# काटे आणि फुले

निर्मलकुमार फडकुले

# काटे आणि फुले



सुविद्या प्रकाशन

# काटे आणि फुले

डॉ. निर्मलकुमार फडकुले



सुविद्या
प्रकाशन

काटे आणि फुले
Kate Aani Phule

डॉ. निर्मलकुमार फडकुले
Dr. Nirmalkumar Phadkule

© मंदाकिनी फडकुले

प्रकाशक
सुविद्या प्रकाशन
३७४, उत्तर कसबा,
सोलापूर - ४१३ ००७

प्रथम आवृत्ती
२८ जुलै २००७

अक्षर जुळणी
जयंती ऑफसेट,
सोलापूर

मुद्रक
विनंद ऑफसेट
सोलापूर.

मुखपृष्ठ
शिरीष घाटे

मुद्रितशोधन
पुरुषोत्तम नगरकर

मूल्य : १२० रु.

’काटे आणि फुले’ हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक २००७ साली ‘सुविद्या प्रकाशन’ यांनी प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्या्चे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

## ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# काटे आणि फुले

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

चि. अजित

या विवेकी व आनंदी मुलास

ज्यानं माझं जीवन संवेद्य व संपन्न बनवलं

# थोडं मनातलं

माझ्या मनात वैचारिक लेखसंग्रह लिहिण्याचं फार दिवसांपासून होतं. वैचारिक लेखन यापूर्वीही केलं आहे पण या संग्रहात त्याला परिपूर्णता लाभली आहे.

साहित्याचा प्रकार कोणताही असो जीवनाच्या कडूगोड अनुभवांमुळे साहित्याला जिवंतपणा येतो. माझं वैचारिक लेखन किती जीवनदर्शी आहे कितपत हृदयस्पर्शी आहे हे वाचकांनी ठरवायचं आहे. त्यासाठी लेखकाला अधिक तप करावं लागतं. तो यशस्वी नसला तरी चालेल; पण जीवनानुभवांच्या क्षेत्रात तपस्वी असणं आवश्यक आहे.

चिंतनशील प्रकृतीचा लेखक वाचकनिष्ठ असण्यापेक्षा विचारनिष्ठ असतो. बाह्यतः तो खेळकर आणि क्वचित खोडकरपणानं लिहिल; पण त्याला एखाद्या विशिष्ट विचाराचं मंथन करायचं असतं त्यामुळं तंत्र आणि शैली यांची कुंपणं आपल्या चिंतनाभोवती तो उभी करीत नाही. आपल्या अस्वस्थ मनाचे पदर उकलून दाखवणं आपल्या काही आशा-आकांक्षा व्यक्त करणं आणि आजच्या सामाजिक स्थितीगतीवर एखादा प्रकाशकिरण टाकणं लेखकाला अपरिहार्य वाटतं. याच पद्धतीनं या पुस्तकातील लेखन मी केलं आहे. ते कितपत प्रत्ययकारी आहे हे अर्थातच वाचकांनीच ठरवायचं आहे.

सुविद्या प्रकाशनाचे संचालक आणि माझे मित्र श्री. बाबुराव मैंदर्गीकर यांच्या स्नेहभावानं हे सारे लेख एकत्रित करून त्यांच्या स्वाधीन केले. या लेखात 'काटे आणि फुले' नावाप्रमाणेच सर्वत्र विखुरलेले दिसतील. सुख-दुःखाशिवाय जीवनाला पूर्णताच येत नाही. वाचकांनी आता या पुस्तकाचं स्वागत त्यांच्या इच्छेप्रमाणं करावं.

प्रकाशनाबद्दल बाबुराव मैंदर्गीकर यांचे आभार !

– निर्मलकुमार फडकुले

सारेच दीप कसे मंदावले आता ! / १
सीता आणि द्रौपदी : काही विचार / १२
सामाजिक समतेसाठी झालेल्या चळवळी : एक अवलोकन / २३
नियती आणि पुरुषार्थ / ४२
अज्ञान आणि अंध:श्रद्धा / ५०
छत्रपती शाहू : इतिहास घडविणारा लोकराजा / ५९
साहित्यिक फुले / ७१
माणुसकीचा स्पर्श / ८०
स्त्रीजीवनाला नवी दिशा देणारी सावित्री / ८७
डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा अन्वयार्थ / ९७
परमेश्वर तर्काच्या चौकटीत राहू शकत नाही / १०४
समतेचा सूर आळवणारा संप्रदाय / १०९
जगाला प्रेम अर्पावे / ११७
विवाह हे सर्वस्व नव्हे / १२५
असे नेतृत्व पाहिजे / १३४
धर्म म्हणजे काय / १४१
अर्जुनाचा प्रश्न / १४८
आजच्या शिक्षणक्षेत्राचे दर्शन / १५७
साहित्यातले तीन प्रवाह एकत्रित यावेत / १६३
आम्ही गांधीजींना विसरलो काय ? / १६७

## डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे प्रकाशित साहित्य

लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व
साहित्यवेध
संतकवी तुकाराम : एक चिंतन
काही रंग काही रेषा
हिरव्या वाटा
आनंदाची डहाळी
संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना
जगायचं कशासाठी ?
रंग एकेकाचे
संत सहवास
संतांचिया भेटी
अमृतकण कोवळे
संतवीणेचा झंकार
समाजपरिवर्तनाची चळवळ : काल आणि आज
सुखाचा परिमळ
संत तुकारामांचा जीवनविचार
मन पाखरू पाखरू
साहित्यातील प्रकाशधारा
संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी
प्रिय आणि अप्रिय
चिंतनाच्या वाटा
दीपमाळ
अजून जग जिवंत आहे !
काटे आणि फुले

**संपादित**

ज्ञानेश्वरी : अध्याय पहिला
चिपळूणकरांचे तीन निबंध
प्रबोधनातील पाऊलखुणा
निवडक लोकहितवादी
रत्नकरंड श्रावकाचार
यात्रिक
कल्लोळ अमृताचे

# सारेच दीप कसे मंदावले आता !

भारतीय स्वातंत्र्याला आता साठ वर्षे झाली. ब्रिटिशांच्या जोखडाखाली आपला देश दीड शतकाहून अधिक काळ हालअपेष्टांत कसातरी जगत होता. पारतंत्र्यातलं जगणं हा मरणाचाच एक लाजिरवाणा प्रकार असतो. स्वातंत्र्याच्या संग्रामात अनेक देशभक्तांना आत्माहुती द्यावी लागली. ज्योतीच्या भोवती प्रकाशवेड्या पतंगानं घिरट्या घालाव्यात, ज्योतीशी एकरूप होण्याचा प्रयत्न करावा आणि त्यातच त्याचे पंख जळून जावेत त्याप्रमाणं स्वातंत्र्याच्या ज्योतीभोवती अनेक राष्ट्रभक्तांच्या प्राणांचे पतंग प्रदक्षिणा घालीत होते. आणि त्यातच जळत होते. आपल्या सर्वस्वाचं त्यांनी बलिदान केलं. वर्षानुवर्षे चाललेला स्वातंत्र्याचा लढा खरोखरच दिव्य होता. महान होता. राम प्रसाद बिसमिल नावाच्या कवीनं फासावर जाताना लिहिलेल्या कवितेच्या दोन ओळी उल्लेखितो.

सरफरोशीकी तमन्ना आज हमारे दिलमे है ।
देखना है जोर कितना बाजूए कातिलमे हैं ॥

त्याची संपूर्ण कविता देशप्रेमानं रसरसलेली आहे. माझी हत्या करणाऱ्याच्या बाहूत किती सामर्थ्य आहे हे मी आज पाहणारच आहे. मस्तक कापलं गेलं तरी बेहत्तर ! या आशयाची ही कविता केवळ गुणगुणतानाही सर्वांग रोमांचित होतं.

सावरकरांसारख्या अनेक क्रांतिकारकांनी काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना असंच उन्मत्त आव्हान साम्राज्यशाहीला दिलं होतं. एका कवितेत ते आत्मप्रत्ययानं म्हणतात,

अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला
मारिल रिपु जगती असा कवण जन्मला

मी अवध्य आहे. मला आदि अंत नाही. मला मारू शकेल असा कोण शत्रू आहे ? हा सवाल कवी शत्रूंना करतो. सुभाषचंद्र बोस यांचं एक तेजस्वी वचन सर्वांच्या लक्षात असेल - 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दूँगा' फासावर निघालेला एक तरुण स्वातंत्र्यवीर आपल्या दुःखी आईला सांगतो, 'भेटेन नऊ महिन्यांनी'. स्वातंत्र्याच्या दीर्घ लढ्यात अनेक वीरांनी आपल्या वाटेवर आपल्याच

हातांनी धगधगीत निखारे पसरले. आणि त्यावरून ते बेगुमानपणे होरपळत्या पायांनी चालत गेले. स्वातंत्र्य हेच त्यांचं एकमेव लक्ष्य होतं. तो कालखंड वीर आणि क्रांती या दोन रसांनी रंगलेला होता. मरणाची भीती मावळली होती. आणि स्वातंत्र्याची भक्ती मनामनांत पेटली होती. त्या काळाची आठवण आज पुसट चालली आहे. नव्या पिढीला तर तो भव्य दिव्य इतिहास माहीत नाही. पण त्यावेळी एखादं स्वातंत्र्यगीत ऐकताना, 'वंदे मातरम्' हा घोष करताना लक्ष लक्ष जनतेच्या धमन्यांतून रक्त उसळून यायचं ! त्या रक्तात उष्णता होती. महत्वाकांक्षा होती. स्वप्नं होती. त्या पार्श्वभूमीवर आजचा काळ स्वातंत्र्याचा असूनही नीरस आणि गद्यप्राय वाटतो. त्या कालखंडात घनदाट काळोख असूनही आपल्या ध्येयवादाची मशाल हातात घेऊन माणसं काटेकुटे तुडवीत बेदरकार चालत होती. आज स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे झाली. तरीही आमचा देश खरोखरच स्वतंत्र झाला का ? हा प्रश्न राहून राहून मनात उभा राहातो. इंग्रजांच्या हातून स्वातंत्र्य हिसकावून घेतलं. पण आमच्या हातात ते खरोखरच आहे काय ही शंका मनाला अस्वस्थ करते. स्वातंत्र्याचा लढा लढताना देश जेवढा सुखी होता तेवढा तो आज स्वस्थ आहे काय ? गांधी आणि नेहरू यांच्या उंचीची व्यक्तित्वं आज दिसत नाहीत. डॉ. आंबेडकरांचं लढाऊ नेतृत्व आज का दिसू नये ? देश स्वतंत्र असो की परतंत्र असो अन्यायी प्रवृत्तीशी संघर्ष करण्याची रगेल आकांक्षा माणसांच्या मनात असायलाच हवी. पण कर्तृत्वाचे आणि नेतृत्वाचे दिवे आज उत्तरोत्तर का क्षीण होत आहेत याचा गंभीरपणानं विचार केला पाहिजे.

भारताला स्वातंत्र्य द्यावं, ब्रिटिश साम्राज्यानं भारतावरचा अधिकार सोडावा अशा आशयाचा प्रस्ताव ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आला, तेव्हा प्रसिद्ध मुत्सद्दी आणि एकेकाळचा ब्रिटनचा पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यानं या प्रस्तावाला आपल्या घणाघाती भाषणातून विरोध केला. चर्चिल हा साम्राज्यवादी विचारसरणीचा नेता होता. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्याचा त्यानं प्रयत्न केला होता. गांधीजींच्या मतांचा त्यानं नेहमीच उपहास केला होता. एकवीस दिवसांच्या उपोषणात गांधीजींचा मृत्यू होईल अशी त्याला बळकट आशा वाटत होती पण स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय गांधींचं जीवन संपणार नव्हतं. कारण त्यांचं संपूर्ण जीवन अन्याय आणि अत्याचार यांच्याविरुद्ध तीव्र प्रतिकार करण्यातच व्यतीत व्हावं ही त्यांची उत्कट, आत्मिक इच्छा होती. १९४२ मध्ये 'करेंगे या मरेंगे'

आणि 'छोडो भारत' अशा घोषणा देऊन त्यांनी आपला संग्राम अधिकच तीव्र केला. गांधींच्या वादळी शक्तीपुढं ब्रिटिश साम्राज्य हतबल झालं. त्या साम्राज्याचा सूर्य भारतात तरी अस्तंगत होणार हे ठरल्यावर चर्चिलनं पार्लमेंटमध्ये विरोधी भाषण केलं. तो आवेशानं म्हणाला,

''हिन्दुस्थानला स्वातंत्र्य देऊ नये या मताचा मी आहे. स्वातंत्र्याची जबाबदारी पेलण्याची या हिन्दी लोकांत कुवत नाही. ते आपसात रक्तपात करीत राहतील. स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचा अर्थही त्यांना कळू शकणार नाही. नाना प्रकारच्या जातींनी आणि धर्मांनी विभागलेला हा देश कधीही एकसंध होणार नाही. स्वातंत्र्याचं दान यांच्या हातावर सोडणं हा एक अविचार आहे. ब्रिटिशांनीच यांचं रक्षण केलं. आमच्यामुळेच या देशात प्रगती झाली. शांती नांदली. शांततेनं राहून प्रगती करणं हिंदुस्थानातल्या लोकांना शक्य होणार नाही. अराजकाचं वातावरण निर्माण होईल. दंगली, जाळपोळ आणि अत्याचार यांचे वणवे पेटतील. कारण या देशाला लोकशाहीची कधीच परंपरा नव्हती. म्हणूनच अपात्र, असमर्थ आणि अविचारी लोकांच्या हातात स्वातंत्र्य देण्याच्या प्रस्तावाला माझा तीव्र विरोध आहे.''

चर्चिलच्या विचारात आक्रमक साम्राज्यवादी मनोवृत्ती कशी होती याचं प्रतीक म्हणून या भाषणाचा उल्लेख करता येतो. त्याच्या शब्दांत हिंदी जनतेविषयी कटुता आणि तुच्छता होती. ब्रिटिश साम्राज्याविषयी अतिरेकी अभिमान होता. आपलं साम्राज्य अभंग ठेवणं आणि भारताला पारतंत्र्यात डांबून ठेवणं हे तो आपलं कर्तव्य मानीत होता. ही टीका त्याच्या मनोवृत्तीवर आणि विचारावर निश्चित करता येईल. 'भारतीय स्वातंत्र्याचा कट्टर दुश्मन' असं विशेषण त्याला अनेकांनी बहाल केलं होतं. एखादा देश आपल्या हुकुमशाही पंजाखाली वर्षानुवर्षे दडपून ठेवणारा, कधीही स्वातंत्र्याचा प्रेमी असणं शक्य नाही. साम्राज्यवादी वातावरणात पोसलेला चर्चिलचा मन:पिंड होता. खरं तर दुसऱ्या महायुद्धात त्यानं नाझीवादाला कणखर विरोध करून हिटलरला नेस्तनाबूद करण्यासाठी सतत प्रयत्न केले. युद्धाच्या ज्वाळांतून इंग्लंडला वाचवलं. तो एक चांगला लेखक आणि प्रभावी वक्ता होता. पण साम्राज्यवादी विचारांचे जंतू त्याच्या रक्तात भरलेले होते. पण ही टीका करताना त्यानं जे हिंदुस्थानविषयक विचार मांडले त्याचा आपणही तटस्थपणानं विचार केला पाहिजे. स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानात पुढं काय घडेल याची या राजकारणपटू मुत्सद्याला कल्पना होती.

चर्चिलचा विरोध ब्रिटिश पार्लमेंटनं न जुमानता भारताला स्वातंत्र्य दिलं. देशाची फाळणी झाली. आणि हिंदू-मुसलमानांच्या रक्ताच्या नद्या स्वातंत्र्याच्या पहिल्याच वर्षात दुथडी भरून वाहिल्या. गांधीजींच्या प्रयत्नानं देखील देशातलं रक्तपाताचं घोंघावणारं वादळ शमलं नाही. एक दिवस गांधींचंच रक्त सांडलं. आणि स्वातंत्र्याच्या या शिल्पकाराचा हिंसेनं बळी घेतला. चर्चिलचे कडवट शब्द खरे ठरावेत हे दुर्दैव आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दोनच वर्षात हिंसेचं महाभारत घडलं.

आजही साठ वर्षानंतर हा रक्तरंजित प्रवास चालूच आहे. काश्मीरमध्ये दररोज निरपराध स्त्री-पुरुषांचे आणि बालकांचे बळी पडत आहेत. कशासाठी हा भीषण रक्तपात आणि मनुष्यसंहार ? कशासाठी घरंदारं पेटवली जातात ? फाळणीच्या काळात हजारो स्त्रियांवर का म्हणून बलात्कार झाले ? बालकांना आणि वृद्धांना गोळ्या घालून आजही का मारलं जातं ? स्वातंत्र्याच्या काळात मरण स्वस्त आणि जीवन महाग कशामुळं झालं ? याचं कारण माणसांच्या कपाळावर विशिष्ट धर्मांचे आणि जातींचे शिक्के आहेत. हिंदू आणि मुसलमान, एकमेकांचं रक्त सांडणं हा धर्म मात्र इमानानं पाळत आहेत. खरं तर हिंदू आणि इस्लाम या दोन्ही धर्मांची मूलभूत भूमिका भक्तीची, प्रेमाची आणि शांतीची आहे. पण हिंसेचे प्रचंड वणवे पेटवण्यात येतात आणि माणूसच माणसाचा शत्रू होतो.

गेल्या साठ वर्षात आमच्या शांतिप्रधान म्हटल्या जाणाऱ्या देशात जात आणि धर्म यांच्यावरून किती दंगली झाल्या आणि त्यात किती हिंसा झाली याचं संशोधन करणंही कठीण आहे. केवळ हिंदू-मुसलमानांचेच नव्हे तर भिन्न भिन्न संप्रदायातले दंगे सारखे घडत आहेत. शत्रुत्वाची परंपरा धगधगत ठेवण्याची जबाबदारी आम्ही यथाशक्ती पार पाडीत आहोत. चर्चिलच्या उद्गारात अतिशयोक्ती नव्हती असं खेदानं म्हणणं भाग आहे. धर्म हा विषय माणसांनी हिंसेचा आणि जाळपोळीचा करून ठेवावा ही धर्माची विटंबना आहे. इथल्या साधुसंतांनी शांतीची आणि एकतेची महती शतकानुशतकं गायिली आहेत. 'हे विश्वचि माझे घर' हा विचार प्रत्येक धर्मपुरुषानं उंच स्वरात सर्वत्र पोहोचवला. पण अजूनही भारतातला माणूस आपल्या कपाळावरचे जाती-पातींचे शिक्के पुसायला तयार नाही. 'सर्वधर्मसमभाव' या तत्त्वाची शक्य तितकी पायमल्ली या देशात होते. सेक्युलॅरिझमचे नगारे वाजवणाऱ्या देशात सांप्रदायिकता वाढत चालली आहे. माणूस माणसाजवळ माणूस या नात्यानं येत नाही. तो आपल्या जातीचा

आणि संप्रदायाचा विसर पडू देत नाही.

जात, धर्म आणि संप्रदाय यांच्या भेदांचा इतका बुजबुजाट झालेला दुसरा देश दाखवता येणं अवघड आहे. जातीय भेद सर्वच देशात थोडे फार आहेत. पण भारतात ते पराकोटीला गेलेले दिसतात. याची उदाहरणं देण्याचं कारण पडत नाही इतके हे भेद स्पष्ट आहेत. यामुळंच राष्ट्रीय एकात्मतेचं स्वप्न हे स्वप्नच राहिलेलं आहे.

वस्तुत: जातींच्या आणि संप्रदायांच्या भिंती कोसळून पडल्या तर भारत हे जगातलं बलाढ्य राष्ट्र होईल. पण आज तरी हे मृगजळासारखं फसवं, आभासात्मक सत्य आहे इतकंच याबाबतीत म्हणता येईल. पावलोपावली सांप्रदायिकतेची कुंपणं उभी राहिली. माणूस हे ईश्वराचं रूप आहे अशा अर्थाची भजन-कीर्तनं आम्ही कित्येक वर्ष ऐकत आलो. पण माणूस हे सैतानाचं रूप आहे याचा अनुभव मात्र नित्य यावा अशी परिस्थिती आहे. धर्म-जातीवरून प्रत्यही उत्पन्न होणारे गुंतागुंतीचे प्रश्न कधी सुटतील अशी चिन्हं दिसत नाहीत. 'ईश्वर अल्ला तेरे नाम, सबको सन्मती दे भगवान' ही प्रार्थना उच्चारणं यापलीकडं कोणीच काही करू शकत नाही. ब्रिटिशांनी धार्मिक तेढ वाढवण्याचं कुटिल राजकारण केलं हे काही अंशी खरं असलं तरी भारताच्या इतिहासातच जात-धर्मांची अभेद्य कुंपणं कित्येक शतकांपासून उभी आहेत आणि गेल्या साठ वर्षांत त्यांना संरक्षण देण्याचं कार्य इथल्या राजकीय पक्षांनी मतांच्या राजकारणासाठी चालू ठेवलं आहे. आम्ही कबीर-तुकारामांचा आणि फुले-गांधींचा पराभव केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जातिव्यवस्थेची शक्ती वाढत गेली, हे विधान सर्वमान्य व्हावं असंच आहे.

पण गेल्या साठ वर्षांत या देशात काहीच प्रगती झाली नाही असं म्हणणं चुकीचं ठरेल. शेतीचं उत्पादन वाढलं. औद्योगिक क्षेत्रात नवनवीन उद्योग आणि कारखाने निर्माण झाले. अनेक धरणं बांधली गेली. शाळा-कॉलेजं आणि विद्यापीठं यांची संख्या व गुणवत्ता या बाबतीत लक्षणीय प्रगती झाली. भारत हा अण्वस्त्रधारी देश बनला. हे चित्र आशादायक आहे. पण तरीही नुसत्या भौतिक प्रगतीला अर्थ नसतो. सांस्कृतिक क्षेत्रात या राष्ट्राची उंची कितपत वाढली की कमी झाली या प्रश्नाचाही विचार आवश्यक ठरतो. आर्थिक विकासाचं चित्रही फारसं स्पृहणीय नाही. दारिद्र्य रेषेखाली कसंबसं जगणाऱ्या लोकांची टक्केवारी पाहिली तर हे चित्र अधिकच निराशाजनक ठरेल. बेकार तरुणांच्या संख्येत अमर्याद भर पडत आहे.

त्यातून गुन्हेगारी, व्यसनीपणा इत्यादी दुर्गुणांना भरती येत आहे. 'राष्ट्रीय चारित्र्य' नावाची गोष्ट दृष्टीला पडत नाही. जेव्हा चारित्र्याच्या खालच्या पायरीवर देश उभा राहतो तेव्हा त्याच्या भौतिक उत्कर्षालाही मर्यादा पडतात. मोठ्या शहरातल्या अनेक मजल्यांच्या इमारती लक्षवेधक ठरतात. पण उंच इमारतीत खुजी माणसं राहतात. हे दृश्य मात्र केविलवाणं आहे. गेल्या काही वर्षांत आपला देश भ्रष्टाचारी प्रवृत्तींनी अंतर्बाह्य पोखरला जात आहे. भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडलेल्या या देशाची चिंता करायलाही आता राज्यकर्त्यांना, प्रशासकीय अधिकाऱ्यांना फारसा वेळ नाही. कारण ते देखील या विळख्यात सापडलेले असावेत हे खेदजनक आहे. 'येन केन प्रकारेण' अधिकारपद मिळवायचं आणि त्या पदाचा अधम पातळीवर जाऊन दुरुपयोग करायचा, आपला नागडा-उघडा स्वार्थ साधायचा ही तर आता लोकमान्य आणि राजमान्य रीत होऊन बसली आहे.

मी माझ्या प्रामाणिक श्रमावर आणि निढळाच्या घामावर जगेन असं म्हणणारे शासकीय अधिकारी आणि मंत्री कुठे आढळतील; या प्रश्नाचं उत्तर, ते एखाद्या कवीच्या कल्पनाराज्यातच आढळणं शक्य आहे असंच द्यावं लागेल. भ्रष्टाचार हा जीवनातील यशाचा आद्य, मध्य आणि अन्त्य बिंदू ठरू पाहात आहे. राजकारणापासून समाज, शिक्षण, उद्योग, न्याय आणि धर्म या सर्वच क्षेत्रांत भ्रष्टतेची दुर्गंधी असावी हा एक भयानक शाप आहे. गांधीजी म्हणाले होते, राजकारणाला नैतिकतेचं अधिष्ठान असलं पाहिजे. हे गांधी केव्हाच कालबाह्य झाले. त्यांचं शरीर एका मारेकऱ्यानं नष्ट केलं. तर त्यांचा आत्मा आज त्यांचाच जयघोष करीत सर्व क्षेत्रांतले सत्ताधारी छिन्नभिन्न करीत आहेत. नाव राहिलं पण गाव वाहून गेलं तशी ही अवस्था आहे.

महाभारतातल्या एका कथेची इथं आठवण होते. एकानं आपलं शेत दुसऱ्याला विकलं. ते शेत नांगरताना सुवर्णमोहरांचा एक मोठा हंडा सापडला. ज्यानं शेत विकत घेतलं होतं त्यानं मूळ मालकाला तो हंडा स्वीकारण्याची विनंती केली. त्याचं म्हणणं असं होतं, 'मी शेत विकत घेतलं पण त्यातला मोहरांचा हंडा तुमच्या मालकीचा आहे. मी केवळ जमीन विकत घेतली. हंडा नव्हे.' पण विक्रेत्यानं उत्तर दिलं, ' मी शेत विकलं. याचा अर्थ शेतात जे काही असेल ते तुमच्या मालकीचं आहे.' कोणीच तो मोहरांचा हंडा घ्यायला तयार झाला नाही. अखेर हे भांडण न्यायालयात गेलं.' ही कथा आठवते आणि हसू येतं. शील आणि

प्रामाणिकपणा यांची ही कथा आजच्या परिस्थितीत मनोरंजनासाठी ठीक आहे.

चंद्रगुप्ताला सिंहासन मिळवून देणारा चाणक्य एका साधारण झोपडीत राहत होता. राजाचा हा गुरू आणि राज्याची सूत्रे सांभाळणारा सर्वोच्च शासक सरकारी काम करताना रात्री सरकारी खर्चानं दिवा वापरायचा पण ते काम संपलं की मग आपल्या खर्चानं घेतलेला खाजगी दिवा वापरीत असे. अलीकडच्या काळातही टिळक, गांधी आणि शास्त्री यांच्यासारखे चारित्र्यसंपन्न नेते आपल्याला मिळाले. पण आता ते अद्‌भुत दंतकथांचे नायक बनले आहेत. कोट्यवधी रुपयांचा प्रचंड घोटाळा करण्याची क्षमता असलेले प्रशासक हा आज नियम झाला आहे. या नियमाला काही अपवाद असू शकतात. पण ते अपवाद बऱ्याच प्रयासानंतर योगायोगानं भेटतात. राष्ट्रीय चारित्र्याची ही घसरण आता जनतेला सुद्धा फारशी तापदायक वाटत नाही. कारण ती अंगवळणी पडली आहे. 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे' हे तुकारामांचं वचन म्हणजे एका संताचं निरुपयोगी सुभाषित म्हणून पाठ केलं जातं. आणि पाठ केल्यावर त्याच्याकडं पाठ फिरवली जाते. चारित्र्याकडं पाठ फिरवल्याशिवाय 'यशस्वी' होता येत नाही हे आज आमच्या देशातले व्यवहार पाहिल्यानंतर लक्षात येतं.

एक व्यवहारकुशल अधिकारी आपल्या वातानुकूलित कार्यालयात बसून बोलत होते, ''हाती सत्ता असूनदेखील जो माणूस कोरडा राहातो तो ठार वेडा असतो. कोणत्याही मार्गानं पैसा मिळवायचा असतो. परमेश्वरसुद्धा पैशानं वश होतो. आपण सत्तेवर आहोत तोपर्यंत कित्येक कोटींची तरतूद करून ठेवावी आणि पाच-दहा लाख खर्च करून एखादं मंदिर उभं करावं. होमहवन करावं. साधुसंतांचे आशीर्वाद देखील सत्ता आणि संपत्ती असेल तरच मिळतात. सत्तेसाठी पैसा आणि पैशासाठी सत्ता असं चक्र फिरवावं लागतं. चारित्र्य आणि देशभक्ती असले शब्द सभेत टाळ्या मिळवण्यासाठी राखून ठेवावेत. सत्तेवर राहूनसुद्धा जो संपत्तीपासून अलिप्त राहातो त्याला मूर्खांच्या संमेलनाचं अध्यक्षपद द्यावं.''

त्या महान अधिकाऱ्यानं 'अर्थपूर्ण' विचार मांडून आपलं प्रवचन संपवलं. ही स्थिती सर्वच क्षेत्रात पाय पसरीत आहे. राजकारणात तर अशाच प्रशिक्षित पुढाऱ्यांची गर्दी झालेली दिसते. निखळ देशभक्त आणि नैतिक मूल्यांचा आदर करणारे लोक प्रत्येक क्षेत्रातून झपाट्यानं कमी व्हावेत ही एका अर्थानं देशाची अधोगती नव्हे काय ? ज्ञान आणि चारित्र्य यांची उंची ज्या देशाला लाभते तो देश

नवा इतिहास घडवू शकतो. मूठभर लोकांनी गबर व्हावं आणि खंडीभर लोकांनी फूटपाथवर उभं राहून भीक मागावी हा देखावा राष्ट्रीय प्रगतीचा द्योतक नव्हे. लोकसभेच्या निवडणुकीत फुलनदेवीसारखी कुख्यात दरोडेखोर देखील निवडून येते आणि खासदार म्हणून देशाचं भवितव्य घडवण्याच्या कार्यात सहभागी होते. विधिमंडळात आणि संसदेत गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेले लोक लोकांचे प्रतिनिधी म्हणून बसू शकतात हा आमच्या लोकशाहीतला एक चमत्कार आहे. राजकारणात गुन्हेगार क्वचित प्रमाणात असू शकतात पण त्यांच्याच हातात राजकारण करण्याची व त्यावर नियंत्रण ठेवण्याची शक्ती आली तर ते लोकशाहीवरील संकट नव्हे काय ?

स्वातंत्र्य आणि लोकशाहीसाठी ज्या स्त्री-पुरुषांनी बलिदान केलं ते अशा प्रकारच्या लोकशाहीसाठी मुळीच नव्हे. देशभक्तांच्या स्वप्नातला हाच स्वतंत्र भारत होता काय ? स्वातंत्र्याची साठ वर्षे उलटली पण अजूनही शिक्षणाचा गंधस्पर्श न लाभलेले कोट्यवधी लोक भारतात आहेत. कुपोषित बालकांचा प्रश्न आज ऐरणीवर आहे. कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या आत्महत्या दररोज होत आहेत. मग हे स्वातंत्र्य आणि ही लोकशाही नेमकी कुणासाठी आहे ? साठ वर्षांत काही बाबतीत प्रगतीची पावले पडली असली तरी समोर पसरलेला शेकडो मैलांचा रस्ता किती काट्याकुट्यांनी व खाचखळग्यांनी भरलेला आहे याची जाणीव बहुसंख्य लोकांना नाही. उन्हातान्हात खपणारे शेतकरी आणि कामगार 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' असं म्हणून कपाळाला हात लावून बसले आहेत. जे आमच्या प्रारब्धात असेल ते भोगलंच पाहिजे, ही अगतिकतेची भाषा बहुतेकांच्या तोंडून ऐकू येते. स्वतंत्र देशातला स्वतंत्र माणूस अशी त्याची ओळख त्याला स्वत:लाच नाही. हे चित्र आज आपल्या देशात दररोज पाहायला मिळतं यात कोणत्याही प्रकारची अतिशयोक्ती नाही.

हे सारे प्रकार भारताच्या मातीत खोलवर का रुजत चालले आहेत याची मीमांसा करताना अनेक मुद्दे लक्षात येतात. वाढतं दारिद्र्य, मानगुटीवर बसलेली जातीय विषमता, चुकीचं नियोजन, राजकीय पक्षांची सत्तेसाठी चालणारी स्वार्थी साठमारी, शेती आणि पाणी व लोकसंख्या या प्रश्नांकडं राज्यकर्त्यांचं झालेलं दुर्लक्ष, स्वार्थासाठी समाज आणि देश यांच्याशीही द्रोह करण्याची पाशवी वृत्ती, शिक्षणाचा भरलेला आणि वाढत चाललेला बाजार अशी अनेक कारणं देता येतील. शासनाचं आणि जनतेचं या समस्यांकडं अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. शिक्षण-

संस्था देखील विद्याविक्रीची किफायतशीर दुकानं थाटून बसल्या आहेत. गरिबांना परवडणार नाही इतकी महागडी शिक्षणपद्धती आज रूढ झाली आहे. त्या क्षेत्रातही नानाप्रकारचे भ्रष्ट विचार आणि आचार रुजत चालले आहेत. खरं तर हे विस्तारानं सांगायचं कारण नाही. दररोजच्या वृत्तपत्रात आपल्या राष्ट्रीय चारित्र्याचा पंचनामा करणाऱ्या अनेक बातम्या प्रसिद्ध होतात. त्यामुळं निष्कारण शब्दांचा पसारा वाढवीत बसण्याचं कारण नाही.

'सत्यमेव जयते' हे आपल्या देशाचं ब्रीद आहे. सत्य, न्याय, देशप्रेम, इत्यादी साऱ्या मूल्यांचं दु:शासनी वस्त्रहरण होत असलेलं पाहून एक नव्वदीच्या घरातले स्वातंत्र्य सैनिक डोळ्यांत अश्रू आणून म्हणाले, ''आम्ही गांधीजींच्या पवित्र पावलांवर नतमस्तक होऊन स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेतला. माझा संसार धुळीला मिळाला. देशाचा भाग्योदय होईल म्हणून आम्ही सत्याग्रह्यांनी लाठ्या खाल्ल्या, उपवास केले. ध्येयाच्या मागं धुंदपणानं धावत गेलो. त्याचं काय फळ मिळालं ? हे सारं पाहण्यापेक्षा परमेश्वरानं माझी सुटका करावी. जे गेले ते भाग्यवान होते. आम्ही दुर्भागी मात्र मागे राहिलो.''

त्या स्वातंत्र्यसैनिकाची स्वप्नं उद्‌ध्वस्त झाली होती. वास्तव तर त्याला पाहवत नव्हतं. त्याची खोल निराशा त्याच्या डोळ्यांतून दिसत होती.

कवी अनिल यांच्या एका कवितेची मला आठवण झाली -

सारेच दीप कसे मंदावले आता
ज्योती विझू विझू झाल्या
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने
असे कुठेच तेज नाही !
थिजले कसे आवाज सारे ?
खडबडून करील पडसाद जागे
अशी कुणाची साद नाही
या रे या द्या जीव द्या वाणीवर
अशी वाणी निघत नाही !

या कवितेवर वेगळं भाष्य करण्याचं कारण नाही. आशेचा, ध्येयवादाचा, त्यागभावनेचा एकेक दिवा विझून जात आहे. पेटून उठण्यासाठी जे तात्त्विक बळ आणि वैचारिक प्रेरणा आवश्यक असते तिचा अभाव असल्यामुळं या देशात

दुबळ्या मेंढरांची निपज प्रचंड प्रमाणात होऊ लागली आहे. प्रादेशिक अस्मितेच्या गोंडस नावाखाली केंद्रातून फुटून निघण्याची प्रवृत्तीदेखील काही ठिकाणी डोकं वर काढीत आहे. या खंडतुल्य प्राचीन देशासमोर नाना प्रकारची आव्हानं उभी आहेत. ती पेलण्यासाठी निखळ देशभक्ती आणि आव्हानांचा अर्थ समजण्याइतकी बुद्धी व प्रश्न सोडवण्यासाठी शक्ती पाहिजे आहे. हा माझा देश आहे, ही माझी भूमी आहे, या माझ्या देशाला उज्ज्वल इतिहास आहे आणि अधिक तेजस्वी इतिहास आम्हाला घडवायचा आहे असं स्वप्न मनामनांत उगवलं पाहिजे. पण देशाविषयीचं प्रेमच ओहोटीला लागलं आहे. शेक्स्पिअरचं एक वचन - 'Who is here evil that will not love his country ?' आपल्या जन्मभूमीवर प्रेम न करणारा कोण दुरात्मा आहे ?

देशावरचं प्रेम ही उच्च सुसंस्कृत भावना आहे. आपल्याकडे उत्तम इंजिनियर्स आहेत. उत्तम डॉक्टर्स, बुद्धिमान संशोधक, निष्णात उद्योजक पुष्कळ आहेत. पण उत्तम आदर्श माणूस मात्र अभावानंच दिसतो. चांगला प्रशासक, चांगला डॉक्टर हा प्रथम चांगला माणूस असला पाहिजे. केवळ बुद्धिमान लोक देशाचा सर्वांगीण विकास करू शकत नाहीत. बुद्धीबरोबर भावनांचं विकसन होणं हेच चांगल्या माणूसपणाचं लक्षण आहे. एकेकाळी या देशाची माती सुपीक होती. आजच ती इतकी नापीक झाली की तिच्यातून जन्म घेणारा माणूस मातीचं आणि इथल्या माणसांचं ऋण का विसरून जात आहे ? भारतीयत्वाचा अभिमान हा घटक जर इथल्या लोकांच्या रक्तात नसेल तर मग देशाचं भवितव्य अंधारलेलं आहे असं म्हणावं लागेल. पण पुन्हा पुन्हा असं वाटतं की इतकं हताश होण्याचं कारण नाही. दिवे मंदावले असले तरी त्यांच्या वातीवर आलेली काजळी झाडून टाकता येईल. कोरड्या होणाऱ्या वातींना तेल घालता येईल. अंधाराला सुद्धा शेवट असतो.

तीव्र इच्छाशक्ती असेल तर नवनिर्मिती करता येते. 'छंद लागला टिटवीला, तिने समुद्रही आटविला' या वचनात अतिशयोक्ती आहे असं वाटेल. पण ध्यास लागला तर टिटवीसारखा लहान पक्षी सागरसुद्धा शोषून घेऊ शकतो, हे म्हणण्यात अत्युक्ती नाही. जितकं आव्हान मोठं तितकं आपल्यातलं मनोबल वाढू शकतं. जर्मनी आणि जपानसारखे देश दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झाले होते. पण फिनिक्स पक्ष्याप्रमाणं आपल्या राखेतून ते पुन्हा जिवंत झाले. त्यांच्या सर्व शक्ती पुन्हा नवा प्राण घेऊन प्रगतीच्या क्षितिजाकडं झेपावत गेल्या. हा इतिहास आम्ही भारतीयांनी

लक्षात घेतला पाहिजे. बर्लिनची फाळणी झाली होती. जर्मनीतलं ते प्रमुख नगर विभागलं गेलं. पण शहर विभागणारी मजबूत भिंत नागरिकांनी पाडून टाकली. व्यापार-उद्योग, शिक्षण किंबहुना साऱ्याच क्षेत्रांत जर्मनीनं सामर्थ्य एकवटून झेप घेतली. अणुबॉम्बचा विध्वंसक हल्ला पचवून जपाननंही आपले पराक्रमी पंख पुन्हा पसरले. मानवी प्रगतीचा हा एक चमत्कार आहे. भारताच्या तुलनेत कितीतरी लहान असलेली राष्ट्रं हा विक्रम करू शकतात. मग आम्हीच 'सारे दिवे विझत चालले' असं रडगाणं कशासाठी गायचं ? आमच्या देशालाही इतिहास आहे. परंपरा आहे. ती पुनरुज्जीवित करणं अशक्य नाही. अशक्यतेला शक्यतेच्या कोटीत आणता येतं, म्हणूनच इथं प्रथम देशाभिमानाचं बीज प्रत्येक मनात पेरलंच पाहिजे. 'हे राष्ट्र प्रेषितांचे, हे राष्ट्र देवतांचे' या नुसत्या कवितेतल्या ओळी ठरू नयेत. नवनिर्मितीला इथं अवसर आहे. घामातून, श्रमातून आणि उदंड इच्छेतून नवा भारत घडवता येतो.

सारेच दिवे क्षीण होत चालले हे एक वास्तव आहे. पण मंद होत असलेल्या प्रकाशाला नवी चेतना देणारं बळ आमच्या हातांत आणि आत्म्यांत आहे. दृष्टीसमोर एक नवं स्वप्न रेखाटू आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आकाशपाताळ एक करू. परिस्थितीशी संघर्ष केल्याशिवाय प्रगतीची क्षितिजं उजळणार नाहीत.

■■■

# सीता आणि द्रौपदी : काही विचार

रामायण आणि महाभारत हे भारतीय संस्कृतीच्या महावस्त्राचे ताणे आणि बाणे आहेत. भारतीय संस्कृतीचं भव्य दर्शन या ग्रंथांतून होतं. दोन्ही महाकाव्यात ध्येयवाद आहे. पराक्रम व पुरुषार्थ आहे. धर्मनीतीचं सुंदर चित्र आहे. मानवी जीवनातले विविध रंगगंध, नादनिनाद आणि रस यांचं एकत्रित दर्शन यांत होतं. राम आणि कृष्ण, सीता, कुंती, गांधारी व द्रौपदी यांसारख्या कर्तृत्वसंपन्न व्यक्तींचं चरित्र त्यांत आहे. स्वार्थ आणि परमार्थ यांचा संगम दर्शवणारं हे अपूर्ण भांडार आहे. संस्कृती आणि विकृती, उदारता आणि क्षुद्रत्व, शुद्ध आणि अपवित्र यांचं इतकं प्रत्ययकारी चित्र या महाग्रंथांत दिसतं की तसं अन्य साहित्यात पाहायला मिळत नाही. साहित्याच्या क्षेत्रात आकाशाची उंची गाठलेले हे दोन ग्रंथ वंदनीय ठरले आहेत. भारतीय संस्कृतीचा अर्थ आणि अर्क या महाकाव्यांत एकवटला आहे असं म्हटलं तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही. कित्येक शतकं उलटली तरी या ग्रंथांचा सुगंध कधी सुकणार नाही. त्यांचा ताजेपणा कधी ओसरणार नाही. वाल्मीकि आणि व्यास या ऋषींच्या अपूर्व प्रतिभेनं अलंकृत झालेल्या या कलाकृती केवळ भारतीय नसून त्या विश्वात्मक आहेत यात संदेह नाही. अनेक कवी-नाटककारांच्या प्रतिभेला या ग्रंथांनी आवाहन केलं. जो रामायण-महाभारतावर लिहितो तो लोकप्रिय साहित्यिक ठरतो हे आता प्रस्थापित झालं आहे. संस्कृतीला वैभव देणाऱ्या या ग्रंथांची श्रेष्ठता शब्दांतून सांगताना शब्द अपुरे पडतात.

हो दोन्ही ग्रंथ मी मुळातून वाचण्याचा प्रयत्न केला. जिथं शंका उपस्थित होईल तिथं अधिकारी विद्वानांचं साहाय्य घेतलं. दोन्ही ग्रंथ विस्तीर्ण आणि विराट आहेत. त्यांच्या सान्निध्यात माझ्या आयुष्यातल्या काही वर्षांचं सार्थक झालं. जगण्याचा अर्थ त्यांच्या सहवासात मला अधिकांशानं कळला. दीपस्तंभ ही प्रतिमा जुनी झाली तरी अशा वाङ्मयाच्या संदर्भात योजण्याशिवाय गत्यंतर नाही. यातल्या व्यक्ती कवींच्या कल्पनेची अपत्यं आहेत असं कधीच वाटत नाही. या व्यक्ती जित्या जागत्या आहेत. अनेक शतकांपूर्वी होत्या आणि आणखी कित्येक सहस्रके त्या अखंड राहतील इतक्या त्या जिवंत व जातिवंत आहेत. कोणत्या रसायनानं त्या अजर अमर

झाल्या हे आम्हा मर्त्य माणसांना सांगता येणार नाही. पण जेव्हा मन निराशेनं अंधारून जातं तेव्हा धनुर्धारी रामाच्या मुद्रेवरचा आत्मविश्वास मनाला धीर देतो. अर्जुनाच्या धनुष्याचा टणत्कार ऐकू येतो. सीतेचा दुर्दम्य आशावाद आश्वासन देतो. द्रौपदीचे स्फूर्तिदायक शब्द कानांवर येतात. श्रीकृष्णाचं हास्य आणि गांभीर्य जगायला ऊर्जा देतं. जे ग्रंथ जगवतात आणि जागवतात तेच संस्कृतीचे आधारस्तंभ असतात. रामायण-महाभारतातला एखादाही अध्याय किंवा एखादाही श्लोक ज्याच्या वाचनात आला नसेल त्याची मला कीव करावीशी वाटते. जीवनाची महती गाणारे हे दोन ग्रंथ न वाचलेल्या माणसाला जीवन खऱ्या अर्थानं कळलंच नाही इतकंच म्हणावं लागेल. या ग्रंथांतली लहानसहान पात्रंसुद्धा आपापल्या परीनं परिपूर्ण वाटतात. रामायण-महाभारतातले ते कालखंड या एकविसाव्या शतकात देखील दृष्टीसमोर जसेच्या तसे उभे राहतात.

पण आज मला या दोन ग्रंथांतल्या दोन दिव्य स्त्रियांबद्दल थोडं लिहायचं आहे. रामायणाची नायिका सीता आणि महाभारताची द्रौपदी या दोन अत्यंत प्रभावी व्यक्तिरेखांची तौलनिक मीमांसा मी करणार आहे. या दोन्ही स्त्रियांना वनवास भोगावा लागला. त्यांच्या जीवनात लहरी नियतीनं अनेक विलक्षण दुःखसंकटं निर्माण केली. राजवाड्यात जन्मलेल्या (दोघींच्या जन्मकथांत अद्भुतता आहे) या दोन्ही तेजस्विनींना वनवासात कित्येक वर्षं कंठावी लागली, हा नियतीचा विचित्र खेळ आहे.

रामाबरोबर वनवासात जाण्याचा निर्णय सीतेनं स्वत:च घेतला. ती छायेसारखी रामाबरोबर राहिली. याला पातिव्रत्य म्हणण्यापेक्षा उत्कट प्रेम हीच संज्ञा दिली पाहिजे. वनवासातही सीता सुखी होती, कारण हा वनवास म्हणजे रामाचा सहवास होता. सुखदु:खात ज्याची सोबत मिळते त्याच्यावरचं प्रेम हेच सर्वाधिक महत्त्वाचं असतं. त्यादृष्टीनं सीता वनवासातही सुखी होती, यात शंका नाही. वस्तुत: तिनं वनवासात जाणं ही मागणी कैकयीनं केलेली नव्हती. ती राजप्रासादात राहू शकली असती. पण राम हा तिच्या जीवनाचा आत्मा होता. म्हणूनच ती रामाला म्हणाली,

पश्चादपि हि दु:खेन मम नैवास्ति जीवितम् ।
उज्झितायास्त्वया नाथ तदैव मरणं वरम् ॥
इमं हि सहितुं शोकं मुहूर्तमपि नोत्सहे ।
किं पुनर्दश वर्षाणि मीणि चैकं च दु:खिता ॥

(वाल्मीकीय रामायण सर्ग ३०)

तुम्ही मला सोडून वनाकडे जाल तर दु:खभरानं मला जिवंत राहणं अशक्य आहे. अशा अवस्थेत जगण्याची धडपड करण्यापेक्षा मी प्राणांचा त्याग करणं अधिक चांगलं मानीन. दोनघडी विरह देखील मला सहन होणार नाही. चौदा वर्षांची काय कथा ? सीता आणि राम हे दोन वेगळे शब्द नाहीत. 'सीताराम' हा एकच शब्द ठरावा इतकी सीता रामाशी एकरूप झाली होती. सुख असो की दु:ख, रामाच्या समवेतच ते स्वीकारायचं हे तिचं व्रत होतं. आपल्या जीवनाचा राम हा अविभाज्य घटक आहे हे जणू तिच्या श्वासोच्छ्वासात बिंबलेलं होतं. अरण्यवासात देखील ती आनंदानं राहिली. जनकराजाची ही कन्या. या अध्यात्मनिष्ठ पित्याचे संस्कार तिच्यावर झालेले होते. त्यामुळं दु:खाचा वनवास देखील तिनं सुखमय केला. राजसत्तेपासून आणि न्यायापासून दुरावलेल्या रामाच्या आयुष्यात प्रेमाचं व आनंदाचं शीतल चांदणं सीतेनं निर्माण केलं. रामजीवनात स्वत:ला समर्पित केलेल्या सीतेनं त्याला कधी विरोध केल्याचं एकही उदाहरण आढळत नाही. पण न्यायप्रिय, प्रजावत्सल रामराजाकडून तिच्यावर घोर अन्याय झाला हे विसरता येत नाही. रावणाच्या बंदिवासात तिला जबरदस्तीनं राहावं लागलं होतं. त्या अवस्थेतही आपल्या पतीचा तिला क्षणभरही विसर पडलेला नव्हता. युद्धात रावणाचा पराभव करून त्याला ठार मारून रामानं सीतेला मुक्त केलं. पण त्या प्रसंगी त्यानं जे उद्‌गार काढले ते कोणालाही अगम्य वाटतील. ज्या रामचंद्राला आपलं संपूर्ण जीवन भक्तिप्रेमानं वाहिलं त्या सीतेला तिचा प्रिय पती म्हणाला,

''मी आता तुला मुक्त केलं आहे. तुझी इच्छा असेल त्याच्याशी तू विवाह करू शकतेस. आता तुझ्याविषयी मला ममता किंवा आसक्ती नाही. तुला जिकडं जावंसं वाटेल तिकडे तू जाऊ शकतेस. तू भरत किंवा लक्ष्मण यांचा आश्रय घेऊ शकतेस. किंवा शत्रुघ्न, सुग्रीव अथवा बिभीषण यांच्या जवळही राहू शकतेस.''

वाल्मिकी रामायणात युद्धकांडातील ११५ व्या सर्गातील अशा आशयाचे श्लोक आहेत. हे वाचल्यावर कोणाही वाचकाला आश्चर्याचा आणि दु:खाचा धक्का बसेल. त्याग, प्रेम आणि सेवा हे गुण जिच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत सामावले आहेत त्या सीतेवर या उद्‌गारांचा काय परिणाम झाला असेल याची कल्पना करणंही दु:खद आहे. सीतेचं अपहरण करून रावणानं तिच्यावर अन्याय केला पण तिच्यावर रामानं अपशब्दांचा इतका कठोर आघात का करावा ते समजत नाही. एका न्यायी, धर्मविचारी, उदात्त प्रवृत्तीच्या राजानं आपल्या प्रिय पत्नीला हे शब्द

ऐकवावेत ही एक मन विषण्ण करणारी घटना आहे. रामाचे हे उद्‌गार कोणत्याही रामभक्ताला अनाकलनीय आणि असमर्थनीय वाटतील. या उद्‌गारात तुटकपणा, परकेपणा आहे. आपुलकीचा स्पर्श इथं जाणवत नाही. रामायणाच्या काही विद्वान अभ्यासकांशी याबद्दल मी चर्चा केली, पण त्यांच्याकडं याबद्दल समाधानकारक समर्थन नव्हतं. रावणाच्या कारावासात तडफडत राहिलेल्या एका पतिव्रतेच्या पदरात अखेर हे स्नेहशून्य विषारी शब्द पडावेत हे जितकं सीतेचं दुर्दैव आहे तितकंच ते रामाचंही दुर्दैव आहे. 'रामायण' ही अगतिक सीतेच्या दु:खाश्रूंची कहाणी आहे. निष्ठा आणि प्रेम यांच्या कपाळी नियती आपल्या धारदार लेखणीनं वनवासाची तप्त अक्षरं कशी लिहिते याचं हे एक ज्वलंत उदाहरण आहे.

पुढे आपली शुद्धता सिद्ध करण्यासाठी सीतेला अग्निदिव्य करावं लागलं हा प्रसंगही तिच्यावर अन्याय करणारा आहे. सीता कलंकित असती तर तिनं स्वत:च आपल्या जीविताचा शेवट करून घेतला असता. तिच्या चारित्र्याविषयी रामालाही मनातून पूर्ण विश्वास वाटत होता तर अशावेळी अग्निदिव्याला त्यानं संमती का द्यावी ? सीतेच्या मनाला या अन्यायानं किती अनंत यातना झाल्या असतील याची कल्पना करणं कठीण आहे. प्रेमाच्या कसोटीत रामापेक्षा सीता अधिक उच्च पातळीवर होती हे मात्र यातून सिद्ध होतं. तत्कालीन परिस्थितीत अग्निपरीक्षा ही रूढी टाळण्यासारखी नव्हती असा विचार काही पंडित मांडतात. तो मान्य केला तर एका धोब्याच्या शंकेवरून पुन्हा, गर्भवती असलेल्या सीतेचा त्याग करणं कोणत्याही अर्थानं न्याय्य ठरत नाही. प्रजापालनाचं आपलं नियतकर्तव्य तत्परतेनं करणाऱ्या न्यायी राजाला तर हे मुळीच शोभणारं नव्हतं. सीतेचा त्याग ही रामसीतेच्या जीवनातली एक विलक्षण दुर्दैवी घटना आहे. या घटनेचं कोणत्याही रीतीनं समर्थन होऊ शकेल असं वाटत नाही. लक्ष्मण तिला वनात सोडतो त्यावेळी सीता त्याच्याजवळ रामासाठी जो निरोप देते तोही तिनं अत्यंत संयमानं आणि पतीची मर्यादा राखणाऱ्या शब्दांतून दिला आहे. वस्तुत: अशा वेळी दु:खाचा उद्रेक होऊन संतप्त शब्दांतून तिनं रामाचा निषेध केला असता तर ते स्वाभाविक ठरलं असतं. पण अभिजात संयमी, सुसंस्कृत असलेली ही पतिपरायण स्त्री शब्दानं-देखील आपली मर्यादा ओलांडत नाही. ती म्हणाली,

अहं त्यक्त्वा चं ते वीर अयशोभीरुणा जने ।<br>
यच्च ते वचनीयं स्यादपवाद: समुत्थित: ॥

मगा च परिहर्तव्यं त्व हि मे परमा गतिः ।

आपण अपयशाला भिऊन माझा त्याग केला आहे. माझ्यामुळं आपल्यावर लोकापवाद आला तो दूर करणं हे माझंही कर्तव्य आहे. आपणच माझा परम आधार आहात. पुढे ती म्हणाली, ''लक्ष्मणा, तू महाराजांना सांग की 'आपण आपल्या धर्माला अनुसरून वर्तन करावं. मला माझ्या जीविताबद्दल कसलीही चिंता नाही. लोकापवादापासून आपलं रक्षण व्हावं हीच माझी कामना आहे.''

लक्ष्मण निघून गेल्यावर सीतेच्या मस्तकावर दुःखाचं आकाश कोसळलं. 'रामराज्यात' प्रजा सुखी होती. पण राजाच्या राणीला मात्र वनवास घडतो. ती असहाय होते. एखाद्या उत्कृष्ट शोकात्मिकेला आवश्यक असलेले अनेक करुण रसात्मक प्रसंग वाल्मीकीनं रामायणात चित्रित केले आहेत. राम आणि सीता यांचं सहजीवन एकदा रावणानं अपहरण केल्यामुळं संपलं आणि लोकाराधनेसाठी रामानं सीतेचा त्याग करून ते पुन्हा संपवलं. नायक आणि खलनायक या दोघांनीही सीतेच्या जीवनातलं चैतन्य नाहीसं केलं असं म्हटलं तर ते तर्कशुद्ध ठरेल.

सीतेच्या व्यक्तित्वात चंद्रिकेची प्रसन्नता आणि शीतलता आहे. तिच्या सान्निध्यातच रामाच्या जीवनात आनंदाचे, उत्साहाचे आणि तृप्तीचे असंख्य क्षण उगवले. त्याच्या पराक्रमालाही तिच्यामुळं प्रेरणा मिळाली. रामजीवनाचा गाभा म्हणूनच सीतेचा उल्लेख केला पाहिजे. या दोन्ही व्यक्ती श्रेष्ठत्वाच्या उच्च पातळीवर राहिल्यामुळं 'रामायण' हा आदर्शमूल्यांचा प्रकर्ष दाखवणारा एक चिंतनीय ग्रंथ झाला आहे. व्यक्ती कितीही उच्च कोटीच्या असल्या, त्यांच्या जगण्याला नैतिकतेचं अधिष्ठान असलं तरी त्या निर्भेळ सुखी जीवन जगू शकतील असं विधान करता येत नाही. कित्येक वेळा आपल्या नैतिक दृष्टीमुळेच अशा व्यक्ती दुःखसंकटांना आमंत्रण देतात. नियती नावाची एक दुष्ट शक्ती श्रेष्ठ व्यक्तित्वांना सतत छळते. श्रेष्ठत्वालाच दुर्दैवाचा विळखा पडावा ही विसंगती खरोखरच तर्कबुद्धीच्या पलीकडची आहे. ज्या जगात सीतेसारखी शीलवती आणि सौंदर्यवती दुःखांनी होरपळून जाते, ज्या जगात रामासारखा आदर्श पूजक पराक्रमी राजा अनेक आपदांच्या चक्रव्यूहात सापडतो ते जग कोणत्या तत्त्वांवर आधारलेलं आहे हे कळत नाही. विषारी सर्पांची मिठी पडलेला चंदनवृक्ष जर असं म्हणाला की, 'माझा सुगंध हेच माझं मोठं दुर्दैव आहे तर त्याचं हे विधान सयुक्तिक नव्हे काय ? जीवनाची जटिलता आणि कुटिलता समजून घेणं फार कठीण आहे. वंदनीय सीता

अयोध्येच्या जनतेत काही काळ निंदनीय ठरते तेव्हा लोकबुद्धीचे हिशेब तर्काच्या चौकटीत बसवता येत नाहीत. 'रामायण' वाचल्यावर असंख्य प्रश्न आपल्या बुद्धीला वेढा घालून बसतात. आदर्शांची भक्ती करताना माणसाला एवढा तीव्र संघर्ष करावा लागत असेल तर आदर्शांची काटेरी वाट सोडून व्यवहाराच्या धोपट रस्त्यानं चाललेलं अधिक बरं. कित्येक शतकांपूर्वीचे हे राम आणि सीता केवळ कल्पनेचे विषय नाहीत. ते वास्तवतेचे प्रतिनिधी आहेत. कालच्याही जगात या दोन्ही व्यक्ती दुःखी होत्या. आजच्याही जगात त्या दुःखीच राहाव्यात असा नियतीचा संकेत दिसतो. अलौकिक गुणसंपदा व्यवहारनिष्ठ जगाला चालत नाही. सीता ही कारुण्याची, त्यागाची, सेवेची, सहिष्णुतेची आणि शांतीची मूर्ती आहे.

महाभारतातली द्रौपदी ही सीतेसारखीच अविस्मरणीय व्यक्तिरेखा आहे. सीतेप्रमाणंच द्रौपदीलाही अनेक वेळा अन्यायाचा बळी व्हावं लागलं. पण अन्यायाच्या विरुद्ध ती कणखरपणानं बंड करून एखाद्या ज्वालेसारखी उफाळत राहिली. चंद्रकिरणाची शीतलता सीतेत आहे. तर ग्रीष्मातल्या सूर्याची दाहकता द्रौपदीत आहे. सहिष्णुता आणि शांती यांचं माहेरघर म्हणजे सीता. पण अन्याय आणि अत्याचार यांच्याशी कडवेपणानं झुंजत राहणं हा द्रौपदीचा गुणधर्मच आहे. तिचा जन्मच मुळी अग्निकुंडातून झाल्याची कथा महाभारतानं दिली आहे. त्यामुळंच तिच्या व्यक्तित्वाची दीप्ती आणि ओज आगळं आहे. जो कोणी तिच्या सौंदर्याला आणि मनस्वीपणाला भुलून तिच्याकडं विकारी दृष्टीनं पाहतं त्याला तिच्या पायांवर पराभूत होऊन मस्तक टेकवावं लागतं. जयद्रथ आणि कीचक ही उदाहरणं हेच दर्शवितात.

या मानिनीच्या स्वभावातली आक्रमकता कर्ण-दुर्योधनासारख्या वीरांनाही दुःसह वाटली. अन्याय करणाऱ्या विरोधकांना उपहासाचा विषय बनवून त्यांच्यावर मर्मभेदक टीका करण्याची तिला आवड होती. कुशाग्र बुद्धी, स्वाभिमानाची जाण, अन्यायाचा सूड घेण्याची प्रवृत्ती यांच्या बरोबरच शालीनता, रसिकता, श्रेष्ठत्वा-समोर विनम्र होण्याची तत्परता या गुणांची जोड तिला मिळालेली होती. श्रीकृष्णावरची तिची भक्ती आणि प्रीती अलौकिक होती. इतकी की कृष्ण हे तिचं एकमेव आश्रयस्थान होतं. आनंदाच्या आणि दुःखाच्या प्रसंगी तिला पहिलं स्मरण कृष्णाचंच होत असे. कौरव-पांडव युद्धात पांडवांच्या विजयाला कृष्णाची बुद्धी आणि नीती जशी कारणीभूत ठरली तशीच द्रौपदीची प्रेरणाही उपयुक्त ठरली.

कौरवांविषयीचा द्वेषाग्नी पांडवांच्या मनांत धगधगत ठेवण्याचं कार्य वेळोवेळी द्रौपदीच्याच तेजस्वी शब्दांनी केलं आहे. सीतेमुळं रामायण घडलं तर द्रौपदीमुळं महाभारत घडलं. या दोन्ही नायिका शतकानुशतकं भारतीय मनाला प्रेमाची आणि पौरुषाची शिकवण देत आहेत. रावणासारख्या बलाढ्य शत्रूचं निर्दालन रामाच्या बाणानं झालं. पण त्या बाणाला गती आणि शक्ती सीतेमुळंच मिळाली. त्याप्रमाणंच भीमाच्या गदेला आणि अर्जुनाच्या धनुष्याला द्रौपदीच्याच महत्त्वाकांक्षेची स्फूर्ती मिळत राहिली. पांडवांच्या शौर्यधैर्याचं उगमस्थान काही प्रमाणात द्रौपदीची प्रतिभा हेच आहे असं दिसतं. अनेक प्रकारचे तत्त्वसुंदर विचार तिच्या मुखातून बाहेर पडले आणि पांडवांनी ते ग्रहण केले याची उदाहरणं महाभारतात आहेत. सीतेच्या तोंडी कोणाचा मर्मभेद करणारे शब्द फारसे येत नाहीत. रावणाचा देखील कठोर अपमान आपल्या शब्दांतून तिनं सहसा केला नाही. त्याला नीतीच्या आणि विवेकाच्या चार गोष्टी तिनं सांगितलेल्या दिसतात. शांती आणि सहिष्णुता व आत्मक्लेश यातून रावणाचं मन:परिवर्तन करण्याचा ती प्रयत्न करते. काही ठिकाणी तिच्याही शब्दांतून अनेक ठिणग्या प्रकट होतात. पण तिचा स्थायी भाव शांती हाच आहे.

द्रौपदी मात्र ज्वालाग्रही आहे. तिच्या शब्दांतली स्फोटकता हे तिचं आगळं बळ आहे. पण हे असूनही वनवासातली आणि अज्ञातवासातली सारी दु:खं तिनं सहन केली. पतींची सेवा मनोभावानं केली. पण त्यांच्या चित्तांतला कौरवांविषयीचा वैरभावनेचा विस्तव कधीच शमू नये याची दक्षता तिनं घेतली. धर्मराज आपल्या उदार स्वभावामुळं दुर्योधन, दु:शासनालाही क्षमा करू शकतो हे माहीत असल्यामुळं ती भीमार्जुनांच्या मनातली सूडभावना सदैव जागी ठेवते. हे तिचं कृत्य निश्चितच समर्थनीय आहे. ती केवळ वैयक्तिक अपमानानं पेटलेली नव्हती. पांडवांच्या न्याय्य अधिकारावर आक्रमण करणाऱ्या कौरवांच्या कुटिलतेशी तिचं वैर होतं. कौरवदरबारात तिला ज्या बीभत्स, असंस्कृत आणि लांछनास्पद रीतीनं अपमानित करण्यात आलं तो प्रसंग हेच भारतीय युद्धाचं महत्त्वाचं कारण आहे. या अपमानाच्या असह्य ज्वाळा तिला जन्मभर ताप देत राहिल्या. ज्या हाताने दु:शासनानं तिला विवस्त्र करण्याचा अधम प्रयत्न केला तो हात मुळासकट उखडला जावा हे स्वप्न ती रंगवीत राहिली. अपमानाच्या प्रसंगी दरबारातल्या सर्व सभाजनांना उद्देशून ती तीव्रतेनं बोलली. भीष्म, द्रोण, कृप इत्यादी आचार्यांना संतप्त होऊन तिनं जे प्रश्न विचारले त्यातल्या एकाचंही उत्तर त्या विद्वान आचार्यांना देता आलं नाही. राजसभेत

द्रौपदीचा निर्लज्ज विनयभंग करणाऱ्या दुःशासन-दुर्योधनाच्या विरोधात एक शब्दही न उच्चारता हे तथाकथित आचार्य लाजिरवाणं मौन धारण करून बसले. आपले आत्मेच जणू त्यांनी आंधळ्या राजसत्तेकडे गहाण ठेवले होते. आपल्या डोळ्यांदेखत भर दरबारात एका स्त्रीचा अधम रीतीनं छळ करण्यात येत आहे आणि तरीही आपल्या विद्वत्तेनं गुरूपदावर चढलेले वंदनीय आचार्य थंडपणानं हे दृश्य पाहात होते. आचार्यांची विद्वत्ता जेव्हा राजशक्तीची दासी बटकी बनते तेव्हा त्या विद्वत्तेला बाजारबसवीची अवकळा आल्याशिवाय राहात नाही. भीष्म आणि द्रोण हे देखील पाशवी सत्ताधीशांसमोर लाचार होऊन बसले तेव्हाच द्रौपदीच्या सहनशक्तीचा कडेलोट झाला. ही दुर्घटना महाभारतातली असली आणि ती कित्येक शतकांपूर्वी घडली असली तरी आधुनिक भारतातही अशा घटना नेहमी घडतात. आजचे भीष्म आणि द्रोण सत्तेच्या सिंहासनासमोर लोचटपणे उभे असल्याचं दृश्य दिसतं. माणसाच्या अध:पतनाची विदारक कथा आणि व्यथा व्यासांनी लिहून ठेवली. ती आज देखील कोणत्याही अर्थानं शिळी झालेली नाही. आजच्या सीतेला आणि द्रौपदीला कालच्यासारखाच वनवास घडत आहे. शास्त्रज्ञानाचा प्रकर्ष झालेल्या आजच्या जगात दुःशासन, दुर्योधनांची कमतरता नाही. शास्त्रांचा विकास झाला असेल पण माणसांच्या खुरट्या बुद्धीचा आणि क्षुद्र मनाचा विकास होऊ शकला नाही. म्हणूनच रामायण-महाभारताची कथा कोणे एके काळची नाही. ती नित्याचीच आहे. 'अर्थस्य पुरुषो दास:' असं म्हणणाऱ्या आचार्यांना उद्देशून द्रौपदीनं परखड सवाल विचारले. आणि ती म्हणाली,

न सा सभा यत्र न सन्ति वृद्धाः ।
न ते वृद्धा: ये न वदन्ति धर्मम् ॥
नासौ धर्मो यत्र च नास्ति सत्यम् ।
न तत्सत्यं यच्छलेनानुविद्धम् ॥

ज्या सभेत प्रगल्भ बुद्धीचे वृद्ध लोक नसतात ती सभाच नव्हे. वृद्ध म्हणजे म्हातारे झालेले नव्हे तर परिणत बुद्धीचे, वृद्धिंगत झालेले लोक. जे धर्मतत्त्व सांगू शकत नाहीत ते वृद्ध नव्हेत. ज्या धर्माला सत्याचं अधिष्ठान नाही तो धर्म नव्हे. आणि जे छलकपटावर अवलंबून असते ते सत्यही नव्हे. कौरवांच्या राजसभेत प्रगल्भ बुद्धी नाही. धर्मनीती नाही. सत्य आणि संस्कृती नाही. केवळ सत्तेचा उन्मत्तपणा आणि कपटाचा व्यवहार आहे अशी घणाघाती टीका द्रौपदीनं केली. या अधर्माला आणि

अन्यायाला तुमची संमती आहे का ? हा प्रश्न तिनं विचारला आहे. पण सत्तेचे गुलाम झालेले ज्ञानवंत आपल्या डोळ्यांवर कातडं ओढून नेभळेपणानं बसले होते. एकही व्यक्ती या अधर्माचा धि:कार करण्यासाठी उभी राहिली नाही. द्रौपदीच्या दृष्टीनं तो दरबार 'वीरांचा' नव्हता. 'मेंढरांचा' होता. तिचे पाचही पती मेंढरांप्रमाणेच निष्क्रिय बसून होते. केवळ द्रौपदीच त्या दरबारात विजेप्रमाणं कडाडत होती. भेकड दुर्योधन आणि दु:शासन हसत होते. आणि उदारमनस्क कर्णदेखील त्या हसण्यात सामील झाला होता.

राजसभेत एका स्त्रीचा इतक्या लाजिरवाण्या पद्धतीनं अवमान केला जातो आणि सभेतील एकाही माणसाचं रक्त त्वेषानं उसळत नाही ही घटना सत्तेचा आणि संस्कृतीचा भीषण अध:पात सुचवते. 'महाभारत' या ग्रंथात संस्कृतीची उंच शिखरं जशी दिसतात तशीच तिची हीनदीन पतित अवस्थाही दिसते. माणसांतल्या पशूचं आणि राक्षसाचं दर्शन घडवणाऱ्या या ग्रंथानं मानवी श्रेष्ठत्वाची उत्तुंगताही दाखवली आहे. द्रौपदी हे संस्कृतीच्या उच्चत्वाचं आणि तेजस्वितेचं द्योतक आहे. भरसभेत दुर्योधनानं आपली उघडी मांडी द्रौपदीला दाखवली होती. पुढं गदायुद्धात भीमानं त्याच्या मांडीवर जबरदस्त प्रहार करून तिचं चूर्ण केलं होतं. दु:शासन आणि कर्ण यांनाही त्यांच्या अपराधाचं योग्य शासन मिळालं. दुष्टांचं पारिपत्य करण्यासाठी सज्जनांची शस्त्रं आणि त्यांची मनोवृत्ती धारदार बनली पाहिजे ही द्रौपदीची विचारसरणी तिच्या पीळदार स्वभावावर प्रकाश टाकणारी आहे. युद्धाच्या पहिल्याच दिवशी हताश झालेल्या पांडवांचा धि:कार करून द्रौपदीनं त्यांना जो वीरोचित उपदेश केला तोही तिच्या युक्तिवादित्वावर प्रकाश टाकतो. हतप्रभ झालेले पांडव गलितगात्र होऊन 'हस्तिनापूरचं सिंहासन आपल्याला नको' असं म्हणत होते. तेव्हा डिवचलेल्या नागिणीप्रमाणं फुत्कारत द्रौपदी कडाडली,

"तुम्हाला पती म्हणण्याची मला लाज वाटते. तुमचं क्षत्रियत्व आणि शौर्य नाहीसं झालं आहे. पुरुषार्थहीनांना राज्य मिळत नाही. तिळात तेल असतं. जमिनीत पाणी असतं. लाकडात अग्नी असतो पण तो बाहेर काढायला प्रयत्न आणि पुरुषार्थ यांची जरुरी असते. समुद्रही हटवता येतो. पर्वतही फोडता येतो. तिथं दुर्योधन आणि दु:शासन यांची काय कथा ?" तिच्या जळजळीत शब्दांमुळं विझलेले निखारे पुन्हा फुलले. त्वेषानं आणि क्षोभानं पांडव रसरसून उठले. द्रौपदी एखाद्या जळत्या मशालीसारखी दाहक होती. हा गुण सीतेत नव्हता. पण या दोन्ही नायिका

आदर्श होत्या. या दोन स्त्रियांनी भारतीय संस्कृतीतली शुद्धता आणि सुंदरता, समर्थता आणि ओजस्विता पेलून धरली आहे. स्त्रीचं आदर्श रूप त्यांच्यात प्रकट झालं. आता या दोन ग्रंथांना सहस्रके उलटली तरी त्यांचं जिवंत व्यक्तिमत्व कायम आहे.

सीता आणि द्रौपदी यांच्या व्यक्तित्वाची वैशिष्ट्ये पाहताना आज एक खंत मनात आहे. प्राचीन काळात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा प्रगत नव्हता. आजही तो विकसित झाला आहे असं विधान करता येणारे नाही. पण जुन्या काळात स्त्रीचं श्रेष्ठत्व तिच्या पतिनिष्ठेशी सर्वार्थानं जोडलेलं होतं. पतीसंबंधीच्या निष्ठेला दास्याचं स्वरूप आलं होतं असं म्हणता यावं. पातिव्रत्याची कल्पना अतिरेकी टोकापर्यंत ताणली जात असे. या कल्पनेचा जाच तत्कालीन स्त्रियांना सहन करावा लागायचा. जणू स्त्रीला पतीशिवाय वेगळं अस्तित्व नाही, तिच्या आशाआकांक्षा आणि सुखदु:खाच्या भावना सर्वस्वी पतीच्या इच्छेतच विलीन झालेल्या असाव्यात, ही अपेक्षा होती. आपल्याला स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व आणि व्यक्तित्व आहे असं वाटणं यात पातिव्रत्याचा भंग आहे असं स्त्रीला देखील वाटावं इतकी ही कल्पना ताणलेली होती. या अन्यायाच्या जोखडातून आजची स्त्री बहुतांशी मुक्त होत चालली आहे. अगदी परवापर्यंत सती आणि केशवपन या रुढी सुशिक्षित समाजात अस्तित्वात होत्या. स्त्रीचे अलंकार, तिचं कुंकू आणि मंगळसूत्र, तिची वस्त्रप्रावरणे या गोष्टी देखील पतिजीवनाशी निगडित होत्या. महाभारतातलं गांधारीच्या पातिव्रत्याचं उदाहरण विलक्षण टोकाचं आहे. धृतराष्ट्र जन्मांध होता. म्हणून गांधारीनंही जन्मभर अंधत्व पत्करणं ही पतिनिष्ठेची पराकोटी झाली. सीता आणि द्रौपदी या दोन्ही नायिका स्वाभिमानी होत्या. पण त्यांच्या काळातील दृष्टिकोन आणि रूढी यांच्यामुळं या दोन्ही बुद्धिमती स्त्रियांना काही दु:खं भोगावी लागली. स्त्रीला आपल्या शुद्धत्वाची ग्वाही देण्यासाठी 'अग्निदिव्य' करावं लागणं ही स्त्रीजीवनाची दारुण शोकांतिका आहे. स्त्रीचं चारित्र्य आणि पुरुषाचं शील यात समाज आणि धर्म फरक करीत होता. द्रौपदीसारख्या तेजस्वी स्त्रीला आपली केवळ मालमत्ता मानून युधिष्ठिरासारखा 'धर्मराज' तिला जुगारात पणाला लावण्याची एक वस्तू मानीत होता. आणि त्यात काही गैर आहे असं मानलं गेलं नाही. सीता आणि द्रौपदी ही दोन्ही अलौकिक व्यक्तित्वं तत्कालीन सामाजिक व धार्मिक दृष्टिकोनाची शिकार बनली होती. अनेक प्रकारची बंधनं

असूनही या दोन्ही स्त्रीरत्नांचं तेज रामायण-महाभारताला प्रकाशित करणारं ठरलं. आजच्या परिस्थितीत या नायिकांच्या ठायी असणाऱ्या काही गुणांचं अनुकरण स्त्री-पुरुषांनी केलं पाहिजे. स्त्रीत्वातलं सारं सौंदर्य आणि सामर्थ्य यांचं दर्शन या व्यक्तित्वात होतं यात शंका नाही.

■■■

# सामाजिक समतेसाठी झालेल्या चळवळी : एक अवलोकन

भारताला स्वातंत्र्य मिळून अर्धशतक उलटून गेलं. पण गेल्या पन्नास-पंचावन्न वर्षांत समतेचा विचार या राष्ट्रात मूळ धरत आहे असं चित्र मात्र अद्यापि दिसलेलं नाही. या देशात जाती, धर्म, वर्ण आणि पंथोपपंथ यांचा बुजबुजाट झालेला आहे. हिंदू धर्मात दोन हजारांपेक्षा अधिक जाती आणि उपजाती अस्तित्वात आहेत असं समाजशास्त्रज्ञांचं मत आहे. मुसलमान, शीख, जैन, बौद्ध आणि ख्रिस्ती या धर्मांतही जातिभेद व पंथभेद आहेत. त्यामुळं भारतीय जनता सामाजिक दृष्ट्या एकतेच्या पातळीवर येणं दुरापास्त बनलं आहे. या राष्ट्राला त्याचा स्वत:चा एक चेहरा गेल्या कित्येक शतकांत लाभलेला नाही. प्रत्येक माणसाच्या कपाळावर जातीची व पंथाची परंपरेनं एक चिठ्ठी चिकटवलेली आहे. ती चिठ्ठी महत्त्वाची. माणूस मात्र गौण किंवा नगण्य अशी दीर्घकाळापासून दृढमूल झालेली (अ) व्यवस्था आहे. आजही या व्यवस्थेचा पाया ढासळलेला दिसत नाही. यामुळं भारतीय माणूस स्वत:ची ओळख आपल्या जातीवरून करून देतो. वस्तुत: केवळ भारतातलाच नव्हे तर साऱ्या जगातला माणूस इथून तिथून एकच असताना अनेक प्रकारच्या कृत्रिम भेदांच्या भिंती मानवी ऐक्याच्या विरोधात का उभ्या राहाव्यात या प्रश्नाचं उत्तर मिळत नाही. रूसो नावाच्या विचारवंतानं म्हटलं आहे, 'Man is born free and yet he is in chains everywhere.'

जन्मत: मनुष्य स्वतंत्र आहे. पण तरीही सर्वत्र तो साखळदंडांनी बांधला गेला आहे. समता आणि स्वातंत्र्य यांचं समर्थन करण्याचंही कारण पडू नये इतकी ही तत्त्वं स्वयंसिद्ध आहेत. पण माणसाला बांधून टाकणारी, त्याला पावलोपावली कुंठित करणारी काही अशास्त्रीय कुंपणं माणसानंच उभी केली आहेत. धर्म, ईश्वर आणि परंपरा अशा संकल्पनांचा धाक दाखवून माणसाला ठराविक कुंपणात कोंडून टाकण्यात आलं आहे. धर्म आणि ईश्वर या संकल्पनांची निर्मिती माणसानंच केली. त्यामुळं विषमता आणि पारतंत्र्य यांच्या भोवती ईश्वरी आज्ञेचं वलय उत्पन्न करण्याचं बौद्धिक चातुर्य काही मूठभर माणसांनी दाखवलं. विषमतेचं समर्थन करणारी

जातिसंस्था हे मनुष्याच्या स्वार्थी बुद्धीला आलेलं विषारी फळ आहे. या जातिसंस्थेचा उगम केव्हा झाला याचा शोध घेताना ती खिस्तपूर्व पाचव्या-सहाव्या शतकात रुढ झाली असावी असा तर्क आहे. सातव्या आणि आठव्या शतकात तिला स्थिरता येत गेली असा उल्लेख सापडतो. 'धर्मसूत्रातत' चांडाल आणि श्वपच आणि अन्य अनेक अस्पृश्य जातींचे उल्लेख आले आहेत.

विषमतेच्या पायावर आधारलेली जातिसंस्था आणि अस्पृश्यता वेदकालानंतर अधिकच दृढ होत गेली असावी. 'मनुस्मृती', 'याज्ञवल्क्य स्मृती' या ग्रंथांत वर्ण आणि जाती यांचं स्पष्ट समर्थन असून ब्राह्मण हा वर्ण सर्वोच्च मानला आहे. धर्म व संस्कृती यांच्या संदर्भात अत्युच्च अधिकार याच वर्णाला प्राप्त झाले. चार वर्णांची उत्पत्ती कशी झाली यासंबंधीची एक उपपत्ती मांडण्यात आली आहे. तिची भ्रममूलकता वाचतानाच लक्षात येते. वर्णव्यवस्थेचं समर्थन करताना ज्या श्लोकाचा आधार गंभीरपणानं घेतला जातो तो श्लोक असा -

ब्राह्मणोऽस्य मुखमासीत<br>
बाहू राजन्यः कृतः<br>
उरुतदस्य यद्वैश्यः<br>
पद्‌भ्यां शूद्रो अजायत (पुरुषसूक्त)

यज्ञपुरुषाच्या मुखातून ब्राह्मण, बाहूंतून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य आणि पायांपासून शूद्र उत्पन्न झाले. यात उच्चनीचतेचा क्रम श्लोककर्त्यानं लावून दिला आहे. विषमतेला ग्रांथिक बळकटी देण्याचा हा प्रयत्न यशस्वी ठरला: परमेश्वरानंच ही व्यवस्था निर्माण केली हे सांगून अज्ञानी जनतेच्या मनात परमेश्वरी आज्ञा मानली पाहिजे हा विचार ठसवण्यात आला. ईश्वर आणि धर्म या शब्दांच्या भोवती भीतीचं आणि विश्वसनीयतेचं एक वर्तुळ तथाकथित धर्माचार्यांनी निर्माण करून ठेवलं होतं. सर्वसामान्य माणूस या स्वार्थी आचार्यांवर विसंबून राहिला आणि पदरात पडलेला अन्याय ईश्वरी न्याय म्हणून त्यानं शतकानुशतकं सहन केला. पण या अन्यायामुळं देशात एकात्मतेचं वातावरण कधीच निर्माण होऊ शकलं नाही. माणसांपासून माणूस तोडण्याचं व त्यांच्यात उच्चनीचभाव जोपासण्याचं काम इथल्या धर्मपीठांनी आणि पीठांवर अधिष्ठित झालेल्या आचार्यांनी प्रामाणिकपणानं केलं. धर्मानं माणूस जोडला पाहिजे पण तो विभक्त करण्याचा विपरीत धर्म कित्येक शतकं प्रतिष्ठित होऊन बसला. अनेक वेळा भारत देश परकीयांच्या आक्रमणाला

बळी पडून परतंत्र झाला याचं प्रमुख कारण जातीय आणि वर्णीय विषमता हेच सांगावं लागेल. गेल्या दोन हजार वर्षांच्या काळात हा आपला देश किती वेळा आक्रमकांना शरण गेला याचं लाजिरवाणं उत्तर इतिहासात सापडेल. ईश्वर आणि धर्म आणि जातिसंस्था हा सारा मानवी विचारांचा दुर्दैवी परिपाक आहे. सामाजिक विषमतेमुळं भारतीयांचं जीवन शतखंडित होऊन गेलं. माणूस आपला आत्मप्रत्यय हरवून बसला. देव आणि दैत्य, पाप-पुण्य, इहलोक-परलोक, पुनर्जन्म या भ्रांतिष्ट कल्पनांच्या आहारी गेल्यामुळं माणूस हतबल झाला. एक चमत्कारिक भयगंड व न्यूनगंड त्याच्या मनात निर्माण झाला. शेकडो वर्ष कनिष्ठ समजल्या गेलेल्या कोट्यवधी लोकांचं माणूसपण विषम समाजरचनेमुळं फुलू शकलं नाही. भारताचा इतिहास हा पराभवांचा इतिहास आहे असं मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केलं, हे सयुक्तिकच आहे.

धार्मिक आणि सामाजिक विषमतेला छेद देणारी समता विचाराची चळवळ अनेक क्रांतिकारक विचारवंतांनी उभी करण्याचा प्रयत्न केला. इ.स. पूर्व सहाव्या शतकात भगवान बुद्ध आणि भगवान महावीर यांनी विषमतेच्या विषारी तत्त्वज्ञानावर तीव्र प्रहार करून सामान्य माणसाला प्रतिष्ठित करण्याचा प्रयत्न केला.

'बहुजनहिताय' 'बहुजनसुखाय' हे तर भ. बुद्धाचं परम उद्दिष्ट होतं. जात, वर्ण आणि वंश यांच्या आधारावर माणूस उच्च किंवा नीच ठरत नाही. जन्मामुळं तो महान अथवा लहान मानता येत नाही. सारी माणसं समान आहेत ही तर्कशुद्ध भूमिका या महापुरुषांनी घेऊन विषमतेला प्रतिष्ठा देणाऱ्या पुरोहितशाहीविरुद्ध चळवळ उभी केली. बुद्धाच्या संघात आणि महावीराच्या समवशरणात सर्व जातींच्या, सर्व पंथांच्या स्त्री-पुरुषांना मुक्त प्रवेश होता. अस्पृश्यतेच्या भिंती तिथं कोसळून पडल्या. राजाच्या मांडीला रंकही मांडी लावून बसत होता. शूद्रांच्या पंक्तीत बसवल्या गेलेल्या स्त्रीवर्गालाही समानतेची वागणूक मिळू लागली. त्यामुळं विषमतेच्या पुरस्कर्त्यांचं धाबं दणाणलं. कारण समतावादी उदार विचारधारा समाजात मुक्तपणानं वाहू लागली तर ब्राह्मण्याची प्रतिष्ठा धुळीला मिळेल ही भीती निर्माण झाली. भ. बुद्धाच्या समतेचा आणि ममतेचा प्रभाव पसरत गेला. त्यांच्या संबंधीची एक कथा उल्लेखिणं मला या लेखातल्या मध्यवर्ती विचाराच्या दृष्टीनं आवश्यक वाटतं.

उन्हाळ्याचे दिवस होते. रानातून विहार करताना भ. बुद्धांना तहान लागली.

पण त्या निर्जन भागात पाणी मिळणं कठीण झालं. ते तसेच आणखी काही अंतर चालून गेले. दूरवर एक झोपडी दिसली. बुद्धांनी तिथं जाऊन आत चुलीपाशी बसलेल्या स्त्रीला साद घातली, ''भद्रे, मला तहान लागली आहे. प्यायला पाणी देशील का ?'' ती स्त्री लगबगीनं उठली. आणि नम्रतेनं म्हणाली, ''भगवान, मी हलक्या जातीची आहे. मी तुम्हाला पाणी कसं देऊ ?'' बुद्ध हसले. ते म्हणाले, ''भद्रे, मी तुला पाणी मागितलं जात नव्हे. जात ही कल्पना आहे. पाणी हे सत्य आहे.'' हे उदार विचार ऐकताच त्या स्त्रीच्या विषण्ण चेहऱ्यावर आनंदाचे किरण पसरले. जातिपातींच्या काल्पनिक बेड्या खळखळा तुटून पडल्या. एका भ्रमातून ती बाहेर पडली. आपल्या माणूसपणाची, आपल्या अस्मितेची तिला जाणीव झाली. समता विचाराची त्या काळात भ. बुद्धाच्या प्रयत्नांमुळं प्रगती झाली असली तरी ही लाट पुढे क्षीण होत गेली. जन्मसिद्ध उच्चनीचत्वाची कल्पना अधिक दृढमूल होत गेली. वर्ण जातीच्या आणि उपजातींच्या कोंडवाड्यात बहुसंख्य लोकांना राहावं लागलं. समतेची चळवळ अंधुकपणानं पाउलं टाकीत होती. हजार दीडहजार वर्षांच्या कालखंडात विषमतेच्या भिंती मात्र बुलंद झालेल्या दिसतात. पुढं. इ.स. च्या तेराव्या शतकापर्यंत ही स्थिती मनुस्मृतीमुळं आणि अन्य पुराण ग्रंथांमुळं कायम राहिली. तिला आव्हान देणारी चळवळ या दीर्घकाळात उभी राहू शकली नाही. जुनाट जातिव्यवस्थेला धर्माच्या नावाखाली अधिक मजबुती आली. 'एष धर्मः सनातनः' असं म्हणून धर्मपंडितांनी ही व्यवस्था सुप्रतिष्ठित केली.

विषमतेवर आधारलेल्या जातिसंस्थेमुळं व्यक्तीच्या स्वतंत्र प्रेरणेची क्रूर गळचेपी होत राहते. जात आणि वर्ण व्यक्तींवर परंपरेनं लादण्यात येतात. व्यक्तीच्या ठायी असलेल्या कर्तृत्वाला या समाजरचनेत कोणताही अर्थ उरत नाही. वरिष्ठ वर्णीय व कनिष्ठ वर्णीय यांचं जीवन कोणत्या चाकोरीतून व्यतीत व्हायचं ते जन्मसिद्ध वर्णजातींवरच ठरत असतं. व्यक्तिस्वातंत्र्याला पूर्णपणे मारक असलेली ही जातिरचना अन्यायकारक आहे यात कसलाही संदेह नाही. हा अन्याय हे पूर्वजन्मीचं फलित म्हणून स्वीकारलंच पाहिजे अशी मानसिकता समाजाची बनवण्यात आली. भारतीय समाजात पुरुषार्थापेक्षा ईश्वरेच्छा आणि नियती या घटकांना प्राधान्य मिळालं. प्रारब्धवादाची पोलादी पकड लोकमनाभोवती असल्यामुळं माणूस अगतिक होऊन दैवाच्या प्रवाहाबरोबर एखाद्या निर्जीव काटकीसारखा वाहत चालला. ज्ञान-विज्ञानाच्या आणि व्यापार उद्योगाच्या व

सैनिकी सामर्थ्याच्या क्षेत्रात भारताची जी केविलवाणी पिछेहाट झाली त्याला इथली विषमतावादी समाजरचना कारणीभूत आहे. तेराव्या शतकात महानुभाव आणि वारकरी या दोन धार्मिक पंथांचा उदय झाल्यानंतर सामाजिक समतेच्या विचाराला थोडीफार गती मिळाली. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर आणि गोविंदप्रभू यांनी वर्णव्यवस्थेला व ती व्यवस्था मानणाऱ्या शास्त्र-पुराणांना ठामपणे विरोध केला. सारे स्पर्शास्पर्शभेद चक्रधरानं धुडकावून लावले. कुळ, जात, वर्ण यांचा कर्तृत्वाशी आणि श्रेष्ठ-कनिष्ठतेशी काहीही संबंध नसतो ही घोषणा करून समतेच्या विचाराला चक्रधरांनी चालना दिली. महानुभावांच्या साहित्यातही या विचारांची मुळं सापडतात. पण या विचारातून एक समर्थ चळवळ उभी राहू शकली नाही. महानुभाव पंथाच्या आचार्यांचं समाजव्यवहारापेक्षा आध्यात्मिक अंगाकडं अधिक लक्ष होतं. पण तरीही जातिवर्गरहित समाजाची उभारणी करण्याचं स्वप्न महानुभाव पंथानं रंगवलं होतं. सामान्य माणसांना आपुलकीनं जवळ घेण्याचं कार्य या पंथानं काही अंशी केलं. पण या पंथाची समाजाभिमुखता वेगवेगळ्या कारणांमुळं पुढं कमी झाली. चक्रधरांचा व्यापक दृष्टिकोन त्यांच्या अनुयायांत फारसा उतरला नाही. महाराष्ट्राच्या समाजमनावर आणि संस्कृतीवर या उदारमतवादी धर्मपंथाचा खोलवर परिणाम होऊ शकला नाही. त्यानंतर भागवत संप्रदायाची म्हणजेच वारकरी पंथाची धार्मिक व सामाजिक चळवळ आकाराला येऊ लागली. तेराव्या आणि चौदाव्या शतकात ही चळवळ महाराष्ट्रात सर्वत्र पसरत गेली.

वारकरी पंथाच्या आचारविचारांचा परिणाम महाराष्ट्रावर त्या काळात सर्वाधिक झाला. या पंथाचं नेतृत्व उच्चवर्णीयांपेक्षा बहुजनसमाज आणि दलित समाज यातील साधुसंतांकडं गेलं हे उल्लेखनीय आहे. ब्राह्मणानं विचार सांगावा आणि सामान्य लोकांनी तो शिरोधार्य मानावा ही चाकोरी बुजवण्याचं कार्य वारकरी पंथानं केलं. या पंथातून उदयाला आलेले संत, विचारवंत, कवी इत्यादींच्या उदार विचारांचा प्रभाव बहुसंख्य लोकांवर पडू लागला. जनमानसात आजही वारकरी पंथाला जे महत्त्वपूर्ण स्थान आहे ते अन्य कोणत्याही धर्मपंथाला मिळवता आलेलं नाही. 'अवघियांपुरते वोसंडले पात्र' ही या संप्रदायाची भूमिका होती. जन्मसिद्ध उच्चनीचतेला तात्त्विकदृष्ट्या या पंथात स्थान नाही. तेराव्या शतकात चंद्रभागेच्या वाळवंटावर संत ज्ञानेश्वर आणि संत चोखामेळा एकमेकांना उराउरी भेटत होते. हे दृश्य सामाजिक समतेच्या संदर्भात खरोखरच लक्षणीय होते. जातिपातीच्या भिंती

वारकऱ्यांच्या चळवळीमुळं काही प्रमाणात ढासळल्या हे एक ऐतिहासिक सत्य आहे. या सत्याला मर्यादाही आहेत. पण समतेची चळवळ गतिमान करण्याचं श्रेय वारकरी पंथाला देणं सयुक्तिक ठरेल. जात आणि वर्ण यांपेक्षा हृदयातली भक्ती हीच व्यक्तीच्या महतीची निशाणी ठरते असा विचार या पंथानं मांडला. वर्णजातीचा विचार न करता ईश्वर सर्वांना आपल्या पोटाशी घेतो ही भूमिका समाजाला समतेच्या पातळीवर आणण्यासाठी काही प्रमाणात उपकारक ठरली. वारकरी पंथाचा प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे 'ज्ञानेश्वरी'. 'ज्ञानदेवे रचिला पाया' अशी प्रशस्ती संत जनाबाईनं केली आहे. ज्या मनात ईश्वरभक्ती आहे ते मन शुद्ध असतं. ते मन ब्राह्मणाचं असो किंवा स्त्री-शूद्राचं असो तिथं जात, वर्ण या घटकांना अर्थ उरत नाही. ही भूमिका स्पष्ट करताना ज्ञानेश्वरांनी म्हटलं आहे -

जैसे तंवचि वहाळ वोहळ । जंव न पवति गंगाजळ ॥
मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप ॥
कां खैर चंदन काष्ठे । हे विवंचना तंवचि घटे ।
जव न घापती एकवटे । अग्नीमाजी ॥
तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया ॥
जाति तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥

(ज्ञानेश्वरी अध्याय - ९)

समाजातलं जातिपातींचं बंड मोडून काढायला हा ईश्वरभक्तीचा विचार उपयुक्त ठरला. भक्तीची सनद मिळाल्यामुळं न्यूनगंडाच्या विळख्यातून सामान्य माणूस बाहेर पडू लागला. त्याच्याही आत्मशक्तीला स्फुरण आलं. प्रतिभेला शक्ती लाभली. आणि मग अस्पृश्य समजला जाणारा संत चोखामेळाही भावभक्तीची उत्कट कविता लिहू लागला. त्याची पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, मेहुणा बंका महार, सर्वांनाच भक्तीच्या क्षेत्रातल्या समता विचारानं उत्तेजित केलं. माळी, कुंभार, न्हावी, सोनार, मुसलमान, शिंपी अशा अठरापगड जातिजमातींच्या मनात भागवत संप्रदायानं चैतन्याची पेरणी केली. इतकंच नव्हे तर सदैव उपेक्षित राहिलेल्या स्त्री वर्गातून, खालच्या थरातील स्त्रियांतूनही जागृतीचा हुंकार ऐकू येऊ लागला. कान्होपात्रा, जनाबाई, भागू इत्यादी कवयित्रींनीही आपल्या रसमय रचनांनी मराठी सारस्वताला समृद्ध केलं आहे. जेव्हा शोषितांचा, दलितांचा आणि वंचितांचा समूह जागा होतो तेव्हा साहित्याला आणि संस्कृतीला बळ येतं. वारकरी पंथाची

चळवळ जशी भक्तिविचाराची होती तशीच ती समतेचाही पुरस्कार करीत होती. 'कुळ, जाति, वर्ण। हे आघवेचि या अकारण।' हा विचार हे या चळवळीचं सामर्थ्य होतं. जातिव्यवस्था दृढमूल करणाऱ्या भेदभावनेची कुंपणं ज्ञानोबा-तुकोबांनी शिथिल केली. तुकोबांनी तर विषमतेवर इतर कुठल्याही संतापेक्षा अधिक तीव्र प्रहार केले. 'तुका म्हणे नाही जातीसवे काम । ज्याचे मुखी नाम तोचि धन्य।' ब्राह्मण आणि शूद्र यांच्यात जो भक्त असेल तोच श्रेष्ठ मानावा मग त्याचे कुळ आणि जात कोणतीही असली तरी ती नगण्य आहे, ही उदार दृष्टी संतांनी स्वीकारली होती. विषमतेची धार या विचारामुळे काहीशी सौम्य होऊ शकली. याचे श्रेय संतांच्या चळवळीला दिले पाहिजे. या संदर्भात तुकारामांचा एक अभंग उल्लेखनीय आहे. ते म्हणतात -

अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड । काय त्यासी रांड प्रसवली॥
वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयता कुळ याती ॥
ऐसा हा निवाडा जालासे पुराणी । नव्हे माझी वाणी पदरीची ॥
तुका म्हणे आगी लागो थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी ॥

वारकरी पंथानं समतेचा उद्घोष उत्कटतेनं केल्यामुळं भिन्न भिन्न जाती-जमातीत उत्साहाची लहर आली आणि समाजमनातली विषमतावादी विचारसरणी बोथट व्हायला मदत झाली. हे या चळवळीचं यश मानावं लागेल. प्रा. श्री. म. माटे यांनी या स्थित्यंतराचा उल्लेख 'सामाजिक क्रांती' या शब्दांत केला आहे. महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाही (Spiritual Democracy) प्रस्थापित झाली असाही निष्कर्ष त्यांनी जवळजवळ काढला आहे. पण संतांची चळवळ सामाजिक क्रांती घडवून आणू शकली नाही. जातिव्यवस्थेच्या मूळ गाभ्याला संतांनी धक्का लावला नाही. शास्त्रप्रामाण्यालाही त्यांनी बाजूला सारलं नाही. 'जे जे भेटे भूत । ते ते जाणिजे भगवंत।' या वचनातला त्यांचा आशय आध्यात्मिक आहे तो सामाजिक नाही. सामाजिक समतेच्या चळवळीला संतांच्या विचारांचा निश्चित उपयोग झाला. पण समाजरचनाशास्त्र मुळातच बदलावं हा विचार संत वाङ्मयात सापडत नाही. कुळ जातिवर्ण हे सारे व्यर्थ आहेत असं प्रतिपादन करणाऱ्या ज्ञानेश्वरांना वर्णव्यवस्था सामाजिक दृष्ट्या आवश्यक वाटली असं दिसतं. ब्राह्मणाचा उल्लेख करताना त्यांनी 'वर्णामाजी छत्रचामर' असा करून त्याचं उच्चत्व अबाधित ठेवलं आहे. शूद्राच्या घरची पकान्न कितीही भूक लागली तरी ब्राह्मणानं खाऊ

नयेत हा उल्लेख ज्ञानेश्वरीत आहे. पसायदानातील 'स्वधर्म' या शब्दाचा वर्णप्राप्त धर्म असाच त्यांना अभिप्रेत असावा. वर्णीय विषमतेच्या समूळ उच्चाटनाची भाषा संतसाहित्यात आढळत नाही. अठरापगड जातिजमाती भजन-कीर्तनाच्या निमित्तानं भेदभाव विसरून एकत्र येत होत्या. पण हा आध्यात्मिक सहवास संपल्यावर सामाजिक व्यवहारात मात्र हे विठ्ठलभक्त जातिव्यवस्थेचं कटाक्षानं पालन करीत होते. महनीय विठ्ठलभक्ताला सुद्धा तो अस्पृश्य असेल तर विठ्ठलाचं दर्शन घेणं सनातन व्यवस्थेनं अशक्य केलं होतं. संत चोखामेळ्याची संपूर्ण कविता याच एका तीव्र दुःखानं काळवंडलेली आहे. सामाजिक दृष्ट्या कनिष्ठ मानल्या गेलेल्या संतांच्या कवितेत दुःखवेदनेचे जे अत्युत्कट सूर आहेत त्यांची मुळं त्यांना मिळालेल्या अन्याय्य वागणुकीतच आहेत. संत चोखामेळा म्हणतो,

अवघ्या वर्णामाजी हीन केली जाती ।
विटाळ विटाळ म्हणती क्षणोक्षणी ॥
कोणीही अंगिकार न करिती माझा ।
दूर दूर हो जा अवघे म्हणती ॥

ज्या हीन वर्णाचा उल्लेख या संतानं केला तो वर्ण आणि ती जात ईश्वरकृत आहे असं मानायला कोणता आधार आहे ? ज्या शास्त्रात हे आधार सापडतात ती शास्त्रं आणि पुराणं मानवी कुटिल बुद्धीतूनच निर्माण झाली आहेत. मुळातच ईश्वर ही देखील एक भ्रांतिष्ट कल्पना आहे असं म्हणून भ. बुद्धानं ती नाकारली. भ. महावीरांनीही ईश्वरकल्पना नाकारली आहे. पण ईश्वराचं नाव घेऊन विषमतेचं भरण-पोषण स्वार्थी हितसंबंधी लोकांनी सतत केलं. इतकं की शूद्रातिशूद्राला मंदिरातही प्रवेश शतकानुशतकं मिळू शकला नाही. संत चोखामेळा विठ्ठल दर्शनासाठी जन्मभर तळमळत होता. पण त्याच्या दर्शनानं विठ्ठल विटाळेल असा शास्त्राधार असल्यामुळं भक्त आणि ईश्वर यांची ताटातूट करण्यात आली. तेराव्या शतकात या परंपरेच्या विरुद्ध चोखामेळा झगडू शकला नाही. त्याच्या काव्यात दुःख आहे. निषेध आहे. पण विद्रोहाचा आव्हानात्मक शब्द मात्र दिसत नाही. एका बाजूला तथाकथित सनातन पवित्र अशी बलाढ्य परंपरा आणि दुसऱ्या बाजूला संत चोखामेळा, संत सोयराबाई वगैरेंचे व्याकूळ शब्द असं दृश्य दिसतं. या परिस्थितीत विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत फरक पडला नाही. भक्ताच्या प्रार्थनेमुळं देवाच्या अंतःकरणाला कधीच दया आली नाही. संतचळवळीचं हे

अपयश आहे. त्या चळवळीनं विचार दिला. वातावरणात काही अंशी बदल झाला पण सामाजिक परिवर्तन मात्र झालं नाही. तो त्या चळवळीचा हेतूही नव्हता. समाजमनाच्या जखमांवर भूतदयेच्या मलमपट्ट्या मात्र लावल्या गेल्या. जखम आतून चरतच होती. एखादा कर्ममेळा विठ्ठलाला उद्देशून तीव्रतेनं विचारतो, 'जन्म गेला उष्टे खाता । लाज न ये तुमचे चित्ता ।' पण अखेर आपला ललाटलेख आपण मान्य केला पाहिजे ही प्रारब्धवादी भूमिका घेतली जाते. सारांश तेराव्या शतकापसून सतराव्या शतकांपर्यंत महाराष्ट्रात जी संतचळवळ झाली तिचं यश आध्यात्मिक क्षेत्रात उदंड आहे. सामाजिक क्षेत्रात मात्र ते अत्यल्प आहे. संक्षेपानं मूल्यांकन करायचं तर या चळवळीची वैशिष्ट्यं पुढीलप्रमाणं सांगता येतील.

१) जातीय उच्चनीचतेचा बडिवार संतांनी कमी करून माणसाच्या माणुसकीला आणि त्याच्या मनातील देवभक्तीला मान्यता दिली.

२) ब्राह्मणांपासून शूद्रातिशूद्रांपर्यंत ईश्वरनिष्ठांची मांदियाळी संतांनी सिद्ध केली. यातून जातीय विषमतेची तीव्रता कमी होऊन जातीजातीत सौहार्दाचं वातावरण काही अंशी निर्माण होऊ शकलं.

३) पारंपरिक विषम जातिव्यवस्था अबाधित राहिली. संतांनी त्या व्यवस्थेला कधीच आव्हान दिलं नाही. त्यामुळं समताविचाराची ही चळवळ विशेष प्रगती करू शकली नाही.

संतचळवळीतल्या उदार विचारांचा परिणाम समाजमनावर होत राहिला. सामाजिक न्यायाकडं लक्ष वेधण्याचं कार्य या चळवळीतून अप्रत्यक्षपणे घडलं. या चळवळीचं मूल्यमापन करताना ते समतोलपणानं केलं पाहिजे. काळ आणि परिस्थिती यांचे संदर्भ लक्षात घेतले तर मध्ययुगात माणसाच्या विचारावर केलेले उदारमतवादी संस्कार परिवर्तनाच्या प्रवासात उपकारक ठरले असा निष्कर्ष काढावा लागेल. ही सारी चळवळ पूर्णपणे अयशस्वी झाली किंवा सारे संत कर्मठ मतांचेच पुरस्कर्ते होते असे एकांगी पक्षपाती विचार या चळवळीबद्दल काही टीकाकारांनी मांडले आहेत. पण ते टोकाचे आहेत.

सामाजिक समतेचा विचार संतकालानंतर मुख्यत: इंग्रजी राजवटीत अधिकांशानं मूळ धरू लागला. पाश्चात्त्य विद्येतून स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या तत्त्वांना चालना मिळाली. विज्ञानाची उपासना केल्यामुळं

पाश्चात्त्य ज्ञान आणि संस्कृती आपल्या जुन्या-पुराण्या परंपरेला समर्थपणानं आव्हान देऊ लागली. जुने ग्रंथ व त्यातील जुनाट विचारसरणी नवीन ज्ञानाच्या प्रकाशात केविलवाणी दिसू लागली. नव्या सुशिक्षित पिढीनं इंग्रजी विद्या ग्रहण करून आपल्या देशाचा चेहरा मोहरा बदलून टाकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली. स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांचा उद्घोष सुरू झाला. सारे जातिभेद मोडून टाकावेत; धार्मिक समानतेचा, समभावाचा पुरस्कार करावा ही भूमिका एकोणिसाव्या शतकात अंग धरू लागली. दादोबा पांडुरंग यांनी परमहंस सभेची स्थापना करून जातिभेदांना विरोध केला. त्यांचा एक अभंग परमहंस सभेच्या विचारांचं स्वरूप स्पष्ट करतो. दादोबा पांडुरंग म्हणतात,

जातिभेद सर्व । सोडा अभिमान
द्यावे आलिंगन । एकमेकां ॥
असो कृष्णगीता । किंवा ख्रिस्तगीता
महम्मदाची वार्ता । असेना का ॥
असो बौधाचार्य । किंवा जैनाचार्य
शंकर आचार्य । कबीरही ॥
तत्त्वज्ञान एक । एक त्यांचे जरी
न कां ते पदरी । घ्यावे आम्ही ॥

सुशिक्षितांची ही 'परमहंस सभा' टिकाव धरू शकली नाही. कुणीतरी या सभेच्या सदस्यांची नावं वृत्तपत्रांत प्रसिद्ध केल्यामुळं भित्र्या समाजसुधारकांची गाळण उडाली. जातिभेद मोडण्यासाठी एक चळवळ उभी करू इच्छिणाऱ्या सुशिक्षितांत सामाजिक रोष पत्करण्याचं धैर्य नव्हतं. पण अल्पकाळ अस्तित्वात असलेल्या या 'सभेनं' सुशिक्षितांना विचारप्रवृत्त केलं हे नाकारता येणार नाही. कोणत्याही पुरोगामी, वैचारिक आंदोलनाला अशा प्रकारच्या अपयशातूनच वाटचाल करावी लागते. परमहंस सभेनंतर समतेच्या चळवळीला आत्यंतिक प्रयत्नानं आणि अपूर्व त्यागानं नवं बळ देणाऱ्या विचारवंतांत महात्मा फुले यांचाच अग्रक्रमानं उल्लेख करावा लागतो. फुले म्हणजे क्रांतिविचारांचं धगधगीत अग्निकुंड होतं. प्रत्यक्ष कृतीच्या पातळीवर उतरून विषमतेविरुद्ध या ध्येयवादी क्रांतिकारकानं जन्मभर जी झुंज घेतली आणि बहुजनांपर्यंत, दलित-शोषितांपर्यंत आपला विचार पोहोचवण्याचं जे कार्य केलं त्याला तोड नाही. 'नवा शिपाई' ही केशवसुतांची कविता

म. फुले यांनाच जणू दृष्टीसमोर ठेवून लिहिली गेली, असा विचार मनात येतो.

म. फुल्यांच्या जीवनकार्यात समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय या तत्त्वांचा सतत घोष होत राहिला. जातीय विषमता आणि अस्पृश्यता यांच्यावर फुल्यांनी जे घणाघाती हल्ले चढवले ते महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे वेगळेपण सिद्ध करतात. भारतातल्या इतर प्रांतात एकोणिसाव्या शतकात अशी व्यापक चळवळ कोणीच बांधली नव्हती. या दृष्टीनं विचार केला तर समतेसाठी अविरत लढणारा आधुनिक भारतातला पहिला क्रांतिकारक असाच त्यांच्यासंबंधी उल्लेख करावा लागतो. नवसमाजरचनेचं भव्य स्वप्न त्यांनी देशासमोर ठेवलं. सामाजिक क्रांतीच्या या शिल्पकाराला गुरुस्थानी मानून डॉक्टर आंबेडकरांनी आपली बुलंद चळवळ उभी करून मन्वंतर घडवून आणलं. म. फुल्यांनी शेतकरी, कष्टकरी, गावकुसाबाहेर पिढ्या न् पिढ्या अपमानित अवस्थेत राहाणारे दलित आणि शोषित व समाजाच्या सर्व थरांतली स्त्री यांच्या सर्वांगीण उन्नयनासाठी प्रथम शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यात नव्या जाणिवा निर्माण केल्या. समाजातले अल्पसंख्य लोक वर्णवर्चस्वाच्या अहंकारात आणि पारंपरिक ज्ञानाच्या वातावरणात नांदत होते. पण बहुजनवर्गाला ज्ञानाचे दरवाजे शेकडो वर्षे बंद होते. या बंद दरवाजावर धडक देऊन ते पाडून टाकण्याचं साहसी कार्य जोतिबा फुले यांनीच प्रामुख्यानं केलं. सर्वांसाठी शिक्षण हा विचार समतेचा द्योतक आहे. ज्ञानाच्या आणि संस्कृतीच्या प्रकाशापासून बहुसंख्य लोकांना वंचित ठेवणाऱ्या कर्मठ, दुराराध्य प्रवृत्तीवर त्यांनी अचूक प्रहार केले. जेव्हा सर्वसामान्य माणूस जागा होतो, तेव्हाच सामाजिक क्रांती यशस्वी होते हे जाणून सामान्य स्त्री-पुरुषाला बंधमुक्त करण्याची ऐतिहासिक कामगिरी फुल्यांनी केली. जातिसंस्था आणि विषमता किती चिवट आहे याचे अनेक अनुभव त्यांना स्वत:लाही आले होते. म्हणूनच विषमतेचं निर्मूलन करणाऱ्या ज्ञानावर आणि समता विचारावर त्यांनी भर दिला. या संदर्भातलं म. फुल्यांचं एक सर्वप्रसिद्ध वचन इथं उल्लेखितो -

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।।
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।।
वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

ज्ञान ही शक्ती आहे. ज्ञानातूनच मनुष्याला आपल्या स्थितीगतीची यथार्थ जाणीव होते, अन्यायाच्या विरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळते. फुले यांना अभिप्रेत

असलेली विद्या पोथ्या-पुराणांशी संलग्न नव्हती. ती इहजीवनाला आकार देणारी, बुद्धिवाद शिकवणारी विद्या होती. समतेची चळवळ या ज्ञानातूनच पुष्ट होत गेली. स्त्री-पुरुष समतेचा विचार फुल्यांनीच उत्कटतेनं मांडला. एका जागृत, स्वाभिमानी विद्यासंपन्न स्त्रीचं चित्र त्यांनी दृष्टीसमोर ठेवलं होतं. आज स्त्रीच्या दृष्टिकोनात झालेली क्रांती हे त्यांच्या परिश्रमाचं फळ आहे. डॉ. आंबेडकरांनीही 'शिका', 'संघटित व्हा', 'संघर्ष करा' असा मंत्र उच्चारला. संघर्षाची चेतना शिक्षणातूनच मिळते. आणि त्यातूनच आपल्यावरची अन्याय्य बंधनं झुगारून देण्याची इच्छा उत्पन्न होते. म्हणूनच सर्व समाजसुधारकांनी (Knowledge is Power) हा सिद्धान्त स्वीकारून जागृती केली. म. फुल्यांच्या कालखंडात लोकहितवादी, आगरकर, न्यायमूर्ती रानडे इत्यादींनी शैक्षणिक आणि सामाजिक चळवळींचं भरण-पोषण केलं.

म. फुले यांनी अपार कष्ट करून शिक्षणाचा प्रवाह समाजातल्या शोषित जनतेपर्यंत पोहोचवला. प्रतिगामी व्यक्ती आणि शक्ती त्यांच्या मार्गात अनेक संकटं उपस्थित करीत होत्या. या प्रतिगामी सनातनी प्रवृत्तीशी फुल्यांना अटीतटीचा संघर्ष करावा लागला. ही समतेची आणि शिक्षणाची चळवळ मुळातच नष्ट करण्याचा चंग विरोधी शक्तींनी बांधलेला होता. 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।' ही त्यांची अवस्था झालेली होती. जुन्या समाजरचनेत आणि शिक्षणव्यवस्थेत ज्या मूठभर लोकांचे हितसंबंध गुंतलेले होते त्यांनी म. फुले आणि सावित्रीबाई फुले व त्यांचे सहकारी यांना छळण्याचे अनेक मार्ग शोधले होते. पण फुल्यांची निश्चयी वृत्ती आणि पराकोटीची ध्येयनिष्ठा यामुळं ते अखेरपर्यंत झगडत राहिले. पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूलची' स्थापना करणारे आणि 'निबंधमाला' या नियतकालिकाचं संपादन करणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या सारख्या शिक्षणप्रेमी आणि विचारवंत समजल्या जाणाऱ्या व्यक्तींनंही म. फुले यांच्या निंदा-नालस्तीची मोहीम आपल्या पत्रातून उघडली होती. शिक्षणाच्या चळवळीत बहुजन-समाज आणि दलित समाज सहभागी होत आहे हे पाहून चिपळूणकरांच्या उच्चकुलीन अहंकाराला तडा गेला. फुल्यांच्या विचारावर अन्यायी टीका करताना त्यांनी काढलेले दर्पयुक्त उद्‌गार प्रसिद्धच आहेत. 'ज्ञानभांडाराच्या किल्ल्या ब्राह्मणांच्याच कमरेला आहेत. ज्ञानासाठी तुम्हाला त्यांच्यासमोर वाकावेच लागेल.' आपल्या कमरेच्या किल्ल्या नाहीशा होणार हा भयगंड ज्या वर्गाच्या मनात निर्माण झाला त्याचे

हे प्रातिनिधिक उद्गार आहेत. सामाजिक परिवर्तनाचं आंदोलन पुनरुज्जीवनवादी प्रवृत्तीला मानवणारं नव्हतं. फुल्यांच्या चळवळीमुळं उच्चवर्णियांच्या शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील एकाधिकारशाहीला हादरा बसला. कारण पिढ्यान् पिढ्या अंधारात चाचपडणारा सामान्य माणूस जागृत होऊन प्रकाशाकडं चालू लागला. म. फुले यांनी सामाजिक समतेच्या चळवळीला बळ यावं म्हणून ग्रंथलेखनही केलं. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ म्हणजे त्यांच्या वैचारिक बंडखोरीचा आणि समतावादी विचारधारेचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. भिन्नभिन्न धर्मीय विचारांच्या व्यक्ती एकाच कुटुंबात राहून सत्यधर्माची उपासना करतात अशा आशयाचं एक अतिभव्य स्वप्न फुल्यांनी या ग्रंथात रंगवलं आहे. बौद्धधर्मी पत्नी, ख्रिस्तधर्मी पती, महंमदी धर्माची कन्या आणि सत्यधर्मी पुत्र एकाच कुटुंबात असू शकतील आणि सारे एकमेकांचा आदर करतील हा विचार म्हणजे समतातत्त्वाचा अत्यंत उज्ज्वल आविष्कार आहे.

आपल्या एका 'अखंडात' समताभावाचा फुल्यांनी केलेला आविष्कार हृद्य आहे. हृदयाच्या भाषेतून त्यांनी असे अनेक 'अखंड' लिहिले आहेत.

ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणासी । धरावे पोटाशी बंधूपरी ।।
मानव भावंडे सर्व एकसह । त्याजमध्ये आहा तुम्ही सर्व ।।
रंजले गांजले अनाथा पोसावे । प्रीतीने वागावे बंधूपरी ।।

सामाजिक समता आणि म. फुले यांचं समग्र जीवन परस्परांशी निगडित झालेलं होतं. त्यांच्या विचारज्योतीवर अनेक समाजसुधारकांच्या आत्मज्योती तेवत राहिल्या. परिवर्तनाच्या विचाराला वेग आला.

समताविचाराचा ध्वज अधिक उंचावर नेण्याच्या कार्यात म. गांधी यांनी केलेलं योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्यापूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी समतेचा लढा कोल्हापूर संस्थानात आणि महाराष्ट्रात तीव्र केला. सत्तेच्या माध्यमातून सामाजिक न्याय कसा प्रस्थापित करता येतो याचा आदर्श म्हणजे छ. शाहू महाराज. त्यांच्या विचारांना कृतीची जोड होती. अस्पृश्यवर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या राजसत्तेचा त्यांनी अत्यंत समुचित उपयोग केला. शाहू महाराज सामाजिक समतेचं चालतं बोलतं उदाहरण बनलं. दलितांच्या जीवनाला सुयोग्य आकार देऊन हा वेगळा ठेवलेला समाज हिंदुसमाजात मिसळून देण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न महत्त्वाचा आहे. आपल्या एका भाषणात ते म्हणतात -

'आमच्या धर्मात जातिभेदामुळे जो उच्चनीचपणा आलेला आहे तशा प्रकारचा जन्मजात भेदभाव जगाच्या पाठीवरील दुसऱ्या कोणत्याही धर्मात नाही. त्या जातिभेदाचे अत्यंत हिडीस स्वरूप जर कोठे दिसत असेल तर ते इतर जातीकडून तुम्हाला ज्या रीतीने वागविण्यात येते त्या रीतीत दिसून येते. तुम्ही आमचे बंधू असता तुम्हाला अस्पृश्य म्हणून लेखून मांजरे, डुकरे, कुत्री यापेक्षा तुम्हाला नीचपणाने वागविण्यात येते. ही किती लज्जेची गोष्ट आहे बरे ! ही अस्पृश्यता अलीकडे केव्हातरी मध्येच घुसडून दिली असली पाहिजे.... याठिकाणी स्पर्शा-स्पर्शाला विधिनिषेध असणे शक्य नाही. असे असता हल्लीच्या व्यवहारात तुम्हाला आम्ही अस्पृश्य म्हणून दूर ठेवतो ही किती शरमेची गोष्ट आहे!'' (नाशिक, १६ एप्रिल १९२० रोजी दिलेल्या भाषणातून)

म. गांधी यांनी अस्पृश्यता निवारणाच्या संदर्भात एक वेगळी भूमिका घेतली. अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील एक कलंक आहे, अस्पृश्यता हे हिंदुधर्मावरील एक बांडगूळ आहे म्हणून ते आपण नष्ट करून टाकणं धर्माच्या दृष्टीनं आणि मानवतेच्या दृष्टीनं हितावह आहे असं मत त्यांनी व्यक्त केलं. ते म्हणतात, 'कायद्याच्या जबरदस्तीने अस्पृश्यता घालविता येणार नाही. जेव्हा बहुसंख्य हिंदूंना अस्पृश्यता हा देवाविरुद्ध व मानवाविरुद्ध गुन्हा आहे असे कळून येईल आणि त्या गुन्ह्याबद्दल त्यांना जेव्हा शरम वाटेल तेव्हाच अस्पृश्यता नष्ट होईल. दुसऱ्या भाषेत सांगावयाचे म्हणजे हिंदुसमाजातील हृदयपरिवर्तन, म्हणजेच हृदयशुद्धी करण्याची ही प्रक्रिया आहे.' गांधीजींच्या मते अस्पृश्यता हा हिंदू धर्माचा भाग नाही. त्या धर्मात निर्माण झालेली ती एक विकृती आहे. अनेक दुष्ट रूढी धर्मात घुसडल्या जातात. त्या स्थिरावतात पण अशा रूढी म्हणजे धर्म नव्हे. अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी गांधीजींनी काँग्रेस पक्षाला पक्षकार्य म्हणून कार्यक्रम दिला होता. सामाजिक चळवळ ही राष्ट्रीय चळवळीशी त्यांनी जोडली. गांधीजींच्या चळवळीला केवळ भूतदयेचं अधिष्ठान होतं अशी टीका करण्यात येते, ती सयुक्तिक वाटत नाही. मानवतावादी दृष्टीतून ते या प्रश्नाकडे पाहत होते. अस्पृश्य समाज हा भारतीय समाजातून फुटून निघू नये आणि एक पंचमांश जनतेला अस्पृश्य समजून हिंदू समाजानं बहिष्कृत ठरवावं ही घटना नैतिकतेच्या व धार्मिकतेच्या दृष्टिकोनातून समूळ चुकीची आहे ही तर्कशुद्ध भूमिका त्यांनी घेतली होती. गांधीजींची विचारसरणी डॉ. आंबेडकरांच्या विचारधारेला विरोधी होती हा अपसमज दुर्दैवानं रूढ झाला. पण गांधीजींचा

विचार सर्वसमावेशक आणि उदार होता. राजकारणाच्या क्षेत्रात गांधी आंबेडकर यांचे मतभेद होते. पण समताविचाराच्या संदर्भात दोघांचंही कार्य परस्परपूरक होतं. सवर्ण हिंदूंच्या मनात समताभावाची पेरणी करण्याचा गांधीजींचा प्रयत्न काही अंशी सफल झाला. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या कोट्यवधी लोकांचं नेतृत्व डॉ. आंबेडकरांनी निर्विवादपणे केलं. पण हिंदू समाजात गांधीजींच्या चळवळीमुळं वैचारिक संक्रमण होऊन अस्पृश्यता निवारणाला वेग येत होता. गांधीजींच्या स्वराज्याच्या संकल्पनेत जातिभेद नव्हता. त्यात समता-विचाराचा विशेषत्वानं प्रभाव होता. समतेसाठी त्यांनी केलेली लढाई इतिहासाच्या दृष्टीनं उल्लेखनीय आहे. याच काळात विठ्ठल रामजी शिंदे, स्वातंत्र्यवीर सावरकर या समाजसुधारकांनी सामाजिक समतेसाठी आणि न्यायासाठी चळवळ चालू ठेवली होती. तिचेही अनुकूल परिणाम लोकमनावर होत होते. एका रात्रीतून सामाजिक सुधारणा घडत नाही. त्यातून दोन हजार वर्षांपेक्षा अधिक काळ विषमता या देशात पोसली जात होती. ती सर्वार्थानं नष्ट करण्यासाठी अजूनही आपल्याला समतेचा लढा प्रखरपणानं करावा लागणार आहे. या लढाईत सर्व सामर्थ्यानिशी स्वतःला झोकून देणाऱ्या एका युगप्रवर्तक क्रांतिकारकाच्या चळवळीचा विचार केल्याशिवाय महाराष्ट्राचा आणि भारताचा सामाजिक इतिहास पूर्ण होणार नाही. आपल्या बलिष्ठ हातांनी सामाजिक न्यायाची आणि समतेची पहाट जन्माला घालणाऱ्या या महनीय व्यक्तीचं नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

सामाजिक समतेच्या ग्रंथातला एक स्फूर्तिदायक अध्याय म्हणून डॉ. आंबेडकरांचा उल्लेख करता येईल. दलितमुक्तीचा लढा लढण्यासाठी दलितांतूनच एक समर्थ योद्धा त्यांच्या रूपानं उभा राहिला ही घटना अर्थपूर्ण आहे. समता आणि न्याय या गोष्टी याचना करून मिळत नाहीत. त्या निग्रहानं दीर्घकाळ लढूनच मिळवाव्या लागतात. आंबेडकरांनी केलेल्या संग्राम हा मानव्याची उंची वाढवणारा आहे. अनेक शास्त्रांचं, धर्मांचं आणि संस्कृतीचं सखोल अध्ययन केलेल्या या विचारवंतानं आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत समतेसाठी, माणुसकीच्या हक्कांसाठी लढत दिली. महाभारतातल्या कर्णानं चिखलात फसलेला आपला रथ बाहुबलानं वर उचलला. त्याप्रमाणं विषमतेच्या दलदलीत फसलेलं समाजरथाचं चाक त्यांनी निर्धारानं वर काढण्याची जी कृती केली त्यामुळं समाजपरिवर्तनाला गती प्राप्त झाली. त्यांच्या मते 'क्रांतीचं चक्र अर्धवट फिरलं आहे. ते आम्ही आमच्या

बळावर पूर्णपणे फिरवू' क्रांती अजून अपुरी आहे हा त्यांचा निष्कर्ष बरोबर आहे. १९२७ साली आपल्या 'बहिष्कृत भारत' या नियतकालिकात लिहिलेल्या प्रमुख लेखात ते म्हणतात,

''युगानुयुगे तुम्ही गुलामगिरीच्या गर्तेत गंजत, कुजत, सडत पडला आहात. तरी तुमची भावना आहे की आपली दुर्दशा देवनिर्मित आहे. ईश्वरी संकेतानुसार आहे. तुम्ही गर्भात असतानाच का मेला नाहीत ? तुम्ही मनुष्यासारखे मनुष्य आहात. स्वतःच्या कर्तबगारीने जगात उत्कर्ष करण्यास प्रत्येकास स्वातंत्र्य आहे. तुम्ही या देशाचे रहिवासी आहात. म्हणून तुम्हाला स्वाभिमानपूर्वक जिणे जगायचे असेल तर 'स्वावलंबन' हाच खरा आत्मोन्नतीचा मार्ग होय.'' डॉ. आंबेडकरांनी केलेलं हे आवाहन उत्कट, आक्रमक पण विचारांना व कृतीला स्फुरण देणारं आहे. राजकीय स्वातंत्र्य देशाला मिळावं म्हणून ते धडपडत होते. पण ज्या स्वराज्यात समता नसेल ते स्वराज्य आपण बुटाच्या ठोकरीनं उडवून देऊ असं त्यांनी सडेतोडपणानं सांगितलं. अस्पृश्यतेच्या इंगळ्या कशा सर्व बाजूंनी माणसाला डसतात आणि त्याचा बळी घेतात याची परिपूर्ण अनुभूती जशी त्यांना होती तशी सवर्ण समाजसुधारकांना नव्हती. वणव्यात ज्याचे पंख जळतात; त्या पक्ष्याचा चित्कार सर्वात अधिक तीव्र असतो. आंबेडकरी विचारातली रग आणि धग त्यांच्या अनुभूतीतून आलेली आहे. दलित समाजाला आपल्या गुलामगिरीची तर्कनिष्ठ मीमांसा करायला त्यांनी शिकवलं. ज्या शास्त्रांनी आणि रूढींनी असंख्य लोकांना विषमतेच्या ज्वालेत लोटून दिलं ती शास्त्रं आणि ते तथाकथित धर्म ठामपणे बाजूला सारण्याचा त्यांनी संदेश दिला. डॉ. आंबेडकर यांनी दलितमुक्तीसाठी अनेक शिक्षणसंस्था उभारल्या. शिक्षणाची संजीवनी मिळाली म्हणजे माणूस अन्यायाशी दोन हात करायला सज्ज होतो हे लक्षात घेऊनच शाळा कॉलेजांची आणि वैचारिक नियतकालिकांची त्यांनी स्थापना केली. लढल्याशिवाय पदरात काहीच पडत नाही; हे जाणून १९२७ मध्ये महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. आपल्या जन्मसिद्ध मानवी हक्कांसाठी संघर्ष अटळपणे करीत राहण्याची शिकवण त्यांनी दिली. चवदार तळ्याचा सत्याग्रह करण्याची घटना क्रांतिकारक आहे.

दलित समाजाला गावातल्या विहिरीवर किंवा तळ्यावर पिण्यासाठीही पाणी मिळू नये अशी तरतूद सवर्ण समाजानं करावी यासारखी माणुसकीची क्रूर चेष्टा आणखी कोणती असू शकेल ? महाडच्या सार्वजनिक तळ्याचं पाणी गुरेढोरे

पिऊ शकतात; पण माणसासारखा माणूस मात्र त्या पाण्याला स्पर्श करू शकत नव्हता. हा विषमतेचा कडेलोट आहे. भगवान बुद्ध म्हणाले होते. 'जात ही कल्पना आहे. पाणी मात्र वास्तव आहे.' बुद्धाचे हे उद्‌गार कालौघाबरोबर वाहून गेले. गावात राहणाऱ्या लोकांनी गावकुसाबाहेर आसरा घेतलेल्या दलितांना साऱ्या सार्वजनिक विहिरी आणि तलाव बंद करून टाकले. कुठल्यातरी ओहोळातून वाहणारं घाणेरडं पाणी पिण्यासाठी मिळवायचं हेच दलितांचं जिणं होतं. डॉ. आंबेडकरांनी पाण्यासाठी महाडला सत्याग्रह केला. ओंजळभर पाणी दलित व्यक्तीनं हातात घेतलं तर त्याच्यावर दगडधोंड्यांचा वर्षाव केला गेला. वर्णव्यवस्थेचं हे अतिभयानक स्वरूप पाहिल्यावर ही व्यवस्था मुळापासून उद्‌ध्वस्त करण्याचा विचार प्रत्येक क्रांतिकारकाच्या मनात येऊन गेला. पण डॉ. आंबेडकरांनी हा प्रश्न धसाला लावला. चवदार तळ्याचं पाणी पेटून निघालं. सत्याग्रहाच्या या चळवळीत चवदार तळ्यात दलित सत्याग्रहींचं रक्तही मिसळलं.

या लढ्याचा परिणाम सवर्ण आणि दलित दोघांवरही झाला. सवर्ण जनता अंतर्मुख झाली. शेकडो वर्षे आपण अन्याय सहन करीत आहोत याची दाहक जाणीव दलितांसाठी निर्माण झाली. माणुसकीचे अधिकार मिळवण्यासाठी आपल्याला जुन्यापुराण्या, सडलेल्या विचारांशी झुंज द्यायची आहे हा वज्रनिर्धार दलित समाजानं डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली केला. कोटी-कोटी दलित जनतेला आमरण गुलामगिरीत कुजत ठेवण्याची वैचारिक तरतूद करणाऱ्या 'मनुस्मृतीची' डॉ. आंबेडकरांनी जाहीरपणे होळी केली. शूद्रांनी केवळ तीन वर्णांचं दास्य करावं असा विचार 'मनुस्मृतीत' आहे. या अर्थाचे अनेक श्लोक उद्‌धृत करता येतील. शूद्राची उत्पत्ती परमेश्वरानं गुलाम म्हणूनच केली आहे. असं निक्षून सांगणाऱ्या मानवताद्रोही ग्रंथाची होळी करणं म्हणजे 'आम्ही गुलाम म्हणून जगणार नाही आणि गुलाम म्हणून मरणार नाही' अशी घोषणा या कृत्यामुळं दुमदुमली. समतेच्या लढाईत घडलेली ही घटना सत्याग्रहाइतकीच उचित होती यात शंका नाही.

नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, पर्वती सत्याग्रह हे आंबेडकरी चळवळीतले ऐतिहासिक महत्त्वाचे टप्पे आहेत. अनेक ग्रंथ लिहून, विधिमंडळात आणि लोकसभेत भाषणे करून, सामाजिक समतेचा विचार प्रत्येक व्यासपीठावर मांडून ही न्याय्य चळवळ आंबेडकरांनी जोमदार बनविली. त्यांचे लक्षावधी अनुयायी समता विचारानं झपाटलेले होते. कर्मवीर दादासाहेब गायकवाड त्यांपैकीच

एक होते. त्यांनी स्वतःला बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत झोकून दिलं. सावलीप्रमाणं ते त्यांच्या पाठीशी राहिले. आंबेडकरी विचारधारा त्यांनी सर्वत्र वाहती राहावी यासाठी अथक परिश्रम केले. आपल्या या निष्ठावंत सहकाऱ्याबद्दल डॉ. आंबेडकरांनी म्हटलं आहे, ''जर माझं आत्मचरित्र लिहिलं तर त्यातील अर्धअधिक चरित्र भाऊराव गायकवाडांचं असेल.'' इतकी एकरूपता दादासाहेबांची या चळवळीशी झालेली होती. डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर निराधार बनलेल्या दलित समाजाला संघटित करण्याचं कार्य दादासाहेबांनीच केलं.

सवर्ण हिंदू समाजाच्या धार्मिक आणि मानसिक प्रकृतीत फारसा बदल होत नाही हे पाहिल्यावर डॉ. आंबेडकरांच्या मनात धर्मांतराचे विचार घोळू लागले. येवल्याच्या एका जाहीर सभेत ते म्हणाले होते, ''मी हिंदू म्हणून जन्माला आलो त्याला माझा नाइलाज आहे. पण मी हिंदू म्हणून मरणार नाही.'' १९५६ साली आपल्या असंख्य अनुयायांसह त्यांनी 'बुद्धं सरणं गच्छामि' असा घोष करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्मही याच मातीतला. भारतीय संस्कृतीचा सारा उदात्तपणा त्याच्यात सामावलेला. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व या तत्त्वत्रयीचं माहेरघर असलेला हा धर्म त्यांनी धारण केला. ही तीन तत्त्वं त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीतून नव्हे तर भारताच्या संस्कृतीतून घेतली. ते म्हणतात, 'Positively my social philosophy may be said to be enshrined in three words - Liberty, Equality, Fraternity.'

मनुस्मृतीचं दहन करणाऱ्या डॉ. आंबेडकरांवर नियतीनं स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याची जबाबदारी टाकली. मनुस्मृती गेली आणि भीमस्मृती उदयाला आली. इतिहासाचा प्रवाह खरं तर नियतीनं बदलला नाही. तो जागृत झालेल्या माणसानं बदलला. समतेच्या लढ्याचं हे फलित आहे. पण याचा अर्थ समतेची लढाई संपली आणि विषमतेचं निर्मूलन झालं असा करता येणार नाही. राज्यघटनेत समतेची अक्षरं लिहिली गेली. पण प्रत्येक भारतीयाच्या मानसिक घटनेत या अक्षरांची मुद्रा अद्यापि उमटलेली नाही. तांत्रिक अर्थानं समतेचं राज्य आलं. पण दैनंदिन लोकजीवनात विषमतेच्या पाऊलखुणा जागोजागी दिसतात. शिक्षणाच्या क्षेत्रात सुद्धा जातिपातींचा विचार केला जातो. शाळा आणि कॉलेजं विशिष्ट जातीची किंवा पंथाची म्हणून मानली जातात. इतर क्षेत्रांतही जात हाच परवलीचा शब्द समजला जातो. राजकारणात पक्षोपक्षांनी जातीला आणि धर्माला

महत्त्व दिलेलं दिसतं. जोपर्यंत धर्मनिरपेक्ष वृत्ती राजकारणात येत नाही तोपर्यंत राजकारणाचा चेहरा बदलणं शक्य नाही. सत्तेच्या सिंहासनावर बसण्यासाठी जनतेच्या जातीय अभिमानावर फुंकर मारून ज्वाला भडकवली जाते. आपण धर्मनिरपेक्ष आहोत असा दावा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात करणारे पक्षोप पक्ष अजूनही जातीय चक्रव्यूहातून बाहेर पडलेले नाहीत. फुले-आंबेडकरांचं स्वप्न केव्हा साकार होणार की त्याची अशीच विटंबना होत राहणार हे आज तरी सांगता येत नाही. देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाला समतेचं, ममतेचं आणि बंधुत्वाचं वळण लावण्यासाठी फुले-आंबेडकरांसारखे युगपुरुष पुन्हा निर्माण होण्याची आवश्यकता आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची समता आणि स्वातंत्र्य या तत्त्वांवर असीम निष्ठा होती. तसे निष्ठावंत नेते आणि अनुयायी समाजाच्या सर्वस्तरांतून उदयाला यावेत अशी अपेक्षा आहे.

आज पुन्हा विषमतावादाचं तण देशात पद्धतशीरपणे वाढवलं जात आहे. पुनरुज्जीवनवादी प्रवृत्ती पुन्हा फोफावत आहेत. समता आणि बंधुता यांची जी क्षीण हाक थोडीफार कानावर पडत आहे तिचं बळ वाढवण्यासाठी परिवर्तनवादी शक्ती एकत्रित आल्या पाहिजेत. नुसत्या राजकीय स्वातंत्र्यानं प्रश्न सुटत नाहीत. ज्या स्वातंत्र्याला समतेची बैठक नाही ते स्वातंत्र्य केव्हाही कोसळू शकतं; अशा आशयाचा इशारा भारतीय लोकसभेत डॉ. आंबेडकरांनी दिला होता. याकडं दुर्लक्ष करणं देशाला परवडणारं नाही.

तेराव्या शतकापासून समता विचाराच्या प्रतिष्ठापनेसाठी ज्या प्रमुख चळवळी झाल्या त्यांचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. समतेची चळवळ चढ-उतारांनी भरलेली आहे. यश थोडं, अपयश मात्र अधिक असा तिचा इतिहास आहे. समतातत्त्वाचा प्रभाव गेल्या सातशे वर्षांत लोकमनावर काही प्रमाणात निश्चितपणे झाला. एकेकाळी विषमतेचं उघडपणे समर्थन केलं जात होतं. आज तसं क्वचितच कुठं होत असेल. हे या चळवळीचं चांगलं फलित आहे असं म्हणायला प्रत्यवाय नाही. पुरोगामी विचारांच्या चळवळी लोकजीवनात रुजवण्याची जबाबदारी आजच्या बुद्धिजीवी वर्गानं, शाळा-कॉलेजांनी, विद्यापीठांनी, पत्रकारांनी आणि साहित्यिकांनी स्वीकारली पाहिजे. म्हणजे समतेला अधिक आवेग प्राप्त होईल.

■■■

# नियती आणि पुरुषार्थ

काही सुगंधी फुलं स्वर्गातल्या सुंदरींच्या केशकलापात विहार करतात. काही फुलं रसिक आपल्या हृदयाजवळ ठेवतात. काही सुदैवी फुलं देवाच्या चरणांवर विलीन होतात. पण एखादं फुटक्या नशिबाचं फूल मात्र प्रेताला शृंगारण्याचं काम करतं. गडकऱ्यांच्या 'एखाद्याचे नशीब' या कवितेत अशा आशयाच्या ओळी आहेत. एखाद्याच फुलाच्या वाट्याला प्रेतावर पडण्याचा प्रसंग का यावा ? त्याचं उत्तर 'फुटके नशीब' या शब्दात कवीनं दिलं आहे. काही भाग्यवंत फुलं असतात. ती सुंदर स्त्रियांच्या केशपाशात स्थान मिळवतात. पण एखाद्या फुलाला मात्र प्रेताची सोबत करावी लागते. याच्यामागे कुठलाही सुसंगत नियम नाही. प्रेताशी शृंगार करणारं फूल सुगंधात इतर फुलांपेक्षा कमी नसतं. रंगगंधानं ते फुललेलं असतं. पण त्याच्या ललाटी विधात्यानं जे लिहिलेलं असतं ते त्याला चुकवता येत नाही. नियतीची इच्छा किंवा प्रारब्ध अथवा दैवयोग अशी नावं याला दिली जातात. फुलांना स्वातंत्र्य असतं तर कुणीही प्रेताबरोबर स्मशानात जायला संमती दिली नसती. पण हे स्वातंत्र्य त्यांनाच काय माणसांनाही नाही; अगदी चक्रवर्ती राजालाही नाही. अवतारी पुरुषांनाही नाही. नियती ही सर्वसमर्थ असते. ती केव्हा कुणावर प्रसन्न होईल आणि कधी कुणावर रुष्ट होईल हे सांगता येत नाही.

द्वारकाधीश श्रीकृष्ण म्हणजे कर्तृत्वाचं आणि नेतृत्वाचं एक उंच शिखर, त्याच्या बुद्धिचातुर्यानं पांडवांना हस्तिनापूरचं राज्य मिळालं. कौरवांचा निःपात झाला. त्याच्या हातातल्या सुदर्शन चक्रानं अनेक दुष्टांची मस्तकं धडावेगळी झाली. त्याच्या प्रेमासाठी असंख्य स्त्री-पुरुष आसुसलेले असायचे. असा हा पूर्णावतारी श्रीकृष्ण. पण त्याच्यावरही नियतीनं प्रहार केला. त्याचं यादवकुळ आणि प्रचंड सैन्य दैवानं उद्ध्वस्त केलं. द्वारकानगरी ज्वालांनी वेढली गेली. त्याच्या डोळ्यांसमोर तिची राखरांगोळी झाली. एकटी अवस्थेत रानातल्या एका झाडाखाली विश्रांती घेत पडलेल्या श्रीकृष्णाला एका शिकाऱ्याच्या बाणानं मृत्यू आला. ही जर महनीय व्यक्तीच्या जीवनाची कथा असेल तर आम्ही सामान्य माणसांनी कशाचा अभिमान बाळगायचा ? नियतीच्या हातातली आपण तर सामान्य खेळणी आहोत. तिच्या

विळख्यात पुरुषोत्तमांचेही प्राण गेले. आम्हा पामर जीवांची काय अवस्था होणार ?

नियती आणि पुरुषार्थ यांची अनेक वेळा तुलना केली जाते. 'मी दैव किंवा प्राक्तन जाणत नाही. माझा विश्वास माझ्या मनगटाबर आहे. आकाशातले तारे पकडण्याची हिंमत माझ्या हातात आहे. मी करीन ती पूर्व. सारं जग माझ्यापुढं, थरथर कापतं. मी जगाला जिंकणारा सिकंदर आहे.' असा पुरुषार्थाचा डंका बाजवणारा सिकंदर ऐन तारुण्यात मरण पावला. त्याची प्रेतयात्रा निघाली तेव्हा त्याचा रिकामा हात सर्वांना दिसत होता. जणू सिकंदर जगाला सांगत होता; आपल्या हातात काही नसतं. सारं काही प्रारब्धाच्या हातात असतं. आपण केवळ नियतीच्या इच्छेप्रमाणं नाचत राहायचं. विचार करू लागलो तर हे एक अत्यंत बिदारक आणि दाहक सत्य आहे हे मान्य करण्याशिवाय गत्यंतर नाही. 'रामायण' आणि 'महाभारत' हे पुरुषार्थाचा जयजयकार करणारे ग्रंथ मानले जातात. सागरावर सेतू बांधून रामचंद्रानं आपलं सैन्य घेऊन लंकेला धडक दिली. रावणाला जिंकलं. आणि सीता परत मिळवली. ही कथा पराक्रमाची आहे यात शंका नाही. पण अयोध्येचं सिंहासन न मिळता रामाला वनवासातलं जिणं पदरात घ्यावं लागलं ते नियतीच्या लहरीनं. सीतेचं अपहरण तरी कोणत्या नियमानं झालं ? तिला पुन्हा परित्यक्त अवस्थेत रामानं वनवासात पाठवून दिलं ही घटनासुद्धा दैवाच्या विचित्रतेची लीला स्पष्ट करणारी आहे. निरपराध, निष्कलंक सीतेला भूमिगत व्हावं लागलं. याचा अर्थ काय करायचा ? अशी असंख्य उदाहरणं मानवी इतिहासात पावलोपावली आढळतात. द्रौपदीसारख्या तेजस्विनीचं भर दरबारात वस्त्रहरण होणं ही घटना म्हणजे नियतीचा एक विकृत खेळ नव्हे का ? त्यामुळंच गडकऱ्यांनी कवितेत योजलेला 'फुटकं नशीब' हा शब्द अत्यंत सार्थ वाटतो. कुणीतरी म्हणेल, 'ही पोथ्या-पुराणातली उदाहरणं घेऊ नका. जुन्या भाकड कथांवर आमचा विश्वास नाही. आता आपण विज्ञानसंपन्न जगात आहोत. आजचा पुरुषार्थी माणूस चंद्र-मंगळावर पोहोचला आहे. उद्या तो विश्वाची सूत्रं आपल्या हातात घेईल आणि स्वतःच परमेश्वर होईल.'

हा आशावाद अत्यंत मधुर आहे यात शंका नाही. नियतीपेक्षा पुरुषार्थाला महत्त्व देण्याची प्रवृत्ती स्वागतार्ह आहे. पण चंद्र-मंगळावर आपल्या पाऊलखुणा उमटवणारा माणूस खरोखरच सर्वसमर्थ आहे काय याचा विचार केला पाहिजे. आजच्या शास्त्रीयदृष्ट्या प्रगत असलेल्या जगातही प्रचंड उत्पात घडत आहेत.

अमेरिकेतल्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या उत्तुंग इमारती क्षणार्धात धुळीला मिळतात आणि हजारो लोकांचे बळी जातात. विमानांचे आणि रेल्वेगाड्यांचे भयानक अपघात, हजारो लोकांचे जीव घेणारे भूकंप, रोगांच्या साथी, दुष्काळ आणि महापूर या साऱ्या घटनांच्या मागं एखादी सुसूत्र विचारपद्धती आहे काय ? महापूर कशाने आला ? किंवा दुष्काळ का पडला ? या प्रश्नाचं उत्तर विचारवंत लोकही 'दैवाची इच्छा' या पलीकडं काही देऊ शकतील असं वाटत नाही. 'देव' या शब्दापेक्षा 'दैव' हा शब्द एकामात्रेनं अधिक आहे. म्हणूनच हे दैव देवांनाही आपल्या ताब्यात ठेवतं. एखादा कवी हे सार दैवविलसित पाहून म्हणतो, 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' त्याला म्हणजे मानवाला कुणीतरी उच्चस्वरानं सांगितलं पाहिजे-

'स्वतःला समर्थ समजणाऱ्या दुबळ्या माणसा, नियतीच्या वाऱ्याची एक लहरसुद्धा तुला धुळीच्या कणाप्रमाणं उंच अस्मानात नेऊ शकते. तू सत्तेच्या आसनावर आहेस. कारण प्रारब्धानं तुला ते बहाल केलं आहे. आपण आपल्या पराक्रमानं सत्तेचं शिखर गाठलं हा भ्रम मनात ठेवल्यामुळं तू आनंदात असशील. पण तुझी सत्ता केव्हाही एखाद्या बुडबुड्याप्रमाणं फुटू शकते. दैवाचं चक्र फिरलं की तुझी सत्ता निमिषार्धात उलथून पडली. हेच दृश्य तुला पाहावं लागेल. पंडितांचं पांडित्य, सुंदर तरुणींचा यौवनमद आणि धनवंतांचा श्रीमंती माज, क्षणभरात उधळून देण्याची कुवत केवळ नियतीच्या एका कटाक्षात आहे. तिचे गोडवे गात तिची लहर असेल तोपर्यंत रहा.

मानवी जीवनात नियती हा एक घटक आहे यात संशय नाही. पण हाच एकमेव महत्त्वाचा घटक असतो असं समजून चालणारे लोक आयुष्यात कधीही प्रगतीचे पाऊल टाकू शकत नाहीत. दैववाद माणसाला निष्क्रिय आणि निरुत्साही बनवतो. प्रवाहाच्या धारेत सापडलेला माणूस हातपाय न हलवता निष्क्रिय राहिला तर तो वाहवत जाईल. एखाद्या खडकावर त्याचा कपाळमोक्ष होईल. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनं पोहत जाण्याचं साहस करण्यासाठी आत्मविश्वासाचं बळ असावं लागतं. आकाशातले ग्रह प्रसन्न आहेत की नाहीत याची चिंता करीत बसणाऱ्याला यश मिळाल्याचा इतिहास नाही. बंद असलेल्या दरवाजावर बेगुमानपणानं धडक मारावी लागते. दैवाच्या कृपेनं केव्हातरी दार उघडलं जाईल ही कल्पना हास्यास्पद आहे. प्रत्येक गोष्टीला जाणीवपूर्वक आकार द्यावा लागतो. या बाबतीत अनेक उदाहरणं देता येतील. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वाभिमान आणि

स्वातंत्र्य यांचं नवं युग सतराव्या शतकात निर्माण केलं. त्यांचा विश्वास आपल्या हातातल्या समशेरीवर होता. मावळ्यांच्या मनात स्वातंत्र्यभावनेचे निखारे त्यांनी प्रयत्नपूर्वक फुलवले. औरंगजेबाचं सैन्य पोटासाठी लढत होतं तर शिवरायाचा प्रत्येक मावळा ध्येयासाठी संघर्ष करीत होता. इतिहास असं सांगतो की लक्षावधी सैन्यानिशी औरंगजेब मराठ्यांचं राज्य बुडवण्यासाठी महाराष्ट्राच्या भूमीत पंचवीस वर्षं ठाण मांडून बसला आणि अखेर महाराष्ट्रातच निराशेनं त्याला प्राण सोडावा लागला. कोणाला हा नियतीचा खेळ वाटेल. पण मराठ्यांच्या पुरुषार्थाचा हा रोमहर्षक अध्याय आहे. राज्यं नशीबानं मिळत नाहीत. ती मनगटाच्या जोरावर मिळवावी लागतात. गांधीजींच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ चाललेल्या लढ्यात अखेर ब्रिटिशांना हिंदुस्थानातून पळ काढावा लागला. परमेश्वरी शक्तीनं भारतात स्वातंत्र्य अवतीर्ण झालं नाही. ते लक्षावधी तरुणांच्या त्यागातून, घामातून आणि रक्तातून उदयाला आलं. नियतीचा प्रवाह अनुकूल करून घ्यावा लागला. प्रयत्नाच्या बळानं नियती शरण येऊ शकते, यात शंका नाही. नियती आणि पुरुषार्थ यांच्यातली स्पर्धा प्राचीन काळापासून चालू आहे. एक उदाहरण देतो.

अहिंसा आणि शांती यांचे महान पुरस्कर्ते भगवान महावीर यांनी नियतिवादावर टीका करून प्रयत्नशीलतेचा विचार आग्रहानं मांडला आहे. देव नावाची कल्पनाच त्यांनी अमान्य केली. दैवकल्पनाही झुगारून दिली. एकदा भगवान महावीरांना सद्दालपुत्र नावाच्या प्रसिद्ध कारखानदारानं आपल्या कारखान्याला भेट द्यावी अशी विनंती केली. हा सद्दालपुत्र नियतीवादी होता. त्या काळात मक्खली गोशाल या नावाचा महावीरांचा शिष्य स्वतःला 'तीर्थंकर' म्हणवून घेत होता. तो महावीरांचा विरोधक होता. त्याचं शिष्यत्व सद्दालपुत्रानं स्वीकारलेलं होतं. महावीरांनी त्याच्या विनंतीप्रमाणं कारखान्याला भेट दिली. त्यात तऱ्हेतऱ्हेची सुबक आणि कलात्मक भांडी तयार होत असत. तो प्रचंड कारखाना सद्दालपुत्रानं महावीरांना दाखवला.

महावीरांनी त्याला एक प्रश्न विचारला, ''सद्दालपुत्रा, इतर कारखान्यांपेक्षा तुझ्याच कारखान्यात अधिक कलापूर्ण भांडी तयार होतात असा लौकिक आहे. तुझा उद्योग उत्कर्षाला पोहोचला आहे. याचं कारण काय ?''

सद्दालपुत्रानं हात जोडून नम्रतेनं उत्तर दिलं, ''प्रभो, माझं नशीब चांगलं म्हणून माझी भांडी सर्वत्र प्रसिद्ध झाली. माझा उद्योगही माझ्या दैवानं भरभराटीला आला.

दैवाची अशीच मर्जी राहिली तर मी भारतवर्षातला सर्वात धनवंत आणि भाग्यवंत उद्योगपती ठरेन. नियतीची अशीच कृपा माझ्यावर राहावी असा आशीर्वाद द्या.''

भगवान महावीर हसले, ते म्हणाले , ''यात दैवाचा काय संबंध ? आपल्या कारखान्यातली भांडी मजबूत आणि आकर्षक व्हावीत म्हणून तू स्वतः प्रयत्न करतोस. उत्तम प्रतीची माती निवडतोस. तिच्यावर आवश्यक ते सर्व संस्कार करतोस. ती माती चाळण्यापासून ते तिला आकार देण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया निर्दोष व्हाव्यात म्हणून स्वतः लक्ष देतोस. भांडी तयार झाल्यानंतर त्यांच्यावर पुन्हा रासायनिक प्रक्रिया करतोस. यातून भांड्यांना मजबुती येते. हे सारं तुझ्या प्रयत्नांचं फळ आहे. नियतीशी काहीही संबंध नाही. तू स्वस्थ घरी बसलास तर कारखान्यातलं उत्पादन नियतीमुळं चांगलं होईल का ? निष्क्रिय राहिलेले किंवा यश मिळाल्यावर केवळ सुखोपभोगात बुडून गेलेले व्यापारी आणि उद्योजक यांचे सर्व व्यवहार कोसळून पडल्याची उदाहरणं तुला माहीत आहेत. त्यांचे बंद पडलेले उद्योग हा नियतीचा खेळ आहे, की त्यांच्या निष्क्रियतेचा तो परिणाम आहे याचा तूच विचार कर. शेतातून पीक काढायचं झालं तर नियती ते करू शकत नाही. जमीन नांगरावी लागते. बीज पेरावं लागतं. विहिरीतलं पाणी शेताला द्यावं लागतं. शेतकऱ्याला घाम गाळावा लागतो. वाढणाऱ्या पिकाचं रक्षण करावं लागतं. तेव्हा धान्य पदरात पडतं. ही नियतीची लीला नाही. हा पुरुषार्थाचा प्रभाव आहे.''

महावीरांच्या या तर्कशुद्ध विचारसरणीनं सद्दालपुत्र प्रभावित झाला. इतिहास घडतो तो माणसाच्या प्रयत्नातून आणि पराक्रमातून. प्रयत्नच नसेल तर केवळ काळ उलटत जातो. नवं काहीच घडत नाही.

मानवी संस्कृतीची भव्य इमारत आकाशात उंच गेली ती दैवाच्या लहरीमुळं नसून माणसाच्या ज्ञानामुळं आणि परिश्रमामुळं हा चमत्कार घडला. बुद्ध, महावीरां-सारखे महापुरुष हे सुद्धा नियतीच्या लहरीनं आकाशातून खाली पडत नाहीत.

'Genius never drops from skies' हे वचन सार्थ आहे. महापुरुषत्व हेही प्रयत्नवादाचं फळ आहे. महनीय व्यक्तींना उपेक्षेच्या आणि विरोधाच्या खडतर वाटेनं प्रवास करावा लागतो. समाज अज्ञानामुळं त्यांचा छळ करीत राहतो. पण हे त्या काटेरी वाटेनं चालतच राहतात. पाय रक्ताळले तरी त्यांची मनं मजबूत असतात. अशा अखंड अविरत तपस्येतून त्यांना आपलं ध्येय गाठता येतं. नियतीला वाकवणारी दुर्दम्य इच्छाशक्ती ज्याच्याजवळ असते त्याला नियतीची प्रार्थना

करण्याची गरज भासत नाही. फुले-आंबेडकरांनी आपली सामाजिक समतेची चळवळ उभी करताना एखाद्या ज्योतिष्याला आपली कुंडली दाखवली होती काय ? आपल्या अंतःकरणाची प्रवृत्ती हीच प्रमाण मानून ते परिवर्तनासाठी झगडत राहिले. झगडण्याची रग आणि विचारांची धग ज्यांच्या रक्तात लहरत असते ते प्रारब्धाची स्तुतिस्तोत्रं गात नाहीत. याची असंख्य उदाहरणं इतिहासातून देता येतात. नियती आणि पुरुषार्थ यातला झगडा सनातन आहे आणि तो चालूच राहणार आहे. पण प्रयत्नाचं आणि पुरुषार्थाचं पारडं या झगड्यात अधिक जड असतं हे लक्षात ठेवलं पाहिजे. माणसं फार लवकर आत्मविश्वास हरवून बसतात. कोणत्याही लहान-मोठ्या अपयशाला ते नियतीची इच्छा म्हणून कपाळाला हात लावतात. इतकी नियती प्रबल असते असं मला वाटत नाही. ग्रहांची शांती करून, जपजाप्य आणि होमहवन करून प्रारब्ध बदलता आलं असतं तर ती फार सोपी गोष्ट ठरली असती. नामांकित ज्योतिषाला सुद्धा स्वतःची कुंडली नीट कळत नाही.

कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांकडे एक ज्योतिषी गेला. महाराजांची कुंडली पाहून त्यांचं भविष्य आपण अचूक वर्तवू शकतो असं त्यानं सांगितलं. शाहू महाराज हसले. ते म्हणाले, ''आधी तुमचं भविष्य पाहू.'' त्यांनी चार-पाच चिठ्ठ्या तयार केल्या. त्यातली कोणतीही ज्योतिषानं उचलावी असं सांगितलं. ज्योतिषानं हातातली जपमाळ जपली. मणी मागंपुढं फिरवले. कुठलातरी मंत्र तो पुटपुटला आणि मग विचारपूर्वक चिठ्ठी उचलली. त्यावर महाराजांनी 'रुपये पाच' असं लिहिलं होतं. ''हे तुमचं नशीब.'' असं ते त्या ज्योतिषाला म्हणाले. त्यानं शंका व्यक्त केली. ''सर्वच चिठ्ठ्यांवर हेच लिहिलं नसेल कशावरून ?'' अशी पृच्छा केली. महाराज म्हणाले, ''सगळ्या चिठ्ठ्या पाहा.'' एका चिठ्ठीवर पाचशे रुपये. दुसरीवर पाच हजार रुपये. आणि तिसरीवर आणखी मोठी रक्कम लिहिली होती. महाराज हसून म्हणाले, ''स्वतःचं नशीब कळत नाही आणि माझं भविष्य सांगण्याचा आव आणता. आता मुकाटपणानं घरी जावा.''

एक विनोदी उदाहरण म्हणून मी या घटनेचा उल्लेख केला नाही. प्रारब्ध किंवा दैव या कल्पनांवर विसंबून राहिलेल्या बहुसंख्या अज्ञानी लोकांची आयुष्यात अशीच अवस्था होते. लॉटरीचं तिकीट विकत घेणाऱ्या लक्षावधी लोकांची निराशा होते. एखाद्याला केवळ अपघातानं किंवा योगायोगामुळं अथवा कावळा बसायला आणि फांदी तुटायला या काकतालीय न्यायानं बक्षीस मिळतं, ते नियतीच्या

इच्छेमुळं किंवा परमेश्वर प्रसन्न झाल्यामुळं मिळतं असा हास्यास्पद गैरसमज करून घेण्याचं कारण नाही. एका दारुड्या गुन्हेगाराला- ज्यानं आपल्या बायकोला दारूला पैसे देत नाही म्हणून जाळून मारलं- दयाळू परमेश्वरानं अथवा कृपाळू नियतीनं लॉटरीत पाच लाख रुपये मिळवून दिले. यात परमेश्वराचा आणि दैवाचा काही संबंध नाही. यामागं तर्कसंगती नाही. 'एक अपघात' हेच त्याचं वर्णन होऊ शकेल. माणसाची महत्त्वाकांक्षा आणि त्याचा पुरुषार्थ यातच त्याच्या प्रगतीची बीजं साठवलेली असतात.

महारथी कर्ण हे अनेकांना नियतीवादाचं एक प्रकरण वाटतं. त्याचं समग्र जीवन त्याच्या अदम्य पुरुषार्थाची कहाणी सांगणारं आहे. आपल्या प्रारब्धाशी आत्यंतिक निकरानं संघर्ष करीत राहिलेले कर्ण हे महाभारतातलं एक असामान्य व्यक्तित्व आहे. त्याचे प्रसिद्ध उद्‌गार स्फूर्तिदायक आहेत. तो म्हणाला, ''मी सूत असेन किंवा सूतपुत्र असेन, जो कोणी असेन तो असेन; मला त्याची पर्वा नाही. एखाद्या कुळात जन्म होणं हा केवळ दैवाच्या लहरीचा भाग आहे. पण मी मात्र पुरुषार्थाचा तीव्र उपासक आहे. माझ्या उत्कट प्रयत्नांतून मी माझं जीवन घडवीत आहे. माझ्या हातातले धनुष्यबाण हेच माझ्या जीवनाचे आणि कीर्तीचे साथीदार आहेत. जोपर्यंत माझ्या हातात हे धनुष्य आहे तोपर्यंत नियतीसुद्धा मला पराभूत करू शकत नाही. अर्जुनासारखा धनुर्धरही मी माझ्या पौरुषानं पराजित करू शकतो. कूळ आणि वर्ण यांचा टेंबा मिरवणारे भेकड असतात. अपघातानं मिळालेलं जन्मकूळ इतकंच त्यांचं भांडवल असतं. नियतीचे पंख छाटण्याची हिम्मत माझ्या शस्त्रात आहे. दैवाची रडगाणी गात बसायला मला वेळ नाही.''

कर्णाचे हे उद्‌गार त्याच्या स्वाभिमानी पौरुषाचे रसरशीत आविष्कार आहेत. अर्जुनाबरोबरच्या अंतिम संग्रामात त्याच्या रथाची चाकं जमिनीत घुसू लागली. रथाची गती थांबू लागली. रथाखाली उतरून आपल्या बलिष्ठ बाहूंनी जमिनीत घुसलेलं रथचक्र जोर एकवटून कर्ण वर काढतो. हे दृश्य मानवी प्रयत्नाच्या पराकाष्ठेचं आहे. निःशस्त्र कर्णावर अर्जुनाला बाणांचा वर्षाव करावा लागला. रणांगणात कर्णाला मृत्यू आला तरी त्याचा मृत्यू म्हणजे त्याच्या पुरुषार्थाचं मरण नव्हे. वीरगती प्राप्त झालेला कर्ण शूर अर्जुनापेक्षाही उंच दिसतो. म्हणूनच ध्येयवाद आणि पुरुषार्थ हे दोन घटक मानवी जीवनात प्रारब्धापेक्षा कितीतरी पटीनं अधिक महत्त्वाचे असतात. दैवाचे गोडवे गाणं हा दुर्बलांचा धर्म आहे. हे रडतराव काहीच

करू शकत नाहीत. कारण ते जिवंत मनाचे नसतात. भेकड माणसं आपल्या मरणापूर्वीच अनेक वेळा मरून गेलेली असतात.

समाज आणि राष्ट्र दैववादी भेकडांच्या दुबळेपणामुळं उभं राहू शकत नाही. कुबड्या घेऊन चालणारा माणूस धावू शकत नाही. चालतानाही तो अडखळत राहतो. दैववादी विचारांची कुबडी प्रथम फेकून द्यावी लागेल. ज्या पक्ष्याला अथांग आकाशात झेप घेण्याची इच्छा असते, त्याच्या पंखात बळ असतं, प्रेरणा असते, उंच गगनाला आव्हान देण्याची धमक असते, तो पक्षी त्या असीम निळाईत भरारी घेत राहतो. समाजजीवन आणि राष्ट्रजीवन घडवण्यासाठी आकाशस्थ ग्रहांची आराधना करण्याचं कारण नाही. पत्रिकेतले ग्रह कोणत्या स्थानावर आहेत याची चिंता करण्याचं कारण नाही. ग्रह बळकट असले तरी आपले आग्रह आणि निग्रह त्यांच्यापेक्षाही बळकट असले तर मरणोन्मुख राष्ट्रालाही आपण संजीवन देऊ शकतो. आमचा देश हा रामकृष्णांचा आहे. शिवाजी महाराजांचा आहे. विवेकानंद आणि गांधींचा आहे. मधल्या काळात अनेक परकीय आक्रमकांनी आमचा दारुण पराभव केला. इथली देवळं उद्ध्वस्त केली. इथं प्रचंड रक्तपात केला आणि या देशाचे प्रजाजन 'ग्रहदशा फिरली, परमेश्वरी कोप झाला, नशीब फुटलं' म्हणून आक्रमकांसमोर लोटांगणं घेत राहिले. लोटांगणवाद्यांना यश मिळत नाही. शत्रूच्या लाथा मात्र मिळत राहतात. लाथ खाणारा जेव्हा 'लाथ मारीन तिथं पाणी काढीनं' या त्वेषानं उफाळून उठतो तेव्हा त्याचा विजय होतो. राष्ट्राच्या सर्वांगीण अभ्युदयासाठी प्रत्येक क्षेत्रात प्रयत्न आणि पुरुषार्थ यांची जरूरी आहे. शरणागतीचे दुबळे, हळवे शब्द फेकून दिले पाहिजेत. आत्मप्रत्ययाचे ज्वलंत शब्द हृदयातून ओठांवर आले पाहिजेत. उगीच दैववादाचं तुणतुणं वाजवून स्वतःची करंटी करमणूक करून घेण्यात काय अर्थ आहे ? पुरुषार्थाचं रणवाद्य आत्मबळानं आम्ही वाजवू लागलो तर या देशात संपन्नतेचे समर्थ वारे निश्चित वाहू लागतील.

■■■

# अज्ञान आणि अंधश्रद्धा

मनुष्याची व्याख्या करताना तो विचारशील प्राणी आहे असं म्हटलं जातं. पण माणसासंबंधी विचार करताना त्याच्या आचारविचारात, जीवनपद्धतीत अनेक तर्कशून्य आणि भ्रममूलक गोष्टींचा आढळ होतो. आईन्स्टाईननं एक प्रश्न विचारला, 'What is the hardest thing in the world ?' त्यानं स्वतःच उत्तर दिलं, 'To think.' विचार करणं ही खरोखरच एक अवघड प्रक्रिया आहे. माणसं स्वतंत्र बुद्धीनं विचार करीत नाहीत. परंपरेनं जो काही विचार किंवा अविचार चालत आला त्यालाच चिकटून राहतात. याचा अर्थ जे रूढ झालं असेल, जे शतकानुशतकं चालत आलं आहे त्याचा अंगिकार करायचा. त्या रूढीचं मूळ कशात आहे याची कधीही चिकित्सा बहुसंख्य माणसं करीत नाहीत. 'एष धर्मः सनातनः' हे त्यांचं ठरलेलं उत्तर असतं. हे उत्तर देखील शेकडो वर्षांपूर्वी कुणीतरी देऊन ठेवलेलं असतं. त्याचा केवळ पुनरुच्चार होत राहतो. जे सनातन आहे ते वैचारिकदृष्ट्या शुद्ध की अशुद्ध याचा विचार करण्याचा प्रश्नच येत नाही. कित्येक जुने-पुराणे अर्थहीन आणि कालबाह्य झालेले संकेत माणसांनी पिढ्यान्‌पिढ्या छातीशी कवटाळून ठेवले आहेत.

एकदा एक ज्ञानवंत समजले जाणारे तर्कशास्त्राचे प्राध्यापक आपल्या मुलाचा आजार बरा व्हावा म्हणून कुठल्याशा बैराग्याकडं जाऊन मंतरलेला ताईत आणि अंगारा घेऊन आले. आता आपला मुलगा त्या बाबाच्या कृपेनं ठणठणीत बरा होईल असं सर्वांना सांगू लागले. एक विद्वान प्राध्यापक बाबांचा अनुग्रह घेतात, त्यांच्याकडून मंतरलेला ताईत आणतात हे पाहिल्यावर अनेकांनी बाबांचे पाय धरले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या शास्त्रशुद्ध उपचारापेक्षा एखाद्या अज्ञानी बैराग्यानं दिलेला अंगारा प्राध्यापकालाही महत्त्वाचा वाटावा याचा अर्थ त्याचं बौद्धिक आरोग्य बिघडलेलं होतं. ताईत, गंडेदोरे आणि चिमूटभर अंगारा यात आरोग्यकारक शक्ती कशी असणार ? पण हे उच्च विद्याविभूषित तर्कशास्त्री महाराजांचं गुणगान करीत होते. बाबांच्या हाताला गुण आहे. त्यांना दैवी शक्तीमुळं हे सहज शक्य आहे असा तर्कवाद करणाऱ्या त्या पंडिताला कोणत्या शब्दांतून सांगायचं ? त्यानं

आपल्या विचाराची खिडकी बंद करून ठेवली होती. अंधश्रद्धेच्या काळोखातच त्याच्या अधू दृष्टीला प्रकाशकिरण भेटत होते. कोणतेही शहाणपणाचे शब्द त्याच्या बुद्धीला स्पर्श करू शकत नव्हते.

तो म्हणाला, ''बाबांच्या आंतरिक दृष्टीला सर्वकाही दिसतं. त्यांनी आपलं सामर्थ्य पणाला लावूनच अंगारा दिला आहे. तुझ्यासारखे नास्तिक बाबांच्या ज्ञानशक्तीवर विश्वास ठेवीत नाहीत हे तुमचं दुर्दैव आहे. अरे, तुमच्यासारख्या शंकेखोरांना सद्गती मिळणार नाही.''

त्यानं माझ्याकडं एक केविलवाणा दृष्टिक्षेप टाकला. माझ्या अज्ञानाची तो कीव करीत होता. मला सद्गती मिळेल की नाही यापेक्षा त्याच्या विचारांची झालेली अधोगती पाहून मी अवाक् झालो. तो प्राध्यापक लौकिकदृष्ट्या ज्ञानी होता. पण ज्ञान मिळवूनही त्याला शहाणपण आलेलं नव्हतं. आपली बुद्धी त्यानं बाबाकडं गहाण टाकली होती. 'बाबावाक्यं प्रमाणम्' ही त्याची भूमिका आता निश्चित झालेली होती.

ज्यांना विचारवंत म्हणतात, बुद्धिजीवी म्हणतात तेच लोक भोळ्याभाबड्या समजुतीच्या अधीन झाले तर सर्वसाधारण माणसाची स्थिती काय असेल ? याची कल्पनाही करणं कठीण व्हावं. ज्या जीवनाला विचारांची बैठक नसते ते जीवन सूत्र तुटलेल्या पतंगाप्रमाणं कुठंही भरकटत जातं. आणि अज्ञानाच्या झाडाझुडुपात अडकून फाटून जातं. जगण्याची प्रक्रिया विचारशुद्ध असावी हा आग्रह फारच थोड्या लोकांनी धरलेला असतो.

भास्कराचार्य या प्राचीन गणितपंडिताला चंद्रसूर्यांची ग्रहणं कशी लागतात याची पूर्ण कल्पना होती. तो खगोलशास्त्रज्ञ होता. पण हा विचारवंत देखील ग्रहण लागलं की ते सुटावं म्हणून आपल्या घरात कर्मकांडात्मक गोष्टी भाविकतेनं करीत राहायचा. ज्ञानवंताच्याही मस्तकावर अंधश्रद्धाचं गाठोडं असतं आणि ते ओझं सांभाळीत ते देखील आयुष्याची वाटचाल करीत असतात. कित्येक नामवंत डॉक्टरसुद्धा एखाद्या बुवाच्या भजनी लागलेले पाहायला मिळतात. बुवाच्या पायावर मस्तक टेकणारे एक ख्यातनाम सर्जन म्हणाले, ''अहो, हे बुवा तुम्हाला सामान्य वाटतात. त्यांना अक्षरओळखही नाही; पण ब्रह्मांडाचं ज्ञान त्यांना आहे. ते हनुमानाचा अवतार आहेत.'' त्या शस्त्रवैद्याचं हे मत ऐकल्यावर त्याच्याच बुद्धीवर शस्त्रक्रिया केली पाहिजे आणि अंधश्रद्धांची निरर्थक जाळी-जळमटं त्याच्या

डोक्यातून काढली पाहिजेत असं मला वाटलं. पण भर्तृहरीनं म्हणून ठेवलं आहे, 'न जाणे न नेणे, अशा पामराला बुझावू शकेना विधाना तयाला' हेच खरे.

आज आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत. विज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची प्रगती झालेल्या या कालखंडात माणसानं बुद्धी हीच जीवनाची नियामक शक्ती मानली पाहिजे. देवभक्तीच्या नावाखाली जे असंख्य वेडेविद्रे प्रकार चालतात ते पाहिल्यावर हसावं की रडावं हेच कळत नाही. देवीच्या उत्सवात शेकडो बोकडांचा भाविक लोक बळी देतात. बोकडाच्या मांसाचा नैवेद्य मिळाला की ती देवी प्रसन्न होऊन भक्तांना संपत्ती, सत्ता, संतती आणि अनेक इच्छित गोष्टी मिळवून देते हा समज असंख्य लोकांच्या हाडीमासी प्राचीन काळापासून खिळलेला आहे. पूर्वी यज्ञात पशूंची आहुती दिली जायची. यज्ञात ज्याची आहुती दिली जाते तो पशू स्वर्गात जातो. त्याचं कल्याण होतं. आणि आहुती देणाऱ्या यज्ञकर्त्याला सर्व ऐहिक वैभव प्राप्त होतं असं सांगितलं जायचं. पुराणातल्या कथांतून पशुयज्ञाच्या कथा साग्रसंगीत वर्णिल्या आहेत. प्रत्येक राजा यज्ञ करीत असे. यज्ञाच्या धुरानं आणि मंत्रोच्चारानं, पशूंच्या आक्रंदनानं आकाश निनादून जायचं. पुरोहितांची यज्ञाच्या नावाखाली चंगळ चालायची. आहुती दिलेल्या प्राण्याच्या मांसानं आणि सोमरसाच्या प्राशनानं याज्ञिक संतुष्ट झालेले असायचे.

यज्ञात पडलेला पशू जर स्वर्गाला जातो तर याज्ञिकांनी स्वतःचीच आहुती देऊन स्वर्गसुख का भोगू नये ? असा परखड प्रश्न भगवान महावीरांनी विचारला होता. महावीर आणि बुद्ध यांच्या कालखंडात ही यज्ञसंस्कृती जोमात होती. या हिंसक, भोगपरायण, विचारशून्य रुढींवर बुद्ध-महावीरांनी वैचारिक प्रहार केले. हिंसा करणं, पशुपक्ष्यांना यज्ञ हे गोंडस नाव देऊन जाळून मारणं आणि त्यांच्या मांसावर ताव मारणं या राक्षसी कृतीला 'धर्म' ही संज्ञा एकेकाळी दिली जात होती. हा धर्म कोणत्याही तत्त्वावर आधारलेला नव्हता. त्याच्या मुळाशी नागडा, उघडा भोगवाद होता. दया आणि माणुसकी यांना काळिमा फासवणारं कृत्य म्हणजे धर्म नव्हे. आजदेखील अनेक देवदेवतांना जे बळी दिले जातात ते कोणत्या देवानं मागितलेले असतात ? ही रानटी क्रूर चाल मानवतेच्या तत्त्वाशी पूर्णपणे विसंगत आहे. यात अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा मिलाप झालेला आहे. जे दैवत भक्तांना सर्व इच्छित गोष्टी आपल्या कृपाप्रसादानं देऊ शकतं ते बोकडाच्या मांसाचा नैवेद्य कशाला मागेल ? माणसांप्रमाणं देवदेवतासुद्धा स्वार्थी असतात काय ? काहीतरी

घेतल्याशिवाय द्यायचं नाही ही नीती देवांनी कधीपासून स्वीकारली ? खरे तर देव हा भावाचा भुकेला असतो. त्याला दुसरी कसलीच अपेक्षा नसते. गीतेत तर म्हटलं आहे, 'जो मला भक्तिभावानं एखादं पानफूल देतो किंवा पाण्याचा एखादा थेंब वाहतो त्याच्यावर मी संतुष्ट आहे. मला केवळ विशुद्ध भक्ती पाहिजे. 'न मे भक्तः प्रणश्यति !' मुळातच नवस-सायास करणं हा देवाला काहीतरी लाच देण्याचा अश्लाघ्य प्रकार आहे. बहुसंख्य लोक देवदेवतांची स्वार्थी दृष्टिकोनातून पूजा करतात. देव किंवा ईश्वर नावाची एखादी समूर्त किंवा अमूर्त शक्ती अस्तित्वात आहे आणि तिच्या इच्छेने जगाचे व्यवहार चालतात ही कल्पना तर्कबुद्धीच्या कसोटीवर तपासून घेतली पाहिजे. पण माणसाला देवश्रद्धेची काठी हाती घेतल्याशिवाय आयुष्याचा खडकाळ रस्ता नीट चालता येत नाही. श्रद्धेचा आधार मानसिक बळ देतो. पण कित्येक विचारवंतांनी ईश्वरकल्पना मुळातच नाकारलेली आहे. ही उदाहरणं थोडी आहेत. म्हणून ती बाजूला ठेवू. देव आहे असं जरी गृहीत धरलं तरी तो देव किंवा देवी दीनदुबळ्या पशुपक्ष्यांच्या रक्तमांसाचा नैवेद्य भक्तांकडे मागेल हे कदापि संभवत नाही. कारण सर्व धर्मांत देवाचं जे वर्णन केलेलं आहे ते नीटपणानं समजून घेतलं पाहिजे.

देवत्व म्हणजे दया, शांती आणि क्षमा यांचं प्रतीक आहे. देव ही कोणत्याही जीवाला मारणारी शक्ती नसून ती जीवांचं रक्षण आणि पोषण करणारी कृपाशक्ती आहे. ईश्वर मानणाऱ्या कोणाही विचारवंतानं ती प्राण्यांचा संहार करणारी आणि त्यांच्या मांसाला चटावलेली हिंसक शक्ती आहे असं म्हटलेलं नाही. तरीही एखाद्या दैवतासमोर हजारो पशूंना ठार करण्याची ही विकृत कल्पना कशी निर्माण झाली ? या संदर्भात कित्येक संतांनी आणि विचारवंतांनी लोकप्रबोधन करण्याचा अखंड प्रयत्न केला. जो दुःखितांना पोटाशी धरतो आणि त्यांचं दुःखनिवारण करतो त्यांच्यातच देवत्व जागृत असतं. अशा आशयाच्या विचारांनी प्रत्येक संतानं आपलं वाङ्मय लिहिलं आणि समाजाचं उद्‌बोधन केलं.

भगवान महावीरांनी सव्वीस शतकांपूर्वी अहिंसा हाच धर्माचा मध्यबिंदू मानून अहिंसेचा विचार जगात सर्वत्र पोहोचवला. भगवान बुद्धाच्या जीवनातही अहिंसा आणि करुणा या मूल्यांचा उत्कट आविष्कार झाला आहे. याच अहिंसेचं प्रतिपादन करुणामूर्ती येशू ख्रिस्तानं केलं आहे. संत तुकारामांनी तर क्षुद्र दैवतांच्या आणि अज्ञानी भक्तांच्या प्रवृत्तीवर आपल्या दाहक शब्दांचे आसूड ओढले आहेत.

त्यांचा हा अभंग उल्लेखनीय आहे.

नव्हे जाखाई जोखाई। मायराणी मेसाबाई॥
बळिया माझा पंढरीराव। जो या देवांचा ही देव॥
रंडी चंडी शक्ति। मद्यमांसाने भक्षिती॥
बहिरव खंडेराव। रोटीसुटीसाठी देव॥
गणोबा विक्राळ। लाडुमोदकांचा काळ॥
मुंज्या म्हैसासुरे। हे तो कोण लेखी पोरे॥
वेताळे फेताळे। जळो त्यांचे तोंड काळे॥
तुका म्हणे चित्ती। धरा रखुमाईचा पती॥

मद्य मांसांच्या मोबदल्यात आपल्या भक्तांना मनोवांछित सुख देवता देतात; हा एक प्राचीन काळापासून लोकांनी कवटाळलेला हास्यास्पद गैरसमज आहे. तुकारामांनी तर तीर्थयात्रा आणि भ्रांतिष्ट स्वरूपाचं कर्मकांड यावर हल्ले चढवले आहेत. नवस-सायास करून संतती होत असेल तर मग पतीची आवश्यकता काय ? असा रोकडा सवाल त्यांनी केला आहे. तीर्थक्षेत्री धोंडा आणि पाणी असते तिथं देव भेटत नाही. तो सज्जनांच्याच हृदयात असतो असं सांगून त्यांनी बुद्धिवादाची बाजू भक्कमपणे मांडली आहे. पण या विज्ञानयुगातही माणसं एखाद्या तीर्थयात्रेसाठी कित्येक लाखांच्या संख्येत गर्दी करतात. तिथल्या ओढ्यानदीतल्या दुषित पाण्यात बुड्या मारून आजारी पडतात. पण तीर्थस्नानाचं पुण्य पदरी पडलं या भ्रमात राहातात. भाविक लोक आजारातून सुटण्यासाठी आणखी बोकडांचा बळी देतात. अंधश्रद्धेची ही भयानक, जीवघेणी रूपं पाहिली म्हणजे शिक्षणाचा प्रसार होऊन सुद्धा आजचा माणूस अज्ञानाच्या दाट धुक्यातून बाहेर पडलेला नाही हे लक्षात येतं. याचा अर्थ आपल्याकडे शास्त्र आलं पण शास्त्रीय दृष्टी मात्र अद्यापि आलेली नाही. एकीकडे अद्ययावत यंत्रतंत्रांचा वापर करायचा, वातानुकूलित गाडीतून प्रवास करायचा, शास्त्रज्ञानातली उच्च पदवी उरस्फोड करून मिळवायची. आणि दुसरीकडे एखाद्या निरक्षर बुवाच्या पायावर मस्तक टेकवायचं ही विलक्षण विसंगती असंख्य लोकांच्या जीवनात रुजलेली दिसते. एखाद्या रोगाची साथ आली की एखाद्या देवीच्या पुढ्यात बोकड कापला की रोगाची भीती उरणार नाही असले विचारशून्य समज अशिक्षितांबरोबर सुशिक्षितांच्याही डोक्यात दाटीवाटीनं भरलेले दिसतात. ज्ञानाचा अग्नी सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांचं भस्म करू शकतो.

हे विधान आता अत्यंत मर्यादित अर्थानं घ्यावं लागेल. कारण तार्किकता, सुसंगती आणि शास्त्रीय दृष्टी ही केवळ ग्रंथात राहते. प्रत्यक्ष आचरणात उतरवण्याची क्षमता भल्याभल्या पंडितांत देखील असत नाही. जी विद्वत्ता फक्त मस्तकात राहते, जी मनात आणि वागण्यात उतरत नाही त्या शोभादायक विद्वत्तेला काहीच किंमत नाही. 'मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, ब्रह्मदेवाचे का असेना, बुद्धिदेव बलीयसी असे असले पाहिजे.' हे लोकहितवादींचे उद्‌गार आहेत. पण ज्या बुद्धिवादी दृष्टीचा त्यांनी पुरस्कार केला, ती दृष्टी कित्येक वेळा त्यांच्या स्वतःच्या आचरणात दिसली नाही. या बाबतीत सुधारकाचार्य आगरकर आणि महात्मा फुले यांची उदाहरणं मात्र आदर्शाच्या पातळीवर जाऊ शकतात. बुद्धिनिष्ठ विचार अंमलात आणण्यासाठी जे वैचारिक धैर्य लागतं त्याचा विद्यावंतांतही अभाव दिसतो.

जुन्या ग्रंथांचं आणि पोथ्या पुराणांचं नव्या बुद्धियुगात काहीच महत्त्व उरलेलं नाही. पण तरीही ग्रंथप्रामाण्याच्या आहारी फार मोठा लोकसमुदाय गेलेला आहे. मनुस्मृती न वाचता मनुस्मृतीची नित्यनेमाने पूजा करणारे एक पदवीधर माझ्या परिचयाचे आहेत. दररोज पोथ्या-पुराणांना भाविकतेनं ते गंधाक्षता वाहातात. त्या पोथ्या-पुराणातले विचार केव्हाच कालबाह्य झाले. पण ही पुराणं ईश्वरप्रणित आहेत ही श्रद्धा मात्र ते सोडायला तयार नाहीत. आपला धर्मग्रंथ हा प्रत्यक्ष ईश्वरानं रचला आहे असं प्रत्येक धर्मीयाला वाटतं. या श्रद्धेच्या मुळाशी घोर अज्ञान आहे. प्रत्येक धर्मग्रंथ माणसानंच निर्माण केला आहे. यापुढेही जाऊन देवदैवतं हे देखील मानवी बुद्धीचं अपत्य आहे असं म्हणता येतं. पण बहुसंख्य माणसं अंधश्रद्धेच्या वर्तुळातून बाहेर पडत नाहीत. कदाचित अंधश्रद्धेच्या कवचामुळं आपलं संरक्षण होऊ शकेल हीच धारणा त्यामागे आहे. याच श्रद्धेचा गैरफायदा आजपर्यंत प्रत्येक धर्मातील पुरोहितांनी घेतलेला आहे. लोकांच्या अज्ञानाचं भांडवल इतकं प्रचंड आहे की त्यावर पुरोहित वर्ग पिढ्यान्‌पिढ्या जगत आलेला आहे. 'माझ्या मनबुद्धीला जे इष्ट वाटेल तेच मी करीन. शेकडो पोथ्या-पुराणांनी मला विरोध केला तरी माझ्या बुद्धीचा कौल मी प्रमाण मानीन.' असं धैर्य क्वचितच कुठेतरी दृष्टीला पडतं. अंधश्रद्धेच्या आणि अज्ञानाच्या भरलेल्या बाजारात बुद्धिवाद नावाचा पदार्थच मिळत नाही.

अंधश्रद्धेचा माणसाच्या जीवनावर जो प्रभाव पडतो; तो त्याच्या आणि सामाजिक प्रगतीला अत्यंत मारक आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत भ्रांतिष्ट संकेतांच्या वलयात आपलं मन गुरफटलेलं असतं. बालकाचा जन्म झाला की नाना प्रकारच्या

खुळचट चालीरीती त्याच्या पाचवीला पूजल्या जातात. पाचव्याच दिवशी कोणी सटवाई नावाची देवता बालकाच्या कपाळावर अदृश्य अक्षरात म्हणे त्याचं दैव लिहून काढते. सटवाईचा ललाटलेख कोण लिहितो कुणास ठाऊक ! ही वेडगळ कल्पना आजही पुसली गेली नाही. शकुन आणि अपशकुन यांचं प्रस्थ पाश्चात्य देशातही आहे. तेरा हा आकडा का अशुभ मानला गेला याचा उलगडा होत नाही. तेरा नंबरची खोली हॉटेलात नसते. आपल्याकडे असली तरी सुविद्य मनुष्यही ती स्वीकारीत नाही. आकडे किंवा वार अथवा दिनांक शुभ आणि अशुभ कसे असतात याची सुसंगत मीमांसा कोणीही ज्योतिषी करू शकत नाही. आमच्या दूरदर्शनवरून आणि वृत्तपत्रातून राशीभविष्य सांगितलं जातं. जगातली अब्जावधी माणसं केवळ बारा राशीत बसवली जातात आणि आकाशस्थ ग्रहांचा परिणाम माणसांच्या आयुष्यावर होतो असं ज्योतिषी छातीला हात लावून सांगतात. त्यांचं भविष्य त्यांना कळत नाही. पण जगाच्या भविष्याबद्दल हे आत्मविश्वासानं बोलतात.

एका विशिष्ट दिवशी जगात प्रलय होईल असं एका ज्योतिषानं ठामपणानं सांगितलं. अनेक वृत्तपत्रांनी ही बातमी पहिल्या पानावर प्रकाशित केली. गावोगावी यज्ञ, होमहवन आणि जपजाप्य सुरू झाले. त्या विशिष्ट दिवशी लोक श्वासोच्छ्वास-देखील सावधपणे करू लागले. पण जगात कुठेही उत्पात झाला नाही. कदाचित होमहवनांचा हा सुपरिणाम झाला असावा ! काही वर्षांपूर्वी गणेशोत्सवात सर्वत्र गणपती दूध पिऊ लागला अशी वार्ता पसरली. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी देखील या वार्तेला दुजोरा दिला. प्रसारमाध्यमांनी गणपतीच्या दुग्धप्राशनाची सुवार्ता तत्परतेनं पसरवली. हा वेड्यांचा बाजार नव्हे तर काय आहे ? विवेकबुद्धी गहाण टाकली की साऱ्या अंधश्रद्धा बळकट होतात. हे सर्व वेडे प्रकार विशिष्ट समाजातच घडतात असं नसून या बाबतीत सर्व समाज सारखेच दोषी आहेत. एका सुविद्य क्रिकेट खेळाडूनं मुलाखत देताना सांगितलं, ''माझ्या खिशात लाल रंगाचा हातरुमाल असला म्हणजे मी निश्चित शंभर धावा काढू शकतो. एखाद्या वेळी वेगळ्या रंगाचा हातरुमाल आला असला तर मी शून्यावर बाद होतो.'' हा खेळाडू पुढे प्रत्येक सामन्यात लाल रंगाचा हातरुमाल असून देखील त्याचा खेळ बिघडत गेला.

प्रगती आणि परिवर्तन ज्ञाननिष्ठेतूनच होऊ शकते. प्रत्येक आचार-विचाराला ज्ञानाची बैठक असल्याशिवाय मानवी समाज विकासाकडे वाटचाल करू शकत नाही. हिंदू समाज असो किंवा मुस्लीम, ख्रिश्चन अथवा अन्य कोणताही धर्म मानणारा

समाज असो तो जोपर्यंत अतार्किक आणि अशास्त्रीय संकेतांना व श्रद्धांना कुरवाळीत असेल तोपर्यंत त्याची प्रगती होणं शक्य नाही. जसजसा काळ पुढे जातो तसतसा विज्ञानवादी विचार वाढला पाहिजे. जगाचा इतिहास लक्षात घेतला तर धार्मिक आचार-विचारात, सामाजिक संकेतात अनेक परिवर्तन होत गेली. विचार स्वातंत्र्याकडे समाज अधिकाधिक वळत गेला. महाराष्ट्रातही अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्यावर प्रहार करणारे कित्येक विचारवंत आणि समाजसुधारक उदयाला आले. पण अलीकडच्या काही वर्षांत माणूस उत्तरोत्तर निरर्थक कर्मकांडात आणि अंधश्रद्धांच्या जाळ्यात अधिकच गुरफटत चाललेला आहे. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होऊनसुद्धा सुशिक्षित समाजही कर्मकांडी बनावा याचं आश्चर्य वाटतं. देवदेवतांच्या जत्रा, यात्रा प्रचंड गर्दीनं फुललेल्या असतात. अनेक तीर्थक्षेत्रांवर देवाच्या दर्शनासाठी माणसं दोन-दोन दिवस रांगा लावून उभी असतात.

याचं कारण शोधताना असं लक्षात आलं की आपल्या देशात मानवी जीवन भय आणि दहशत यांच्या दडपणाखाली तग धरून आहे. मुंबई आणि दिल्लीसारख्या आधुनिक सुधारणांनी सज्ज असलेल्या महानगरात केव्हा बॉंबस्फोट होतील किंवा केव्हा लुटालूट आणि जाळपोळ होईल, केव्हा भयानक अपघात घडतील याची शाश्वती नाही. असुरक्षितपणाचं भय बहुसंख्य लोकांच्या मनात आज आहे. शहरं आणि खेडी सारखीच असुरक्षित बनली आहेत. आपल्यावर कोणत्या क्षणी कोण हल्ला करील हे सांगता येऊ नये इतकी अनिश्चितता जाणवत आहे. अगतिक झालेल्या माणसाला देवळातले देवच आपल्याला वाचवू शकतील असं वाटत आहे. हे भीतीचं जीवघेणं वातावरण माणसाला देवदेवस्कीकडं, ज्योतिषी आणि मांत्रिक यांच्याकडं ओढून नेत आहे. बुडणाऱ्याला काडीचाही आधार हवासा वाटतो. मानसिक अस्थिरतेच्या अवस्थेत विचारशक्ती हरवून बसलेला माणूस नको त्या ठिकाणी आधार घेऊ पाहत आहे. आपल्या श्रद्धेला वैचारिक कणा नाही हे माहीत असून देखील सुशिक्षित स्त्री-पुरुष होमहवन, जपजाप्य आणि बुवा-बैरागी यांच्या आहारी चाललेले आहेत. बुद्धिवादाचे विचार ऐकून घेण्याची त्यांची तयारी फारशी दिसत नाही.

अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा करण्याची मागणी एका बाजूला होत आहे. पण कायदेमंडळात हा प्रस्ताव अजूनही मांडला जात नाही. जे कायदा करू शकतात त्यातले बहुतेक लोक अंधश्रद्धेच्या चिखलात स्वतःच फसलेले आहेत. निवडणुकीचं

तिकीट मिळावं म्हणून ज्योतिषाकडं खेटे घालणारे आणि एखाद्या देवीला नवस बोलणारे हे महाभाग काय करू शकणार ? हे स्वतःच ताईत आणि गंडेदोरे यांच्यात अडकलेले आहेत.

मागे नाशिकला मराठी साहित्य संमेलन झालं. ते निर्विघ्नपणे पार पडावं म्हणून संयोजकांनी बोकडाचा बळी देऊन त्याच्या मांसाचा प्रसाद घेतला अशी वार्ता प्रसिद्ध झाली होती. एकाही साहित्यिकानं या अशास्त्रीय कृतीचा निषेध केला नाही. साहित्यिकांची ही 'बुद्धिवादी' भूमिका पाहून आम्ही धन्य झालो.

महाराष्ट्र हा बुद्धिनिष्ठ समाजसुधारकांचा आणि क्रांतिकारकांचा प्रदेश आहे. महाराष्ट्रानंच भारताला फुले, आगरकर, सावरकर आणि आंबेडकर यांच्यासारखे सुधारणावादी नेते दिले. बुद्धिवादी विचारांची उपासना करणाऱ्या या नेत्यांनी अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्यावर घाव घालून प्रगतीची वाट तयार केली. पण आज आम्ही यांचे पूजक बनलो आहोत. अनुयायी मात्र नव्हे. विचारांची पूजा करण्याऐवजी व्यक्तीची पूजा करणं हा एक अंधश्रद्धेचाच प्रकार आहे. एखाद्या वृक्षावर बांडगुळं वाढावीत आणि त्यांनी वृक्षाचा जीवनरस शोषून घ्यावा तशी अवस्था बुद्धिवादी विचारांची होत आहे. जमिनीतलं तण मुळासकट काढल्याशिवाय तिच्यातून भरघोस पीक येत नाही. ज्ञानविज्ञानाच्या फाळानं समाजाची मनोभूमी पुन्हापुन्हा नांगरण्याची आवश्यकता असते. या भूमीत नवे फुले-आगरकर पेरण्याची आणि त्यांची वाढ करण्याची गरज आज अधिकांशानं वाटत आहे. लोकांच्या रोगट अंधश्रद्धांच्या मुळावर प्रहार करण्यासाठी प्रबोधनाची चळवळ तीव्र केली पाहिजे. आमचे साहित्यिक सुद्धा अंधश्रद्धेला खतपाणी घालणारं साहित्य लिहितात याची खंत वाटते. शाळा कॉलेजच्या क्रमिक पुस्तकांतूनही परंपरावादाचं आणि जुनाट श्रद्धांचं तुणतुणं वाजवलेलं असतं. शिकवणारे अध्यापकही त्याच पठडीतून आलेले असतात. संत साहित्यावर प्रवचनं देणारे तथाकथित अभ्यासक संतांनी कसे आणि कोणते चमत्कार केले यावर बोलत राहतात. बुद्धिवादाच्या विचारांचं दुर्भिक्ष सर्वत्र वाढत चाललं आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्राथमिक शाळेपासून विद्यापीठ पातळीपर्यंत बुद्धिवादी विचारांची जोपासना करणारी शिकवण मिळाली पाहिजे. खेड्यापाड्यांतही प्रबोधनाचे वारे वाहते ठेवण्यासाठी कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत. यापेक्षा अधिक काय सांगणार ?

■■■

# छत्रपती शाहू : इतिहास घडविणारा लोकराजा

महाराष्ट्रजीवनाची घडण करण्यासाठी अनेक प्रज्ञावंतांनी, प्रतिभावंतांनी आणि क्रांतिकारकांनी आपली सारी सामर्थ्ये समर्पणबुद्धीने वेचली असे इतिहासावरून आढळते. 'महाराष्ट्र' या शब्दात जो आशय आहे, त्या अर्थाने या प्रदेशाला महानतेच्या पातळीवर नेण्याची आकांक्षा धरून अनेकांनी कार्य केले यात शंका नाही. त्यामुळेच महाराष्ट्र हा वीरांचा, साधुसंतांचा आणि समाज-सुधारकांचा देश म्हणून ओळखला जातो. त्याला स्वतःचे असे एक स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. त्याला एक गौरवास्पद इतिहास आहे. चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांनी धर्मदृष्टी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांनी अस्मिता आणि स्वराज्य दिले. तानाजी, संताजी, धनाजी, पहिले बाजीराव यांनी शौर्य-धैर्याचे संस्कार केले; आणि लोकहितवादी, फुले, आगरकर, शाहू महाराज, सावरकर, आंबेडकर यांच्यासारख्यांनी क्रांतिकारक विचार दिले.

**उपभोगशून्य स्वामी**

क्रांतिकारकांच्या बलिष्ठ परंपरेत कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातली एक वादळी आणि निर्मितीशील शक्ती म्हणून शाहू महाराजांचा सार्थ उल्लेख करावा लागतो. या राजाने आपली सत्ता केवळ लोककल्याणाच्या हेतूनेच उपयोगात आणली. गडकऱ्यांच्या 'राजसंन्यास' नाटकातले एक विधान अर्थपूर्ण आहे. ''राजा म्हणजे राज्याचा उपभोगशून्य स्वामी, राज्यउपभोग म्हणजे राजसंन्यास.'' या विधानातून शाहू महाराजांचे जीवन आणि कार्य प्रकट झाले आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. वैयक्तिक सुखविलासात ते कधी गुरफटून गेल्याचे दृश्य दिसले नाही. सर्वसामान्य माणसाच्या प्रगतीचा व सुखाचा त्यांनी सदैव विचार केला. सामान्य माणूस - जो नाना प्रकारच्या साखळदंडांनी बांधला गेला आहे, ज्याच्या आयुष्यात नवविचारांची आणि सुखाची पहाट कधीच उगवली नाही, तो शोषित, वंचित माणूस समर्थ व्हावा, सुशिक्षित व्हावा, यासाठी महाराजांनी ज्या योजना आखल्या, जे परिश्रम केले ते नव्या इतिहासाला चालणा देणारे ठरले. केवळ प्रजापालन हा

राजधर्म असतो असे त्यांनी मानले नाही. आपल्या प्रजेच्या पारंपरिक जीवनदृष्टीत परिवर्तन व्हावे आणि सामान्य माणसाला शोषणमुक्त जीवन जगण्याची संधी मिळावी, ही त्यांची भूमिका होती. बहुधा लोकाराधन करण्यात आपला धर्म सामावला आहे, अशी राज्यकर्त्यांची समजूत असते. भौतिकदृष्ट्या प्रजा सुखी झाली म्हणजे आपले कर्तव्य संपले या समजुतीच्या पलीकडे गेलेले फारच थोडे राजे इतिहासात आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर असलेल्या शाहू राजांनी केवळ लोकपालन इतकीच आपली सीमा असे कधीच मानली नाही. खरे तर शाहू राजांना समकालीन असलेले आणि त्यांच्या पूर्वीचेही कित्येक संस्थानिक सत्तेचा सर्वार्थांनी स्वैर आणि बेजबाबदार उपभोग घेत होते. प्रजेच्या संपत्तीवर चरावे, परदेशच्या वाऱ्या कराव्यात आणि सत्तेची वारुणी पिऊन धुंद व्हावे, या पलीकडे त्यांना कर्तव्याची जाण नव्हती. आत्मभान आणि अभिमान नसलेल्या या संस्थानिकांनी आपल्याच प्रजेचे शोषण मात्र केले. प्रजेच्या आशा-आकांक्षा दडपून ठेवल्या. इंग्रजांची सत्ता देशात दृढमूल करण्यासाठी या संस्थानिकांचे पुष्कळच साहाय्य झाले. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे कार्य रचनात्मक आणि क्रांतिकारक असे निर्विवादपणे म्हणता यावे.

**लोकांचा राजा**

'क्रांतिकारक' हा शब्द अलीकडे सैलपणाने योजला जातो. शाहू महाराजांच्या कार्याची चिकित्सा करताना हा शब्द यथार्थपणे योजता येईल. समाजसुधारक आणि क्रांतिकारक यांच्यात महत्त्वाचे अंतर आहे. गतार्थ झालेल्या धारणा, कल्पना, वर्तनपद्धती मोडून त्यांच्या जागी आधुनिक युगाशी आणि बुद्धिवादी विचारांशी सुसंगत असलेल्या मूल्यांची उभारणी निर्धाराने करणाऱ्या व त्यासाठी झगडणाऱ्या विचारशील व्यक्तीला 'क्रांतिकारक' ही संज्ञा देता येते. समाजमन हे बहुधा स्थितिप्रिय असते. क्रांतिप्रिय मनोवृत्तीला मळलेल्या वाटा उखडून टाकाव्याशा वाटतात. जुनी वळणे शतकानुशतके गिरवणाऱ्या सनातन प्रवृत्तींशी संघर्ष करणे क्रांतिकारकाला अपरिहार्य असते. शाहू राजांच्या आयुष्यात संघर्षाचे अनेक प्रसंग उभे राहिलेले दिसतात. केवळ लोकाराधन करणाऱ्या राजाला लोकप्रियता लाभते. पण लोकजीवनालाच नवे वळण देण्याचा प्रयत्न करीत राहिलेल्या शाहू राजांना अप्रियतेचाही स्वीकार करावा लागला. सामाजिक विषमतेवर आणि अज्ञानावर त्यांनी जन्मभर त्वेषाने जे प्रहार केले त्यातून नव्या

प्रागतिक विचार-आचारांना स्पष्ट आकार येण्यास साहाय्य झाले. महात्मा फुले यांच्या विचारांतून प्रेरणा घेतलेला हा धिप्पाड राज्यकर्ता काही वेळा वादग्रस्त ठरला. पण संत तुकोबांसारखीच त्यांची मनस्वी भूमिका होती. 'सत्य असत्यासी मन केले ग्वाही। मानियेले नाही बहुमता।' अशा परिस्थितीत 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, अंतर्बाह्य जग आणि मन' ही अनुभूती त्यांना यावी यात आश्चर्य नाही. कोणत्याही क्रांतिकारकाला याच वाटेने चालावे लागते. कारण त्याला अभिप्रेत असलेला मार्ग काट्याकुट्यांनी भरलेला असतो. सुदैवाने शाहू महाराजांच्या हातात सत्तेची सूत्रे असल्यामुळे इतर क्रांतिकारकांपेक्षा महाराजांच्या वाटेत त्या तुलनेने अडथळे कमी आले. पण अखेरपर्यंत सर्वसामान्य माणूस हाच त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा केंद्रबिंदू होता. म्हणूनच 'लोकांचा राजा' हीच महाराजांची यथार्थ प्रतिमा लोकमनात रुजली.

**इतिहासाचा तेजस्वी अध्याय**

कोणताही समाजपुरुष, लोकनेता, क्रांतिकारक स्वयंभू असू शकत नाही. त्याच्या काळाने आणि परिस्थितीने त्याला घडवलेले असते. पूर्वकालाचा व पूर्वकालीन विचारवंतांचा त्याच्यावर अपरिहार्यपणाने परिणाम होतो. शाहू महाराजांनी आपल्या कार्याने नवा इतिहास घडवला हे जितके खरे, तितकेच त्यांच्याही विचारदृष्टीला, ध्येयवादाला पूर्वकालीन इतिहासातून आणि समाज-सुधारकांच्या कार्यातून प्रेरणा मिळाल्या होत्या. महापुरुष आकाशातून खाली उतरत नाहीत. समाजाच्या कुशीतूनच, समाजशक्तीतून सामर्थ्याचे अनेक अंश घेऊन त्यांचे व्यक्तित्त्व सिद्ध होत असते. त्यामुळेच शाहू महाराजांसारखा समाजनिष्ठ, बलदंड, विचारशील आणि भविष्यकाळात दूरवर शोधकतेने पाहणारा द्रष्टा राजा निर्माण झाला. हा महाराष्ट्रात घडलेला अपघात नव्हे, केवळ योगायोग नव्हे. या भूमीतूनच क्रांतीचे तेजस्वी स्फुल्लिंग निर्माण होणे शक्य होते. एखादी महनीय कलाकृती ज्याप्रमाणे परिस्थितीच्या प्रभावातून उत्पन्न होते त्याप्रमाणेच शाहू महाराजांची निर्मिती करण्याचे स्वप्न महाराष्ट्राच्या भूमीने शिवाजी महाराजांच्या काळापासून पाहिलेले होते.

"The work of art is a product of its environment and nothing else." हे मत तेन् नावाच्या एका समीक्षकाने कलेच्या संदर्भात मांडले असले तरी ते कोणत्याही महनीय व्यक्तीला लागू पडते. कारण ती देखील

परिस्थितीचेच अपत्य असते. पण म्हणून केवळ परिस्थिती आणि काळ यांनीच शाहू महाराजांची सर्वार्थाने घडण केली असे म्हणणे मात्र चुकीचे ठरेल. काही गुण सोन्याचा आणि काही गुण सोनाराचा असतो. एखाद्या बीजात निसर्गतःच अंकुरण्याची आणि विकसित होण्याची अदम्य इच्छा असते. काही प्रतिकूल घटक असले तरी त्यांच्याशी संघर्ष करीत हे बीज विकास पावते. महाराजांच्या समग्र जीवनाचा आढावा घेतला तर त्यांचे गतिमान व्यक्तित्व सदैव विकासाच्या दिशेने आकार घेत होते, त्यात परिवर्तन होत होते हे लक्षात येते. शाहू महाराजांच्या बंडखोरीला निश्चितच रचनात्मक अर्थ आहे. त्यांच्या बंडखोरीमागे विधायक स्वरूपाचा विचार आहे. कोणत्याही क्रांतिकारकाला जशी नवरचनेची स्वप्ने पडतात तशीच नवसमाजनिर्मितीची स्वप्ने शाहू छत्रपतीही पाहात होते. त्यांची पूर्तता करणे हे फारच कठीण काम होते. लोकाभिमुख वृत्तीचा संस्थानाधिपती ब्रिटिश राज्यकर्त्यांना पसंत पडण्यासारखा नव्हता. त्यामुळे साऱ्या पुरोगामी चळवळी उभ्या करताना शाहू महाराजांना अनेक अडथळे धैर्याने आणि मुत्सद्दीपणे पार करावे लागत होते. प्रतिगामी शक्ती, ब्रिटिश शासन यांच्या संघर्षात नेटाने उभे राहून छत्रपतींनी समाजाचा चेहरामोहरा बदलण्याचा एक ऐतिहासिक पण बहुतांशी यशस्वी असा प्रयत्न केला. या प्रयत्नांची नोंद घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास लिहिला जाऊ शकत नाही. कारण शाहू महाराजांचे कार्य हा या इतिहासाचा एक तेजस्वी अध्याय आहे.

### अभूतपूर्व कामगिरी

जन्मसिद्ध उच्चनीचत्वाच्या अशास्त्रीय कल्पनेमुळे भारतीय समाजाचे शेकडो तुकडे झाले आहेत. हजारो जाती आणि पोटजातींनी बुजबुजलेल्या या समाजात एकत्वाची जाणीव कधीच निर्माण झाली नाही. शिवाजीसारखा एखादा लोकोत्तर राजा सर्व जाती-जमातींना एकत्र करून त्यांच्यात स्वातंत्र्याची स्वाभिमानी ज्वाला निर्माण करू शकला. पण हा प्रयत्नही शिवाजी महाराजानंतर जवळजवळ संपुष्टात आला. जाती-पातींच्या चौकटी अधिकच बुलंद बनल्या. माणसाच्या कपाळावर परंपरेने चिकटवलेली जातीची आणि वंशाची चिठ्ठी हेच त्याचे ओळखपत्र होऊन बसले. म्हणूनच येथे भारतीय समाज किंवा हिंदू समाज नावाची चीज खऱ्या अर्थाने अस्तित्वात नव्हती. असंख्य तुकड्यांत विभागला गेलेला, दुबळा प्रारब्धवादी अज्ञानी समाज पाहता पाहता परतंत्र बनला, यात आश्चर्य नव्हते.

समाजसुधारकांना या समाजातील विषमतामूलक जातिव्यवस्था हे प्रचंड आव्हान होते. विषमतेच्या अंगात केवळ हजारो हत्तींचे बळ होते. इतकेच नव्हे तर तिला 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' प्रतिष्ठाही लाभलेली होती. 'एष धर्मः सनातनः' असे मानून माणसे आपापल्या जाती-पोटजातींच्या वर्तुळात राहत होती. बुद्ध, महावीर, बसवेश्वर, चक्रधर यांनी झुंज देऊनही विषमतेच्या भिंती अभंगच होत्या. त्यांचे ढलपे थोडेफार उडाले असतील इतकेच. धार्मिक आणि सांप्रदायिक प्रयत्नही अपुरे पडले. महात्मा जोतिबा फुल्यांनी या भिंती खिळखिळ्या करण्याचा विशेष प्रयत्न केला. त्यातूनच स्फूर्ती घेऊन शाहू महाराजांनी या भिंतीवर बलदंडपणे धडक घेतली. या कार्याला अधिक महत्त्व आहे. खुद्द महाराजांनाही विषमतेच्या ज्वालांची झळ लागली होती. पारंपरिक जातिव्यवस्थेत महाराजांचे स्थान कनिष्ठ प्रतीचे आहे, असे धर्मांध पुरोहितशाहीने त्यांना जेव्हा तोंडावर सांगितले तेव्हा मानव्याची विटंबना करणाऱ्या या जातिव्यवस्थेतील विषमतेवर त्यांनी प्रखर हल्ले चढवले. कोणी उच्च नाही; कोणी नीच नाही; सर्वांचे माणूसपण एकाच पातळीवरचे आहे, हा विचार प्रत्यक्षात रुजवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न 'न भूतो' या कोटीतले आहेत. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या आणि सदैव माणुसकीच्या अधिकारापासून वंचित राहिलेल्या समाजाच्या उत्थानासाठी त्यांनी सदैव दंड थोपटले.

महाराज स्वतः महार, मांग, चांभार, ढोर या जमातीतल्या लोकांना आपल्या पंक्तीला घेऊन भोजन करीत असत. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी म्हणून प्रतिष्ठित व्यवसाय करण्यासाठी त्यांना संधी मिळवून देत. आपल्या राजवाड्यावर त्यांनी अनेक सेवक या वर्गातूनच नेमलेले होते. अस्पृश्यांच्या शिक्षणाची आणि त्यांना अधिकाधिक चांगल्या नोकऱ्या मिळवून देण्याची महाराजांनी केलेली कामगिरी अभूतपूर्व अशीच आहे. 'प्राचीन पवित्र परंपरेची' वाट सोडून चाललेल्या या राजावर केवळ ब्राह्मणांनीच नव्हे तर बहुजन समाजातील लोकांनीही भरपूर टीका केली, विरोध केला. सुशिक्षित आणि सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांतूनही प्रतिकूल टीकेचे मोहोळ उठलेले होते. परंपरेच्या ढोलीत डोळे मिटून बसलेल्या कर्मठ प्रवृत्तीने नव्या प्रकाशाला शिव्याशाप द्यावेत हे एका अर्थाने सयुक्तिकच होतं. तिच्या या धूत्काराबद्दल महाराज एकदा विनोदाने म्हणाले, ''दोन सवयी मला लागल्या आहेत, अंग रगडून घेणे आणि बामणी वृत्तपत्रांतील शिव्या खाणे.''

**सर्वार्थाने 'माणूस'**

महात्मा फुल्यांच्या नंतर माणसांवरील अस्पृश्यतेचा कलंक धुऊन टाकण्यासाठी माणुसकीचे आणि न्यायाचे रसायन प्रभावीपणे वापरणारे शाहूराजे हे समर्थ क्रांतिकारक आहेत. दलितांना त्यांनी आत्मभान दिले. त्यांच्यातला न्यूनगंड निरसून टाकण्यासाठी प्रयत्न केले. सामाजिक समतेची चळवळ त्यांनी अधिक बलिष्ठ केली. आपल्या एका भाषणात त्यांनी स्पष्टपणे सांगितले, ''आमच्या धर्मात जातीभेदामुळे जो उच्च-नीचपणा आला आहे तशा प्रकारचा जन्मजात भेदभाव जगाच्या पाठीवर दुसऱ्या कोणत्याही धर्मात नाही.'' दलित समाजाला उद्देशून ते पुढे म्हणाले, ''या जातिभेदाचे अत्यंत हिडीस स्वरूप जर कोठे असेल तर इतर जातीकडून तुम्हाला ज्या रीतीने वागवण्यात येते त्या रीतीत दिसून येते. तुम्ही आमचे बंधू असता तुम्हाला अस्पृश्य म्हणून लेखून मांजरे, डुकरे, कुत्री यांपेक्षाही तुम्हाला नीचपणाने वागवण्यात येते. माझ्या राज्यात मागासलेल्या जातींना वर आणण्याबद्दल माझे जे प्रयत्न झाले आहेत त्याबद्दल उच्च म्हणविणाऱ्या एका सुशिक्षित जातीचा माझ्यावर घुस्सा झालेला आहे. परंतु ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर किंवा लेडी डॉक्टर ही अगदी अशक्त व दुबळ्या मुलाला अन्न व औषधे देऊन त्याची जोपासना सर्वांपेक्षा विशेष काळजीने करून त्याला इतर मुलांच्या जोडीला आणून बसवितात त्याचप्रमाणे आम्ही अस्पृश्य मानलेल्या लोकांना वर आणले पाहिजे. परंतु यावरून ब्राह्मणाचे ठिकाणी माझा द्वेषभाव आहे असे मात्र मुळीच नाही.'' शाहू राजांच्या आणखी एका भाषणातील एक विधान येथे उद्धृत करतो. त्यांची भूमिका कशी तत्त्वशुद्ध आणि समान अशा सामाजिक न्यायाला पोषक होती, याचे दर्शन त्यातून घडेल. शाहू महाराज हे राजे असण्यापेक्षा सर्वार्थांनी कसे 'माणूस' होते आणि माणुसकीची मशाल हाती घेऊन त्यांनी जीवनाची कशी वाटचाल केली याचा प्रत्यय त्यातून देईल -

''अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे निंद्य आहे. तुम्ही अस्पृश्य नाही. तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या लोकांपेक्षा जास्त बुद्धिमान, जास्त पराक्रमी, जास्त स्वार्थत्यागी असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटकावयव आहात. आपण बरोबरीची भावंडे आहोत. आपले हक्क समसमान खास आहेत.''

**माणूस हाच कार्याचा मध्यबिंदू**

जात, वंश, संप्रदाय यांच्या कृत्रिम आधारावर माणसामाणसांत भेद पाडणारी

आणि एका मोठ्या मानव समूहाला अस्पृश्य समजून त्याला गावकुसाबाहेर ठेवणारी विचारसरणी म्हणजे अन्यायाची परिसीमा आहे. या विचारात तर्क नाही आणि सामान्य सहानुभूतीही नाही. मानवतेचा अवमान करणारी ही विचारसरणी राजर्षी शाहूंनी सर्वस्वी नाकारून मानवतेची सेवा केली. त्या काळात ब्राह्मणांव्यतिरिक्त साऱ्यांनाच शूद्र असे संबोधिले जाई. सारा ब्राह्मणेतर समाज त्यामुळे उपेक्षित राहिला. बौद्धिक सत्तेची मिरासदारी तथाकथित उच्चवर्णीयांना मिळाली. समाजाचे मानसिक आणि बौद्धिक बल या अन्यायामुळे शतकानुशतके खचून गेले. या संकटातून बहुसंख्य समाजाची मुक्तता करण्याचे जे प्रयत्न इतिहासात झाले त्यात महात्मा फुले आणि शाहू छत्रपती यांच्या उत्कट प्रयत्नांना अलीकडच्या काळात महत्त्वपूर्ण स्थान आहे. दलित मुक्तीच्या या चळवळीला एक व्यापक अर्थ आहे. ही वस्तुतः मानवमुक्तीचीच चळवळ म्हणता येते.

मनुष्य खरे तर जन्मतःच स्वतंत्र असला पाहिजे. त्याच्या नैसर्गिक प्रेरणांची गळचेपी करणारी सामाजिक आणि धार्मिक व्यवस्था हे स्वातंत्र्याच्या आड येणारे मोठे संकट असते. वर्ण आणि जात यांची विशिष्ट अशी परंपरागत व्यवस्था प्रमाण मानल्यामुळे माणूस अनेक साखळदंडांनी बांधला गेला. शाहू छत्रपतींच्या विचारात हा व्यापक आशय असल्यामुळे त्यांनी माणूस हाच आपल्या कार्याचा मध्यबिंदू मानला.

त्यांच्यावर टीका करताना काही टीकाकारांनी - जे व्यक्तिस्वातंत्र्याचेच विरोधक होते, ज्यांचे हितसंबंध जातिव्यवस्थेत गुंतलेले होते, जे पिढ्यान्‌पिढ्या आपल्या मानी व उच्चपणाने समाजावर वर्चस्व गाजवून स्वार्थाची उपासना करीत होते, अशा लोकांनी-'महाराज ब्राह्मणद्वेष्टे आहेत' असा अपप्रचार सुरू केला. प्रत्येक समाजसुधारकावर या प्रकारचे अन्यायी आक्षेप काही दुखावलेल्या लोकांनी केलेले आहेत. लोकहितवादींवर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केलेल्या द्वेषमूलक टीकेत हाच मुद्दा मांडला आहे. स्वतः ब्राह्मण असून लोकहितवादींनी ब्राह्मणनिंदा करून त्यांचा द्वेष केला, असा आरोप चिपळूणकरांनी केला होता. महात्मा फुल्यांवरही हाच तर्कदुष्ट आक्षेप चिपळूणकरांनी आणि त्यांचे मत प्रमाण मानणाऱ्या अविचारी लोकांनी केलेला आहे. काही काळ गैरसमज निर्माण करण्यासाठी यासारख्या अपप्रचारांचा निश्चित उपयोग होतो. आजही महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्यावर कुत्सित टीका करणारा एक वर्ग आहेच. कारण त्यांच्या प्रतिष्ठेचे अधिष्ठानच या दोन क्रांतिकारकांनी नष्ट केले आहे.

### गुणवत्तेचे उपासक

शाहू छत्रपतींनी ब्राह्मणद्वेष करून बहुजनसमाज आणि दलित यांना अन्यायाने सुप्रतिष्ठित केले, या आक्षेपाला मात्र लेशभरही आधार दिसत नाही. राजा या नात्याने समाजाच्या सर्व घटकांना समान न्याय देण्याची आणि सर्वांना संरक्षण देण्याची त्यांची नैतिक जबाबदारी होती. एखादा वर्ग बौद्धिक, सांपत्तिकदृष्ट्या उन्नत आणि बाकीचे वर्ग मात्र पूर्णपणे अवनत अवस्थेत राहिले तर राज्याचा समतोल ढासळून जातो. प्रत्येक व्यवसायात आणि विद्येत निपुण होण्याचा पूर्ण अधिकार कोणाही व्यक्तीला मूलतःच असतो, हे उदारमतवादी तत्त्व शाहू महाराजांनी आत्मसात केले होते. याचाच परिणाम त्यांच्या संस्थानातच नव्हे तर तो साऱ्या महाराष्ट्रात दिसू लागला होता. महाराज हे असे क्रांतिकारक होते की, त्यांची दृष्टी प्रथम उपेक्षितांच्या आणि शोषितांच्या कल्याणाकडे वळली. त्यांनी समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले होते. अनेक रंगांतली माणसे त्यांनी न्याहाळली होती.

गुणग्रहणाची रसदृष्टी असलेल्या महाराजांनी आपल्या राज्यात कवी, लेखक, गायक, चित्रकार, नट, मल्ल, शिकारी, कुशल शेतकरी, विद्वान अध्यापक आपल्या गुणज्ञतेने घडवले आणि सर्वांच्या सहकार्यातून कोल्हापूर संस्थानाला कला व संस्कृतीचे माहेरघर बनवले. त्यांनी जवळ केलेली माणसे भिन्नभिन्न जातींची व धर्मांची होती. महाराज हे मानवतेचे, गुणवत्तेचे उपासक होते. त्यांच्या अभिजात रसिकतेला भेद नव्हता. कोणाच्या कंठातले स्वरसौंदर्य, कोणाच्या कुंचल्यातला रंगविलास, कोणाच्या कमावलेल्या सुदृढ शरीरातले शक्तिसौंदर्य, कोणाची बुद्धिमत्ता, कोणाच्या ठायी असलेली निष्ठा यांचे दर्शन घडले की ते हरखून जात. आपल्या राज्याच्या नावलौकिकात हा माणूस भर घालीत आहे, हा आपला आहे, या विचाराने ते त्याला जवळ करीत असत. कोल्हापूरच्या भूमीतून कलावंतांची निपज होण्याची परंपरा शाहू राजांच्या वेळेपासून भरभराटीला आली ती आजही कायम आहे. या साऱ्याच गोष्टी त्यांच्या सुसंस्कृत, मानवतावादी भूमिकेवर स्वच्छ प्रकाश टाकतात.

### शिक्षणानेच तरणोपाय

जीवनाकडे पाहण्याची शाहू राजांची दृष्टी निकोप, स्वच्छ, काहीशी रांगडी पण मर्दपणाची होती. शिक्षणाचा जोमदार प्रवाह केवळ कोल्हापुरातच नव्हे तर महाराष्ट्रातल्या इतर शहरांतही खळाळत वाहावा यासाठी त्यांनी केलेले कार्य बहुमोल

स्वरूपाचे आहे. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या खामगावच्या अधिवेशनात त्यांनी केलेले भाषण त्यांच्या व्यापक आणि विकसित शिक्षणविषयक दृष्टिकोनाचे द्योतक आहे. त्या प्रसिद्ध भाषणात ते म्हणतात,

''शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची, हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांकडून खालच्या जातीला, लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले... निरनिराळ्या समाजातील लोकांना शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीपूर्वक अनुसरीत आहे, आणि माझ्या आयुष्याच्या पुढील काळात तीच पद्धत सुरू ठेवण्याची माझी इच्छा आहे. पुन्हा जरुरीची गोष्ट ही की, जातिपद्धतीच्या शृंखला तोडून टाकण्याचे ध्येय साध्य करण्याकरिता आणि परस्परांची मने एक करणे असेल तर राम क्षत्रिय होता व परशुराम ब्राह्मण होता; असल्या प्रकारच्या गतकालीन ऐतिहासिक गोष्टी आम्ही साफ विसरल्या पाहिजेत. जर हल्लीची जातिव्यवस्थाच कायम राहिली तर त्या रीतीने हल्ली सुराज्याचा अर्थ समजला जातो ते स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे हे होय.''

## पुरोगामी विचारांची पेरणी

एका उत्कट ध्येयवादी, विद्याप्रेमी, समतावादी लोकाभिमुख राज्यकर्त्याचे हे परिपक्व विचार आहेत. ज्या काळात बहुसंख्य संस्थानिक प्रजेच्या श्रमावर व घामावर चरत असत, त्या काळात सामान्य माणसांचा कैवार घेणारा हा असामान्य लोकराजा समाजमनाची भूमी आपल्या त्यागाने, तपस्येने आणि वात्सल्याने भिजवीत होता. त्या भूमीत पुरोगामी विचारांची बीजे पेरीत होता. एक नवा माणूस घडवण्याचा प्रयोग अहर्निश करीत होता. या विलक्षण उज्ज्वल ऐतिहासिक घटनेची दखल जितकी घेतली जाणे आवश्यक आहे तितकी इतिहासाभ्यासकांनी घेतली नाही. याची कारणमीमांसा होऊ शकते. पण तो या लेखाचा हेतू नाही. आमचे इतिहासकार आणि संशोधक, कवी व कलावंत, पत्रकार यांच्या डोळ्यांवर कित्येक वेळा पूर्वग्रहांची ढापणे घट्ट बसलेली असतात. त्यामुळेच इतिहासाचे यथोचित

वस्तुनिष्ठ मूल्यमापन होऊ शकत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, शाहू राजांनी सामान्य माणसाला स्वाभिमानाने उभे राहण्यासाठी ताठ वृत्तीचा कणा दिला. झोपडीझोपडीतला माणूस त्यांनी आपल्या बुलंद वाणीने जागवला. जी शिक्षणपद्धती त्यांनी उभी केली, त्यातून प्रेरणा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भाऊसाहेब हिरे इत्यादी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रात अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. आजचा महाराष्ट्र शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या बराचसा प्रगत आहे याचे श्रेय महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांनाच देता येईल. महारवतने रद्द करण्याची घोषणा स्वातंत्र्याच्या काळात मुंबई प्रांतात करण्यात आली. पण स्वातंत्र्यपूर्व काळात छत्रपती शाहूंनी ही कृती करून दलितांचे दलितत्व पुसून टाकण्याचा आणि त्यांना शासकीय नोकऱ्यात अग्रक्रम देण्याचा पहिला प्रयत्न केला. साऱ्या भारतात ही घटना अपूर्व स्वरूपाची होती. या अभिमानास्पद घटनांचे मूल्यांकन राहो पण त्यांचे प्रांजळपणे रसग्रहण करण्याची प्रवृत्ती वाढीला लागली पाहिजे.

**अंगीकृत कार्यात अविचल**

व्यक्तीची विभूती बनवू नये. तिला देव्हाऱ्यात बसवून मूर्तिपूजेच्या कर्मकांडात हरवून जाऊ नये. पण व्यक्तीत असलेल्या शक्तीचे आणि स्फूर्तीचे चिंतन व ग्रहण करून पुढे पाऊल टाकणारे डोळस अनुयायी सहसा भेटत नाहीत. शाहूराजांविषयी आत्यंतिक भक्तिभाव किंवा आत्यंतिक गैरसमज या दोन्ही चुकलेल्या वाटा टाळून तटस्थ मूल्यांकनाची, समजूतदारपणाची जी मधली वाट आहे, तीच स्वीकारली पाहिजे. आम्ही अभिमानाने आमचे नेते देवत्वाच्या चौकटीत बसवले की, मग केवळ निरर्थक पूजनाशिवाय दुसरे कर्तव्य राहत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांपासून महात्मा गांधी, डॉक्टर आंबेडकर या साऱ्या श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वाची विभूतिपूजक वृत्तीने अशीच चमत्कारिक अवस्था करून ठेवली आहे. इतिहासाचे पूजक नव्हे तर इतिहासाचे अभ्यासक आणि इतिहासापासून स्फूर्ती घेणारे कार्यकर्ते यांची आज अधिक आवश्यकता आहे. राजर्षी शाहू महाराज हा जितका आमच्या अभिमानाचा विषय असेल, त्यापेक्षा तो अध्ययनाचा, अनुकरणाचा आणि प्रेरणेचा विषय व्हावा.

'उत्तररामचरित' या नाटकात भवभूतीने रामचंद्रांच्या तोंडी एक विचार श्लोकरूपाने टाकला आहे -

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि।
आराधनाय लोकांना मुञ्चतो नास्ति मे व्यथा॥

रामराजाच्या धीरोदात्त, प्रजावत्सल, स्वार्थत्यागी प्रवृत्तीचे या श्लोकातून दर्शन होते. लोकाराधनेसाठी मी माझ्या जीवनातली सर्व सुखे, फार काय प्रत्यक्ष सीतासुद्धा सोडून द्यायला सिद्ध आहे. लोकाराधनेसाठी या गोष्टींचे मला दुःख होणार नाही. छत्रपती शाहूंच्या जीवनातही काही अटीतटीचे प्रसंग आले. लोकाभिमुख चळवळींमुळे लोकप्रियता वाढत चाललेल्या या राजाचे राज्य खालसा करण्याचे कारस्थान इंग्रज राज्यकर्ते करीत होते. आपल्या लोकोपयोगी, प्रबोधन कार्यातून महाराजांनी लक्ष काढून घ्यावे अन्यथा त्यांची सत्ता संपुष्टात आणावी लागेल अशा अर्थाची काही दडपणे प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने त्यांच्यावर आणण्यात आली. या सर्व घटनांकडे महाराज मुत्सद्दीपणाने पाहत होते. पण एकदा त्यांनी स्पष्टपणे इंग्रजी शासनाला कळवून टाकले. ते म्हणाले,

''तुम्ही मला गादीवरून काढण्याची भाषा कशाला बोलता ? तशी वेळ येण्यापूर्वीच मी स्वतः होऊन राजीनामा देईन. पण बहुजन समाजाच्या उद्धाराचे जे पवित्र कार्य मी हाती घेतले आहे ते मात्र प्राणांतीही सोडणार नाही.''

या शब्दांतला आवेश, निर्धार आणि वैचारिक पीळ विलक्षण आहे. समाजाच्या उद्धाराच्या ज्या दृढ जाणिवा त्यांनी आपल्या हृदयाशी कवटाळून ठेवल्या होत्या, त्यात सत्ताभ्रष्ट होण्याचा धोका असूनही आपल्या अंगीकृत कार्यापासून ते कधीच विचलित झाले नाहीत. केव्हातरी त्यांनी चिखलात जिचे एक चाक फसले आहे अशी घोडागाडी आपल्या बलिष्ठ बाहूंनी एकट्याने उचलून रस्त्यावर आणली, अशी एक कथा आहे. या घटनेच्या आधाराने मी इतकेच विधान करीन की अज्ञान, विषमता आणि दारिद्र्य यांच्या चिखलात फसून बसलेली समाजजीवनाची गाडी शाहू राजांसारख्या धिप्पाड लोकनेत्याने आपल्या बळकट बाहूंनी वर काढली. त्यामुळे तिला गती मिळाली. इतिहासाच्या ओघाबरोबर अगतिकपणाने वाहून गेलेले किंवा वाहवत गेलेले अनेक राजे आपल्याला माहीत आहेत. पण इतिहासाचा प्रवाह बाहुबलाने इच्छित दिशेला वळवण्याचे कार्य ज्यांनी केले अशा थोड्या प्रगतिवादी, क्रांतिवादी राजांच्या मालिकेत राजर्षी शाहूंचा उल्लेख अपरिहार्य आहे.

**लोकहृदयात स्थान**

खरे तर या बलदंड लोकराजाने एका नव्या युगाची ध्वजा फडकविली. कोल्हापूरचे सिंहासन शाहू राजांसाठी अपुरे होते. मोठ्या सिंहासनावर बसण्याची संधी मिळाली म्हणून राजेलोक मोठे होतातच असे नव्हे. जे लोकांच्या हृदयसिंहासनावर अधिष्ठित होतात, तेच खरे लोकराजे असतात. या लोकराजाच्या खांद्यावर मानवतेचे निशाण होते. क्रांतीची, प्रगतीची नवी क्षितिजे पाहू शकणारा हा राजा काट्याकुट्यातून चालला. पण सर्वसाधारण गरीब कष्टकऱ्यांच्या आणि दलितांच्या कल्याणासाठी तो जन्मभर झगडत राहिला. या झगड्यात शाहू राजे कितपत विजयी किंवा पराभूत झाले याचा निर्णय इतिहास करील. पण उदात्त मानवी मूल्यांसाठी केलेल्या संघर्षात पराभव पदरी आला तरी तो वैभवशाली पराभव असतो. त्यातूनच विजयाची वाट दिसत असते. महाराष्ट्रातल्या नवजीवनवादी चळवळीच्या या पुरुषार्थी लोकनेत्याने ही चळवळ खेड्यापाड्यांपर्यंत नेऊन पोहोचवली, हे यश सामान्य नाही.

■■■

# साहित्यिक फुले

केशवसुतांची 'नवा शिपाई' ही कविता जणू काही महात्मा फुल्यांच्या बलोद्धत, वादळी, क्रांतिकारक व्यक्तित्वाचे दर्शन घडविण्यासाठीच लिहिली गेली असावी असे वाटते. केशवसुतांचा हा शिपाई नवनिर्माणशील वृत्तीचा आहे. आपल्या मळ्याला कोणतेही कुंपण नसावे, आपली भूक व्यापक असावी आणि आपल्या कपाळावर कोणत्याही जातीची मुद्रा असू नये ही त्याची स्पष्ट भूमिका आहे. आपले विचार प्रत्यक्षात उतरविण्यासाठी संघर्ष करण्याची आणि कोणतेही आव्हान स्वीकारण्याची त्याची तयारी आहे. ही कविता लिहिताना केशवसुतांच्या प्रगतिशील दृष्टीसमोर फुल्यांची प्रतिमा होती काय ? ती असू शकेल कारण हा 'नवा शिपाई' मानवतावादी आहे. अन्यायाशी निकराने तो सामना करीत आहे, त्याला जीर्णशीर्ण झालेली, प्रतिगामी मूल्ये उखडून टाकायची आहेत. नवरचनेचा ध्यास घेऊन तो दमदार पावले टाकीत चालला आहे.

महात्मा फुले हे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या सामाजिक इतिहासातील एक बुलंद व बंडखोर व्यक्तिमत्त्व आहे. मानवमुक्तीची व्यापक चळवळ त्यांनी उभी केली. ते चिंतनशील वृत्तीचे एक लेखकही होते. साहित्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन साचेबंद नाही. आपल्याला आनंदासाठी, मनोरंजनासाठी लिहायचे आहे अशी त्यांची दृष्टी कधीही नव्हती. अनेक प्रकारच्या पारंपरिक अन्यायाखाली भरडल्या जाणाऱ्या दलित आणि शोषित माणसाला बंडखोरीची प्रेरणा देण्यासाठी फुले लिहीत राहिले. समाज बदलण्याची भूमिका घेऊनच त्यांनी साहित्याची निर्मिती केली. फुल्यांच्या साहित्यातील क्रांतिकारक विचारांची दखल साहित्याच्या समीक्षकांनी जवळ-जवळ घेतली नाही. वैचारिक साहित्यात वस्तुतः फुल्यांच्या ग्रंथांमुळे अमूल्य भर पडली; याचे भान आजही मर्मज्ञ म्हणवणाऱ्या अनेक टीकाकारांना झालेली दिसत नाही. साहित्य या संज्ञेचा अर्थ त्यांनी फारच आकुंचित केलेला दिसतो. केवळ रंजनासाठी लिहिल्या गेलेल्या कथा-कादंबऱ्यांच्या पलीकडे साहित्यात काही असते याची जाणीव अनेकांना नाही. आकृतीवादी साहित्याची भलावण करीत बसलेल्या समीक्षकांना तर सामाजिक जाणिवेतून निर्माण होणाऱ्या

साहित्याचे मोल व महत्त्व कधीच कळणे शक्य नाही. आजही सामाजिक बांधीलकीच्या तत्त्वाचा उपहास करण्यात आमचे केवळ कलावादी साहित्यिक गढून गेले आहेत. त्यांच्या दृष्टीने : महात्मा फुले हे साहित्यिकच नव्हते. ते एक कृतिशील समाजसुधारक ओहत, आपल्या सामाजिक विचारांचा केवळ प्रचार करण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांना साहित्याची पदवी देणे शक्य नाही. फुले हे क्रांतिकारक असतील; सामान्य मनुष्याच्या प्रश्नात त्यांनी रस घेतला असेल पण त्यांना लेखक म्हणून संबोधणे शक्य नाही. वाङ्मयाचे निकष लावून पाहिले तर त्यांचे साहित्य सामान्य स्वरूपाचे आहे हे सिद्ध करणे अवघड नाही.

महात्मा फुल्यांच्या वाङ्मयनिर्मितीकडे पाहण्याचा वरील दृष्टिकोन इतका अज्ञानमूलक आहे की, खरे तर त्याला उत्तर देण्याचेही कारण नाही. पण अनेक शिष्ट व उच्चभ्रू टीकाकारांच्या मनात साहित्यासंबंधीच्या काही भ्रांत कल्पना खोलवर रुजून बसल्या आहेत. या कल्पनांच्या मुळाशी केवळ साहित्यविषयक नव्हे तर समाजविषयक अज्ञानही लपलेले आहे. सांकेतिक कल्पनांची झापडे लावून खोट्या कृत्रिम साहित्याला डोक्यावर घेणाऱ्या या लोकांच्या जाणिवा तोटक्या असतात. त्यांच्या दृष्टीने साहित्य ही नुसती कला आहे. कलेच्याच नियमांनी कोणत्याही वाङ्मयकृतीचे मूल्यमापन केले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. फुल्यांनी क्रांतिकारक विचारांचा पुरस्कार आणि प्रचार करण्यासाठी जे प्रबोधनवादी लेखन केले त्याचे आकलन या तथाकथित रूपवादी टीकाकारांना होऊच शकले नाही. कलावादाचाही अर्थ ते समजतात तितका उथळ नाही. कलेची तत्त्वे मानवी जीवनाच्या विकासाशी निगडित असतात; याची जाण त्यांना अजूनही नाही. **फुल्यांच्या साहित्यकृती एका मूलभूत क्रांतीची घोषणा करीत अवतीर्ण झाल्या** आहेत. या साहित्याचे **उद्दिष्ट सामाजिक जीवनातील विदारक कुरूपतेवर,** अन्यायावर आणि विसंगतीवर घणाघाती प्रहार करून शुद्ध समतेवर आधारलेली एक नवी समाजरचना उभारणे हे आहे.

केशवसुतांनी -

पद्यपंक्तीची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे<br>टेकुनि ती जनताशीर्षावर जग उलथुनिया देऊ कसे

हे उद्गार ज्या अभिप्रायाने काढले आहेत तोच विध्वंसक, मूर्तिभंजक विचार फुल्यांच्या लेखनाच्या मुळाशी आहे.

साहित्याच्या सुद्धा भिन्न भिन्न पातळ्या असू शकतात. कुरवाळणारे साहित्य, स्वप्नरंजनात मश्गूल करणारे साहित्य, पलायनवादी साहित्य, मनोरंजनाचा गंडा बांधलेले साहित्य, हलके-फुलके विचार मांडून क्षणभर उत्तेजित करणारे साहित्य, जीवनाच्या केवळ पृष्ठभागावर क्रीडा करणारे साहित्य; अशा विविध प्रकारात साहित्य विभागता येते. फुल्यांच्या लेखनाची जातकुळी मात्र वेगळी आहे. लेखनासाठी लेखन करणारा हा साहित्यिक नाही. लेखणीचा शस्त्रासारखा उपयोग करून समाजवृक्षावर उत्पन्न झालेली बांडगुळे छेदून टाकण्यासाठी त्यांनी मुख्यतः लेखन केले. लोकरंजनाची भूमिका त्यांच्या साहित्याने स्वीकारली नाही. फुल्यांच्या मनःप्रकृतीला ती मानवण्यासारखी मुळीच नव्हती.

पोवाडे किंवा **नाटिका** यासारख्या वाङ्मयप्रकाराचा त्यांनी अवलंब केला असला तरी त्यांतून व्यक्त होणाऱ्या विचारांवर त्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे. एखाद्या वाङ्मयप्रकाराचे विवक्षित तंत्र अभ्यासून व त्याचे काटेकोर पालन करून आपण साहित्यनिर्मिती करावी; असा केवळ कलावंतालाच शोभणारा विचार त्यांच्या मनात कधीच आला नसेल. कारण हा महात्मा साहित्यापेक्षाही समाजाशी, कनिष्ठ पातळीवर नाना प्रकारच्या सामाजिक आणि धार्मिक रूढीच्या विळख्यात सापडून मरणोन्मुख झालेल्या समाजाशी 'संवाद' करण्यात आणि समरस होण्यात पूर्णपणे गुंतलेला होता. माणूस म्हणून दलित शोषितांना त्याचे मूलभूत स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा कशी मिळेल; यासाठी एका विराट संग्रामात त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. अशा लढाऊ, क्रांतिनिष्ठ लेखकाचा वैचारिक आणि भावनिक पिंड लक्षात न घेता काही सांकेतिक फुटपट्ट्यांनी त्यांचे साहित्य मोजण्यात आपण केवढा प्रमाद करीत आहोत याचे भान कित्येकांना नाही. टॉलस्टॉयने साहित्यकृतीचे निकष ठरवताना निर्मितीच्या मागे प्रशस्त, प्रौढ आणि सामाजिकदृष्ट्या श्रेयस्कर हेतू असावा असा पहिला निकष सांगितला आहे. या हेतूला अनुरूप अशी भाषा हा दुसरा निकष त्याने ठरवला. या दृष्टीने विचार केल्यास फुल्यांच्या विध्वंसक आणि तरीही रचनात्मक साहित्याचे मूल्यांकन करणे सुलभ ठरेल.

महात्मा फुल्यांचे बंडखोर विचार ज्या ग्रंथांतून स्पष्टपणे व्यक्त झाले; ते ग्रंथ म्हणजे 'शेतकऱ्याचा आसूड', 'गुलामगिरी' आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' हे आहेत. काळ झपाट्याने बदलत असला तरी काही प्रश्न समाजात पूर्वीइतकेच किंबहुना अधिक प्रमाणात तीव्रतर होत गेले आहेत. शेतकऱ्यांच्या निकृष्ट

परिस्थितीचे यथातथ्य चित्र सहानुभूतीने फुल्यांनी रेखाटले. पण गेल्या शंभर वर्षांत शेतमजुरांचे, छोट्या शेतकऱ्यांचे प्रश्न स्वातंत्र्याच्या काळात देखील तसेच कुचंबत पडले आहेत. खेड्यापाड्यात पसरलेला लहान शेतकरी आजही कंगाल व कर्जबाजारी आहे. निढळाचा घाम गाळणाऱ्या या वर्गाकडे इतर कोणत्याही लेखकाचे लक्ष गेले नाही. हरिभाऊ आपटे, माटे आणि वरेरकर यांनी काही कथा शेतकऱ्यांच्या सुख-दुःखांवर लिहिल्या आहेत. पण त्या लेखनाची आधारभूमी दुबळी सहानुभूती हीच आहे. सहानुभूतीला प्रत्यक्ष अनुभूती, शास्त्रशुद्ध अभ्यास आणि समस्या सोडवण्याची निकड यांची जोड मिळाली म्हणजे 'शेतकऱ्यांचा आसूड' सारखे महत्त्वपूर्ण पुस्तक जन्माला येते. या पुस्तकात उद्याच्या सुखी आणि संपन्न शेतकरी जीवनाचे एक स्वप्न आहे, म्हणून आजही हा ग्रंथ केवळ वाचनीय आहे असे नव्हे तर शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाची आणि जीवनाची घडी बसविण्यासाठी तो चिंतनीय आहे. महाराष्ट्राच्या शेतीविषयक विचारांत महत्त्वाची भर घालणारे हे पुस्तक विसरता किंवा वगळता येणार नाही. वैचारिक साहित्याचे सारे गुणधर्म त्यात सामावले आहेत. शेतकऱ्यांचा आणि शूद्रांच्या दैन्यवाण्या स्थितीवर अचूक बोट ठेवून फुल्यांनी जे तळमळीचे उद्‌गार काढले; ते आज एका सर्वमान्य सुभाषिताच्या पदवीला पोहोचले आहेत. ते म्हणतात,

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले. इतके अनर्थ एका अविद्येने केले. शूद्र शेतकरी हल्ली इतक्या दीन स्थितीत येऊन पोहोचण्याची धर्म व राज्यासंबंधीची अनेक कारणे आहेत. त्यापैकी थोड्या बहुतांचे विवेचन करण्याच्या हेतूने हा पुढील ग्रंथ रचिला आहे."

फुले हे अर्थशास्त्राचे खास अभ्यासक नव्हते. पण शेतकरी वर्गाच्या दैन्य-दारिद्र्याची मुख्य कारणे अर्थव्यवस्थेत आणि अन्याय्य समाजव्यवस्थेत कशी सामावली आहे; याचे सर्वांगीण चिंतन त्यांनी केले होते. शेतमजुरांच्या शोषणाचा व त्यावरील उपाययोजनांचा विचार गेल्या शंभर वर्षांत इतक्या उत्कट सहानुभूतीने क्वचितच कोणी केला असेल. या ग्रंथाची मौलिकता मध्यमवर्गीय समीक्षकांना समजणे शक्य नाही. कारण त्यांचे नाते पुस्तकाच्या पानाशी असते, जमिनीशी नसते. फुले दोन्ही नात्यांनी जोडले गेले असल्यामुळे हे पुस्तक लिहू शकले.

'शेतकऱ्याचा आसूड' यापेक्षाही महात्मा फुल्यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म'

हा ग्रंथ सामाजिक प्रबोधनाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. लोकहितवादी जसे 'शतपत्रात' दिसतात, केशवसुत जसे 'तुतारी'तून प्रकट होतात; टिळकांचे दर्शन जसे 'गीतारहस्या'तून होते; तसे फुल्यांचे उज्ज्वल दर्शन 'सार्वजनिक सत्यधर्मा'तून घडते. वॉल्ट व्हिटमनने 'He who touches the book, touches the man' असे म्हटले आहे. लेखकाचे पुस्तक म्हणजे त्याचे जिवंत व्यक्तित्व असते. 'सार्वजनिक सत्यधर्म' ही फुल्यांची बंडखोर प्रतिमा आहे. नवनिर्मितीचे एक भव्य स्वप्न फुल्यांनी आपल्या रसरशीत विचारांतून उभे केले आहे. हा ग्रंथ फुल्यांच्या सामाजिक आणि साहित्यिक प्रतिभेची साक्ष देण्यास सर्वार्थांनी समर्थ आहे. ज्याला फुले समजून घ्यायचा असेल, फुल्यांच्या विशाल मानवतावादी अंतःकरणातील विधायक विचारांची स्पंदने समजून घ्यायची असतील आणि त्याबरोबरच एक साहित्यिक म्हणून फुल्यांचे निर्माणक व्यक्तिमत्त्व अनुभवायचे असेल तर 'सार्वजनिक सत्यधर्मा'चे वाचन त्याला करावेच लागेल.

मला तरी एका वत्सल विचारवंताचे आणि निर्मितीशील लेखकाचे या ग्रंथात दर्शन घडले. हा ग्रंथ जीवनावर विविध दृष्टिकोनांतून भाष्य करू शकतो. 'फुल्यांची काही मते एकांगी आणि नको तितकी अभिनवेशी आहेत' अशी टीका या ग्रंथावरही झाली आहे. पण क्रांतीच्या प्रणेत्यांना आपले विचार घणाघाती पद्धतीने मांडावे लागतात. भाषेत येणारी आक्रमकता हा त्यांच्या तेजस्वी, बंडखोर विचारांचा अपरिहार्य भाग असतो. फुल्यांच्या मनात रात्रंदिवस सलणारे दुःख हे एखाद्या अभ्यासिकेत बसलेल्या निष्क्रिय विचारवंताचे दुःख नव्हते. ते कृतिवंत कार्यकर्त्याचे धगधगीत दुःख होते.

'सार्वजनिक सत्यधर्मात' अन्यायाचे निरसन करणारी आणि दुःखावर उपाय सांगणारी एक उत्स्फूर्त विचारधारा सर्वत्र वाहताना आढळते. फुल्यांच्या लेखनात स्वैरपणा आहे पण या लेखनातील जीवनदृष्टी माणुसकीने भरलेली, सामाजिक न्याय आणि समता या मूल्यांतून उचंबळून आलेली वाटते. त्यामुळेच या साहित्याचा ताजेपणा कोणालाही मोहून टाकील. अनेक मूलभूत प्रश्नांना त्यांनी येथे हात घातला आहे. धर्मविषयक प्रश्नांची चर्चा तर इतक्या खोलवर जाऊन ते करतात की; त्यातली अंगभूत मौलिकता (Originality) नाकारणे अशक्य आहे. जगातले सारेच धर्म सांप्रदायिक आकुंचित चौकटीत बंदिस्त होऊन बसले आहेत. आपली शक्ती त्यांनी केव्हाच गमावली आहे हा विचार फुले व्यक्त करतात. धर्मसंस्थांनी

माणसाचे स्वातंत्र्य ठायी-ठायी कसे हिरावून घेतले आणि त्याला एक प्रकारच्या अनुल्लंघ्य कुंपणात कसे बंदिस्त केले याचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. कुटिल आणि धूर्त पुरोहितशाहीने ही जीर्ण झालेली संस्था आपल्या स्वार्थासाठी ईश्वराच्या नावाखाली राबवली आणि लोकजीवनाचे शतकानुशतके मनसोक्त शोषण केले; हा तर्कशुद्ध विचार फुल्यांनी सामर्थ्याने मांडला आहे. सत्यधर्म हाच एकमेव धर्म. बाकीच्या सांप्रदायिक भिंतींची काहीच आवश्यकता नाही. ते म्हणतात -

मानवांचे साठी बहुधर्म कसे।
झाला काही पिसे। जोती म्हणे।
मानवाचे धर्म नसावे अनेक।
निर्मीक तो एक। जोती म्हणे॥

ईश्वर एकच व धर्मही एकच ही फुल्यांची भूमिका खंडोगणती देवांच्या आणि सांप्रदायांच्या जंजाळात अडकलेल्या अंधश्रद्धा समाजाला नवी दिशा देणारी आहे. कोणताही धर्मग्रंथ त्यांनी ईश्वरप्रणीत मानला नाही. ईश्वरप्रणीत तत्त्वाच्या कल्पनेवर फुल्यांनी मर्मभेदक प्रहार केला आहे. पराकोटीचे ग्रंथप्रामाण्य समाजात शिरल्यामुळे अनेक प्रकारच्या भेदांचे अडसर उत्पन्न झाले. माणसे विभागली. गीता, बायबल, कुराण वगैरे धर्मग्रंथांतून काही शाश्वत मूल्यांचा आढळ होत असला तरी हे ग्रंथ कालसापेक्ष आहेत; हे फुल्यांनी निर्भयपणे सांगितले. ते म्हणतात,

'या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी धर्मपुस्तके केली आहेत त्यापैकी एकाही ग्रंथात आरंभापासून शेवटपर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नाही. कारण प्रत्येक धर्मपुस्तकामध्ये काही एक व्यक्तींनी त्यावेळच्या प्रसंगास अनुसरून हेकटपणा केल्यामुळे, ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यांस सारखे हितकारक न होता सहज त्यामध्ये अनेक फळ्या होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करू लागतात.'

महात्मा फुल्यांचा हा विचार जितका तर्कशुद्ध तितकाच क्रांतीला पोषक आहे. धर्मसंस्था ही मनुष्याची निर्मिती आहे आणि तीच मानवी हिताला व प्रगतीला बाधक ठरू शकते. हा आशय आजच्या विज्ञानसंपन्न जगात सुद्धा लोकांना सहज स्वीकारता येत नाही. फुल्यांनी धर्मसंस्था आणि धर्मग्रंथ यांच्याकडे निखळ 'सत्यशोधक' दृष्टीने पाहिले. अशी शोधकता आज मात्र दुर्मिळ होऊन बसली आहे. खरे तर धर्म ही पूर्णपणे व्यक्तिगत गोष्ट आहे. ईश्वराच्या उपासनेची कोणतेही

पद्धती स्वीकारण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य मनुष्याला आहे. तो मंदिरात जाईल, मशिदीत जाईल अथवा चर्चमध्ये जाईल किंवा कोणत्याही प्रार्थनास्थळात न जाता स्वतःच्या हृदयातच परमजीवनमूल्याविषयी पूज्यभाव बाळगील. माझे मन हेच माझे मंदिर असेही तो म्हणू शकेल. या बाबतीत त्याच्यावर कोणत्याही असहिष्णु पारंपरिक विचारांची आणि प्रवृत्तींची सक्ती होऊ नये, ही फुल्यांची भूमिका केवढी उदात्त आणि उदार आहे. पण फुले, आगरकर, आंबेडकर वगैरे विचारवंतांचे विचार आकलन करण्यासाठी आवश्यक असलेली बुद्धी आणि सहिष्णुता फारच थोड्या लोकांजवळ आहे. फुल्यांच्या साहित्यातली एक विलक्षण, उत्तुंग वैचारिक झेप त्यांच्या शब्दांत मला सांगावीशी वाटते.

'या भूमंडळावर महासत्पुरुषांनी जेवढी म्हणून धर्मपुस्तके केली आहेत त्या सर्वांत त्या वेळेस अनुसरून त्यांच्या समजुतीप्रमाणे काही ना काही सत्य आहे. यास्तव कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्धधर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास, बौद्ध व्हावे, त्याने ख्रिस्ती व्हावे व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने महमदी धर्मी व्हावे. आणि त्याच कुटुंबातील त्यांच्या पुत्राने 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास त्याने सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे. आणि या सर्व माता-पित्यांसह कन्यापुत्रांनी आपला प्रपंच करीत असता प्रत्येकाने कोणी कोणाच्या धर्माचा हेवा करून द्वेष करू नये आणि त्या सर्वांनी आपण सर्वांच्या निर्माणकर्त्याने निर्माण केलेली लेकरे असून त्याच्याच (निर्मिकाच्या) कुटुंबातील आहोत असे समजून प्रेमाने व गोडी गुलाबीने एकमेकांशी वर्तन करावे. म्हणजे ते सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यात धन्य होतील.

महात्मा फुल्यांचे हे एक रोमांचित करणारे भव्य स्वप्न आहे. एकाच कुटुंबात भिन्न भिन्न धर्मश्रद्धा मानणारी माणसे एकरस होऊन नांदतात हा विचार स्फुरणे हे खरे तर 'क्रांतदर्शी' प्रतिभावंतालाच शक्य आहे. आजही एखादा शंकराचार्य जन्मसिद्ध उच्चनीचत्वाची कल्पना योग्य आहे असे सांगून विषमतेला आणि माणसावरील अन्यायाला धार्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न करताना दिसतो. आजही तथाकथित धर्मपंडित सती जाण्याच्या प्रथेचा गौरव करताना आढळतात. आजही धर्माचे नाव घेऊन रक्ताचे पाट वाहवणारी मनोवृत्ती आढळते. आजही एखाद्या लेखकाने आपल्या जुन्या धर्माला विरोधी विचार मांडला आहे या कारणावरून त्याला जिवे

मारण्याची धमकी राजरोस दिली जाते. या निर्बुद्ध, रानटीपणाच्या पार्श्वभूमीवर फुल्यांच्या विचारातली महनीय उदात्तता आणि मानव्यावरील प्रगाढ विश्वास केवढा सुंदर, केवढा पवित्र, केवढा धीरगंभीर, केवढा आशावादी आणि किती क्रांतिकारक वाटतो हे शब्दांतून सांगणे कठीण आहे.

फुल्यांचे विचार म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा जाहीरनामा आहे. एखाद्या टीकाखोराला हे विचार वेडगळपणाचे वाटण्याचा संभव निश्चित आहे. मनुष्यजातीच्या अभ्युदयाची आणि आत्यंतिक कल्याणाची बीजे फुल्यांच्या या भावविचारात सामावली आहेत. सारेच क्रांतिकारक मूर्ख लोकांना वेडगळ वाटत असतात. धार्मिक अहंगंडाने पछाडलेल्या, रोगट मनोवृत्तीच्या माणसांना फुल्यांचा हा मंगल विचार कसा समजेल ? आपापल्या आकुंचित संप्रदायाचे ते ढोल बडवीत बसले आहेत. पण या कर्णकर्कश आवाजात धर्मसहिष्णुतेची, सामाजिक न्यायाची, स्वातंत्र्य आणि समतेची मधूर स्वर जोतिबा फुले नावाचा एक कलावंत आपल्या हृदयाच्या सतारीतून निर्माण करीत आहे. हा साहित्यिक मानवी मूल्यांची जोपासना करण्यासाठी लिहीत होता, एक साहित्यिक म्हणूनही त्यांचे मोल आणि महत्त्व विशेष स्वरूपाचे आहे.

इमर्सन नावाच्या तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे. 'Where there is no vision, People perish' जे क्रांतदृष्टी नसते तेथील समाज नष्ट होतो. फुले हे क्रांतदर्शी निर्माणशील साहित्यिक आहेत. म्हणून चैतन्यमय जीवनाची आकांक्षा त्यांच्या वाङ्मयातून प्रकट झाली आहे. फुले जातीवादी तर नाहीत; पण ते राष्ट्रवादीही नाहीत. मानवतेच्या अथांग आकाशात झेपावणाऱ्या या विचारवंताला कोणतीही तटबंदी अडवू शकत नाही. म्हणून तर 'गुलामगिरी' हे आपले पुस्तक त्यांनी अमेरिकेतील गुलामगिरीविरुद्ध लढणाऱ्या स्वातंत्र्यवादी योद्ध्याला अर्पण केले आहे. फुल्यांची लेखणी आणि वाणी मानवी स्वातंत्र्याच्या चळवळीलाच वाहिलेली आहे.

लेखकाच्या साहित्यात तत्कालिकाबरोबर काही चिरकालीन विचारांचाही आविष्कार व्हावा लागतो. तरच ते साहित्य नवरचना करू शकते. शैली आणि अलंकार हे खरे तर साहित्याचे बाह्यगुण आहेत. या गुणांना अतिरेकी महत्त्व देऊन उथळ टीकाकारांनी त्यांच्या साहित्याची यथार्थ ओळख करून घेतली नाही. जी माणसाला विचारांकडे नेते, जी मानवी मूल्यांचा प्रामाणिक व उत्कट पुरस्कार

करते; ती साहित्यकला श्रेष्ठ आहे. कलेचे सौंदर्य कोणताच रसिक नाकारणार नाही. पण फुले नावाचा लेखक शब्दशैलीचा लेखक नसून तो पेटत्या क्रांतिकारक विचारस्फुल्लिंगांची उष्णता घेऊन आलेल्या विवेकनिष्ठ लेखक आहे. माणसावर प्रेम करणारा आणि म्हणून माणुसकीचा ध्वज उंच धरणाऱ्या या लेखकाच्या वैचारिक साहित्याकडे सांकेतिक दृष्टिकोनातून पाहण्यात अर्थ नाही. फुल्यांची भाषा पंडिती, कृत्रिमपणापासून दूर आहे. ती सुगम, प्रसादपूरक अशी लोकव्यवहारातली भाषा आहे. मराठी गद्यशैलीवर या भाषेचे एक ऋण आहे. व्यापक सहानुभूतीने व समतावादी विचारांनी ओथंबलेल्या फुल्यांच्या साहित्याने त्यांचे जिवंत व ज्वलंत मन आणि आक्रमक पण रचनात्मक विचार टिपून घेतलेले आहेत. फुल्यांच्या साहित्यातली क्रांतिधारा आपल्याला बंड करण्याची आणि नवजीवनाची उभारणी करण्याची प्रेरणा देते यात संशय नाही.

■■■

# माणुसकीचा स्पर्श

''मी केवळ माझ्यासाठी लिहितो. माझे शब्द माझ्या आनंदासाठीच आहेत. माझ्या लेखनातून मी मलाच साकार करीत असतो. आत्माविष्कार, माझ्या आत्म्याची सुख-दुःखं हाच माझ्या वाङ्मयाचा विषय आहे. समाजजीवनाशी मला कर्तव्य नाही. 'मी' हाच केंद्रबिंदू मानून मी लिहीत असतो.''

एका लेखकाचं हे उद्धट विधान त्याच्या अज्ञानाचं द्योतक आहे. 'मी', 'माझे', 'माझ्यासाठी' ही आत्मकेंद्रित मनोवृत्ती कित्येक साहित्यिकांची असते. खरं तर ही स्वयंकेंद्रितता हा एक सामाजिक गुन्हा आहे. 'मी केवळ माझ्यासाठीच गातो' असं एखाद्या कवीनं म्हणणं याचा अर्थ त्याला लेखनाची प्रक्रिया समजली नाही असाच होतो. केवळ स्वतःभोवती प्रदक्षिणा घालीत बसणं हे संकुचित वृत्तीचं केविलवाणं लक्षण आहे. हाच लेखक एकदा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी उभा राहिला. 'मला निवडून द्या' असं पत्रक त्यानं काढलं. तेव्हा मी त्याला म्हणालो, ''तुमचं लेखन केवळ तुमच्यासाठी असतं. समाजाचा त्याच्याशी संबंध असत नाही, असं गर्वानं तुम्ही म्हणता. मग जे साहित्य समाजसंबंधित नाही, त्याबद्दल वाचकांनी तुम्हाला कशासाठी निवडून द्यायचं ? सामाजिक जाणीव नसलेल्या लेखकानं अध्यक्षपदासाठी समाजासमोर हात पसरण्यात काय अर्थ आहे ? तुमच्या साहित्यातून तुम्ही केवळ तुमच्याच मूर्तीची पूजा केली. एका उंच मनोऱ्यात बसून कल्पनेची गाणी गात असताना लोकजीवनाकडं पाठ फिरवलीत. 'मी' या वेलांटीचा गळफास तुमच्या गळ्याभोवती कायमचा बसलेला आहे. समाजानं आपला प्रतिनिधी लेखक म्हणून तुम्हाला निवडून द्यावं, ही तुमची अपेक्षा हास्यास्पद आहे.''

ज्या साहित्याची नाळ समाजाशी जोडलेली नसते, ते साहित्य खुरटं आणि प्रेरणाशून्य असतं. अत्यंत मर्यादित कक्षेत त्याचा डोलारा उभा असतो. झुळझुळत राहिलेला झरा आपल्या जिवंत प्रवाहानं आजूबाजूचा परिसर हिरवागार करतो. साचून राहिलेल्या गतिशून्य पाण्याच्या डबक्याला निर्झराची योग्यता कधीच येणार नाही. पण काही कलावंत स्वतःच्या पलीकडे पसरलेल्या व्यापक समाजाशी

भावनेचा किंवा विचाराचा सामान्य संपर्कही ठेवू शकत नाहीत. हे त्यांचं भावनिक दारिद्र्य केविलवाणं असतं. साहित्यनिर्मितीची शक्ती वस्तुतः समाजजीवनाशी सहकंप पावण्याच्या ऊर्मीतूनच प्रकट होते. ज्याला लोकमनाशी संवाद साधता येत नाही, जो लोकव्यवहारापासून फटकून राहतो, त्याच्या कलेला एक प्रकारचं वांझपण आल्याशिवाय राहत नाही. अनेक लेखक-कवी सकुंचित दृष्टीचे असतात. माणसांची आणि त्यांची कधी समोरासमोर ओळखच होत नाही. ती स्वतःतच गुंतून पडलेली असतात. या प्रवृत्तीला 'नार्सिसिझम्' ही संज्ञा दिली जाते. एका विहिरीच्या आतील भिंतीतून उगवलेलं एक सुंदर फूल पाण्यात पडलेल्या आपल्या प्रतिबिंबाकडं सतत पाहात राहतं. आपल्याच प्रतिबिंबावर ते प्रेम करू लागतं. ते प्रतिबिंब हेच त्याचं सर्वस्व होतं. त्याच्या पलीकडं त्याला काही सुचत, रुचत नाही. नार्सिसिझम् नावाच्या फुलाची ही कथा सांगितली जाते. आमचे बरेचसे लेखक नार्सिसिस्ट प्रवृत्तीनं पछाडलेले आहेत. ते स्वतःच्या शब्दांवर, स्वतःच्या गीतांवर इतके लुब्ध झालेले असतात की, स्वतःखेरीज इतरांचा शब्द किंवा स्वर त्यांना चालत नाही. त्यांच्या हृदयाच्या गाभाऱ्यात त्यांनी आपल्याच हातांनी घडवलेली स्वतःचीच मूर्ती प्रतिष्ठित केलेली असते. भजनपूजनाचा सोहळा चालू असतो.

अशा एका लेखकाला एकदा मी विचारलं, ''भुकेनं वखवखलेल्या लोकांनी अन्नधान्याची मागणी करण्यासाठी मोर्चा काढला होता. त्यांना फक्त जगण्यासाठी अन्न हवं होतं. मंत्र्यांच्या आलिशान बंगल्यासमोर शेकडो लोक उन्हा-तान्हात घोषणा देत होते. त्यांच्यावर पोलिसांनी गोळीबार केला. अन्नाचा घास मिळण्या-ऐवजी गोळीचा प्रसाद मिळाला. या अन्यायाचं पेटतं दर्शन तुमच्या लेखनातून घडायला हवं.''

स्वतःला आधुनिक कालिदास समजणारा तो लेखक आढ्यतेनं म्हणाला, ''असल्या गद्यप्राय घटना पुष्कळ घडतात. घडणाऱ्या प्रत्येक घटनेवर काहीतरी लिहिण्यासाठी माझी लेखणी नाही. ती सौंदर्याची गाणी गाण्यासाठी आहे. कुरूपता आणि बीभत्सता जगात पुष्कळ आहे. सुंदरतेची चित्रं रेखाटून वाचकांना मुग्ध करण्यासाठी माझी प्रतिभा आहे. हे तुमचे भूकबळी, दारिद्र्य आणि विषमता यांच्याशी मला काय कर्तव्य ? मला थोडं सुंदरतेचं गाणं गाऊ द्या.''

लेखकाचा हा एक दुसरा अज्ञानमूलक भ्रम आहे. आपण केवळ सुंदरतेचं आणि प्रेममयतेचं चित्रण करावं. जगातल्या दुःख-दैन्याशी आपला संबंध नाही.

ही देखील एक अत्यंत अज्ञानी आणि बेजबाबदार समजूत आहे. साहित्याच्या सुंदरतेविषयींची ही असुंदर अशीच कल्पना आहे. सौंदर्यासंबंधीच्या सांकेतिक कल्पनांची उजळणी करीत बसलेल्या या साहित्यिकांना सौंदर्य म्हणजे काय, हेच समजलेलं नसतं. वर्षानुवर्षे मोलमजुरी करीत राहिलेल्या एका गरीब शेतमजुराचा मुलगा विद्यापीठाच्या परीक्षेत पहिला आला. ही वार्ता कळल्यावर त्या कष्टकऱ्यानं आपल्या मुलाला पोटाशी धरून आपला खरबरीत हात त्याच्या तोंडावरून मायेनं फिरवला आणि तो माणूस आनंदानं रडू लागला. या दृश्यातली सुंदरता टिपण्याची जिवंत शक्ती किती लेखकांच्या लेखणीत आहे ? अश्रूंतही सौंदर्य असतं. सैनिकाच्या वाहणाऱ्या रक्तातही सौंदर्य असतं. माणसाच्या जीवनातली सुख-दुःखं न्याहाळण्यासाठी भावनेची भाषा समजणारी सौंदर्यदृष्टी असेल तर माणसाच्या मनाची सुंदरता कळू शकते. पण पुष्कळसं साहित्य मळलेल्या वाटेनंच वाचकांना घेऊन जातं. कारण लेखकांचा दृष्टिकोन प्रगल्भ असत नाही.

सुख-दुःखांच्या जाणिवा तरल आणि संवेद्य व व्यापक असल्या तरच त्या लेखनाला कसदारपणा येतो. स्वतःची सुख-दुःखं सांगतानादेखील त्यांनाही एक प्रकारचं सार्वजनिक तत्त्व असलं तर त्या भावना सर्वस्पर्शी होतात. संत तुकोबांसारखा प्रतिभावंत जेव्हा 'ओस जाल्या दिशा मज वाटे भिंगुळवाणे' असं म्हणतो तेव्हा 'या कवीचं दुःखं त्याचं एकट्याचं नसून तो माणसाचं अटळ दुःख प्रकट करीत आहे असं वाटून आपल्याही मनात त्या दुःखाची शल्यं खुपू लागतात. कवीचा शब्द हा लोकहृदयाचा स्वर प्रकट करणारा शब्द बनला पाहिजे. निरुंद मनाचे शब्द साहित्याची पदवी कधीच मिळवू शकत नाहीत. व्यक्तीचं दुःख हे समष्टीपर्यंत सर्वांशी भिडलं पाहिजे. श्रेष्ठ साहित्याची साक्ष काढली तर जे शब्द समाजाला आपुलकीनं जवळ घेतात, आत्मीयतेनं कुरवाळतात आणि सहानुभूतीनं बोलत राहतात, त्याच शब्दांना साहित्याची प्रतिष्ठा प्राप्त होते हे ध्यानात येईल. गोष्ट काऊचिऊची असो की रामसीतेची, ती जिवंत सुख-दुःखाची आणि सर्वांच्या अंतःकरणाची असेल तरच तिचा साहित्यात अंतर्भाव होतो.

माझे शब्द हे सर्वांच्या हृदयातलं संगीत जागं करू शकतील असेच शब्द मला लिहायचे आहेत, ही भावना जोपर्यंत लेखकाची होत नाही, तोपर्यंत त्याच्या भाषेला साहित्यिक मोल येणार नाही. शब्दांना व्याकरण असेल, पण अंतःकरण नसेल तर त्या शब्दांचं जिणं निरर्थक आहे. साहित्याची कला हृदयाशी संबंधित आहे.

आईचा शब्द ऐकला की, रडणारं बालक शांत होतं. अश्रू थांबतात आणि डोळ्यांत हसू उमटतं, साहित्याचा स्पर्श असाच वात्सल्यातून फुलावा लागतो. हेच साहित्याचं शास्त्र. कलास्वरूप शास्त्रावर विद्वानांचे ग्रंथ आहेत. पंडितांचे वादविवाद चालूच आहेत. पण साहित्य म्हणजे हृदयाची हाक एवढं समजलं की मग पंडिती वादविवादांची आवश्यकता उरत नाही. खुरट्या मनाचे लेखक खुरटी चित्रं कृत्रिम रंगानं रंगवीत बसतात. त्यांच्या हातातली कुंचली लहानखुरी असते आणि ज्या फलकावर त्यांना चित्र रंगवायचं असतं, तो कॅनव्हासदेखील खुरटा असतो. केवळ स्वतःसाठी लिहिणारा किंवा अत्यंत अरुंद परिघात रमलेला लेखक दूरवरची क्षितिजं न्याहाळू शकत नाही. डबक्यातल्या बेडकाला समुद्राचं स्वप्न कधीच पाहता येत नाही. गरुडाची दृष्टी असलेले आणि विशाल क्षितिजाला पालाण घालणारे गरुड साहित्याच्या प्रांतात फार थोडे आहेत. मर्यादित उंचीपर्यंत झेप घेणारे पक्षी मधून-मधून दिसतात. ते स्वतःला कदाचित गरुड समजत असतील !

'आनंदे भरीन तिन्ही लोक' हे स्वप्न ज्ञानेश्वरांसारख्या कवीश्वरालाच पाहता येतं. कुरूप आणि बीभत्स झालेल्या जगाला नवसौंदर्य देण्याची जबाबदारी आपली आहे, असं त्यांना वाटत होतं. 'हे विश्वचि माझे घर' ही उत्कट जाणीव जेव्हा कवीला वेढून टाकते तेव्हाच त्याच्या शब्दांत कस येतो आणि साहित्यात रस येतो. साहित्यनिर्मिती हा विश्रांतीच्या वेळेचा उद्योग नव्हे. अस्वस्थ झालेल्या महत्त्वाकांक्षी मनातून ज्या शब्दांच्या ठिणग्या उडतात, त्यांनाच साहित्य म्हणता येतं. कधी ठिणग्या असतात, कधी फुलं असतात. पण दोन्हीही अस्सल असतात. हा अस्सलपणा तत्त्वनिष्ठेतून, सामाजिक जाणिवेतून आणि माणसासंबंधीच्या उत्कट ओढीतून उदयाला येतो. 'जे का रंजले गांजले' त्यांच्याविषयीची आंतरिक जवळीक प्रतिभेला चालना देते. जगातलं थोर साहित्य कारुण्यातून, समाजप्रेमातून आणि व्यापक जीवनाच्या आकर्षणातून उत्पन्न झालेलं आहे. माणूस हाच साहित्याच्या देव्हाऱ्यातला प्रमुख देव आहे. सूर्यमालेत सूर्याचं स्थान मध्यवर्ती असतं. इतर सारे ग्रह त्याच्याभोवती प्रदक्षिणा घालतात. हेच स्थानमाहात्म्य माणसाचं आहे. त्याच्यासाठी धर्म, साहित्य आणि संस्कृती, शिक्षण आणि अर्थव्यवहार आहेत. माणसाच्या माणुसकीची प्रतिष्ठा दृढमूल करणं हे साहित्याचं नियत कार्य.

मॅक्झिम गोर्कीनं म्हटलं आहे, "I Know of nothing finer, more complex, more interesting than man. He is everything."

माणसासारखं सुंदर आणि कुतूहल वाढवणारं दुसरं काहीच नाही. माणूस सुंदरही आहे आणि विद्रूपही आहे. माणूस आणि त्याच्या अवतीभोवतीचं जीवन हाच साहित्याचा एकमेव धर्म आहे. म्हणून माणसांच्या सुख-दुःखांशी सहकंप पावण्याची उत्कट वृत्ती ज्या साहित्यिकात नसेल, त्याला साहित्यिक हे विशेषण शोभणार नाही. माणूस म्हणूनही तो कमी प्रतीचा ठरेल.

'मी माझ्यासाठी लिहितो' किंवा 'सामाजिक जाणिवेशी माझा संबंध नाही' ही विधानं मानसिक विकृतीकडं झुकलेली वाटतात. 'बुडता हे जन न देखवे डोळा' ही तुकारामांची प्रवृत्ती हीच कलावंताची प्रकृती आहे. 'ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभाविण प्रीती॥' हा मनोधर्म असलेला लेखक उत्तम साहित्याची निर्मिती करू शकतो. बहिणाबाई चौधरीसारखी सामान्य गृहिणी व्यापक सहानुभूतीच्या बळावर 'अक्षर' कवितेला जन्म देऊ शकते. जितकं सहानुभूतीचं क्षेत्र विस्तीर्ण, तितकं साहित्याला लाभणारं बळ अधिक असतं.

अण्णाभाऊ साठे यांच्या काही कादंबऱ्या उच्च दर्जाच्या आहेत. उपेक्षित आणि शापित वर्गातल्या स्त्री-पुरुषांचं फाटलेलं जीवन त्यांनी सहृदयतेनं रेखाटलं. हीच त्यांच्या लेखनाची थोरवी आहे. सहृदयता, सहानुभूती, माणसांविषयीची निष्ठा हे गुणधर्म साहित्यिकांच्या मनांतून अलीकडं ओसरत चालले आहेत की काय याची शंका येते. विविध विषयांवरचं साहित्य आज लिहिलं जातं. पण त्यातून सहृदयतेची साक्ष फारशी मिळत नाही. साहित्यिक ज्ञानवंत असावा, पण त्याहीपेक्षा त्याच्या हृदयात जीवनविषयक सहानुभूतीचा झरा झुळझुळत असावा. कोणत्याही कलेचं वैभव या आंतरिक झऱ्याच्या झुळझुळण्यावर अवलंबून असतं. माणुसकीचा सुस्वर समर्थपणानं प्रकट करणाऱ्या साहित्यालाच जागतिक वाङ्मयात स्थान मिळतं. म्हणूनच सामाजिक सहानुभूती आणि जाणीव हीच साहित्याच्या सामर्थ्याची निधानं आहेत. कलेच्या नावाखाली कुशल कारागिरी दाखवणारी अनेक पुस्तकं मराठी साहित्यात उत्पन्न होतात. त्यातलं नावीन्य रचनेतलं असतं. हे आकृतिवादी साहित्य भुरळ घालतं. रंजन करतं. पण मनावर सुख-दुःखांच्या रेषा उमटवीत नाही. बौद्धिक क्रीडेसाठी लिहिल्या जाणाऱ्या या वाङ्मयाला फार लवकर माणूस विसरून जातो.

साहित्याच्या एका प्रकृतिधर्माचा इथं उल्लेख करतो. आजच्या जगात एक निरुपद्रवी तात्पुरती कला म्हणून साहित्याकडं पाहणं हा अपराध ठरेल. जुनाट

झालेल्या मूल्यांवर प्रहार करून ती नष्ट करण्यासाठी साहित्यातल्या वैचारिक शक्तीचा आज उपयोग करून घेतला पाहिजे. सामाजिक कुरूपतेवर, अन्याय, विषमता आणि शोषण यांवर तुटून पडण्यासाठी साहित्याच्या शस्त्राचा फुले-आंबेडकरांनी समर्थतेनं वापर केला होता. याच सामर्थ्याचा आजच्या परिस्थितीत अधिक आवेगानं उपयोग झाला पाहिजे. क्रांतीची पहाट जन्माला घालण्याची भावनिक आणि वैचारिक तयारी करण्यासाठी लेखकांनी आपली शस्त्रं परजली पाहिजेत. 'मी' आणि 'माझ्यासाठी' या क्षुद्र वलयातून लेखक आणि कवी यांनी झडझडून बाहेर पडलं पाहिजे. क्रांतिविचारांची रग आणि धग लेखण्यांच्या माध्यमातून समाजात पसरवण्याची ऐतिहासिक कामगिरी या वर्गावरच येऊन पडते. मरगळलेल्या समाजाला नवी स्वप्नं देण्याची कामगिरी आता अधिक जोमानं साहित्यानं करावी. केवळ कलावादी किंवा आकृतिवादी समीक्षकांना हा विचार मानवणारा नाही. ते आपले ठराविक ठशाचे युक्तिवाद पुढे करतात.

एक समीक्षक म्हणाले, ''फुलं सुगंध देण्यासाठी फुलतात. क्रांतीची आग पेटवणं हा त्यांचा धर्म असत नाही. साहित्यानं आनंद द्यावा. मन उल्हसित करावं. मन पेटवणं हे त्याचं काम नव्हे.'' या भोंगळ युक्तिवादाला पुन्हा पुन्हा उत्तरं देण्याचं कारण नाही.

अण्णाभाऊ साठे म्हणतात. ''जग बदल घालुनी घाव। सांगून गेले मला भीमराव।'' घाव घातल्याशिवाय जगात बदल होत नाही. हा आक्रमक पण आशावादी विचार क्रांतिकारक विचारवंतांनी साहित्यिकांना दिला आहे. साहित्य ही संस्कृतीची रचना करणारी सामाजिक शक्ती आहे. या विचारावर अधिकाधिक विश्वास ठेवला पाहिजे. 'विश्वश्रेयं काव्यं' या सुभाषिताचा अर्थ इतकाच की मानवी जीवनाला सुंदरत्वाच्या आणि स्वातंत्र्याच्या पातळीवर घेऊन जाण्यासाठी साहित्य हेच समर्थ असतं.

साहित्याची महती गाताना मी इतकंच म्हणतो की, मानवी संस्कृतीची विविधता, विचित्रता, सुरूपता आणि विरूपता यांचं दर्शन साहित्यातून घडतं. जीवनसंस्कृतीच्या उत्कर्षाचा आणि अपकर्षाचा चालता-बोलता इतिहास साहित्यातूनच समजू शकतो. रामायण आणि महाभारत हे जसे साहित्याचे तसेच मानवी संस्कृतीचे मानदंड आहेत. रंजन करताना भंजन करण्याचीही शक्ती साहित्यात असावी. पण त्यासाठी साहित्यिकाच्या मनाला आणि दृष्टीला विशालतेची बैठक

लाभावी. मी फक्त माझ्या आनंदासाठी लिहीन ही पराकोटीची स्वार्थी भूमिका समूळ सुटली पाहिजे. जीवनाविषयीच्या बलवत्तर प्रेमातून आणि आकर्षणातून लेखकाच्या लेखणीला रस मिळाला पाहिजे. या **संदर्भात** क्युप्रिनच्या 'यामा' या जुन्या कादंबरीची (साहित्य कधीच जुनं होत नाही) साक्ष काढण्यासारखी आहे.

पोटाची भूक भागवण्यासाठी शरीराचं दुकान मांडून बसलेल्या शापित स्त्रियांची कहाणी म्हणजे ही 'यामा' कादंबरी. अंतर्बाह्य दुःखी असलेल्या या स्त्रियांच्या फाटलेल्या जीवनातलं कारुण्य लेखकानं विलक्षण सहृदयतेनं टिपलं आहे. एकदा सोळा-सतरा वर्षांचा एक कोवळा तरुण मोहानं 'त्या' वस्तीकडं वळतो. तिशीतल्या तरुण वेश्येच्या घरात तो भीत भीत प्रवेश करतो. या कोवळ्या पण वाट चुकलेल्या पोराला पाहून त्या गणिकेच्या मनात वात्सल्याची भावना उचंबळून येते. त्याच्या मस्तकावरून आणि पाठीवरून आपुलकीनं हात फिरवीत गहिवरल्या स्वरात ती त्याला म्हणते. ''माझ्या भावा, इकडं या नरकात कशासाठी आलास ? ही नागमोडी वाट तुला उद्ध्वस्त करील. मला जर भाऊ असता तर तो तुझ्यासारखाच दिसला असता. जा बाळ, आपल्या घरी सुखानं रहा. या वाटेला पुन्हा येऊ नकोस.'' तिचे डोळे अश्रूंनी भरले होते. स्वरातून माणुसकी ठिबकत होती. एका वेश्येच्या मनातलं माणुसकीचं **तुळशीवृंदावन** लेखकानं कसं सजीव केलं आहे हे पाहण्यासारखं आहे. लेखकानं **काय लिहावं** ? कसं लिहावं ? काहीही लिहावं आणि कसंही लिहावं. पण माणुसकीच्या रसायनात **लेखणी बुचकळून** लिहावं इतकंच म्हणता येईल. माणुसकीचा स्पर्श हाच **साहित्याचा चिरंतन गुणधर्म** आणि परिणाम असावा.

ज्ञानेश्वरांनी कवित्वाला परतत्त्वस्पर्श व्हावा असं म्हटलं आहे. माणुसकीचा स्पर्श हाच खऱ्या अर्थानं परतत्त्वस्पर्श म्हणावा लागेल. ज्याच्या मनाच्या भूमीत **माणुसकीची बीजं रुजतात, त्याच्या प्रतिभावेलीवर काव्याची** सुगंधी फुलं उमलतात. **प्रतिभेच्या विकासाला माणुसकीसारखं दुसरं खतपाणी नाही** हेच खरं.

■■■

# स्त्री-जीवनाला नवी दिशा देणारी सावित्री

महाराष्ट्राच्या स्त्री-जीवनाला आकार देणारी एक रचनात्मक शक्ती म्हणून सावित्रीबाई फुले यांचा उल्लेख अभिमानाने करता येतो. सावित्रीबाईंनी स्त्रीला प्रतिष्ठा दिली. स्त्रीच्या व्यक्तित्वाचे आणि कर्तृत्वाचे उदात्त क्रांतिकारक दर्शन त्यांच्यामुळेच घडले असे म्हणायला प्रत्यवाय नाही. नवविचारांच्या या ज्योतीचे तेज आजच्या आणि उद्याच्या महाराष्ट्राला प्रेरणा देणारे आहे.

गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकातले एक वाक्य आठवते - 'पुरुष ही परमेश्वराची कीर्ती आहे, तर स्त्री ही परमेश्वराची मूर्ती आहे.' अनुप्रासाच्या मोहाने हे वाक्य लिहिले गेले नाही; त्यातले सत्य लेखकाने जाणून घेतले आहे. स्त्रीला परमेश्वर म्हणण्यात एक प्रकारचा भाबडेपणा आहे अशी कोणी टीका करील; पण तिच्या ठायी असलेल्या अपार वात्सल्याचा, निर्मितीशीलतेचा आणि सेवेतून संस्कार करण्याचा, त्यागाचा गुणधर्म लक्षात घेतला तर स्त्रीच्या सामर्थ्याची यथोचित जाणीव होऊ शकते. स्त्रीमध्ये असलेल्या देवत्वाचेही दर्शन घडू शकते.

पण प्राचीन काळापासून स्त्री हा केवळ आपल्याच देशात नव्हे तर, जगात सर्वत्र उपेक्षेचा विषय बनलेला आहे. पुरुषाच्या तुलनेत स्त्री सदैव दुय्यम आहे असेच मानले गेले. तिच्या गौरवाचे कित्येक उल्लेख साहित्यात आढळत असले तरी तिला स्वतंत्र व्यक्तित्व आहे, स्वतंत्र मन आहे, याची डोळस जाणीव पूर्वीही नव्हती, आजही ती सर्वार्थाने आलेली दिसत नाही. अशा पारंपरिक वाटेने चालताना ज्या स्त्रियांनी नव्या वाटांचा शोध घेतला आणि स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीला बळ देऊन समाजमन घडवले, त्यात सावित्रीबाई फुले हे एक विशेषनाम आहे.

पुराणकाळातली सावित्री पतीचे प्राण परत मिळवण्यासाठी मृत्यूबरोबर झगडली. पण आधुनिक काळातली ही सावित्री मृतवत् झालेल्या समाजात आणि स्त्रीच्या जीवनात नवा प्राण ओतण्यासाठी एकोणिसाव्या शतकात अखंड संघर्ष करीत राहिली. तिच्या लढ्याची स्फूर्तिदायक गाथा समजून घेण्यासाठी त्या कालखंडातील सामाजिक स्थितीगतीचे चित्र पाहणे जरुरीचे आहे.

एकोणिसाव्या शतकातले स्त्री-जीवन हे अनेक प्रकारच्या रूढीत जखडलेले

होते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असे म्हणून मनूने स्त्रीच्या पारतंत्र्यावर कायमचे शिक्कामोर्तब करून ठेवले होते. घराच्या चार भिंतीत कोंडल्या गेलेल्या स्त्रीला ज्ञानापासून, अधिकारापासून आणि स्वातंत्र्यापासून अनेक शतके वंचित ठेवलेले होते. जिचे नखही कधी समाजाच्या दृष्टीला पडत नाही; किंवा सूर्यही जिला पाहू शकत नाही ती स्त्री श्रेष्ठ मानली जाणे म्हणजे अज्ञानाची परमावधी होती.

'मी' या हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरीतील नायिका म्हणते, 'बाबा रे ! आम्ही गोठ्यात बांधलेली मुकी जनावरे.' या उद्‌गारात स्त्री-जीवनातली सारी दयनीयता आणि दुःख व्यक्त झाले आहे. स्त्रीच्या या पारतंत्र्याला धर्म आणि रूढी यांचा आधार दिल्यामुळे तिची परवशता अधिकच दृढ झालेली होती. स्त्री-विषयक सुधारणांना वेगाने चालना देण्याचा प्रयत्न लोकहितवादी, जोतिबा फुले, विष्णुशास्त्री पंडित आणि आगरकर यांनी प्रामुख्याने केला. सामाजिक सुधारणा आणि स्त्री-विषयक प्रश्न यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे हे या सुधारणावादी विचारवंतांनी ओळखले होते. स्त्रीचा मनोविकास शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकतो. म्हणून ती प्रथम शिक्षित झाली पाहिजे, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले. लोकहितवादी, फुले आणि आगरकर यांच्या दृष्टीसमोर सुशिक्षित, स्वतंत्र आणि व्यक्तित्वसंपन्न स्त्रीचे चित्र उभे होते.

लोकहितवादींनी 'शतपत्रां'तून स्त्री-सुधारणेचा विचार भावोत्कट भाषेतून मांडला. स्त्री आणि पुरुष यांचे अधिकार समान असले पाहिजेत ही भूमिका त्यांनी आग्रहपूर्वक मांडून म्हटले आहे, ''जसे पुरुष, तशा स्त्रिया आहेत असे आंधळ्या हिंदू लोकांस समजा. स्त्रियांस आणि पुरुषांस सारखे अधिकार आहेत असे ठरवा. जो अधिकार संसारासंबंधी व सुखासंबंधी पुरुषांस आहे तोच स्त्रियांस असावा.'' स्त्रीच्या संबंधात सामाजिक न्यायाचा आणि माणुसकीचा हा विचार मराठी साहित्यातून प्रथमच उत्कटतेने प्रकट झालेला दिसतो.

लोकहितवादींची 'शतपत्रे' इ.स. १८४८ ते १८५० या कालखंडात लिहिली गेली. त्यापूर्वीच्या काळात स्त्री-पुरुष समानतेचा विचार कोणा विचारवंताच्या मनात उद्‌भवल्याचा आधार आढळत नाही. स्त्री हा केवळ करुणेचा विषय नव्हे. भूतदयेच्या मलमपट्ट्या लावून तिच्यासंबंधीची सामाजिक दुखणी दूर होण्यासारखी नव्हती. पुरुषरचित शास्त्रांतून, आचारसंहितांतून जो अन्यायी, एकतर्फी दृष्टिकोन दिसतो, तोच प्रथम पुसून टाकला पाहिजे आणि करुणेपेक्षा सामाजिक न्यायाचे

तत्त्व गृहीत धरून स्त्री-पुरुषांचा विचार केला पाहिजे; अशी दृष्टी लोकहितवादींच्या साहित्यात आढळते. फुले-आगरकरांनी स्त्री-स्वातंत्र्यवादी विचारांचा ध्वज अभिनिवेशाने उचलून धरला, याचे कारण त्यांच्या मुळाशी सामाजिक न्याय होता. महात्मा फुल्यांनी तर एक नवी, पुरोगामी विचारांची सुशिक्षित, स्वावलंबी, बंडखोर स्त्री उभी करण्यासाठी आपली सारी सामर्थ्ये वेचली. सावित्रीबाई फुल्यांनी या कार्याला आपले जीवन समर्पित केले. त्यामुळे एकोणिसाव्या शतकातले स्त्री-चित्र हळूहळू बदलत गेले. कोणताही सामाजिक बदल जाणीवपूर्वक घडवून आणावा लागतो. परिवर्तनाची आच जेव्हा मनाला लागून राहते, तेव्हा विचारवंत कृतीच्या पातळीवर उतरतात. फुले दंपतीचे स्त्री-दास्य-विमोचनाचे कार्य हा महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वपूर्ण अध्याय आहे, यात शंका नाही.

प्राचीन काळापासून स्त्रीला अनेक अर्थांनी कनिष्ठ मानण्यात येत होते. स्त्री ही केवळ शृंगाराची पुतळी आणि 'नरकमार्गस्यदीपिका' आहे असे मानले गेले. केशवपनाची आणि सतीची चालदेखील तिच्यावर लादली गेली. तिने केवळ पतीची सावली होऊन राहावे आणि पतिव्रत्य हाच आपला परमधर्म समजावा, पतिव्रता हीच पुण्यशील असते, अशा अर्थाची अनेक भ्रांतिमूलक वचने निर्माण करण्यात आली. स्त्रीला देवता समजण्यातही तिचे मनुष्यत्व नाकारण्यासारखे आहे. मध्ययुगातल्या संतसाहित्यातही स्त्रीचे चित्र पारंपरिक दृष्टीनेच चितारलेले आढळते. विठ्ठलाला माउली समजून भक्ती करणाऱ्या संतांनी स्त्रीमधल्या माउलीची मात्र उपेक्षा केली. स्त्रीसंबंधीचा सनातन सांकेतिक आणि पक्षपाती विचार लोकमनात रुजून बसलेला असल्यामुळे एकोणिसाव्या शतकातले स्त्रीचे जीवन पूर्वीसारखेच परावलंबी राहिले. महाराष्ट्रात लोकहितवादींनी केशवपनाचा आणि सती जाण्याचा प्रश्न धसाला लावला. यापूर्वी बंगालमध्ये राजा राममोहन रॉय आणि ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी या प्रश्नांवर रान उठवले होते. पतीच्या जळत्या चितेत आपल्या जिवंत देहाची राखरांगोळी करणाऱ्या स्त्रीला देवता मानून तिची पूजाअर्चा आजही क्वचित कोठे तरी केली जाते. अज्ञानी रूढींची बंधने किती चिवट असतात, हेच त्यातून स्पष्ट होते. इ.स. १८१७ ते १८२७ या दहा वर्षांच्या काळात दरवर्षी सरासरीने सहाशे स्त्रिया बंगालमध्ये सती गेल्या, ही माहिती अधिकृत म्हणून दिली आहे. (अर्वाचीन महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना - लेखक डॉ. रा. शं. वाळिंबे, पृ. १२५) 'पुणे शहराचे वर्णन' या पुस्तकाचे लेखक ना. वि. जोशी यांनी एक

चित्तथरारक अनुभव सांगितला आहे. ते म्हणतात,

'एक स्त्री सती जात असता तिचे अंग पोळून ती बाहेर निघाली; आणि सर्व अंगाची आग झाली म्हणून नदीत उडी टाकण्यास पळू लागली. पण ब्राह्मण लोकांनी तिला पकडून जुलुमाने सरणात फेकली व वर मोठे मोठे ओंडके टाकून तिचा प्राण घेतला. ही गोष्ट इंग्रज सरकारास कळताच त्यास दया येऊन त्यांनी लोकांस अशी ताकीद केली की, ज्या बाईला सती जाणे असेल तिने अथवा तिच्या घरच्या लोकांनी सरकारात कळवावे. सरकार हुकूम देईल तर जावे.'

या विलक्षण राक्षसी रूढीच्या भोवती धर्माज्ञेचे वलय निर्माण केलेले होते. वर दिलेली दोन उदाहरणे एकोणिसाव्या शतकातील आहेत. गायीसंबंधी सहानुभूती आणि भक्ती ठेवणाऱ्या तथाकथित धार्मिक ब्रह्मवृंदाला कोवळ्या-कोवळ्या निष्पाप मुली आगीत जळत असताना मात्र शांतपणाने पाहावेसे वाटत होते. या अज्ञानाला आणि क्रूरतेला कोणत्याही भाषेत एखादे सार्थ विशेषण सापडेल असे वाटत नाही. धर्म हा माणसाला सर्व बाजूंनी करकचून बांधून ठेवणारा असेल तर त्याच्या पाशातून मुक्त होऊन मानवधर्माची कास धरली पाहिजे, असा आशय महात्मा फुल्यांच्या क्रांतिकार्यातून आणि त्यांच्या साहित्यातून व्यक्त होतो. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा ग्रंथ या दृष्टीने मननीय आहे.

लोकहितवादींनी लिहिले आहे, ''हिंदू हो धन्य तुमची ! तुम्हीच आपल्या मुलीचे खाटीक स्वस्थपणाने होता. तुमच्यासारखे राष्ट्र आणि तुमच्यातील विद्वानांसारखे विद्वान यास तुलना पृथ्वीवर कोठेही मिळणार नाही.''

लोकहितवादी हे ब्राह्मण होते, पण ब्राह्मणी धर्मात शिरलेल्या विसंगतीचे, अन्यायी रूढींचे आणि अज्ञानी प्रवृत्तीचे ते कठोर टीकाकार होते. टीका करताना त्यांची भाषा आक्रमक होती. आपल्या भाषेच्या शस्त्राने ते दांभिक रूढींवर घाव घालतात. लोकहितवादी आणि फुले या दोन्ही समाजसुधारकांनी रूढीवादावर निर्दय प्रहार करून विधायक विचार जनतेला दिले आहेत. दोघांच्याही भाषेत काहीशी ग्राम्यता व शिवराळपणा आहे अशी हास्यास्पद टीका सनातनी वृत्तीच्या लोकांनी केली. पण ती निरर्थक आहे. खरे स्त्री-जीवन शतकानुशतके उद्ध्वस्त करीत राहिलेल्या तर्कशून्य धर्मरूढींवर प्रहार करताना ते सोवळ्या आणि सौम्य शब्दांतून करावे, ही अपेक्षाच वेडेपणाची आहे.

महात्मा फुले हे तर श्रेष्ठ कृतिवंत होते, दृढनिश्चयी होते. सामाजिक

परिवर्तनाची पहिली प्रभावी ललकारी त्यांच्या उक्तीतून आणि कृतीतून प्रकट झाली. सावित्रीबाई फुले हे महाराष्ट्रातल्या पहिल्या जागरूक आणि व्यक्तित्वसंपन्न स्त्रीचे उदात्त प्रतीक आहे, यात शंका नाही. नवनिर्मिती करताना जे जुनाट झाले आहे, जे व्यक्तीला आणि समाजाला बांधून ठेवते, प्रगतीच्या वाटा अरुंद करते ते न्यायनिष्ठुरतेने बाजूला सारावे लागते. अन्यायावर तुटून पडावे लागते. लोकहितवादींच्या 'शतपत्रांत' आणि महात्मा फुल्यांच्या साहित्यात हीच भूमिका आहे. फुल्यांच्या विचारांना अधिक व्यापक असे सामाजिक अधिष्ठान आहे. नवरचना करणाऱ्या सुधारकांना, 'जुने जाऊ द्या मरणालागुनी जाळुनी किंवा पुरुनी टाका' हा अटीतटीचा मार्ग स्वीकारावाच लागतो. आगरकरांच्या विचारातही आक्रमक अभिनिवेश आहे. जीर्ण आचारविचारांवर त्यांनी आपल्या धगधगीत शब्दांतून घणाघाती टीका केली आहे.

त्यांनी म्हटले आहे, ''आमची गृहपद्धती, आमची राज्यपद्धती, आमची शास्त्रे, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या चाली, आमच्या वागण्याच्या रीती सारांश, इंग्रज येईपर्यंत आमचे सारे व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व घशात घालून ओतलेल्या पोलादासारखे किंवा शृंखलाबद्ध बंदिवानासारखे, अथवा उदकाच्या नित्य आघाताने दगडाप्रमाणे कठीण झालेल्या लाकडासारखे किंवा हाडकासारखे शेकडो वर्षे होऊन राहिले, असे म्हणण्यास हरकत नाही.''

आगरकरांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करून स्त्री-शिक्षणाचा विचार ठामपणे मांडला. स्त्रीला माणुसकीशून्य पद्धतीने साखळदंडात ठेवणाऱ्या धर्माचा उल्लेख त्यांनी, 'हे भीषण, बीभत्स, अमंगळ हिंदुधर्मा' अशा संबोधनाने केला आहे. सारांश, एकोणिसाव्या शतकात स्त्रीकडे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ती उदयाला येऊ लागली. स्त्री स्वातंत्र्याच्या विचाराला या शतकात चालना आणि चेतना मिळू लागली. महात्मा फुले यांनी तर 'स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे' असे मत मांडले आहे. स्त्रीच्या ठायी संगोपन करण्यासाठी जे वात्सल्य निसर्गाने ठेवले आहे, त्यामुळे स्त्री ही पुरुषापेक्षा काकणभर सरस आहे असे त्यांचे प्रतिपादन आहे.

एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणेची चळवळ मूळ धरू लागली. सर्वच समाजसुधारकांनी स्त्री-सुधारणा आणि शिक्षण यांना या चळवळीत अग्रस्थान दिलेले दिसते. बालविवाह, जरठबाला विवाह, केशवपन, सतीची भयानक रूढी

आणि शिक्षणाचा अभाव या साऱ्या गोष्टींच्या विरुद्ध चळवळ उभी करण्यात आली. याचे श्रेय पुष्कळ अंशी पाश्चात्त्य विद्येच्या प्रसाराला दिले पाहिजे. भौतिक शास्त्रांच्या अभ्यासातून आणि उदारमतवादी पाश्चात्त्य शिक्षणातून लोकहितवादी, फुले, आगरकर, न्यायमूर्ती रानडे प्रभृती समाजसुधारक बाहेर पडले आणि पाश्चात्त्य विद्या व दृष्टीकोन यांचे त्यांनी स्पष्ट समर्थन केले. सनातन जीवनमूल्ये आणि आधुनिक विचारधारा यांचा संघर्ष सुरू झाला. बुद्धिवाद, व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा प्रभाव भारतीय जीवनावर वाढत गेला. महाराष्ट्रात त्याचे विशेष प्रत्यंतर येऊ लागले. स्त्रियांच्या शिक्षणावर सुधारकांनी सर्वाधिक भर दिला याचे कारण स्त्री हा समाजाचा अत्यंत महत्त्वाचा घटक जर अज्ञानात राहिला, तर साऱ्या सामाजिक जीवनावर त्याची अनिष्ट छाया पडेल हे त्यांनी ओळखले होते.

व्यक्ती हे स्वयंसिद्ध मूल्य आहे; मग ती स्त्री असो की पुरुष असो ! तिला मूलभूत अधिकार आहेत ही जाणीव समाजात रुजणे आवश्यक आहे, असे सुधारकांना वाटत होते. सतीबंदीचा कायदा या चळवळीतूनच निर्माण झाला. १८५५ साली ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी हिंदुविधवांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारे एक पुस्तक लिहिले. महाराष्ट्रात पुनर्विवाहासाठी चळवळ करणाऱ्या व्यक्तींमध्ये महात्मा फुले, डॉ. भांडारकर, सर नारायण चंदावरकर, आगरकर, न्या. रानडे, महर्षी कर्वे प्रभृती प्राधान्याने होते. महाराष्ट्रात मुलींसाठी पहिली शाळा १८२४ साली अमेरिकन मिशन या संस्थेने काढली. १९२९-३० या वर्षात मुलींसाठी आणखी सहा शाळा स्कॉटिश मिशनरी सोसायटीने सुरू केल्या. पण या शाळांतून आपल्या मुलींना पाठवणे नागरिकांना फारसे पसंत नव्हते. परकीय संस्कृतीच्या व परधर्माच्या लोकांनी काढलेल्या या शाळांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. स्त्री-शिक्षणाची ही चळवळ अत्यंत मंद होती. महात्मा जोतिबा फुले यांनी पुण्यात १८५१ साली मुलींची जी शाळा सर्व प्रकारच्या विरोधाला तोंड देऊन स्थापन केली; त्यामुळे स्त्रीशिक्षणाच्या आंदोलनाला भरती येऊ लागली. महात्मा फुल्यांनी सामाजिक सुधारणेच्या चक्राला आपल्या पुरोगामी विचारांनी जी गती दिली, तिच्यातून परिवर्तनाचा इतिहास घडत गेला, हे निर्विवाद आहे.

फुल्यांनी स्थापन केलेल्या या शाळेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ मागासलेल्या वर्गातील मुलींसाठी नव्हती. ब्राह्मण आणि बहुजन समाजातीलही

काही मुलींनी या शाळेत प्रवेश घेतला होता. समाजाचा प्रचंड प्रक्षोभ फुल्यांना सहन करावा. सनातनी कर्मठांनी या शाळेला आणि स्त्रीशिक्षणाला संस्कृतीच्या नावाखाली कडवा विरोध केला. स्त्रीने शिक्षण घेणे, तिने पुरुषांप्रमाणे लिहिणे आणि वाचणे हे त्यांच्या दृष्टीने संस्कृतिविध्वंसक कृत्य होते. फुल्यांच्या वडिलांनीही शक्य तितका विरोध केला. पण जोतिबा आणि सावित्रीबाई दोघांनीही घरादाराची बंधने तोडून टाकली आणि स्त्रीशिक्षणाला वाहून घेतले.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेचा इतिहास हा फुले दांपत्यांच्या कर्तृत्वाचा आणि व्यापक विचारांचा इतिहास आहे, यात शंका नाही ! स्त्री ब्राह्मण असो की कोणत्याही वर्णातील असो, तिने चूल आणि मूल या आपल्या परंपरागत कार्यकक्षेच्या पलीकडे जाऊ नये, हे लोकमत असताना या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहण्याचा विक्रम फुले पतीपत्नींनी केला. सावित्रीबाईंनी शिक्षण घेतले आणि पुढे दीर्घकाळ स्त्रीशिक्षणाचे कार्य त्या करीत राहिल्या. हे करताना त्यांना कोणत्या खडतर वाटेने पावले टाकावी लागली, याचा इतिहास सर्वांना माहीत आहे. क्रांतीची वाट कधीच सरळ नसते. अनेक खाचखळग्यांनी आणि काट्याकुट्यांनी भरलेल्या या वेड्यावाकड्या वळणाच्या वाटेवरून चालणे हे एक दिव्य आहे. पण फुले पती-पत्नी निर्धाराने, शांतपणे वाटचाल करीत राहिले. त्यामुळेच महाराष्ट्रात स्त्री-शिक्षणाची चळवळ सामर्थ्यवान बनली.

खरे तर केवळ स्त्रीच नव्हे तर ब्राह्मण सोडल्यास इतर सर्व जाती-जमातींतल्या पुरुषांतही शिक्षणाचा अभाव होता. अध्ययन, अध्यापन, लेखन आणि वाचन ही एकाच वर्गाची शतकानुशतके मिरासदारी होती. मूठभर शिकले-सवरलेले लोक शेतकऱ्यांचे आणि कष्टकऱ्यांचे शोषण करू शकत होते. आपले शोषण होत आहे याचेही भान बहुजनसमाजाला आणि खालच्या स्तरातील लोकांना आलेले नव्हते. अज्ञान, अंधश्रद्धा आणि पाचवीला पुजलेले दारिद्र्य याचा परिणाम इतकाच झाला की, बहुसंख्य समाज कर्तृत्वहीन व प्रारब्धवादी बनला. आपल्या दुःखाचे मूळ आपल्या प्रारब्धातच आहे आणि हे प्रारब्ध मनुष्य बदलू शकत नाही, या निराशावादी विचारांच्या विळख्यात बहुसंख्य लोक सापडलेले होते. स्त्री तर मानसिकदृष्ट्या बालपणापासूनच खचलेली असायची. आपण उपेक्षित आहोत, स्त्री असल्यामुळे आपण दुर्दैवी आहोत, हा न्यूनगंड सर्वच स्त्रियांच्या मनात खोलवर गेलेला असायचा. पुरुष हा कर्ता आहे, आपण

त्याची सेवाचाकरी करीत राहणे हाच आपला धर्म आहे, ही भावना तिच्या मनात आणि जीवनात खिळलेली असायची. अशा परिस्थितीत तिला शिक्षण देऊन आत्मसन्मानाची जाणीव तिच्या ठायी निर्माण झाल्याशिवाय ती आपल्या गुलामगिरीच्या साखळ्या तोडायला सिद्ध होणार नाही; हा बहुमोलाचा विचार समाजसुधारकांनी एकोणिसाव्या शतकात उचलून धरला. पाश्चात्त्य विद्येचे हे ऋण मान्य केलेच पाहिजे. या विद्येचा प्रभाव पडला नसता, तर भारतातल्या आणि महाराष्ट्रातल्या सामाजिक जरठ वातावरणातून समाजाला मुक्त होता आले नसते.

महात्मा फुल्यांनी स्त्री-शूद्रांच्या दुःख दैन्याचे कारण सांगताना म्हटले आहे, 'विद्येविना मती गेली. मतिविना नीती गेली' आणि याच क्रमाने पुढे ते म्हणतात, 'इतके अनर्थ एका अविद्येने केले.' सर्वसामान्य माणसाला, घराच्या चार भिंतीत कोंडल्या गेलेल्या स्त्रीला, ज्ञान आणि स्वातंत्र्य यांचा प्रकाश जोतिबांनी दाखवला. लोकहितवादी, आगरकर प्रभृतींनी क्रांतिप्रद विचार रसरशीतपणे सांगितले. विचारवंत म्हणून त्यांची कामगिरी लक्षणीय आहे. पण प्रत्यक्ष कृतीच्या पातळीवर उतरून बहुजन समाजात शैक्षणिक चळवळ पेटवण्यासाठी आपल्या आत्मिक शक्तीची ठिणगी प्रथम फुल्यांनी टाकली आणि आपल्या व्यक्तित्वाची ज्योत त्या ठिणगीच्या साहाय्याने पेटवण्याचे महनीय कार्य सावित्रीबाईंनी केले. सावित्रीबाई फुले आपल्या संस्कृतीला भूषणभूत आहेत असे म्हणण्यापेक्षा त्या संस्कृतीचा एक आधारस्तंभ आहेत असे म्हणणेच सयुक्तिक ठरेल. आज विसाव्या शतकाच्या अखेरीला स्त्रीच्या प्रज्ञेने आणि प्रतिभेने अनेक कार्यक्षेत्रे उजळून टाकलेली दिसतात. राष्ट्राच्या प्रशासनाची सूत्रेही आजची स्त्री हाती घेऊन राष्ट्र चालवू शकते हे आता ऐतिहासिक सत्य बनले आहे. पण या कर्तृत्वाचा जन्म एका सावित्रीच्या व्यक्तित्वातून झाला हे मान्य करावे लागेल.

सावित्रीबाई आपल्या एका कवितेत म्हणतात -

'शुद्रांना सांगण्याजोगा। आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हाटते पहा॥
इंग्रजी शिकुनी जातिभेद मोडा
भटजी भारूडा। फेकुनिया॥'

या काव्यातल्या विचारांवरून सावित्रीबाई फुले या एकोणिसाव्या शतकातल्या क्रांतिकारकांच्या मालिकेत सहज सामावल्या जातात हे लक्षात येईल.

त्यांचे विचार आणि कृती सामाजिक परिवर्तनाला कशा कारणीभूत झाल्या, याची जाणीव होते.

फुले दांपत्याने काढलेल्या शाळेबद्दल १८५२ च्या अहवालात सावित्रीबाईंच्या उदात्त शैक्षणिक कार्याबद्दल गौरवाचे उद्‌गार काढले आहेत. सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांच्यामुळे स्त्री-शिक्षणाला उत्तेजन मिळू लागले आणि ही चळवळ समर्थ बनू लागली असे शासकीय अहवालात नमूद केले आहे. श्री. ना. वि. जोशी यांनी 'पुणे शहराचे वर्णन' या पुस्तकात म्हटले आहे. तो उतारा पुढे यासाठी देत आहे की, एकोणिसाव्या शतकातील या कार्यावर आणखी प्रकाश पडेल -

'या साली मुलींची शाळा एतद्देशीय गृहस्थांनी प्रथमच स्थापन केली... या स्त्री शिक्षणाचे पुढारी रा. जोति गोविंद फुले हे होते. त्यांनी या कामाचे प्रथम दुःख व श्रम सोसले. काही दिवस पंतोजी मिळत नव्हते. तेव्हा त्यांनी निर्लेप बुद्धीने स्वतः पंतोजीचे काम केले. त्या शाळेत मदतनिसाची गरज भासली तेव्हा ती मिळेना, म्हणून त्यांनी आपल्या बायकोस मदतीस आणली. त्यास दोनप्रहरी भाकरी खाण्यास देखील फुरसत नसे. एक-एक दिवस संध्याकाळपर्यंत उपाशी राहावे लागे. तरी त्यांनी या परोपकारी कृत्याचा पिच्छा सोडलाच नाही. पुढे काही दिवसांनी लोकांच्या मनातील शंका निघून मुली शाळेत बिनदिक्कत येऊ लागल्या व शाळा बरीच चालली. राजेश्री जोतिबाचा सरकारने सन्मान करून एक शालजोडी बक्षिस दिली...'

शिक्षणाचा प्रवाह समाजाच्या खालच्या स्तरातूनही अनिरुद्धपणे वाहत राहावा हे स्वप्न फुल्यांनी का पाहिले असावे ? शिक्षणातून विचार करण्याची आणि विचारातून अन्यायाशी संघर्ष करण्याची शक्ती निर्माण होते म्हणून फुल्यांना ही विलक्षण अनुभूती आलेली होती. ज्ञानाची स्वाभाविक प्रवृत्ती, पारतंत्र्याचे पाश तोडून स्वतंत्र होण्याची असते. ज्ञानातूनच स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांचा उदय होतो.

एकोणिसाव्या शतकात बहुजन समाजातल्या स्त्री-पुरुषांत ही जाणीव उत्पन्न व्हावी यासाठी त्यांनी जन्मभर परिश्रम केले. सावित्रीबाई देखील आपल्या स्वतंत्र व प्रभावी व्यक्तिमत्त्वाने प्रबोधनाच्या चळवळीत उभ्या राहिल्या. महात्मा फुल्यांची पत्नी म्हणूनच केवळ नव्हे तर, आपल्या स्वयंकर्तृत्वाने त्यांच्याभोवती प्रकाशवलय उत्पन्न झाले आहे. मात्र विद्येचा उपयोग स्त्रीने अलंकरणासाठी करू नये. आत्म्याला

जागृतीची साद घालणारी विद्या नवनिर्मितीसाठी असते. सामाजिक प्रबोधनासाठी स्त्री-शक्तीने कार्य करावे ही देखील सावित्रीबाईंची इच्छा होती. नवसंस्कृतीच्या रचनेत नव्या जगाच्या मांडणीत, स्त्रीचा वाटा महत्त्वाचा असावा. जुन्या काळात ती केवळ शोभेची बाहुली किंवा पायाची दासी होती. पण नव्या काळात सुविद्य स्त्रीच्या हातात नवयुगाचा म्हणजेच समतेचा, स्वातंत्र्याचा आणि प्रतिष्ठेचा ध्वज असावा, हे स्वप्न सावित्रीबाईंनी पाहिले होते. आजची जागृत स्त्री हे स्वप्न साकार करू शकली, तर सावित्रीबाईंची तपश्चर्या फळाला आली असे म्हणता येईल.

ग्रामीण भागातील स्त्रीच्या समस्या आजही जटिल आहेत. खेड्यापाड्यात शाळा आल्या, वीज आली, यंत्र, तंत्र आले. पण दोन-चार इयत्ता झाल्या की मुलींच्या शिक्षणाला खंड पडतो. कारण अजूनही मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणात फरक केला जातो. सनातनी वातावरण निवळले असले तरी मुलीला अधिक शिकवून काय करायचे, फार तर तिला लिहिता वाचता येते एवढे प्रस्थापित झाले म्हणजे तिच्या लग्नाचा मार्ग सुकर होईल ही विचारसरणी खेड्यापाड्यांत बऱ्याच ठिकाणी आढळते. बाह्य सुधारणा झाल्या पण शिक्षणातून जे मानसिक परिवर्तन अपेक्षित आहे; ते होण्याच्या दृष्टीने आजच्या समाजसुधारकांना कार्य करावे लागेल. प्रबोधनाची लाट केवळ नागरी भागात उचंबळून चालणार नाही. ती ग्रामीण भागात आणि आदिवासी भागात पोहोचविण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे. फुल्यांची चळवळ ग्रामीण जनतेच्या जीवनाशी अधिकांशाने निगडित होती हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची व कामकऱ्यांची, शूद्रातिशूद्रांची मुले व मुली सर्वार्थांनी ज्ञानविज्ञानात पुढे येत आहेत हे चित्र आज दिसावे.

■■■

# डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा अन्वयार्थ

विषमतेवर आधारलेली जातिव्यवस्था हे हिंदू समाजरचनेचे लांछनास्पद वैशिष्ट्य आहे यात शंका नाही. अनेक क्रांतिकारकांनी, समाजसुधारकांनी या जातिसंस्थेवर प्रहार केले. ही संस्था व्यक्तीच्या आणि समाजाच्या प्रगतीला कसा प्रतिबंध करते हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. पण अशास्त्रीय असूनही हिंदू समाजाने ही व्यवस्था टिकवून धरली, तिला खतपाणी घातले, तिची स्तुतिस्तोत्रे गाऊन ती सुप्रतिष्ठित बनवली. शतकानुशतके ती अधिकाधिक बलिष्ठ व चिवट होत आहे. जातीच्या हरळीचे मूळ उपटून टाकण्याचे सारे प्रयत्न अयशस्वी ठरावेत ही भारतीय समाजाची अत्यंत दारुण शोकांतिका आहे. रामायण-महाभारतासारख्या राष्ट्रीय महाकाव्यांत, इतिहास ग्रंथांत हिची काळी सावली पडलेली दिसते. माणसाच्या माणूसपणापेक्षा त्याच्या कुळाला आणि वंशाला महत्त्व देण्याच्या अट्टहासामुळे 'माणूस' मातीमोलाचा ठरला आणि त्याच्या जन्माला, जातीला मात्र महत्त्व मिळाले. मनुष्याच्या श्रेष्ठ कनिष्ठत्वाचे हे मोजमाप इतके हास्यास्पद व मूर्खपणाचे आहे की खरे तर त्याची चिकित्सा करण्याचेही कारण नाही. पण कित्येक प्रज्ञावंत समजल्या जाणाऱ्या लोकांनीही 'माणूस' नाकारला आणि 'जात', 'वंश' यांचा स्वीकार केला.

एकलव्य आणि कर्ण यांच्या कर्तृत्वाविषयी कसलाच वाद नाही; पण त्यांच्या व्यक्तित्वाला, कर्तृत्वाला तत्कालीन समाजाने कधीच मान्यता दिली नाही. जन्माच्या आधारावर उच्च ठरणाऱ्या जातीचे प्रमाणपत्र या वीरांजवळ नव्हते. ते महान शूर, ध्येयवादी, पुरुषार्थी, महत्त्वाकांक्षी होते. पण ते ब्राह्मण किंवा क्षत्रिय नव्हते. खालच्या जातीत जन्म घेण्याचा अपराध त्यांच्या हातून घडला होता. अशा अपराध्यांचे खच्चीकरण करण्याची शास्त्राज्ञा होती. हे शास्त्र प्रत्यक्ष परमेश्वराने निर्माण केल्याचा दावा केला जात होता. आजही जातिव्यवस्थेचे आणि विषमतेचे समर्थक 'ईश्वरी इच्छेचा' व त्याने उत्पन्न केलेल्या 'पवित्र परंपरेचा' आधार घेतात. व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्यावर आणि प्रतिष्ठेवर आघात करणारी ही दुष्ट व्यवस्था खरे तर उखडून टाकायला पाहिजे पण तिला देव्हाऱ्यात बसवून तिची पूजाअर्चा

करीत बसलेल्या या कर्मठ परंपरावाद्यांना शहाणपणाचे शब्द कधीच पटले नाहीत. मूठभर पुरोहितांनी स्वतःची तुंबडी भरण्यासाठी आणि सदैव प्रतिष्ठेच्या आसनावर बसण्यासाठी अज्ञानी लोकांना धर्माच्या नावावर फसवले हा विदारक इतिहास आहे. अनेक शतके-सहस्रके शोषणाचा हा अन्यायी खेळ येथे चालू राहिला. अन्यायाला आव्हान देणाऱ्या काही प्रभावी शक्ती या देशात उदयाला आल्या. त्याचा काही अंशी परिणामही झाला. पण प्रतिगामी शक्ती अधिक प्रबळ होत गेल्या आणि माणसामाणसांत जातींच्या, संप्रदायांच्या, जन्मसिद्ध उच्च-नीचत्वाच्या भरभक्कम तटबंदी उभ्या राहिल्या. हिंदू समाजाचेच नव्हे तर राष्ट्राचेही यातून सामर्थ्य क्षीण होत गेले. समाजाचे शतखंड झाले. माणूस माणसापासून दूर गेला.

शतशतकांचा लाजिरवाणा इतिहास असलेल्या या जातिव्यवस्थेवर अलीकडच्या काळात सर्वच समाजसुधारकांनी घणाचे घाव घातले. महात्मा फुले यांनी अस्पृश्यतेवर प्रखर हल्ला चढवला. डॉ. आंबेडकरांनी तर आपल्या व्यक्तित्वाची सारी सामर्थ्ये पणाला लावून जातीय-वर्णीय विषमतेला गारद करण्याचा चंग बांधला. आंबेडकर हे समतेचे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे विलक्षण तेजस्वी प्रतीक आहे यात संदेह नाही. भारताच्या सामाजिक इतिहासातली आंबेडकर ही अत्यंत वादळी शक्ती मानावी लागेल. या वादळाने सहस्र वर्षे कुंभकर्णाची झोप घेत पडलेल्या शापित अवस्थेतल्या अस्पृश्यांना नवी जागृती दिली. अंधारात खुरडत राहिलेला हा समाज प्रकाशकिरण पाहू शकला; केवळ डॉ. आंबेडकरांच्या भीम प्रयत्नांमुळे, निसर्गदत्त मानवी हक्कांसाठी आणि माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगण्यासाठी त्यांनी रणशिंग फुंकले. अस्पृश्य समजला जाणारा समाज हिंदू समाजाचाच एक प्रतिष्ठित घटक आहे म्हणून त्याला धार्मिक व सामाजिक बाबतीत समान हक्क मिळालेच पाहिजेत ही न्याय्य भूमिका घेऊन आंबेडकरांचा दीर्घ, दृढ व तीव्र संघर्ष सुरू झाला. या संघर्षामुळे मानवतेची मान उंचावली हे निर्विवाद.

डॉ. आंबेडकरांचे समग्र आयुष्य म्हणजे न्याय व समता या महनीय मूल्यांसाठी केलेल्या संघर्षाची उदात्त कहाणी आहे. जातिव्यवस्थेच्या, विषमतेच्या बुलंद तटबंदीवर आंबेडकरांनी बेगुमानपणे एकामागून एक धडका घेतल्या. मस्तक रक्तबंबाळ झाले; पण त्यांची हिम्मत हरली नाही. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन असे अनेक वीरसंग्राम ते लढले. व्याख्याने, लेखन यांतून सतत परिवर्तनवादी विचार मांडले.

पण या दीर्घ लढ्याचे फलित काय ? सात कोटी अस्पृश्यांचा कलंक धुतला गेला काय ? गावकुसाबाहेरच्या या बहिष्कृत समाजाला हिंदू समाजात प्रवेश मिळाला का ? हा समाज पिढ्यान्‌पिढ्या गुलामच होता, त्याच्या कपाळीची गुलामगिरी अभंग राहिली. महार-मांग माणूस सुशिक्षित आणि संपन्न झाला तरी त्याला सवर्णांनी स्वीकारले नाही. डॉ. आंबेडकरांसारख्या प्रकांड पंडिताचाही 'अस्पृश्य' म्हणून छळ झाला. उपेक्षा झाली. हिंदू समाजाच्या परंपरागत मनोवृत्तीत फारसा फरक झाला नाही. केवळ शाब्दिक सहानुभूतीच्या चार-दोन थेंबांनी क्रांती होऊ शकत नाही. अस्पृश्यता हा जर एखाद्या धर्माचा गाभा असेल तर त्या धर्मात सुधारणा कशी होऊ शकेल ?

डॉ. आंबेडकरांचे विचारमंथन अखंड चालू होते. ते अस्वस्थ होते. अस्पृश्यतेच्या आगीत होरपळत असलेल्या दलितांच्या मुक्तीसाठी जे जे करता येणे शक्य होते सारे ते करीतच होते. एक महत्त्वपूर्ण श्रेय मात्र पदरात पडले. दलितांचा आंतरिक अग्नी त्यांनी पेटवला. 'मी पददलित नाही. मी कनिष्ठ नाही. मी अस्पृश्य नाही. मानव्याच्या साऱ्या अधिकारांचा मी स्वामी आहे. आता समतेच्या संग्रामात स्वतःला मी झोकून देईन. कारण समतेशिवाय मला जगता येणार नाही. मला आता वास्तविकतेचं भान आलं आहे. मी शिकेन. संघटित होईन आणि संघर्ष करीन.' दलित जनतेच्या मनात आता प्रतिकाराच्या ज्वाला भडकल्या होत्या. समतेची तहान तीव्रतर होत होती. हिंदुधर्माच्या वळचणीला उभे राहून न्याय पदरात पडेल अशी वाट पाहण्यात अर्थ नव्हता.'

डॉ. आंबेडकरांनी १९५६ साली परंपरावादी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला ही घटना वादळी स्वरूपाची आहे यात शंका नाही. धर्मांतराच्या कृतीमुळे उलटसुलट विचारांचे अनेक भोवरे समाजमनात निर्माण झाले.

एखाद्या लक्षावधी लोकांचा समूह सामुदायिकरित्या जुन्या धर्माची वस्त्रे टाकून नवा धर्म जाहीरपणे स्वीकारतो तेव्हा ती घटना सामाजिक आणि धार्मिक इतिहासावर खोल परिणाम करणारी असते. नागपूरच्या दीक्षाभूमीवर प्रचंड जनसमूहासह बौद्धधर्म स्वीकारल्याची घोषणा ज्याक्षणी क्रांतिकारक आंबेडकरांनी केली तो क्षण आता चिरंजीव झाला आहे. पण या धर्मांतराचा अन्वयार्थ योग्य त्या संदर्भात अद्यापही समजून घेण्याचा विशेष प्रयत्न झाला नाही. परंपरानिष्ठ लोकांनी डॉ. आंबेडकरांवर अनेक हेत्वारोप केले. हितशत्रूंनी अविचारी टीका केली. पण

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे भारतीय संस्कृतीला एक नवे, समर्थ विचारांचे अधिष्ठान मिळाले यात संदेह नाही. स्वतः आंबेडकरांनी एडमंड बर्क यांचे पुढील वचन काही वेळा उद्धृत केले आहे,

'True religion is the foundation of Society, the basis on which all true civil government rests'

खरा धर्म हा समाज आणि शासन यांचा आधार असतो. धर्माच्या आधाराने समाज खऱ्या अर्थाने स्थिर होतो आणि समाजाचे पोषणही करतो. यावर आंबेडकरांचा पूर्ण विश्वास होता. व्यक्तीचे सुख व्यक्तीच्या मूलभूत प्रतिष्ठेवर अवलंबून असते आणि समाजात व्यक्तीच परतंत्र असेल, दुःख आणि अन्याय यांनी पीडित झाली असेल तर समाजाची स्थिरता व प्रगती या दोन्ही गोष्टी अशक्य ठरतात. प्रगती आणि विकास यांच्यासाठी व्यक्तीला व समाजाला धर्माची आवश्यकता असते ही भूमिका आंबेडकरांना पूर्णपणे मान्य होती. पण हिंदू धर्माने प्रमाण मानलेली समाजरचना मात्र व्यक्तीच्या जन्मसिद्ध स्वातंत्र्याला नकार देत होती. माणसाच्या प्रतिष्ठेला महत्त्व न देता जो धर्म मनुष्यावर आपली हुकूमशाही लादतो तो धर्म सामाजिक विकासाला सदैव प्रतिबंधक ठरतो अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच त्यांनी हिंदू धर्माची वस्तुनिष्ठ दृष्टीने छाननी केली आहे. आपल्या अनेक व्याख्यानांतून आणि पुस्तकांतून या विषयीची त्यांनी वेळोवेळी साधार चिकित्सा केली आहे. स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय या मूल्यांकडे परंपरागत हिंदू धर्माने पाठ फिरवली असल्यामुळे व्यक्तिविकास आणि सामाजिक प्रगती या समाजात सर्वस्वी अशक्य आहे हा अनुभव आंबेडकरांनी घेतला. इतिहास, समाजशास्त्र, धर्म, कायदा आणि मानववंशशास्त्र यांच्या सखोल अध्ययनातून आणि आपल्या भोवताली पसरलेल्या जातिबद्ध समूहांच्या निरीक्षणातून त्यांनी काढलेला निष्कर्ष हा होता की, ज्या धर्माने 'माणूस' व त्याचे मूलभूत 'स्वातंत्र्य' उद्धटपणे नाकारले आहे, जन्माच्या अपघाताने जेथे एकाला प्रतिष्ठा मिळते आणि दुसऱ्याची विटंबना होते तेथे धार्मिक क्रांतीशिवाय, सामाजिक परिवर्तनाशिवाय गत्यंतर नाही.

या संदर्भात डॉ. आंबेडकरांचे एक महत्त्वपूर्ण भाषण संस्मरणीय आहे. ते म्हणतात, ''माणूस धर्माकरिता नाही. धर्म माणसाकरिता आहे, माणुसकी प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा. समता प्राप्त करून घ्यावयाची असेल

तर धर्मांतर करा. ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे हा अधर्म मानला जातो तो धर्म नसून रोग आहे. ज्या धर्मात अमंगल पशूचा स्पर्श झाला असताना चालतो, पण माणसाचा स्पर्श चालत नाही तो धर्म नसून वेडगळपणा आहे. जो धर्म एका वर्गाने विद्या शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करू नये असे सांगतो तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे. मी निश्चय करून टाकलेला आहे. मी धर्मांतर करणार हे निश्चित आहे. माझ्या धर्मांतराच्या मुळाशी आध्यात्मिक भावनेशिवाय दुसरी कसलीही भावना नाही.''

डॉ. आंबेडकरांचे हे भाषण अत्यंत स्पष्ट व प्रांजळ आहे. वैयक्तिक आणि सामाजिक स्वातंत्र्यासाठी जी धार्मिक चौकट आपल्याला एखाद्या तप्त शापासारखी छळत व जाळत आहे ती चौकट झुगारून देण्यात अस्पृश्य समाजाची कोणतीही चूक नाही. अनेक पिढ्या अन्याय सहन करण्याच्या लाचार व पराभूत वृत्तीमुळे विषम समाजरचना अधिकच चिवट व बळकट बनत गेली. वस्तुतः कोणतीही सामाजिक रचना ईश्वरप्रणीत नसते. कोणताही धर्मग्रंथ ईश्वरकृत नसतो. माणूसच त्यांचा कर्ता करविता असतो. कोणताही माणूस परमेश्वर नसतो, तो हाडामांसाचाच असतो. ही बुद्धिवादी विचारसरणी अनेक धर्मसंप्रदायांनी स्वीकारलेली नाही. सामाजिक व धार्मिक गुलामगिरीचा हा प्रकार आहे. माणसांवर लादलेली ही सांप्रदायिक वेठबिगार झुगारून दिल्याशिवाय मनुष्य खरा धर्म आणि न्याय यांचा पाठपुरावा करू शकणार नाही ही शुद्ध भूमिका डॉ. आंबेडकरांनी स्वीकारली. धर्मांतराशिवाय त्यांना दुसरा पर्यायच उरलेला नव्हता. वस्तुतः १९३५ च्या सुमारास त्यांनी ही धर्मांतराची घोषणा केली. त्यानंतर एकवीस वर्षांनी प्रत्यक्षात धर्मांतर केले. या अवधीत परंपरानिष्ठ समाजात विचारक्रांती होईल ही त्यांची आशा हळूहळू मावळत गेली. जी मनुस्मृती त्यांनी १९२७ साली जाहीरपणे जाळली त्या मनुस्मृतीतले विषमतावादी विचार मात्र जळता जळत नव्हते.

धर्मांतराच्या घोषणेमुळे हिंदुसमाजातल्या बुद्धिवादी वर्गात विचारमंथन सुरू झाले पण त्याची प्रत्यक्ष फलनिष्पत्ती काहीच होत नव्हती. विचारांच्या दृष्टीने अस्पृश्यता समूळ चुकीची आहे असे मानणारे लोकसुद्धा आपल्या कृतीत मात्र अस्पृश्यता पाळीत होते. दलित समाजाच्या मनाशी समरस होण्याची सवर्ण हिंदू समाजाची मानसिक तयारी होणे शक्य नाही याची विदारक जाणीव आंबेडकरांना झाली. धर्मांतरामुळे सारे प्रश्न सुटतील अशी भ्रांत अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली

नव्हती. पण शेकडो वर्षे अस्पृश्यतेच्या विळख्यात पिचत पडलेला एक प्रचंड संख्येचा मनुष्यसमूह मानसिक गुलामगिरीतून तरी बाहेर येईल आणि आपल्या न्याय्य सामाजिक हक्कांसाठी आत्मविश्वासाने संघर्ष करू लागेल असा जबरदस्त आशावाद त्यांच्या मनात होता. पारंपरिक धर्मात राहून दलितांच्या सर्वांगीण विकासाच्या चळवळीत काही करता येण्याची शक्यता फारशी दिसत नव्हती. कारण जातीय उच्चनीचता, विषमता हा जर परंपरेचा अविभाज्य घटक असेल तर ती परंपरा स्पष्टपणे नाकारणे, तिच्या विरुद्ध बंडाचा आवाज उठवणे आणि समतेचा उद्घोष करणाऱ्या धर्माचा स्वीकार करणे याशिवाय दुसरा मार्ग उरलेला नव्हता. म्हणूनच एक प्रकारच्या निराशेने आणि आवेगाने १९३५ साली येवल्याच्या परिषदेत धर्मांतराची घोषणा करताना आंबेडकर म्हणाले, ''मी हिंदू म्हणून जन्मलो असलो आणि जन्म ही कुणाच्या हातातली गोष्ट नाही. तरी हिंदू म्हणून मी मरणार नाही.''

पण याचा अर्थ हिंदू समाजावर आपल्याला सूड घ्यायचा आहे, या धर्माचा उच्छेद करायचा आहे असा विचार मात्र त्यांच्या मनाला कधीच स्पर्श करू शकला नाही. त्यांनी स्पष्ट केले की, ''हिंदूंनी अस्पृशांवर जुलूम केले व कविठा (गुजराथ) या गावी तर त्यांनी दुष्टपणाचा कळस केला. मी धर्मांतर करून या गोष्टीबद्दल हिंदूंच्यावर सूड उगवीत आहे असे कोणी समजत असेल तर ते चूक आहे.''

हिंदू समाजाच्या दीर्घकालीन सांस्कृतिक परंपरेचा संस्कार डॉ. आंबेडकरांच्या मनावरही झालेला होता. त्यांचा विरोध जातिभेदाला, वर्णव्यवस्थेला, सामाजिक अन्यायाला आणि उच्चनीचत्वाच्या भ्रांत कल्पनेला होता. हिंदू संस्कृतीबद्दल न्यूयॉर्कमधील एका परिसंवादात इ.स. १९१६ मध्ये त्यांनी 'भारतातील जाती' असा विषय घेऊन निबंध वाचला होता. त्यात भारतातील हिंदू जातिधर्माची घडण संमिश्र स्वरूपाची असूनही त्यात सांस्कृतिक एकतेचाही बळकट धागा आहे असे म्हटले होते. हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाचा, साहित्याचा, रामायण भारतादी महाग्रंथांचा त्यांनी सूक्ष्म दृष्टीने अभ्यास केलेला होता. या धर्माची सामर्थ्यस्थाने जशी त्यांनी ओळखली होती त्याप्रमाणेच त्याच्या अंगभूत मर्यादांचीही त्यांना सुस्पष्ट कल्पना होती. म्हणूनच आंबेडकरांनी केलेले धर्मांतर हे त्यांच्या डोळस व चिकित्सक वृत्तीबरोबरच त्यांच्या धर्मप्रेमाचेही द्योतक आहे. बौद्ध धर्माचा स्वीकार ही घटना तर त्यांच्या भारतीय संस्कृतीवरील अतूट प्रेमाची साक्ष देते. आंबेडकरांचे धर्मांतर क्रांतिकारक असूनही ते एक मंगल असे स्वप्नात्मक मन्वंतर आहे. भारताची

संस्कृती आणि भारताचा धर्मविचार त्यामुळे अधिकच समर्थ बनला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धधर्म आत्मसात केला म्हणजे नेमके कोणते तत्त्वज्ञान स्वीकारले, कोणत्या मूल्यांचा अंगीकार केला याची यथार्थ जाणीव दलित समाजानेही करून घेतली पाहिजे. बाबासाहेबांनी सांगितलेल्या धर्माची नेमकी महती कशात सामावली आहे याचा विचार दलित जनतेने केला पाहिजे. हिंदूधर्म आणि बौद्धधर्म हे तत्त्वदृष्ट्या किती जवळ आणि किती दूरचे आहेत याचे आकलन झाल्याबरोबर गैरसमजुतीची व अज्ञानी अहंकारांची पुटे गळून पडतात. खरे तर आजच्या विज्ञाननिष्ठ जगात सारेच सांप्रदायिक स्वरूपाचे धर्म क्षीण झाले आहेत. माणसाला माणूस बनविण्याची धर्माची चैतन्यशक्ती लुप्त झाली आहे. स्वतः डॉ. आंबेडकरांनीही भारताची राज्यघटना धर्मनिरपेक्ष स्वरूपाची केली पण धर्म या संकल्पनेवर त्यांची नितांत श्रद्धा होती. ते म्हणतात, ''धर्माची मानवी जीवनातून फारकत करता येत नाही. धर्म हे मानवी जीवनाचे सर्वस्व आहे.'' येथे सामाजिक समता, माणसाचे निखळ माणूसपण व माणसाचे निसर्गसिद्ध स्वातंत्र्य हेच त्यांना अभिप्रेत आहे. या तत्त्वांचा साक्षात्कार गौतमबुद्धाच्या जीवनदृष्टीत आणि धर्मात त्यांना झाला. म्हणूनच त्यांनी तो धर्म स्वीकारला.

आपल्या एक प्रसिद्ध भाषणात ते म्हणतात, ''मी देखील बुद्धाच्या शब्दांचाच आश्रय घेऊन तुम्हाला असा निरोप देतो की, तुम्हीच आपले आधार व्हा. सत्याचा आधार घ्या. सत्यास शरण जा. दुसऱ्या कशासही शरण जाऊ नका. हा भगवान बुद्धाचा उपदेश तुम्ही ध्यानात ठेवाल तर तुम्ही दिव्याप्रमाणे स्वयंप्रकाशी व्हाल.''

■■■

# परमेश्वर तर्काच्या चौकटीत राहू शकत नाही

ईश्वर नावाची एक अगम्य अशी निर्मितीशील शक्ती आहे असं मला पूर्वी वाटायचं. सर्वच धर्मांनी विश्वाची निर्मिती ईश्वरानेच केली आणि त्याच्याच प्रेरणेनं सृष्टीचा व्यापार चालत असतो असं मानलेलं आहे. भगवान महावीर आणि भगवान बुद्ध यांनी मात्र ईश्वराचं अस्तित्व नाकारलेलं आहे.

मी जसजसा विचार करू लागतो तसतसं ईश्वराचं अस्तित्व मला शंकास्पद वाटू लागलं. याचं कारण ईश्वराची निर्मिती कोणी केली ? हा प्रश्न तर्काऐवजी श्रद्धेनं सोडवावा लागतो. ईश्वर स्वयंभू आहे. त्याची निर्मिती करणारी शक्ती अस्तित्वात नाही. तो स्वयंनिर्माता आहे. पण हे उत्तर मला कधीच समाधानकारक वाटत नाही. रूढ अर्थानं मी नास्तिक आहे असं मानायला हरकत नाही. पण देवाचं अस्तित्व नाकारणं म्हणजे देवत्वच नाकारणं असं मात्र मला वाटत नाही.

बुद्ध, महावीर आणि ख्रिस्त यांच्या ठायी अलौकिक दैवी गुणसंपत्ती होती. त्यांनी अवघ्या मानवजातीला आदर्श जीवनाचा मार्ग दाखवला. संपूर्ण विश्व हा त्यांच्या प्रेमाचा, आत्मीयतेचा विषय होता. जगातली दुःखं नाहीशी करावीत आणि साऱ्या विश्वात सुखाचा व ज्ञानाचा सुगंध पसरावा ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. या एकाच विचाराला आपलं जीवन त्यांनी समर्पित केलं होतं. सर्व प्रकारच्या विरोधाला त्यांनी तोंड दिलं. आपल्या अंतःप्रवृत्तीला पटलेला मार्ग त्यांनी कधीही सोडला नाही. व्यक्तिगत मोक्षाची कल्पना त्यांना मान्य नव्हती. विश्वकल्याणातच ते स्वतःची मुक्ती पाहू शकत होते. ज्याला आपण देवत्व म्हणतो ते यापेक्षा वेगळं काय असतं ? मी त्यांना ईश्वराचे अवतार मानीत नाही; पण ईश्वरत्वाची वैशिष्ट्ये मात्र त्यांच्यात परिपूर्ण होती.

म्हणूनच त्यांच्या पावन व्यक्तिमत्त्वाला मी वंदन करतो आणि प्रार्थना करताना म्हणतो, 'हे महात्म्यांनो, तुमच्या चिंतनातून मला आणि साऱ्या जगाला शांतीचा व प्रेमाचा अनुभव मिळावा. मी अतिसामान्य जीव आहे. पण तुमच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत गेलो तर माझ्यावर चढलेली क्षुद्रत्वाची पुटं गळून पडतील, माझ्यातही तुमची अपूर्व करुणा, प्रेम, अहिंसा आणि शांती यांच्या

शीतल धारा प्रविष्ट होतील. माणसाला आणि साऱ्या विश्वाला तुम्हीच कल्याणकारक मार्गानं नेऊ शकता. तुमचे गुण मिळावेत म्हणून ही प्रार्थना. इतर भौतिक सुखं तुम्ही देऊ शकत नाही पण प्रेम आणि सहिष्णुता यांचा आमच्या मनात संचार झाला की भौतिक सुखांचीही आवश्यकता वाटेनाशी होते. या मानसिक अवस्थेपर्यंत येण्यासाठी तुमची प्रेरणा पाहिजे.'

जगातले सारेच महापुरुष वंदनीय असतात. देवत्वाची लक्षणं त्यांच्यात जाणवतात. पण म्हणून ईश्वरानं त्यांना जाणीवपूर्वक पाठवलेलं आहे ही श्रद्धावादी भूमिका मला घेणं शक्य होत नाही. माणूस आपल्या तपस्येच्या, ज्ञानाच्या आणि प्रेमाच्या बळावर महान होऊ शकतो. परमेश्वर नावाची शक्ती त्याला घडवते किंवा त्याचा अधःपात करते हे मानणं तर्कसंगत नाही. परमेश्वर हाच मुळी तर्काच्या चौकटीत राहू शकत नाही. तो केवळ श्रद्धेचा विषय आहे. सहस्रावधी वर्षांपासून सृष्टिकर्ता परमेश्वर माणसानं गृहीत धरला आहे. त्याचे वेगवेगळे आकार आणि प्रकार कल्पिलेले आहेत. तोच कर्ता आणि करविता हा विचार पिढ्यान्‌पिढ्या माणसाच्या रक्तात रुजलेला आहे. त्यामुळे त्याच्या अस्तित्वाविषयी कोणी शंका उपस्थित केली तरी तो कित्येक धार्मिकांच्या दृष्टीनं अपराध ठरतो. त्याला देवद्रोही मानण्यात येतं. पण ईश्वर मानणाऱ्या धर्मसंप्रदायातही ईश्वर नाकारणारी एक विचारधारा प्राचीन काळापासून वाहत आहे. हिंदू धर्म ईश्वरवादी आहे. पण सांख्यमताप्रमाणं ईश्वर हा पदार्थ अस्तित्वात नाही. कपिल, कणाद व चार्वाक या विचारवंतांनी देव संपूर्णतः नाकारलेला आहे. जैन आणि बौद्ध यांना तर नास्तिक दर्शनं असं संबोधण्यात येतं. विश्वाचं नियमन करणारी, उत्पत्ती आणि विलय घडवून आणणारी शक्ती म्हणजेच ईश्वर असं मानण्यात येतं. पण यावर खोलवर जाऊन विचार करू लागलो तर देव मानणं आणि तोच विश्वनिर्माता समजणं चुकीचं वाटू लागतं.

एकदा गौतम बुद्धाला त्याच्या शिष्यानं प्रश्न विचारला, ''आपण आम्हांला ईश्वर आहे की नाही, विश्व हे सान्त की अनन्त वगैरे गोष्टींबद्दल काहीच सांगितलं नाही हे कसं ?''

बुद्धांनी उत्तर देताना म्हटलं, ''या झाडाखाली मी बसलो आहे. हात वर केल्यावर एका फांदीची काही पानं माझ्या मुठीत येतात. याशिवाय असंख्य पानं माझ्या हातात येत नाहीत. जेवढी पानं हाती आली तेवढ्याबद्दलच मी बोलतो.''

हे अत्यंत मार्मिक उत्तर आहे. ईश्वर, आत्मा, पूर्वजन्म, पुनर्जन्म, स्वर्ग

आणि नरक खरं तर स्वैर कल्पनेचे म्हणजेच तर्काच्या पलीकडचे विषय आहेत. यावर आजपर्यंत कोणी आत्मविश्वासपूर्वक अंतिम शब्द उच्चारू शकला नाही. त्यामुळंच ईश्वरकल्पनेवर कल्पक प्रतिभावंतांनी कल्पनेचे अनेक खेळ रचलेले दिसतात. धर्मनिष्ठ राहण्यासाठी व सुंदर आणि निकोप जीवन जगण्यासाठी ईश्वर मानण्याची जरुरी आहे असं मला वाटत नाही. तरीही बहुसंख्य लोक देवकल्पनेवर विश्वास ठेवतात याचं कारण माणसाच्या भयग्रस्त मनाला ही कल्पना आधार देते, सुरक्षिततेची जाणीव देते.

परमेश्वर दयाघन आहे, तो सर्व जीवांना आधार आहे. जीवमात्राचं तोच संरक्षण करतो. दुःखनिवारण करतो अशी वचनं बहुतेक धर्मग्रंथांत आढळतात. दयाळू परमेश्वर सृष्टीत विषमता, हिंसा आणि रक्तपात, अन्याय व अत्याचार या गोष्टी वैफल्यानं आढळतात. दुबळे भरडले जातात. बलदंड सुखाने जगतात. धर्मनिष्ठ लोकांना वनवास घडतो. दुर्योधनी प्रवृत्तीचे लोक मात्र आपल्या महालात ख्याली-खुशालीत नांदतात. जात, संप्रदाय आणि धर्म, भाषा व भिन्न प्रदेश आणि सत्ता या कारणांवरून प्रत्येक देशात निरपराध मानवी रक्त सांडत आहे. इतिहासाचं प्रत्येक पान रक्तानं रंगलेलं दिसतं. प्रत्येक पानातून माणसाचं आक्रंदन ऐकू येतं. गॅसचेंबरमध्ये जळत असलेल्या बालकांचे चित्कार इतिहासानं जपून ठेवले आहेत. कोणी अत्याचारी प्रवृत्तीचा अधम दहशतवादातून हजारो निरपराध माणसांना त्यांच्या घरादारांसकट जगातून उठवतो. यालाही धर्माचा आणि देवाचा पाठिंबा आहे असं सांगितलं जातं तेव्हा परमेश्वराच्या न्यायाबद्दल जबरदस्त शंका निर्माण होते. माणूसच देवधर्माच्या नावाखाली आपली रक्ताची तहान वेगवेगळ्या निमित्तांनी भागवीत आहे; यात त्या देवाचा संबंध काय ? ईश्वर हे जर करुणेचं आणि सौंदर्याचं व प्रेमाचं रूप असेल तर त्यानं निर्माण केलेलं जग इतकं कुरूप, इतकं बीभत्स का ? या प्रश्नाचं उत्तर कोणताही विचारवंत देऊ शकेल असं मला वाटत नाही. अन्याय आणि अत्याचार रोखण्याची शक्ती जर त्या देवात नसेल तर त्याचा जयघोष कशासाठी करायचा ? निष्पाप बालकांनादेखील कॅन्सरसारख्या असाध्य रोगानं तडफडायला लावणाऱ्या परमेश्वराच्या दयाळूपणाबद्दल खरं तर आपला भ्रमनिरास झाला पाहिजे. जगात प्रतिक्षणी होणाऱ्या अन्यायाला आणि मूल्यांच्या विध्वंसाला अज्ञानी माणूसच जबाबदार आहे. हा आसुरी महत्त्वाकांक्षेनं पछाडलेला माणूस परमेश्वरापेक्षा अधिक बलवान आहे असंच म्हणावं लागेल.

माणूस हेच देवाचे रूप आहे आणि माणूस हाच सैतानाचा आविष्कार आहे. कधीकधी माणसाच्या अंतःकरणातला दैवी प्रकाश दिसतो. रोगग्रस्त झालेल्या दुःखी माणसाच्या डोळ्यांतले अश्रू आत्मीयतेनं पुसणाऱ्या एखाद्या डॉक्टरांचा हात हा हाडा-मांसाचा वाटत नाही. त्याला नंदनवनातल्या फुलाचा सुगंध येतो. असे अमृताचा स्पर्श असलेले हात कधीकधी आपल्याला आधार देतात. तो हात परमेश्वरी हात आहे असं अलंकारिक अर्थानं म्हणता येईल. 'हे विश्वचि माझे घर' ही वत्सल प्रवृत्ती ज्यांच्या हृदयात नांदते. त्यांचं मन हेच देवाचं मंदिर असतं. देव नावाची संकल्पना त्यांच्या जीवनात समूर्त होते. माणूस या उंचीपर्यंत जाऊ शकतो.

एकदा मी एका असाध्य रोगानं आजारी झालो. त्यावेळी माझा एक मित्र कुठल्याशा देवाला नवस बोलला. दररोज त्या विशिष्ट मंदिरात जाऊन तो माझ्यासाठी प्रार्थना करीत होता. तिथला अंगारा भक्तिभावानं माझ्या कपाळाला लावीत होता. हा सगळा भोळेपणा आहे, अंधश्रद्धेचा भाग आहे हे मला जाणवत होते. पण मी मित्राच्या इच्छेचा कधीही अव्हेर केला नाही. त्याच्या प्रेमातली उत्कटता पाहून मला तशाही अवस्थेत आनंद वाटत होता. योगायोगानं मी जगलो. (मित्राच्या मताप्रमाणं मला देवानं जगवलं) खरं तर त्याचं प्रेम हेच मला ईश्वरी लक्षण वाटतं. 'तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा।' हे तुकोबाचं वचन सत्यच आहे.

'कोणाही जिवाचा न घडो मत्सर' हे देवपूजेचं वर्म आहे असं तुकोबा म्हणतात. प्रेमातूनच जीवनाची वाट सुखाकडे जाऊ शकते. ज्ञान आणि प्रेम या दोन महनीय मूल्यांची जगाला नेहमीच आवश्यकता आहे. बर्ट्रंड रसेलनं 'A good life is inspired from love and guided by knowledge' असं म्हटलं आहे. निकोप जीवनाचं हे स्वरूप कुणालाही मान्य होईल. बुद्धी आणि अंतःकरण यांचा मिलाप आपण घडवू शकलो तर एका समर्थ जीवनाची उभारणी करू शकतो. ज्ञान आणि प्रेम यांच्यातच ईश्वर खऱ्या अर्थानं सामावला आहे. तो मंदिर-मशिदीत शोधण्यापेक्षा आपल्या अंतःकरणातल्या प्रत्येक स्पंदनात दिसू शकेल. मीच तो परमेश्वर आहे असं आत्मप्रत्ययानं आणि सद्‌भावनेनं म्हणता आलं तर प्रार्थना-स्थळांची वेगळी आवश्यकता वाटण्याचं कारण नाही. 'माझं मन हेच चर्च आहे.' असं थॉमस पेन या विचारवंतानं म्हटलं होतं ते सयुक्तिकच आहे.

भारतात अध्यात्मविचाराची लागवड अनेक धर्मपुरुषांनी केली. श्रीराम, श्रीकृष्ण या पराक्रमी राज्यकर्त्यांनीही धर्ममार्ग उज्ज्वल केला. त्यांनाच ईश्वर मानण्यात

येऊ लागलं. वाच्यार्थानं ते ईश्वर नव्हते. पण त्यांनी लोककल्याणाचा हेतू ठेवून मानवी जीवन उन्नत करण्याचा अखंड प्रयत्न केला. श्रीकृष्णानं सांगितलेली गीता भारतीय अध्यात्मविचाराला अधिक गतिमान करणारी ठरली. 'गीतेत' ईश्वरकल्पना आहे. किंबहुना आपण ईश्वरच आहोत असं श्रीकृष्णानं म्हटलं आहे. पण या 'गीतेत'ही 'आपण आपला उद्धार करावा, आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार असतो' असा विचार मांडला आहे. हा कर्मयोगी विचार मला गीतेतला केंद्रीभूत विचार वाटतो.

दुर्दैव असं की रामायणातला, महाभारतातला पुरुषार्थवादी विचार आजच्या भारतातून लुप्त झाला आहे. दुबळ्या माणसाला देव नावाचा एक काल्पनिक आधार हवासा वाटतो. अध्यात्मप्रधान समजल्या गेलेल्या भारतात प्रत्येक क्षेत्र अनीतीनं आणि अधर्मानं डागाळलेलं दिसत आहे. उच्च मूल्यांची प्रचंड प्रमाणात पडझड होत आहे. देवदेवतांच्या यात्रा जत्रा इथं प्रचंड गर्दीनं ओसंडून वाहतात. पण खरी आध्यात्मिकता क्वचितच कुठं अपघातानं दिसते. जनतेचे शोषण करणारे, काळाबाजारवाले, अन्नात आणि औषधात भेसळ करणारे अधम प्रवृत्तीचे लोक, देवमंदिरं बांधण्यासाठी लक्षावधी रुपयांचा दानधर्म करतात. होमहवन करतात, विश्वशांतीसाठी (?) यज्ञ करतात. कुठल्यातरी तथाकथित संन्याशाचं प्रवचन घडवून आणतात आणि आपला भ्रष्टाचाराचा धंदा अबाधित चालू ठेवतात.

सहज प्रश्न मनात येतो, कुठं आहे तो देव ? सुदाम्याचे पोहे खाणारा वत्सल देव, प्रेमळ देव, शबरीची उष्टी बोरं खाणारा दयाळू देव कधीतरी कुणाला दिसला आहे का ? संगमरवरी मंदिरात, वैभवशाली देव्हाऱ्यात, अलंकारांनी मढलेल्या मूर्तीत तो कसा असू शकेल ? भारत हे एके काळी आध्यात्मिक राष्ट्र असेलही. आज भ्रष्टाचारी प्रवृत्तींनी ते अंतर्बाह्य बरबटलेलं आहे. अध्यात्म उरलेलं नाही. स्वार्थाचे, सत्तेचे आणि संपत्तीचे इथं देव्हारे माजवले आहेत. कोणताही परमेश्वर असल्या राष्ट्राला वाचवू शकेल असं मला वाटत नाही. 'देवाच्या मदतीस चला तर' असं केशवसुतांनी म्हटलं होतं त्याची आठवण होते.

माझ्या देवविषयक कल्पना मी स्पष्ट केल्या आहेत. त्या करताना कुणाच्या हळव्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर त्यांनी क्षमा करावी.

■■■

# समतेचा सूर आळवणारा संप्रदाय

प्रत्येक धर्मसंप्रदाय धर्मविचाराला समर्थ करण्याचा प्रयत्न करीत असतो. समाजात धार्मिक आचारविचार नसतील तर तो समाज आपलं व्यक्तित्व हरवून बसतो. धर्मभावना ही माणसाच्या मनात खोलवर रुजलेली असते. या भावनेला सुसंगत आणि सुव्यवस्थित रूप देण्यासाठी संप्रदायाची चौकट आवश्यक असते. कालांतरानं चौकट बळकट होते आणि तिच्यात सामावलेली तत्त्वदृष्टी मात्र धूसर व विरळ होत जाते. इतिहासाची साक्ष काढली तर अनेक धर्मविचार आजपर्यंत जगात उत्पन्न झाले. संप्रदाय उभे राहिले आणि पुढे कालप्रवाहाबरोबर वाहूनही गेले. धर्मभावनेचा मूळ पाया बलिष्ठ असेल तर धर्मसंप्रदाय दीर्घकाळ समाजजीवनाला तात्त्विक आणि भावनिक आधार देतात. धर्म ही समग्र जीवनाला व्यापणारी एक उदार जीवनदृष्टी आहे. धर्म म्हणजे केवळ पारलौकिक विचार असं समजणं मुळातच चुकीचं आहे. श्रेष्ठ प्रतिभावंतांनी जीवनाचं केलेलं सखोल चिंतन आणि त्यातून काढलेले निष्कर्ष म्हणजे धर्म, असा मी अर्थ करतो. हा धर्म ईश्वरकल्पनेशी निगडित असेल किंवा नसेल, तो माणसाच्या जीवनाला सशक्त करणारा असावा. माणसाचं आणि सर्व प्राणिमात्रांचं आत्यंतिक कल्याण हेच धर्माचं आणि त्यातील संप्रदायांचं उद्दिष्ट असतं. केवळ कर्मकांडात, होमहवनात आणि जपजाप्यात धर्म गुंतून पडत नाही. कर्मकांडी धर्म मनुष्याला उदारतेकडे घेऊन जायला असमर्थ ठरतात, असा इतिहास आहे. या दृष्टीनं आज महाराष्ट्रात जे धार्मिक संप्रदाय लोकमनावर प्रभाव पाडत आहेत. त्यांच्याकडे चिकित्सक दृष्टीनं पाहिलं पाहिजे.

भागवतधर्माच्या अंतर्गत असलेला वारकरी पंथ किंवा संप्रदाय हा महाराष्ट्रातला सर्वाधिक लोकप्रिय संप्रदाय आहे, असं दिसतं. त्याचे लक्षावधी अनुयायी महाराष्ट्रात आणि अन्य प्रांतातही पसरले आहेत. वारकरीपंथाची नेमकी उत्पत्ती केव्हा झाली, याबद्दल इतिहास मौन बाळगून आहे. भाविकांच्या मते हा पंथ अतिप्राचीन आहे. त्याला आदि व अंत नाही. हे श्रद्धाळू भाविकांचं म्हणणं आहे.

जेव्हा नव्हते चराचर। तेव्हा होते पंढरपूर।
जेव्हा नव्हत्या गोदागंगा। तेव्हा होती चंद्रभागा॥

श्रद्धेच्या पोटी ही अतिशयोक्ती जन्माला आलेली आहे. एक वेगळा पुरावा उल्लेखिण्यात येतो. संत बहिणाबाईंनी सतराव्या शतकात लिहिलेला एक अभंग उद्धृत केला जातो.

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया॥
नामा तयाचा किंकर। तेणे रचिले ते आवार॥
जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत॥
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश॥

यात वारकरी संप्रदायाचा आरंभ, विस्तार आणि विकास सांगितलेला आहे. भागवत धर्ममंदिराची उभारणी कशी झाली याचं हे अलंकारिक वर्णन आहे. पण संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला हे विधान ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर नाही. संत ज्ञानेश्वरांच्या कुळातच पूर्वीपासून पंढरीची वारी करण्याची प्रथा होती. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत अनेक वर्षे वारी करीत असत. पंढरपूरला विठ्ठल मंदिर केव्हा उभारलं गेलं याबद्दलही विश्वसनीय उल्लेख इतिहासात आढळत नाही. एका आख्यायिकेत पुंडलिकाचा उल्लेख आहे; पण भक्त पुंडलिकाचा काळ कोणता हे सप्रमाण सांगता येत नाही. इतकंच म्हणता येईल की, ज्ञानेश्वरांच्या पूर्वी निदान तीन-चार शतके तरी वारकरी संप्रदायाला आकार येत गेला. संप्रदायाचा जन्म लोकमानसात होतो. लोकशक्तीमुळे संप्रदायाचं माहात्म्य वाढतं. कोणीतरी एकमेव संतपुरुष पंथाची उभारणी करतो असं मानणं सयुक्तिक नाही.

वारकरी या शब्दाचा अर्थ 'पंढरीची वारी करणारा तो वारकरी' असा करण्यात येतो. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला नियमानं विठ्ठलाचं दर्शन घेणं हा वारकऱ्यांचा आचारधर्म आहे. लक्षावधी वारकरी हातात भागवत धर्माची पताका घेऊन आणि ओठी विठ्ठलाचं नाव घोळवीत भाविकतेनं पंढरपूरला येतात. हे दृश्य केवळ वारकऱ्यांच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या संस्कृतीवर प्रकाश टाकणारं आहे. या असंख्य वारकऱ्यांत समाजातल्या सर्व स्तरांतले स्त्री-पुरुष एकत्रित झालेले असतात. भजन, कीर्तन, गायन, प्रवचन आणि नामघोष यात बुडालेला प्रचंड भक्तसमूह वारीच्या वेळी पाहायला मिळतो. चंद्रभागेचा प्रवाह आणि भक्तांचा प्रवाह हातात हात घालून पंढरीला प्रदक्षिणा घालतात. वारकरी पंथानं

महाराष्ट्राला समतेचा आणि ममतेचा उदात्त वस्तुपाठ दिला आणि महाराष्ट्राच्या बुद्धिवादाला भक्तिभावनेची जोड दिली. इतर धर्मपंथ आणि वारकरी पंथ यांतला स्पष्ट जाणवणारा एक फरक असा की, वारकरी पंथानं समतेची ध्वजा उंच उचलून धरली. चंद्रभागेचं पाणी ज्याप्रमाणे सर्वांना खुलं आहे त्याप्रमाणं या पंथाचं महाद्वार सर्वांना मोकळं आहे. इथं कोणताही भेद नाही. 'तुका म्हणे नाही जातीसवे काम। ज्याचे मुखी नाम तोचि धन्य।' भेदाभेदभ्रम अमंगळ आहे असं निःसंदिग्धपणे उद्‌घोषित करणारा हा पंथ माणूसपणाचा आणि माणसाच्या प्रांजल भक्तीचा सत्कार करतो. अन्य पंथात समता आणि ममता ही मूल्यं जरूर आहेत. पण त्या मूल्यांचा वारकरी पंथाइतक्या उत्कटतेनं त्यांनी जयघोष केलेला आढळत नाही.

समर्थ संप्रदायात ब्राह्मण आणि क्षत्रिय यांना महत्त्वाचं स्थान आहे. दत्त संप्रदायात सोवळ्या-ओवळ्याचं कर्मकांड विशेषत्वानं दिसतं. महानुभाव पंथाने जात आणि वर्ण यांच्या सीमा पुसून टाकण्याचा साहसी प्रयत्न केला. पण महानुभावीय आचार्य पंडित आणि कवी नामदेव-तुकारामांसारखे जनसामान्यांत फारसे मिसळले नाहीत. या प्रकारच्या मर्यादा पडल्यामुळं हे संप्रदाय मोठ्या प्रमाणात वाढू शकले नाहीत.

'जे जे भेटे भूत। ते ते जाणिजे भगवंत' असं म्हणणारा वारकरी पंथ हा भागवत धर्माच्या उज्ज्वलतेची साक्ष देतो. वारकरी पंथामुळं महाराष्ट्राच्या जीवनदृष्टीत जी पुरोगामी उदारता आली आहे तिच्याकडे संशोधकांनी लक्ष दिलं पाहिजे. सामान्य माणसाची सुखदुःखं समजून घेण्याची प्रेमळ वृत्ती हे या पंथाचं वैशिष्ट्य आहे. या पंथातले लेखक-कवी पाहिले तर ते सामान्य आणि उपेक्षितांतून आलेले दिसतात. ज्ञानेश्वर आणि एकनाथ हे ब्राह्मण (ज्ञानेश्वरांनाही ब्राह्मण्याचा अधिकार मिळाला नाही आणि एकनाथांनाही सनातनी धर्मपंडितांनी सतत विरोध केला.) पण नामदेव, चोखामेळा, सावतामाळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी, सोयराबाई, कान्होपात्रा, जनाबाई, तुकाराम हे सर्वजण सामाजिकदृष्ट्या खालच्या थरांतून आलेले संत आणि कवी होते. मराठी भाषेचं साहित्य यांच्याच वाणीनं संपन्न झालेलं आहे. ग्यानबा-तुकाराम आणि नामा-जना, चोखा आणि सावता हे वजा केले तर मराठी साहित्य कोणत्याही अर्थानं श्रेष्ठतेच्या पातळीपर्यंत पोहोचणं शक्य नाही. महाराष्ट्राची सुख-दुःखांची गाणी वारकरी पंथातल्या या संतांनी आत्मप्रत्ययानं गायिली आणि लोकजीवनाला आकार दिला. या संतांनीच समाज

घडवला आणि सामाजिक एकतेचा संदेश लोकमनापर्यंत नेला असं विधान करता येतं यात अतिशयोक्ती नाही. 'कुळ, जाति, वर्ण। हे आघवेचि गा अकारण' हा विचार वारकरी पंथानं सर्वत्र नेला. संत नामदेवांचं कीर्तन म्हणजे प्रबोधनाचं व्यासपीठ होतं. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी॥' हीच भागवतधर्माची म्हणजे वारकरी संप्रदायाची भूमिका होती. चंद्रभागेच्या वाळवंटात नामदेवांच्या कीर्तनात अठरापगड जातिजमातीचे लोक सहभागी होत असत. ज्ञानेश्वर नावाचा ब्राह्मण आणि चोखामेळा नावाचा महार या कीर्तनात एकमेकांना उराउरी भेटत असत. हेच दृश्य तुकोबांच्या कीर्तन-प्रवचनात प्रकर्षानं दिसत होतं. तुकोबांचं शिष्यत्व काही ब्राह्मणांनीही स्वीकारलं होतं. गुरू हा कोणत्या वर्णाचा आहे ? या चिकित्सेत रस नसणारे प्रबुद्ध भक्त वारकरी संप्रदायानं निर्माण केले. नीच यातीचा गुरू करू नये, तो उच्च वर्णाचाच असावा असा काही लोकांनी दृढ केलेला विचार वारकरी पंथानं समूळ नष्ट केला. रामेश्वरभट्ट यांच्यासारखा उच्चवर्णीय तुकोबांच्या पायावर माथा टेकतो, हे दर्शन सामाजिक प्रगतीचं द्योतक आहे. परमेश्वर भक्तीची सनद वारकरी पंथानं सर्वांना दिल्यामुळं खालच्या वर्गातले लोक आनंदित झाले. आपली याती हीन आहे, आपण ईश्वरी कृपेला वंचित झालो आहोत, हा न्यूनगंड नाहीसा झाला. भक्तीचा अधिकार ही एखाद्या वर्गाची मिरास नव्हे, ज्याच्या मनी भाव असतो, त्याला देव भेटतो, हा आत्मप्रत्यय शूद्रातिशूद्रांच्या मनात जागवण्याचं महनीय कार्य या पंथानं केलं.

सामान्य मनुष्य आध्यात्मिक विचार, देव आणि धर्म यांच्यापासून वर्षानुवर्षे दुरावलेला होता. त्याच्या जीवनात विठ्ठलाची भक्ती रुजवून त्याला कर्मप्रवृत्त करण्याची कामगिरी वारकरी पंथाच्या तत्त्वदृष्टीमुळं होऊ शकली. सामान्यातल्या सामान्य माणसाशी नातं जोडण्याचं कार्य सर्वच वारकरी संतांनी केलं. जनाबाईसारखी नामयाची दासी आपल्या अभंगांतून विठ्ठलाशी जी उत्कट जवळीक दाखवते, ती पाहिल्यावर वारकरी पंथ हा सामान्य माणसाच्या उद्धरणासाठी प्रयत्न करणारा एकमेव पंथ आहे, हे लक्षात येतं. देव आणि भक्त यांच्यातलं नातं अधिक मोकळं, प्रेमळ आणि विश्वासपूर्ण झाल्याचं चित्र संतांच्या काव्यात दिसतं. वारकरी पंथानं ज्ञानाला भक्तीच्या खालचं स्थान दिलं आहे. भक्ती हीच माणसाला तारणारी शक्ती म्हणून ज्ञानाचं अवडंबर संतांनी माजवलं नाही. हा शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, सामान्य स्थितीत राहणाऱ्या स्त्री-पुरुषांचा पंथ बनला पण या पंथातही प्रज्ञा आणि

प्रतिभा यांचा आविष्कार करणारे कवी व कवयित्री यांचा मोठा सहभाग होता.

वारकरी पंथात 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत' आणि 'तुकोबांची गाथा' हे प्रमुख ग्रंथ मानले जातात. वारकऱ्यांची प्रस्थानत्रयी असं या ग्रंथांना संबोधण्यात येतं. उत्तम साहित्याचे जे निकष मानले आहेत. त्यांच्या आधारानं हे ग्रंथ म्हणजे मराठी साहित्याचे अपूर्व अलंकार आहेत असं म्हणता येतं. या ग्रंथांची लोकप्रियता केवळ वारकऱ्यांपुरतीच मर्यादित नाही. कोणत्याही जातिधर्माच्या साहित्यरसिकाला आकृष्ट करून घेण्याचं सामर्थ्य या काव्यात आहे. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्याशी तुलना होऊ शकेल असे कवी मराठीत अजून तरी आढळत नाहीत. हे विधान भाबडेपणानं केलेलं नाही. उत्कृष्ट साहित्याची निर्मिती ज्ञानापेक्षा उत्कट भावनेतूनच होऊ शकते, हे यातून सिद्ध होतं.

काही धर्मपंथ निवृत्ती आणि संन्यास यांचा पुरस्कार करतात. वारकरी पंथ मात्र प्रवृत्तिवादी आणि कर्मयोगाची शिकवण देणारा आहे. मोक्षप्राप्तीसाठी, देवाच्या साक्षात्कारासाठी घरदार सोडून रानावनात जावं लागत नाही. 'न लगे जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण' आपापलं कर्म करण्यातच मुक्तीचा आनंद सामावलेला आहे. संत सावतामाळी आपल्या काव्यात म्हणतात-

कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।
लसूण मिरची कोथिंबरी। अवघा माझा श्रीहरी॥

माझ्या मळ्यातच तो विठ्ठल मला भेटू शकतो. मी माझं काम निष्ठेनं केलं तर माझ्या भक्तीच्या मळ्यात विठ्ठल वस्तीला येतो.

प्रत्येक संतकवीचे कर्मयोगाची प्रशस्ती करणारे अभंग वाचताना या वारकऱ्यांची दृष्टी कर्मपर आहे हे लक्षात येतं. हे जीवन म्हणजे केवळ माया आहे, म्हणून मायेचा पाश तोडून कुठेतरी रानावनात परमात्म्याचा शोध घेतला पाहिजे, असा विचार या पंथानं केलेला नाही. इहजीवनावर प्रेम करणारा आणि या जीवनातच भक्तीच्या माध्यमातून व कर्मयोगातून परमात्म्याला भेटता येऊ शकतं, हे पुरुषार्थवादी तत्त्वज्ञान खरोखरच महत्त्वाचं आहे.

वारकरी पंथानं संन्यासवादाचं बंड मोडलं. कर्मप्रवृत्तीला बळ दिलं. भावभक्तीतून विठ्ठल आत्मसात करता येतो हे सांगितलं. जात आणि वर्ण यांच्या अहंकाराला छेद दिला. समता विचाराची प्रतिष्ठा वाढवली. समाजाच्या सामान्य स्तरांतून सुद्धा भक्त आणि कवी निर्माण केले. त्यामुळं महाराष्ट्रातल्या धर्मजीवनात

आणि समाजमनात एक प्रकारची क्रांती घडून आली. प्रा. श्री. म. माटे यांनी 'आध्यात्मिक लोकशाही' असा शब्दप्रयोग या संदर्भात केला आहे. त्याचं मर्म समजून घेतलं पाहिजे.

वारकरी पंथानं भक्तीच्या क्षेत्रात समतेची मुहूर्तमेढ उभी केली. तरी त्यानं सामाजिक समतेच्या दिशेनं काहीच पावलं उचलली नाहीत अशा आशयाची टीका कित्येक समीक्षकांनी केली आहे. याला उत्तर देताना मी असं म्हणेन की, तेराव्या शतकापासून वारकरी पंथानं समतेचा ध्वज उचलून धरला. त्यांनी जातिव्यवस्था मुळातच मोडून काढली नाही, याचं कारण ही व्यवस्था शेकडो वर्षांपासून लोकमनात खोलवर जाऊन रुजलेली होती. ती पूर्णपणे उपटून काढणं शक्य नव्हतं. आणि त्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इष्टही नव्हतं. जातिपातीच्या ताणलेल्या तीव्र कल्पना शिथिल करून माणसांना प्रेमभावनेनं एकत्र जोडण्याचं रचनात्मक काम संतांनी केलं. एखादी क्रांतिकारक उडी घेणं त्या काळात अशक्य होतं. महानुभाव पंथाचं उदाहरण वारकरी संतांपुढं निश्चित होतं. महानुभावीय चक्रधरानं वर्णव्यवस्था समूळ उखडण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी ठरला. वारकरी पंथामुळं भक्तीच्या क्षेत्रात तरी समता विचाराला स्थैर्य आलं. चोखामेळ्यासारखा शूद्र संतदेखील भक्तीच्या बळावर श्रेष्ठ संतांच्या मालिकेत गुंफला गेला. याचा अर्थ सामाजिक समतेकडं समाजमन हळूहळू वाटचाल करू लागलं. आज एकविसाव्या शतकातही सामाजिक समता अस्तित्वात आलेली नाही. याचा अर्थ विषमतेची मुळं अत्यंत चिवट आहेत. फुले, आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, भाऊराव पाटील यांच्यासारखे क्रांतिकारक नेते समतेची चळवळ अनेक वर्षे उभी करीत राहिले. पण पूर्ण यश अद्यापि आलेलं नाही. अशा स्थितीत वारकरी पंथानं ममतेच्या बळावर समतेकडं केलेली वाटचाल महत्त्वाची मानली पाहिजे. फुले, आंबेडकरांचा रस्ता संतांच्या कार्यातून तयार झाला हे इतिहासाला मान्य करावं लागेल.

वारकरी पंथ हा वैदिक धर्मांतर्गत पंथ आहे. त्यानं शास्त्रप्रामाण्याची चौकट मोडून काढली नाही. पण ती चौकट अधिक रुंद करून ती सर्वसमावेशक कशी होईल हे पाहिलं. ज्ञानेश्वरांच्या मते वेद कृपण असल्यामुळं त्यांनी केवळ त्रैवर्णिकांचीच काळजी घेतली. चौथा वर्ण उपेक्षित ठेवला. या चौथ्या वर्णासाठी वारकरी पंथानं नामसाधनेचं आणि भक्तीचं महाद्वार पूर्णपणे खुलं केलं. वैदिकांच्या समाजशास्त्रापेक्षा वारकऱ्यांचं समाजशास्त्र अधिक पुरोगामी आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात

या पंथाचं स्थान अनन्यसाधारण महत्त्वाचं आहे. रंजल्या-गांजल्यांना वात्सल्यानं पोटाशी धरणारा हा पंथ म्हणजे मानवतेचा उच्च आविष्कार आहे.

आता या पंथाच्या उपास्य दैवताबद्दल अधिक लिहीत नाही, कारण विठ्ठलाची जनमानसातली प्रतिमा इतकी अभंग आहे की, तिच्याविषयी नव्यानं सांगण्यासारखं काही नाही. हा विठ्ठल स्त्री-शूद्रांना जवळ घेणारा आणि त्यांच्या सुखदुःखात सहभागी झालेला देवतात्मा आहे ही बहुसंख्य लोकांची कित्येक शतकांपासूनच श्रद्धा आहे. हा दीनदलितांचा, वंचितांचा आणि दुःखितांचा उद्धारकर्ता आहे. तो सर्वव्यापी असल्यामुळं प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयात राहतो. हा विचार या पंथानं सांगितला आहे.

प्रत्येक वारीला पंढरपूरला जाऊन त्याचं दर्शन घेणं हा व्रतनियम पंथात महत्त्वाचा मानला जातो. एकदा पंथाची तुळशीमाला गळ्यात घातली की, वारकऱ्यानं आमरण ती काढायची नाही. त्यानं सत्य, संयम, शालीनता, क्षमाशीलता यांचं पालन करायचं, मद्यपान आणि मांसाहार पूर्णपणे निषिद्ध मानायचा. 'रामकृष्णहरी' या मंत्राचा नित्य जप करायचा. या प्रकारचे नियम वारकऱ्यांना पाळावे लागतात. जीवनाला शुद्ध करणाऱ्या आणि समाजाला एकत्र जोडणारा हा वारकरी पंथ म्हणजे महाराष्ट्र संस्कृतीची अमूल्य ठेव आहे. या पंथाचा प्रवाह सर्वांनाच शुचिर्भूत होण्यासाठी खुला आहे.

प्रस्तुत लेखात वारकरी पंथानं समतेचा ध्वज उभारला असं जे विधान करण्यात आलं आहे त्याला काही अंगभूत मर्यादा आहेत हे लक्षात घेतलं पाहिजे. या पंथानं शास्त्रप्रामाण्याला धक्का लावलेला नाही. विषमतेच्या साऱ्या भिंती नष्ट कराव्यात आणि सामाजिक जीवनात विषमता राहू नये या दृष्टीनं संतांनी प्रयत्न केलेले नाहीत. केवळ आध्यात्मिक क्षेत्रात त्यांनी समता आणि ममता ही मूल्यं प्रामाणिकपणे पुरस्कारली. सारे भेदाभेद हे अमंगळ भ्रम आहेत असं सर्व संत मानत होते, तसा प्रचार करीत होते. पण हे भक्तीच्या क्षेत्रापुरतं सीमित होतं. सामाजिक न्यायासाठी वारकरी पंथानं लढा उभारला नाही. हजारो-लाखो वारकरी वारीत एकत्र येत होते. पण ते आपापल्या गावी गेले की- समतेचा विचार जो मुळातच मंद होता तो आणखी क्षीण होऊन- विषमतेची कुंपणं लोकमनात पुन्हा नव्या जोमानं उभी राहत असत. वारकरी पंथानं आणि संतांनी सामाजिक क्रांतीसाठी संघर्ष केला नाही; पण भक्ती आणि अध्यात्म या क्षेत्रात त्यांनी समतेचा ध्वज

निश्चित उभारला. सामाजिक समतेच्या दृष्टीनं टाकलेलं हे पहिलं पाऊल ठरलं. जातीय आणि वर्णीय विषमतेची धार बोथट करण्याचं आणि धर्माच्या नावाखाली भक्तीच्या दालनात भिन्नभिन्न जातिजमाती या पंथामुळं एकत्रित येऊ शकल्या.

मध्ययुगाच्या पार्श्वभूमीवर माणसाचं माणूसपण अधोरेखित करण्याचं हे कार्य निश्चित पुरोगामी आहे यात संशय नाही. महानुभाव आणि वारकरी हे दोन पंथ इतर पंथांच्या तुलनेत अधिक उदार आणि समावेशक वृत्तीचे होते. त्यांच्या कार्यामुळं महाराष्ट्र प्रगत विचाराकडं वळला. आणि समतेची भूमिका अधिकाधिक स्पष्ट होऊ लागली. सामाजिक समतेच्या आचारविचारांकडं लोकमन स्वच्छ दृष्टीनं हळूहळू पाहू लागलं. याचं श्रेय जसं महानुभावांना देता येतं तसंच ते वारकरी पंथाच्या प्रवक्त्यांना आणि प्रचारकांना देणं उचित आहे. या पंथानं सामाजिक क्रांती केली नाही; पण समतेचा विचार आपल्या जीवनातून आणि साहित्यातून फार परिणामकारक रीतीनं सांगितला. त्यातूनच समतेच्या तत्त्वाला उजाळा मिळाला. तेराव्या शतकापासून पुढे चारशे वर्षे वारकरी पंथानं समता आणि बंधुभाव यांची आपल्या विशिष्ट शैलीनं शिकवण दिली. त्यांनी आदळआपट केली नाही. जुनी परंपरा जाळून टाकण्याची अतिरेकी भाषा या पंथानं योजली नाही. प्रगतीचं एकेक पाऊल टाकताना समाजात विस्कळीतपणा येऊ नये याचीही दक्षता घेतली. ही दक्षता महानुभाव पंथातल्या चक्रधरांनी आणि गोविंदप्रभूंनी घेतली नव्हती. लोकांचं मन एकदम नव्या मार्गाकडं वळवता येत नाही. ते पूर्वापार चाकोरीनंच चालत असतं. कर्नाटकात देखील महात्मा बसवेश्वराचा सामाजिक समतेचा विचार एकाएकी स्वीकारला गेला नाही. महात्मा बसवेश्वराच्या चळवळीला तिथं कडवा विरोध झाला. आपल्याकडेही ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम या प्रबोधनवादी संतांना, सनातन्यांनी विरोध केलाच होता. पण आपल्या शांत वृत्तीनं त्यांनी विरोधाची धार हळूहळू बोथट केली. लोकमनावर या संतांच्या ममतावादी व समतावादी विचारदृष्टीचा प्रभाव वाढत गेला. त्यातूनच वारकरी संप्रदाय अधिक लोकप्रिय झाला. त्याची मुळं बहुजनसमाजात आणि दलित समाजातही खोलवर गेली. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेदभ्रम अमंगळ.' ही भूमिका वारकरी पंथाची आधारशिला बनली. समतेचा ध्वज अधिकाधिक उंचावत गेला. वारकरी पंथानं केलेलं हे कार्य ऐतिहासिक स्वरूपाचं आहे.

■■■

# जगाला प्रेम अर्पावे

मी साने गुरुजींचं एकच व्याख्यान ऐकलं. त्यावेळी मी कॉलेजात पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी असेन. साहित्य हा माझ्या आवडीचा विषय. गुरुजींची बरीच पुस्तकं वाचलेली होती. त्यामुळं त्यांच्या व्याख्यानाचं मला आकर्षण होतं. गुरुजी व्यासपीठावर आले. त्यांच्या दर्शनी व्यक्तित्वात कसलंही आकर्षण नव्हतं. पोशाख अगदी साधा. गबाळग्रंथी वाटावा असा. मुद्रा गंभीर. हळू आवाजात त्यांनी भाषणाला सुरुवात केली. सुरुवातीचे शब्दही फारसे वेधक वाटले नाहीत. चार-सहा वाक्यं बोलल्यानंतर त्यांच्या शब्दांना वेग आला. आवाजातला संथपणा कमी होऊन काहीशी चमक आली. त्यातल्या चढ-उतारावरून त्यांच्या मनातल्या भावनिक खळबळीचा अंदाज येऊ लागला. देशातल्या दुःस्थितीचं चित्र त्यांनी परिणामकारक शब्दांतून मांडलं. त्यांच्या साध्या शब्दांत विचार आणि भावना यांचं अस्वस्थ करणारं एक रसायन श्रोत्यांना जाणवत होतं. गुरुजी काळजापासून बोलत होते. त्यामुळंच त्यांचे शब्द आमच्या काळजाचा ठाव घेत होते. बोलता-बोलता ते भावनावश झाले आणि म्हणाले, 'ही सारी भीषण अवस्था पाहिल्यावर मी का जगतो आहे हा प्रश्न मला पडतो. असं वाटतं की एक दिवस आपल्या देहाचं हे मडकं फोडून टाकावं. गरिबांचा आक्रोश, पायदळी पडलेल्यांच्या किंकाळ्या किती ऐकायच्या ? एक दिवस देहाचं मडकं फोडून टाकावं.'

गुरुजींचा प्रत्येक शब्द त्यांच्या जिवाची तडफड घेऊन प्रकट होत होता. ते भाषण म्हणजे त्यांच्या खोल वेदनेचं आविष्करण होतं. प्रत्येक शब्द म्हणजे अश्रूचा थेंब होता. आज इतक्या वर्षांनंतरही गुरुजींची ती काळीसावळी मूर्ती आठवते. त्यांचे शब्द अजूनही मनात घर करून राहिले आहेत. पुढे एके दिवशी वृत्तपत्रात त्यांच्या मृत्यूची बातमी वाचली. आपल्या देहाचं मडकं त्यांनी आपल्याच हातांनी फोडून टाकलं होतं. कित्येक दिवस त्यांच्या अशा आत्मघाताची चर्चा साऱ्या महाराष्ट्रात होत होती. स्वतः होऊन त्यांनी मरणाला आमंत्रण द्यावं हे योग्य की अयोग्य याचा निर्णय आजही मी करू शकत नाही. पण कोणत्याही व्यक्तिगत स्वार्थासाठी गुरुजींनी प्राणत्याग केला नव्हता. हा 'आत्मयज्ञ' होता. स्वतःचीच आहुती याज्ञिकानं यज्ञात

टाकली होती. देशाची ढासळत चाललेली परिस्थिती आणि माणसाचं होणारं अन्यायी शोषण त्यांना पाहवत नव्हतं. या आत्माहुतीबद्दल आणखी काय सांगावं ? एका थोर विचारवंत साहित्यिकाचं जीवन आता काळाच्या ओघाबरोबर दूरवर वाहून गेलं आहे. एका अर्थानं आपल्या जीवनाला त्यांनीच पूर्णविराम दिला हे बरं झालं. नाहीतर एकापेक्षा एक भयानक धक्के त्या आत्म्याला सहन करावे लागले असते.

साने गुरुजींची उत्कट भावशक्ती मी ऐकलेल्या त्यांच्या भाषणातून प्रकट झाली होती. याच भावनिक उद्रेकातून त्यांचं साहित्य निर्माण झालं. श्री. के. क्षीरसागर आणि ना. सी. फडके यांनी गुरुजींच्या वाङ्मयावर ते रडवं आणि ऊरबडवं, अकलात्मक असल्याचा आक्षेप घेतला होता. फडके हे लोकप्रिय कादंबरीकार होते. कॉलेजातील तरुण-तरुणींच्या प्रणयचेष्टितांची चटकदार वर्णनं करण्यात त्यांच्या लेखणीचं बळ खर्ची पडलं. वैषयिक प्रेमाची चित्रं त्यांनी रेखाटली. मध्यम वर्गीयांच्या आयुष्यक्रमाचं दर्शन त्यांच्या कादंबऱ्यांत होतं असं टीकाकारांचं मत आहे; पण या पांढरपेशा समाजालाही अनेक दुःखांनी वेढलेलं होतं. त्याच्या समस्यांचं दर्शन मात्र फडके करू शकले नाहीत. वास्तव जीवनातल्या दुःखांची जाण या कलावंताला झालीच नसावी. किंवा त्यांचं आकलन करून घेण्यासाठी त्यांच्या ठायी प्राथमिक दर्जाचीही समरसता नसावी. शेकडो कथा-कादंबऱ्या लिहूनही हा लेखक समाजजीवनापासून अलिप्तच राहिला. पलायनवादी साहित्याचा आदर्श नमुना म्हणून फडक्यांच्या कादंबऱ्यांकडे बोट दाखवावं लागेल. श्री. के. क्षीरसागरांची गुरुजींच्या लेखनावरची टीका पूर्वग्रहदूषित वाटते.

कोणताही थोर लेखक मानवी जीवितातल्या दुःखांना वगळून साहित्याची निर्मिती करू शकत नाही. दुःख आणि अश्रू म्हणजेच केवळ माणसाचं जगणं असा अतिरेकी सिद्धान्त मी मांडणार नाही. पण जीवनाला कडकडून मिठी मारणाऱ्या दुःखाच्या स्पर्शाशिवाय वास्तव साहित्य निर्माण होऊ शकणार नाही. त्याचं रेखाटन प्राधान्यानं गुरुजींनी केलं म्हणून ते 'रडवं साहित्य' आहे असा निष्कर्ष काढणं अतिशयोक्तीचं वाटतं. काल्पनिक सुखस्वप्नांपेक्षा वास्तव दैन्य-दुःखाचं दर्शन घ्यायला मानसिक धैर्य लागतं. आणि त्याचं चित्रीकरण धैर्यशाली लेखकच करू शकतो.

यावर कोणी अशी शंका घेईल की गुरुजी जर धैर्यशाली लेखक होते तर त्यांनी भ्याडपणानं आपल्या जीविताचा शेवट का करून घेतला ? प्रत्येक आत्महत्या

भ्याडपणाचीच असते असं मानणं वेडेपणाचं आहे. गुरुजींच्या मृत्यूमागे एक तत्त्वज्ञान आहे याचा विसर होऊ नये. व्यक्तिगत स्वार्थ साधत नाही किंवा व्यक्तिगत हानीच्या भीतीनं जीवनाचा अंत करणाऱ्या लोकांच्या मालिकेत गुरुजींसारखा विचारवंत लेखक बसवता येणार नाही. त्यांच्या नैराश्याला समाजजीवनाची पृष्ठभूमी होती. दोन वेळचा घासही ज्यांच्या तोंडात पडत नाही त्या असंख्य दीनदलितांच्या आयुष्यातलं कडवट वैफल्य त्या आत्मविसर्जनात सामावलेलं आहे. जे जग बदललं पाहिजे ते काही केल्या बदलत नाही या वंचनेनं व्याकूळ झालेल्या मनाला हे नासलेलं, किडलेलं जग सोडलंच पाहिजे. असं वाटलेलं आहे. ज्या तीव्र निराशेतून व्यासांनी आक्रोश केला होता त्याच निराशेचे चटके गुरुजींसारख्या आत्यंतिक भावनाशील माणसाला सारखे बसत होते. स्वतःच्या इच्छेनं जीवनाचा त्याग करणं नेहमीच भ्याडपणाचं असतं हा समज शहाण्या लोकांनी नीट तपासून घेतला पाहिजे. गुरुजींच्या जीवनत्यागाला एक वैचारिक बैठक आहे हेच ज्याला कळत नाही त्याला त्यांच्या साहित्यातल्या दुःखदर्शनाचा अर्थ कसा कळणार ?

साने गुरुजी स्वतःच्या जिवंत भावनेच्या नेत्रांनी जग पाहात होते. भावना हा त्यांच्या जीवनाचा आणि साहित्याचा श्वास होता. कल्पनेच्या रंगांनी ज्यांचं साहित्य भडक झालं आहे असे अनेक कथा-कादंबरीकार कलावादाचा झेंडा घेऊन साहित्याच्या प्रांगणात नाचत होते अशा वेळी जीवनाची बाजू घेऊन आपल्या भावबळावर गुरुजी लिहीत राहिले. त्यांचं बरंचसं साहित्य तुरुंगाच्या कोठडीत लिहिलं गेलं आहे. ज्या जगात वेदना आणि अश्रू यांचं नित्य दर्शन घडत होतं ते बंदिवासातलं आणि बाहेरचं जग उघड्या डोळ्यांनी गुरुजी न्याहाळीत होते. जगतही होते. जगण्यातूनच ज्यांचं लिहिणं आणि बोलणं जन्माला आलं अशा लेखकांच्या जातकुळीतले साने गुरुजी होते. शेतकऱ्यांचं आणि कष्टकऱ्यांचं उपाशी पोट ते पाहात होते. भुकेच्या पोटाची कहाणी त्यांनीही अनुभवली होती. असा लेखक आणि कवी जेव्हा कवितेच्या ओळी लिहील तेव्हा शेतकऱ्यांचं आणि कामकऱ्यांचं स्वतंत्र संपन्न झालेलं जग त्याच्या काव्याचा विषय होईल यात कसला संशय ? आशुक-माशुकांची इश्की गाणी जेव्हा पांढरपेशा कवी रचत होते तेव्हा सावकारशाही टिकायची नाही असा आशावाद त्यांच्या कवितांतून प्रकट होत होता.

त्यांच्या वाङ्मयात रडवेपणा आहे अशी टीका करणाऱ्या टीकाखोरांनी त्यांच्या लेखनातून व्यक्त झालेल्या या कडवेपणाची दखल घेतली नाही. गुरुजींच्या

काव्यात धैर्य, आशावाद, उज्वल स्वप्नांचे रंग आणि वीरत्वाला चेतना देणारे आश्वासन आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघानंही त्यांची गीतं आदरानं गायिली आहेत. सेवा दलाच्या आणि समाजवादी पक्षांच्या मेळाव्यात त्यांची गीतं मी ऐकली आहेत. गुरुजींच्या आशावादाला विचारांचा पीळ आणि बळ होतं.

'पत्री' हा त्यांचा काव्यसंग्रह खरोखरच अविस्मरणीय आहे. गेयता आणि ध्येयवादी विचार यांचा संगम साधलेले त्यांचे अर्थपूर्ण शब्द जेव्हा काव्याचं रूप धारण करतात. तेव्हा त्या शब्दांची शक्ती कानाला व मनाला जाणवते. 'पत्री' मधल्या कविता रडव्या किंवा दुबळ्या आहेत काय ? असा सवाल टीकाखोरांना विचारला पाहिजे. स्वातंत्र्याच्या चळवळीत उडी घेऊन अनेकवेळा तुरुंगवास पत्करणारा माणूस रडक्या मनोवृत्तीचा असू शकेल का ? पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराची दारं दलितांसाठी उघडलीच पाहिजेत या निर्धारानं प्राणांतिक उपोषण करणारा सत्याग्रही रडवा असतो काय ? गुरुजींच्या रूपानं मराठी साहित्यात एक नवी रचनात्मक शक्ती उदयाला आली आणि तिचा प्रवाह समाजाच्या सर्व वर्गात पडू लागला. हे चिडक्या साहित्यिकांना सहन होण्यासारखं नव्हतं. त्यामुळंच गुरुजींवर आक्षेप घेण्यात आले. अन्यथा त्यांच्या साहित्याचा प्रवाह शुद्ध, स्वच्छ व अस्खलित आहे हे सांगण्याचंही कारण नाही.

आमचे बहुतेक लेखक कवी पंख्याखाली टेबलखुर्चीवर लेखन करीत होते तेव्हा तुरुंगाच्या कोठडीत जमिनीवर बसून गुरुजी रात्रंदिवस लिहिण्यात गढलेले असायचे. त्यांच्या साहित्याला कष्टकऱ्यांच्या घामाचा आणि दुःखितांच्या अश्रूंचा वास येतो. त्या अश्रूंत गुरुजींचेही अश्रू मिसळलेले आहेत. शाईनं लिहिणारा लेखक आणि अश्रूंनी लिहिणारा लेखक यांच्यात केवढंतरी अंतर असतं. हे अंतर कित्येक साहित्यिकांनाही कळलं नाही. माझ्या दृष्टीनं साने गुरुजी हा मराठी साहित्यातला एक संत आहे. आणि या संतानं आपल्या हृदयस्थ शब्दांतून जे सारस्वत निर्माण केलं त्याची मीमांसा बुद्धीपेक्षा अंतःकरणानंच केली पाहिजे. साहित्यशास्त्राच्या ग्रांथिक फूटपट्ट्या लावून त्यांच्या वाङ्मयाची लांबी-रुंदी कळणार नाही. गुरुजींच्या वाङ्मयाची श्रीमंती पुस्तकी कंगालांना कशी कळेल ?

आपल्या आयुष्यात गुरुजींनी बहुविध स्वरूपाचं लेखन केलं. त्यांनी कथा-कादंबऱ्या लिहिल्या. काव्यनिर्मिती केली. वैचारिक ग्रंथ लिहिले. अनेक पुस्तकांचे

शीतल धारा प्रविष्ट होतील. माणसाला आणि साऱ्या विश्वाला तुम्हीच कल्याणकारक मार्गानं नेऊ शकता. तुमचे गुण मिळावेत म्हणून ही प्रार्थना. इतर भौतिक सुखं तुम्ही देऊ शकत नाही पण प्रेम आणि सहिष्णुता यांचा आमच्या मनात संचार झाला की भौतिक सुखांचीही आवश्यकता वाटेनाशी होते. या मानसिक अवस्थेपर्यंत येण्यासाठी तुमची प्रेरणा पाहिजे.'

जगातले सारेच महापुरुष वंदनीय असतात. देवत्वाची लक्षणं त्यांच्यात जाणवतात. पण म्हणून ईश्वरानं त्यांना जाणीवपूर्वक पाठवलेलं आहे ही श्रद्धावादी भूमिका मला घेणं शक्य होत नाही. माणूस आपल्या तपस्येच्या, ज्ञानाच्या आणि प्रेमाच्या बळावर महान होऊ शकतो. परमेश्वर नावाची शक्ती त्याला घडवते किंवा त्याचा अधःपात करते हे मानणं तर्कसंगत नाही. परमेश्वर हाच मुळी तर्काच्या चौकटीत राहू शकत नाही. तो केवळ श्रद्धेचा विषय आहे. सहस्रावधी वर्षांपासून सृष्टिकर्ता परमेश्वर माणसानं गृहीत धरला आहे. त्याचे वेगवेगळे आकार आणि प्रकार कल्पिलेले आहेत. तोच कर्ता आणि करविता हा विचार पिढ्यानुपिढ्या माणसाच्या रक्तात रुजलेला आहे. त्यामुळे त्याच्या अस्तित्वाविषयी कोणी शंका उपस्थित केली तरी तो कित्येक धार्मिकांच्या दृष्टीनं अपराध ठरतो. त्याला देवद्रोही मानण्यात येतं. पण ईश्वर मानणाऱ्या धर्मसंप्रदायातही ईश्वर नाकारणारी एक विचारधारा प्राचीन काळापासून वाहत आहे. हिंदू धर्म ईश्वरवादी आहे. पण सांख्यमताप्रमाणं ईश्वर हा पदार्थ अस्तित्वात नाही. कपिल, कणाद व चार्वाक या विचारवंतांनी देव संपूर्णतः नाकारलेला आहे. जैन आणि बौद्ध यांना तर नास्तिक दर्शन असं संबोधण्यात येतं. विश्वाचं नियमन करणारी, उत्पत्ती आणि विलय घडवून आणणारी शक्ती म्हणजेच ईश्वर असं मानण्यात येतं. पण यावर खोलवर जाऊन विचार करू लागलो तर देव मानणं आणि तोच विश्वनिर्माता समजणं चुकीचं वाटू लागतं.

एकदा गौतम बुद्धाला त्याच्या शिष्यानं प्रश्न विचारला, ''आपण आम्हांला ईश्वर आहे की नाही, विश्व हे सान्त की अनन्त वगैरे गोष्टींबद्दल काहीच सांगितलं नाही हे कसं ?''

बुद्धांनी उत्तर देताना म्हटलं, ''या झाडाखाली मी बसलो आहे. हात वर केल्यावर एका फांदीची काही पानं माझ्या मुठीत येतात. याशिवाय असंख्य पानं माझ्या हातात येत नाहीत. जेवढी पानं हाती आली तेवढ्याबद्दलच मी बोलतो.''

हे अत्यंत मार्मिक उत्तर आहे. ईश्वर, आत्मा, पूर्वजन्म, पुनर्जन्म, स्वर्ग

आणि नरक खरं तर स्वैर कल्पनेचे म्हणजेच तर्काच्या पलीकडचे विषय आहेत. यावर आजपर्यंत कोणी आत्मविश्वासपूर्वक अंतिम शब्द उच्चारू शकला नाही. त्यामुळंच ईश्वरकल्पनेवर कल्पक प्रतिभावंतांनी कल्पनेचे अनेक खेळ रचलेले दिसतात. धर्मनिष्ठ राहण्यासाठी व सुंदर आणि निकोप जीवन जगण्यासाठी ईश्वर मानण्याची जरुरी आहे असं मला वाटत नाही. तरीही बहुसंख्य लोक देवकल्पनेवर विश्वास ठेवतात याचं कारण माणसाच्या भयग्रस्त मनाला ही कल्पना आधार देते, सुरक्षिततेची जाणीव देते.

परमेश्वर दयाघन आहे, तो सर्व जीवांना आधार आहे. जीवमात्राचं तोच संरक्षण करतो. दुःखनिवारण करतो अशी वचनं बहुतेक धर्मग्रंथांत आढळतात. दयाळू परमेश्वर सृष्टीत विषमता, हिंसा आणि रक्तपात, अन्याय व अत्याचार या गोष्टी वैफल्यानं आढळतात. दुबळे भरडले जातात. बलदंड सुखाने जगतात. धर्मनिष्ठ लोकांना वनवास घडतो. दुर्योधनी प्रवृत्तीचे लोक मात्र आपल्या महालात ख्याली-खुशालीत नांदतात. जात, संप्रदाय आणि धर्म, भाषा व भिन्न प्रदेश आणि सत्ता या कारणांवरून प्रत्येक देशात निरपराध मानवी रक्त सांडत आहे. इतिहासाचं प्रत्येक पान रक्तानं रंगलेलं दिसतं. प्रत्येक पानातून माणसाचं आक्रंदन ऐकू येतं. गॅसचेंबरमध्ये जळत असलेल्या बालकांचे चित्कार इतिहासानं जपून ठेवले आहेत. कोणी अत्याचारी प्रवृत्तीचा अधम दहशतवादातून हजारो निरपराध माणसांना त्यांच्या घरादारांसकट जगातून उठवतो. यालाही धर्माचा आणि देवाचा पाठिंबा आहे असं सांगितलं जातं तेव्हा परमेश्वराच्या न्यायाबद्दल जबरदस्त शंका निर्माण होते. माणूसच देवधर्माच्या नावाखाली आपली रक्ताची तहान वेगवेगळ्या निमित्तांनी भागवीत आहे; यात त्या देवाचा संबंध काय ? ईश्वर हे जर करुणेचं आणि सौंदर्याचं व प्रेमाचं रूप असेल तर त्यानं निर्माण केलेलं जग इतकं कुरूप, इतकं बीभत्स का ? या प्रश्नाचं उत्तर कोणताही विचारवंत देऊ शकेल असं मला वाटत नाही. अन्याय आणि अत्याचार रोखण्याची शक्ती जर त्या देवात नसेल तर त्याचा जयघोष कशासाठी करायचा ? निष्पाप बालकांनादेखील कॅन्सरसारख्या असाध्य रोगानं तडफडायला लावणाऱ्या परमेश्वराच्या दयाळूपणाबद्दल खरं तर आपला भ्रमनिरास झाला पाहिजे. जगात प्रतिक्षणी होणाऱ्या अन्यायाला आणि मूल्यांच्या विध्वंसाला अज्ञानी माणूसच जबाबदार आहे. हा आसुरी महत्त्वाकांक्षेनं पछाडलेला माणूस परमेश्वरापेक्षा अधिक बलवान आहे असंच म्हणावं लागेल.

माणूस हेच देवाचे रूप आहे आणि माणूस हाच सैतानाचा आविष्कार आहे. कधीकधी माणसाच्या अंतःकरणातला दैवी प्रकाश दिसतो. रोगग्रस्त झालेल्या दुःखी माणसाच्या डोळ्यांतले अश्रू आत्मीयतेनं पुसणाऱ्या एखाद्या डॉक्टरांचा हात हा हाडा-मांसाचा वाटत नाही. त्याला नंदनवनातल्या फुलाचा सुगंध येतो. असे अमृताचा स्पर्श असलेले हात कधीकधी आपल्याला आधार देतात. तो हात परमेश्वरी हात आहे असं अलंकारिक अर्थानं म्हणता येईल. 'हे विश्वचि माझे घर' ही वत्सल प्रवृत्ती ज्यांच्या हृदयात नांदते. त्यांचं मन हेच देवाचं मंदिर असतं. देव नावाची संकल्पना त्यांच्या जीवनात समूर्त होते. माणूस या उंचीपर्यंत जाऊ शकतो.

एकदा मी एका असाध्य रोगानं आजारी झालो. त्यावेळी माझा एक मित्र कुठल्याशा देवाला नवस बोलला. दररोज त्या विशिष्ट मंदिरात जाऊन तो माझ्यासाठी प्रार्थना करीत होता. तिथला अंगारा भक्तिभावानं माझ्या कपाळाला लावीत होता. हा सगळा भोळेपणा आहे, अंधश्रद्धेचा भाग आहे हे मला जाणवत होते. पण मी मित्राच्या इच्छेचा कधीही अव्हेर केला नाही. त्याच्या प्रेमातली उत्कटता पाहून मला तशाही अवस्थेत आनंद वाटत होता. योगायोगानं मी जगलो. (मित्राच्या मताप्रमाणं मला देवानं जगवलं) खरं तर त्याचं प्रेम हेच मला ईश्वरी लक्षण वाटतं. 'तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा।' हे तुकोबाचं वचन सत्यच आहे.

'कोणाही जिवाचा न घडो मत्सर' हे देवपूजेचं वर्म आहे असं तुकोबा म्हणतात. प्रेमातूनच जीवनाची वाट सुखाकडे जाऊ शकते. ज्ञान आणि प्रेम या दोन महनीय मूल्यांची जगाला नेहमीच आवश्यकता आहे. बर्ट्रंड रसेलनं 'A good life is inspired from love and guided by knowledge' असं म्हटलं आहे. निकोप जीवनाचं हे स्वरूप कुणालाही मान्य होईल. बुद्धी आणि अंतःकरण यांचा मिलाप आपण घडवू शकलो तर एका समर्थ जीवनाची उभारणी करू शकतो. ज्ञान आणि प्रेम यांच्यातच ईश्वर खऱ्या अर्थानं सामावला आहे. तो मंदिर-मशिदीत शोधण्यापेक्षा आपल्या अंतःकरणातल्या प्रत्येक स्पंदनात दिसू शकेल. मीच तो परमेश्वर आहे असं आत्मप्रत्ययानं आणि सद्भावनेनं म्हणता आलं तर प्रार्थना-स्थळांची वेगळी आवश्यकता वाटण्याचं कारण नाही. 'माझं मन हेच चर्च आहे.' असं थॉमस पेन या विचारवंतानं म्हटलं होतं ते सयुक्तिकच आहे.

भारतात अध्यात्मविचाराची लागवड अनेक धर्मपुरुषांनी केली. श्रीराम, श्रीकृष्ण या पराक्रमी राज्यकर्त्यांनीही धर्ममार्ग उज्ज्वल केला. त्यांनाच ईश्वर मानण्यात

येऊ लागलं. वाच्यार्थानं ते ईश्वर नव्हते. पण त्यांनी लोककल्याणाचा हेतू ठेवून मानवी जीवन उन्नत करण्याचा अखंड प्रयत्न केला. श्रीकृष्णानं सांगितलेली गीता भारतीय अध्यात्मविचाराला अधिक गतिमान करणारी ठरली. 'गीतेत' ईश्वरकल्पना आहे. किंबहुना आपण ईश्वरच आहोत असं श्रीकृष्णानं म्हटलं आहे. पण या 'गीतेत'ही 'आपण आपला उद्धार करावा, आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार असतो' असा विचार मांडला आहे. हा कर्मयोगी विचार मला गीतेतला केंद्रीभूत विचार वाटतो.

दुर्दैव असं की रामायणातला, महाभारतातला पुरुषार्थवादी विचार आजच्या भारतातून लुप्त झाला आहे. दुबळ्या माणसाला देव नावाचा एक काल्पनिक आधार हवासा वाटतो. अध्यात्मप्रधान समजल्या गेलेल्या भारतात प्रत्येक क्षेत्र अनीतीनं आणि अधर्मानं डागाळलेलं दिसत आहे. उच्च मूल्यांची प्रचंड प्रमाणात पडझड होत आहे. देवदेवतांच्या यात्रा जत्रा इथं प्रचंड गर्दीनं ओसंडून वाहतात. पण खरी आध्यात्मिकता क्वचितच कुठं अपघातानं दिसते. जनतेचे शोषण करणारे, काळाबाजारवाले, अन्नात आणि औषधात भेसळ करणारे अधम प्रवृत्तीचे लोक, देवमंदिरं बांधण्यासाठी लक्षावधी रुपयांचा दानधर्म करतात. होमहवन करतात, विश्वशांतीसाठी (?) यज्ञ करतात. कुठल्यातरी तथाकथित संन्याशाचं प्रवचन घडवून आणतात आणि आपला भ्रष्टाचाराचा धंदा अबाधित चालू ठेवतात.

सहज प्रश्न मनात येतो, कुठं आहे तो देव ? सुदाम्याचे पोहे खाणारा वत्सल देव, प्रेमळ देव, शबरीची उष्टी बोरं खाणारा दयाळू देव कधीतरी कुणाला दिसला आहे का ? संगमरवरी मंदिरात, वैभवशाली देव्हाऱ्यात, अलंकारांनी मढलेल्या मूर्तीत तो कसा असू शकेल ? भारत हे एके काळी आध्यात्मिक राष्ट्र असेलही. आज भ्रष्टाचारी प्रवृत्तींनी ते अंतर्बाह्य बरबटलेलं आहे. अध्यात्म उरलेलं नाही. स्वार्थाचे, सत्तेचे आणि संपत्तीचे इथं देव्हारे माजवले आहेत. कोणताही परमेश्वर असल्या राष्ट्राला वाचवू शकेल असं मला वाटत नाही. 'देवाच्या मदतीस चला तर' असं केशवसुतांनी म्हटलं होतं त्याची आठवण होते.

माझ्या देवविषयक कल्पना मी स्पष्ट केल्या आहेत. त्या करताना कुणाच्या हळव्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर त्यांनी क्षमा करावी.

■■■

# समतेचा सूर आळवणारा संप्रदाय

प्रत्येक धर्मसंप्रदाय धर्मविचाराला समर्थ करण्याचा प्रयत्न करीत असतो. समाजात धार्मिक आचारविचार नसतील तर तो समाज आपलं व्यक्तित्व हरवून बसतो. धर्मभावना ही माणसाच्या मनात खोलवर रुजलेली असते. या भावनेला सुसंगत आणि सुव्यवस्थित रूप देण्यासाठी संप्रदायाची चौकट आवश्यक असते. कालांतरानं चौकट बळकट होते आणि तिच्यात सामावलेली तत्त्वदृष्टी मात्र धूसर व विरळ होत जाते. इतिहासाची साक्ष काढली तर अनेक धर्मविचार आजपर्यंत जगात उत्पन्न झाले. संप्रदाय उभे राहिले आणि पुढे कालप्रवाहाबरोबर वाहूनही गेले. धर्मभावनेचा मूळ पाया बलिष्ठ असेल तर धर्मसंप्रदाय दीर्घकाळ समाजजीवनाला तात्त्विक आणि भावनिक आधार देतात. धर्म ही समग्र जीवनाला व्यापणारी एक उदार जीवनदृष्टी आहे. धर्म म्हणजे केवळ पारलौकिक विचार असं समजणं मुळातच चुकीचं आहे. श्रेष्ठ प्रतिभावंतांनी जीवनाचं केलेलं सखोल चिंतन आणि त्यातून काढलेले निष्कर्ष म्हणजे धर्म, असा मी अर्थ करतो. हा धर्म ईश्वरकल्पनेशी निगडित असेल किंवा नसेल, तो माणसाच्या जीवनाला सशक्त करणारा असावा. माणसाचं आणि सर्व प्राणिमात्रांचं आत्यंतिक कल्याण हेच धर्माचं आणि त्यातील संप्रदायांचं उद्दिष्ट असतं. केवळ कर्मकांडात, होमहवनात आणि जपजाप्यात धर्म गुंतून पडत नाही. कर्मकांडी धर्म मनुष्याला उदारतेकडे घेऊन जायला असमर्थ ठरतात, असा इतिहास आहे. या दृष्टीनं आज महाराष्ट्रात जे धार्मिक संप्रदाय लोकमनावर प्रभाव पाडत आहेत. त्यांच्याकडे चिकित्सक दृष्टीनं पाहिलं पाहिजे.

भागवतधर्माच्या अंतर्गत असलेला वारकरी पंथ किंवा संप्रदाय हा महाराष्ट्रातला सर्वाधिक लोकप्रिय संप्रदाय आहे, असं दिसतं. त्याचे लक्षावधी अनुयायी महाराष्ट्रात आणि अन्य प्रांतातही पसरले आहेत. वारकरीपंथाची नेमकी उत्पत्ती केव्हा झाली, याबद्दल इतिहास मौन बाळगून आहे. भाविकांच्या मते हा पंथ अतिप्राचीन आहे. त्याला आदि व अंत नाही. हे श्रद्धाळू भाविकांचं म्हणणं आहे.

जेव्हा नव्हते चराचर। तेव्हा होते पंढरपूर।
जेव्हा नव्हत्या गोदागंगा। तेव्हा होती चंद्रभागा॥

श्रद्धेच्या पोटी ही अतिशयोक्ती जन्माला आलेली आहे. एक वेगळा पुरावा उल्लेखिण्यात येतो. संत बहिणाबाईंनी सतराव्या शतकात लिहिलेला एक अभंग उद्धृत केला जातो.

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया॥
नामा तयाचा किंकर। तेणे रचिले ते आवार॥
जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत॥
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश॥

यात वारकरी संप्रदायाचा आरंभ, विस्तार आणि विकास सांगितलेला आहे. भागवत धर्ममंदिराची उभारणी कशी झाली याचं हे अलंकारिक वर्णन आहे. पण संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला हे विधान ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर नाही. संत ज्ञानेश्वरांच्या कुळातच पूर्वीपासून पंढरीची वारी करण्याची प्रथा होती. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत अनेक वर्षे वारी करीत असत. पंढरपूरला विठ्ठल मंदिर केव्हा उभारलं गेलं याबद्दलही विश्वसनीय उल्लेख इतिहासात आढळत नाही. एका आख्यायिकेत पुंडलिकाचा उल्लेख आहे; पण भक्त पुंडलिकाचा काळ कोणता हे सप्रमाण सांगता येत नाही. इतकंच म्हणता येईल की, ज्ञानेश्वरांच्या पूर्वी निदान तीन-चार शतके तरी वारकरी संप्रदायाला आकार येत गेला. संप्रदायाचा जन्म लोकमानसात होतो. लोकशक्तीमुळे संप्रदायाचं माहात्म्य वाढतं. कोणीतरी एकमेव संतपुरुष पंथाची उभारणी करतो असं मानणं सयुक्तिक नाही.

वारकरी या शब्दाचा अर्थ 'पंढरीची वारी करणारा तो वारकरी' असा करण्यात येतो. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला नियमानं विठ्ठलाचं दर्शन घेणं हा वारकऱ्यांचा आचारधर्म आहे. लक्षावधी वारकरी हातात भागवत धर्माची पताका घेऊन आणि ओठी विठ्ठलाचं नाव घोळवीत भाविकतेनं पंढरपूरला येतात. हे दृश्य केवळ वारकऱ्यांच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या संस्कृतीवर प्रकाश टाकणारं आहे. या असंख्य वारकऱ्यांत समाजातल्या सर्व स्तरांतले स्त्री-पुरुष एकत्रित झालेले असतात. भजन, कीर्तन, गायन, प्रवचन आणि नामघोष यात बुडालेला प्रचंड भक्तसमूह वारीच्या वेळी पाहायला मिळतो. चंद्रभागेचा प्रवाह आणि भक्तांचा प्रवाह हातात हात घालून पंढरीला प्रदक्षिणा घालतात. वारकरी पंथानं

महाराष्ट्राला समतेचा आणि ममतेचा उदात्त वस्तुपाठ दिला आणि महाराष्ट्राच्या बुद्धिवादाला भक्तिभावनेची जोड दिली. इतर धर्मपंथ आणि वारकरी पंथ यांतला स्पष्ट जाणवणारा एक फरक असा की, वारकरी पंथानं समतेची ध्वजा उंच उचलून धरली. चंद्रभागेचं पाणी ज्याप्रमाणे सर्वांना खुलं आहे त्याप्रमाणं या पंथाचं महाद्वार सर्वांना मोकळं आहे. इथं कोणताही भेद नाही. 'तुका म्हणे नाही जातीसवे काम। ज्याचे मुखी नाम तोचि धन्य।' भेदाभेदभ्रम अमंगळ आहे असं निःसंदिग्धपणे उद्घोषित करणारा हा पंथ माणूसपणाचा आणि माणसाच्या प्रांजल भक्तीचा सत्कार करतो. अन्य पंथात समता आणि ममता ही मूल्यं जरूर आहेत. पण त्या मूल्यांचा वारकरी पंथाइतक्या उत्कटतेनं त्यांनी जयघोष केलेला आढळत नाही.

समर्थ संप्रदायात ब्राह्मण आणि क्षत्रिय यांना महत्त्वाचं स्थान आहे. दत्त संप्रदायात सोवळ्या-ओवळ्याचं कर्मकांड विशेषत्वानं दिसतं. महानुभाव पंथाने जात आणि वर्ण यांच्या सीमा पुसून टाकण्याचा साहसी प्रयत्न केला. पण महानुभावीय आचार्य पंडित आणि कवी नामदेव-तुकारामांसारखे जनसामान्यांत फारसे मिसळले नाहीत. या प्रकारच्या मर्यादा पडल्यामुळं हे संप्रदाय मोठ्या प्रमाणात वाढू शकले नाहीत.

'जे जे भेटे भूत। ते ते जाणिजे भगवंत' असं म्हणणारा वारकरी पंथ हा भागवत धर्माच्या उज्ज्वलतेची साक्ष देतो. वारकरी पंथामुळं महाराष्ट्राच्या जीवनदृष्टीत जी पुरोगामी उदारता आली आहे तिच्याकडे संशोधकांनी लक्ष दिलं पाहिजे. सामान्य माणसाची सुखदुःखं समजून घेण्याची प्रेमळ वृत्ती हे या पंथाचं वैशिष्ट्य आहे. या पंथातले लेखक-कवी पाहिले तर ते सामान्य आणि उपेक्षितांतून आलेले दिसतात. ज्ञानेश्वर आणि एकनाथ हे ब्राह्मण (ज्ञानेश्वरांनाही ब्राह्मण्याचा अधिकार मिळाला नाही आणि एकनाथांनाही सनातनी धर्मपंडितांनी सतत विरोध केला.) पण नामदेव, चोखामेळा, सावतामाळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी, सोयराबाई, कान्होपात्रा, जनाबाई, तुकाराम हे सर्वजण सामाजिकदृष्ट्या खालच्या थरांतून आलेले संत आणि कवी होते. मराठी भाषेचं साहित्य यांच्याच वाणीनं संपन्न झालेलं आहे. ग्यानबा-तुकाराम आणि नामा-जना, चोखा आणि सावता हे वजा केले तर मराठी साहित्य कोणत्याही अर्थानं श्रेष्ठतेच्या पातळीपर्यंत पोहोचणं शक्य नाही. महाराष्ट्राची सुख-दुःखांची गाणी वारकरी पंथातल्या या संतांनी आत्मप्रत्ययानं गायिली आणि लोकजीवनाला आकार दिला. या संतांनीच समाज

घडवला आणि सामाजिक एकतेचा संदेश लोकमनापर्यंत नेला असं विधान करता येतं यात अतिशयोक्ती नाही. 'कुळ, जाति, वर्ण। हे आघवेचि गा अकारण' हा विचार वारकरी पंथानं सर्वत्र नेला. संत नामदेवांचं कीर्तन म्हणजे प्रबोधनाचं व्यासपीठ होतं. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी॥' हीच भागवतधर्माची म्हणजे वारकरी संप्रदायाची भूमिका होती. चंद्रभागेच्या वाळवंटात नामदेवांच्या कीर्तनात अठरापगड जातिजमातीचे लोक सहभागी होत असत. ज्ञानेश्वर नावाचा ब्राह्मण आणि चोखामेळा नावाचा महार या कीर्तनात एकमेकांना उराउरी भेटत असत. हेच दृश्य तुकोबांच्या कीर्तन-प्रवचनात प्रकर्षाने दिसत होतं. तुकोबांचं शिष्यत्व काही ब्राह्मणांनीही स्वीकारलं होतं. गुरू हा कोणत्या वर्णाचा आहे ? या चिकित्सेत रस नसणारे प्रबुद्ध भक्त वारकरी संप्रदायानं निर्माण केले. नीच यातीचा गुरू करू नये, तो उच्च वर्णाचाच असावा असा काही लोकांनी दृढ केलेला विचार वारकरी पंथानं समूळ नष्ट केला. रामेश्वरभट्ट यांच्यासारखा उच्चवर्णीय तुकोबांच्या पायावर माथा टेकतो, हे दर्शन सामाजिक प्रगतीचं द्योतक आहे. परमेश्वर भक्तीची सनद वारकरी पंथानं सर्वांना दिल्यामुळं खालच्या वर्गातले लोक आनंदित झाले. आपली याती हीन आहे, आपण ईश्वरी कृपेला वंचित झालो आहोत, हा न्यूनगंड नाहीसा झाला. भक्तीचा अधिकार ही एखाद्या वर्गाची मिरास नव्हे, ज्याच्या मनी भाव असतो, त्याला देव भेटतो, हा आत्मप्रत्यय शूद्रातिशूद्रांच्या मनात जागवण्याचं महनीय कार्य या पंथानं केलं.

सामान्य मनुष्य आध्यात्मिक विचार, देव आणि धर्म यांच्यापासून वर्षानुवर्षे दुरावलेला होता. त्याच्या जीवनात विठ्ठलाची भक्ती रुजवून त्याला कर्मप्रवृत्त करण्याची कामगिरी वारकरी पंथाच्या तत्त्वदृष्टीमुळं होऊ शकली. सामान्यातल्या सामान्य माणसाशी नातं जोडण्याचं कार्य सर्वच वारकरी संतांनी केलं. जनाबाईसारखी नामयाची दासी आपल्या अभंगांतून विठ्ठलाशी जी उत्कट जवळीक दाखवते, ती पाहिल्यावर वारकरी पंथ हा सामान्य माणसाच्या उद्धरणासाठी प्रयत्न करणारा एकमेव पंथ आहे, हे लक्षात येतं. देव आणि भक्त यांच्यातलं नातं अधिक मोकळं, प्रेमळ आणि विश्वासपूर्ण झाल्याचं चित्र संतांच्या काव्यात दिसतं. वारकरी पंथानं ज्ञानाला भक्तीच्या खालचं स्थान दिलं आहे. भक्ती हीच माणसाला तारणारी शक्ती म्हणून ज्ञानाचं अवडंबर संतांनी माजवलं नाही. हा शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, सामान्य स्थितीत राहणाऱ्या स्त्री-पुरुषांचा पंथ बनला पण या पंथातही प्रज्ञा आणि

प्रतिभा यांचा आविष्कार करणारे कवी व कवयित्री यांचा मोठा सहभाग होता.

वारकरी पंथात 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत' आणि 'तुकोबांची गाथा' हे प्रमुख ग्रंथ मानले जातात. वारकऱ्यांची प्रस्थानत्रयी असं या ग्रंथांना संबोधण्यात येतं. उत्तम साहित्याचे जे निकष मानले आहेत. त्यांच्या आधारानं हे ग्रंथ म्हणजे मराठी साहित्याचे अपूर्व अलंकार आहेत असं म्हणता येतं. या ग्रंथांची लोकप्रियता केवळ वारकऱ्यांपुरतीच मर्यादित नाही. कोणत्याही जातिधर्माच्या साहित्यरसिकाला आकृष्ट करून घेण्याचं सामर्थ्य या काव्यात आहे. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्याशी तुलना होऊ शकेल असे कवी मराठीत अजून तरी आढळत नाहीत. हे विधान भाबडेपणानं केलेलं नाही. उत्कृष्ट साहित्याची निर्मिती ज्ञानापेक्षा उत्कट भावनेतूनच होऊ शकते, हे यातून सिद्ध होतं.

काही धर्मपंथ निवृत्ती आणि संन्यास यांचा पुरस्कार करतात. वारकरी पंथ मात्र प्रवृत्तिवादी आणि कर्मयोगाची शिकवण देणारा आहे. मोक्षप्राप्तीसाठी, देवाच्या साक्षात्कारासाठी घरदार सोडून रानावनात जावं लागत नाही. 'न लगे जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण' आपापलं कर्म करण्यातच मुक्तीचा आनंद सामावलेला आहे. संत सावतामाळी आपल्या काव्यात म्हणतात-

कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।
लसूण मिरची कोथिंबिरी। अवघा माझा श्रीहरी॥

माझ्या मळ्यातच तो विठ्ठल मला भेटू शकतो. मी माझं काम निष्ठेनं केलं तर माझ्या भक्तीच्या मळ्यात विठ्ठल वस्तीला येतो.

प्रत्येक संतकवीचे कर्मयोगाची प्रशस्ती करणारे अभंग वाचताना या वारकऱ्यांची दृष्टी कर्मपर आहे हे लक्षात येतं. हे जीवन म्हणजे केवळ माया आहे, म्हणून मायेचा पाश तोडून कुठेतरी रानावनात परमात्म्याचा शोध घेतला पाहिजे, असा विचार या पंथानं केलेला नाही. इहजीवनावर प्रेम करणारा आणि या जीवनातच भक्तीच्या माध्यमातून व कर्मयोगातून परमात्म्याला भेटता येऊ शकतं, हे पुरुषार्थवादी तत्त्वज्ञान खरोखरच महत्त्वाचं आहे.

वारकरी पंथानं संन्यासवादाचं बंड मोडलं. कर्मप्रवृत्तीला बळ दिलं. भावभक्तीतून विठ्ठल आत्मसात करता येतो हे सांगितलं. जात आणि वर्ण यांच्या अहंकाराला छेद दिला. समता विचाराची प्रतिष्ठा वाढवली. समाजाच्या सामान्य स्तरांतून सुद्धा भक्त आणि कवी निर्माण केले. त्यामुळं महाराष्ट्रातल्या धर्मजीवनात

आणि समाजमनात एक प्रकारची क्रांती घडून आली. प्रा. श्री. म. माटे यांनी 'आध्यात्मिक लोकशाही' असा शब्दप्रयोग या संदर्भात केला आहे. त्याचं मर्म समजून घेतलं पाहिजे.

वारकरी पंथानं भक्तीच्या क्षेत्रात समतेची मुहूर्तमेढ उभी केली. तरी त्यानं सामाजिक समतेच्या दिशेनं काहीच पावलं उचलली नाहीत अशा आशयाची टीका कित्येक समीक्षकांनी केली आहे. याला उत्तर देताना मी असं म्हणेन की, तेराव्या शतकापासून वारकरी पंथानं समतेचा ध्वज उचलून धरला. त्यांनी जातिव्यवस्था मुळातच मोडून काढली नाही, याचं कारण ही व्यवस्था शेकडो वर्षांपासून लोकमनात खोलवर जाऊन रुजलेली होती. ती पूर्णपणे उपटून काढणं शक्य नव्हतं. आणि त्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इष्टही नव्हतं. जातिपातीच्या ताणलेल्या तीव्र कल्पना शिथिल करून माणसांना प्रेमभावनेनं एकत्र जोडण्याचं रचनात्मक काम संतांनी केलं. एखादी क्रांतिकारक उडी घेणं त्या काळात अशक्य होतं. महानुभाव पंथाचं उदाहरण वारकरी संतांपुढं निश्चित होतं. महानुभावीय चक्रधरानं वर्णव्यवस्था समूळ उखडण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी ठरला. वारकरी पंथामुळं भक्तीच्या क्षेत्रात तरी समता विचाराला स्थैर्य आलं. चोखामेळ्यासारखा शूद्र संतदेखील भक्तीच्या बळावर श्रेष्ठ संतांच्या मालिकेत गुंफला गेला. याचा अर्थ सामाजिक समतेकडं समाजमन हळूहळू वाटचाल करू लागलं. आज एकविसाव्या शतकातही सामाजिक समता अस्तित्वात आलेली नाही. याचा अर्थ विषमतेची मुळं अत्यंत चिवट आहेत. फुले, आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, भाऊराव पाटील यांच्यासारखे क्रांतिकारक नेते समतेची चळवळ अनेक वर्षे उभी करीत राहिले. पण पूर्ण यश अद्यापि आलेलं नाही. अशा स्थितीत वारकरी पंथानं ममतेच्या बळावर समतेकडं केलेली वाटचाल महत्त्वाची मानली पाहिजे. फुले, आंबेडकरांचा रस्ता संतांच्या कार्यातून तयार झाला हे इतिहासाला मान्य करावं लागेल.

वारकरी पंथ हा वैदिक धर्मांतर्गत पंथ आहे. त्यानं शास्त्रप्रामाण्याची चौकट मोडून काढली नाही. पण ती चौकट अधिक रुंद करून ती सर्वसमावेशक कशी होईल हे पाहिलं. ज्ञानेश्वरांच्या मते वेद कृपण असल्यामुळं त्यांनी केवळ त्रैवर्णिकांचीच काळजी घेतली. चौथा वर्ण उपेक्षित ठेवला. या चौथ्या वर्णासाठी वारकरी पंथानं नामसाधनेचं आणि भक्तीचं महाद्वार पूर्णपणे खुलं केलं. वैदिकांच्या समाजशास्त्रापेक्षा वारकऱ्यांचं समाजशास्त्र अधिक पुरोगामी आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात

या पंथाचं स्थान अनन्यसाधारण महत्त्वाचं आहे. रंजल्या-गांजल्यांना वात्सल्यानं पोटाशी धरणारा हा पंथ म्हणजे मानवतेचा उच्च आविष्कार आहे.

आता या पंथाच्या उपास्य दैवताबद्दल अधिक लिहीत नाही, कारण विठ्ठलाची जनमानसातली प्रतिमा इतकी अभंग आहे की, तिच्याविषयी नव्यानं सांगण्यासारखं काही नाही. हा विठ्ठल स्त्री-शूद्रांना जवळ घेणारा आणि त्यांच्या सुखदुःखात सहभागी झालेला देवतात्मा आहे ही बहुसंख्य लोकांची कित्येक शतकांपासूनच श्रद्धा आहे. हा दीनदलितांचा, वंचितांचा आणि दुःखितांचा उद्धारकर्ता आहे. तो सर्वव्यापी असल्यामुळं प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयात राहतो. हा विचार या पंथानं सांगितला आहे.

प्रत्येक वारीला पंढरपूरला जाऊन त्याचं दर्शन घेणं हा व्रतनियम पंथात महत्त्वाचा मानला जातो. एकदा पंथाची तुळशीमाला गळ्यात घातली की, वारकऱ्यानं आमरण ती काढायची नाही. त्यानं सत्य, संयम, शालीनता, क्षमाशीलता यांचं पालन करायचं, मद्यपान आणि मांसाहार पूर्णपणे निषिद्ध मानायचा. 'रामकृष्णहरी' या मंत्राचा नित्य जप करायचा. या प्रकारचे नियम वारकऱ्यांना पाळावे लागतात. जीवनाला शुद्ध करणाऱ्या आणि समाजाला एकत्र जोडणारा हा वारकरी पंथ म्हणजे महाराष्ट्र संस्कृतीची अमूल्य ठेव आहे. या पंथाचा प्रवाह सर्वांनाच शुचिर्भूत होण्यासाठी खुला आहे.

प्रस्तुत लेखात वारकरी पंथानं समतेचा ध्वज उभारला असं जे विधान करण्यात आलं आहे त्याला काही अंगभूत मर्यादा आहेत हे लक्षात घेतलं पाहिजे. या पंथानं शास्त्रप्रामाण्याला धक्का लावलेला नाही. विषमतेच्या साऱ्या भिंती नष्ट कराव्यात आणि सामाजिक जीवनात विषमता राहू नये या दृष्टीनं संतांनी प्रयत्न केलेले नाहीत. केवळ आध्यात्मिक क्षेत्रात त्यांनी समता आणि ममता ही मूल्यं प्रामाणिकपणे पुरस्कारली. सारे भेदाभेद हे अमंगळ भ्रम आहेत असं सर्व संत मानत होते, तसा प्रचार करीत होते. पण हे भक्तीच्या क्षेत्रापुरतं सीमित होतं. सामाजिक न्यायासाठी वारकरी पंथानं लढा उभारला नाही. हजारो-लाखो वारकरी वारीत एकत्र येत होते. पण ते आपापल्या गावी गेले की- समतेचा विचार जो मुळातच मंद होता तो आणखी क्षीण होऊन- विषमतेची कुंपणं लोकमनात पुन्हा नव्या जोमानं उभी राहत असत. वारकरी पंथानं आणि संतांनी सामाजिक क्रांतीसाठी संघर्ष केला नाही; पण भक्ती आणि अध्यात्म या क्षेत्रात त्यांनी समतेचा ध्वज

निश्चित उभारला. सामाजिक समतेच्या दृष्टीनं टाकलेलं हे पहिलं पाऊल ठरलं. जातीय आणि वर्णीय विषमतेची धार बोथट करण्याचं आणि धर्माच्या नावाखाली भक्तीच्या दालनात भिन्नभिन्न जातिजमाती या पंथामुळं एकत्रित येऊ शकल्या.

मध्ययुगाच्या पार्श्वभूमीवर माणसाचं माणूसपण अधोरेखित करण्याचं हे कार्य निश्चित पुरोगामी आहे यात संशय नाही. महानुभाव आणि बारकरी हे दोन पंथ इतर पंथांच्या तुलनेत अधिक उदार आणि समावेशक वृत्तीचे होते. त्यांच्या कार्यामुळं महाराष्ट्र प्रगत विचाराकडं वळला. आणि समतेची भूमिका अधिकाधिक स्पष्ट होऊ लागली. सामाजिक समतेच्या आचारविचारांकडं लोकमन स्वच्छ दृष्टीनं हळूहळू पाहू लागलं. याचं श्रेय जसं महानुभावांना देता येतं तसंच ते वारकरी पंथाच्या प्रवक्त्यांना आणि प्रचारकांना देणं उचित आहे. या पंथानं सामाजिक क्रांती केली नाही; पण समतेचा विचार आपल्या जीवनातून आणि साहित्यातून फार परिणामकारक रीतीनं सांगितला. त्यातूनच समतेच्या तत्त्वाला उजाळा मिळाला. तेराव्या शतकापासून पुढे चारशे वर्षे वारकरी पंथानं समता आणि बंधुभाव यांची आपल्या विशिष्ट शैलीनं शिकवण दिली. त्यांनी आदळआपट केली नाही. जुनी परंपरा जाळून टाकण्याची अतिरेकी भाषा या पंथानं योजली नाही. प्रगतीचं एकेक पाऊल टाकताना समाजात विस्कळीतपणा येऊ नये याचीही दक्षता घेतली. ही दक्षता महानुभाव पंथातल्या चक्रधरांनी आणि गोविंदप्रभूंनी घेतली नव्हती. लोकांचं मन एकदम नव्या मार्गाकडं वळवता येत नाही. ते पूर्वापार चाकोरीनंच चालत असतं. कर्नाटकात देखील महात्मा बसवेश्वराचा सामाजिक समतेचा विचार एकाएकी स्वीकारला गेला नाही. महात्मा बसवेश्वराच्या चळवळीला तिथं कडवा विरोध झाला. आपल्याकडेही ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम या प्रबोधनवादी संतांना, सनातन्यांनी विरोध केलाच होता. पण आपल्या शांत वृत्तीनं त्यांनी विरोधाची धार हळूहळू बोथट केली. लोकमनावर या संतांच्या ममतावादी व समतावादी विचारदृष्टीचा प्रभाव वाढत गेला. त्यातूनच वारकरी संप्रदाय अधिक लोकप्रिय झाला. त्याची मुळं बहुजनसमाजात आणि दलित समाजातही खोलवर गेली. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेदभ्रम अमंगळ.' ही भूमिका वारकरी पंथाची आधारशिला बनली. समतेचा ध्वज अधिकाधिक उंचावत गेला. वारकरी पंथानं केलेलं हे कार्य ऐतिहासिक स्वरूपाचं आहे.

■■■

# जगाला प्रेम अर्पावे

मी साने गुरुजींचं एकच व्याख्यान ऐकलं. त्यावेळी मी कॉलेजात पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी असेन. साहित्य हा माझ्या आवडीचा विषय. गुरुजींची बरीच पुस्तकं वाचलेली होती. त्यामुळं त्यांच्या व्याख्यानाचं मला आकर्षण होतं. गुरुजी व्यासपीठावर आले. त्यांच्या दर्शनी व्यक्तित्वात कसलंही आकर्षण नव्हतं. पोशाख अगदी साधा. गबाळग्रंथी वाटावा असा. मुद्रा गंभीर. हळू आवाजात त्यांनी भाषणाला सुरुवात केली. सुरुवातीचे शब्दही फारसे वेधक वाटले नाहीत. चार-सहा वाक्यं बोलल्यानंतर त्यांच्या शब्दांना वेग आला. आवाजातला संथपणा कमी होऊन काहीशी चमक आली. त्यातल्या चढ-उतारावरून त्यांच्या मनातल्या भावनिक खळबळीचा अंदाज येऊ लागला. देशातल्या दुःस्थितीचं चित्र त्यांनी परिणामकारक शब्दांतून मांडलं. त्यांच्या साध्या शब्दांत विचार आणि भावना यांचं अस्वस्थ करणारं एक रसायन श्रोत्यांना जाणवत होतं. गुरुजी काळजापासून बोलत होते. त्यामुळंच त्यांचे शब्द आमच्या काळजाचा ठाव घेत होते. बोलता-बोलता ते भावनावश झाले आणि म्हणाले, 'ही सारी भीषण अवस्था पाहिल्यावर मी का जगतो आहे हा प्रश्न मला पडतो. असं वाटतं की एक दिवस आपल्या देहाचं हे मडकं फोडून टाकावं. गरिबांचा आक्रोश, पायदळी पडलेल्यांच्या किंकाळ्या किती ऐकायच्या ? एक दिवस देहाचं मडकं फोडून टाकावं.'

गुरुजींचा प्रत्येक शब्द त्यांच्या जिवाची तडफड घेऊन प्रकट होत होता. ते भाषण म्हणजे त्यांच्या खोल वेदनेचं आविष्करण होतं. प्रत्येक शब्द म्हणजे अश्रूंचा थेंब होता. आज इतक्या वर्षांनंतरही गुरुजींची ती काळीसावळी मूर्ती आठवते. त्यांचे शब्द अजूनही मनात घर करून राहिले आहेत. पुढे एके दिवशी वृत्तपत्रात त्यांच्या मृत्यूची बातमी वाचली. आपल्या देहाचं मडकं त्यांनी आपल्याच हातांनी फोडून टाकलं होतं. कित्येक दिवस त्यांच्या अशा आत्मघाताची चर्चा साऱ्या महाराष्ट्रात होत होती. स्वतः होऊन त्यांनी मरणाला आमंत्रण द्यावं हे योग्य की अयोग्य याचा निर्णय आजही मी करू शकत नाही. पण कोणत्याही व्यक्तिगत स्वार्थासाठी गुरुजींनी प्राणत्याग केला नव्हता. हा 'आत्मयज्ञ' होता. स्वतःचीच आहुती याज्ञिकानं यज्ञात

टाकली होती. देशाची ढासळत चाललेली परिस्थिती आणि माणसाचं होणारं अन्यायी शोषण त्यांना पाहवत नव्हतं. या आत्माहुतीबद्दल आणखी काय सांगावं ? एका थोर विचारवंत साहित्यिकाचं जीवन आता काळाच्या ओघाबरोबर दूरवर वाहून गेलं आहे. एका अर्थानं आपल्या जीवनाला त्यांनीच पूर्णविराम दिला हे बरं झालं. नाहीतर एकापेक्षा एक भयानक धक्के त्या आत्म्याला सहन करावे लागले असते.

साने गुरुजींची उत्कट भावशक्ती मी ऐकलेल्या त्यांच्या भाषणातून प्रकट झाली होती. याच भावनिक उद्रेकातून त्यांचं साहित्य निर्माण झालं. श्री. के. क्षीरसागर आणि ना. सी. फडके यांनी गुरुजींच्या वाङ्मयावर ते रडवं आणि ऊरबडवं, अकलात्मक असल्याचा आक्षेप घेतला होता. फडके हे लोकप्रिय कादंबरीकार होते. कॉलेजातील तरुण-तरुणींच्या प्रणयचेष्टितांची चटकदार वर्णनं करण्यात त्यांच्या लेखणीचं बळ खर्ची पडलं. वैषयिक प्रेमाची चित्रं त्यांनी रेखाटली. मध्यम वर्गीयांच्या आयुष्यक्रमाचं दर्शन त्यांच्या कादंबऱ्यांत होतं असं टीकाकारांचं मत आहे; पण या पांढरपेशा समाजालाही अनेक दुःखांनी वेढलेलं होतं. त्याच्या समस्यांचं दर्शन मात्र फडके करू शकले नाहीत. वास्तव जीवनातल्या दुःखांची जाण या कलावंताला झालीच नसावी. किंवा त्यांचं आकलन करून घेण्यासाठी त्यांच्या ठायी प्राथमिक दर्जाचीही समरसता नसावी. शेकडो कथा-कादंबऱ्या लिहूनही हा लेखक समाजजीवनापासून अलिप्तच राहिला. पलायनवादी साहित्याचा आदर्श नमुना म्हणून फडक्यांच्या कादंबऱ्यांकडे बोट दाखवावं लागेल. श्री. के. क्षीरसागरांची गुरुजींच्या लेखनावरची टीका पूर्वग्रहदूषित वाटते.

कोणताही थोर लेखक मानवी जीवितातल्या दुःखांना बगळून साहित्याची निर्मिती करू शकत नाही. दुःख आणि अश्रू म्हणजेच केवळ माणसाचं जगणं असा अतिरेकी सिद्धान्त मी मांडणार नाही. पण जीवनाला कडकडून मिठी मारणाऱ्या दुःखाच्या स्पर्शाशिवाय वास्तव साहित्य निर्माण होऊ शकणार नाही. त्याचं रेखाटन प्राधान्यानं गुरुजींनी केलं म्हणून ते 'रडवं साहित्य' आहे असा निष्कर्ष काढणं अतिशयोक्तीचं वाटतं. काल्पनिक सुखस्वप्नांपेक्षा वास्तव दैन्य-दुःखाचं दर्शन घ्यायला मानसिक धैर्य लागतं. आणि त्याचं चित्रीकरण धैर्यशाली लेखकच करू शकतो.

यावर कोणी अशी शंका घेईल की गुरुजी जर धैर्यशाली लेखक होते तर त्यांनी भ्याडपणानं आपल्या जीविताचा शेवट का करून घेतला ? प्रत्येक आत्महत्या

भ्याडपणाचीच असते असं मानणं वेडेपणाचं आहे. गुरुजींच्या मृत्यूमागे एक तत्त्वज्ञान आहे याचा विसर होऊ नये. व्यक्तिगत स्वार्थ साधत नाही किंवा व्यक्तिगत हानीच्या भीतीनं जीवनाचा अंत करणाऱ्या लोकांच्या मालिकेत गुरुजींसारखा विचारवंत लेखक बसवता येणार नाही. त्यांच्या नैराश्याला समाजजीवनाची पृष्ठभूमी होती. दोन वेळचा घासही ज्यांच्या तोंडात पडत नाही त्या असंख्य दीनदलितांच्या आयुष्यातलं कडवट वैफल्य त्या आत्मविसर्जनात सामावलेलं आहे. जे जग बदललं पाहिजे ते काही केल्या बदलत नाही या वंचनेनं व्याकूळ झालेल्या मनाला हे नासलेलं, किडलेलं जग सोडलंच पाहिजे. असं वाटलेलं आहे. ज्या तीव्र निराशेतून व्यासांनी आक्रोश केला होता त्याच निराशेचे चटके गुरुजींसारख्या आत्यंतिक भावनाशील माणसाला सारखे बसत होते. स्वतःच्या इच्छेनं जीवनाचा त्याग करणं नेहमीच भ्याडपणाचं असतं हा समज शहाण्या लोकांनी नीट तपासून घेतला पाहिजे. गुरुजींच्या जीवनत्यागाला एक वैचारिक बैठक आहे हेच ज्याला कळत नाही त्याला त्यांच्या साहित्यातल्या दुःखदर्शनाचा अर्थ कसा कळणार ?

साने गुरुजी स्वतःच्या जिवंत भावनेच्या नेत्रांनी जग पाहात होते. भावना हा त्यांच्या जीवनाचा आणि साहित्याचा श्वास होता. कल्पनेच्या रंगांनी ज्यांचं साहित्य भडक झालं आहे असे अनेक कथा-कादंबरीकार कलावादाचा झेंडा घेऊन साहित्याच्या प्रांगणात नाचत होते अशा वेळी जीवनाची बाजू घेऊन आपल्या भावबळावर गुरुजी लिहीत राहिले. त्यांचं बरंचसं साहित्य तुरुंगाच्या कोठडीत लिहिलं गेलं आहे. ज्या जगात वेदना आणि अश्रू यांचं नित्य दर्शन घडत होतं ते बंदिवासातलं आणि बाहेरचं जग उघड्या डोळ्यांनी गुरुजी न्याहाळीत होते. जगतही होते. जगण्यातूनच ज्यांचं लिहिणं आणि बोलणं जन्माला आलं अशा लेखकांच्या जातकुळीतले साने गुरुजी होते. शेतकऱ्यांचं आणि कष्टकऱ्यांचं उपाशी पोट ते पाहात होते. भुकेच्या पोटाची कहाणी त्यांनीही अनुभवली होती. असा लेखक आणि कवी जेव्हा कवितेच्या ओळी लिहील तेव्हा शेतकऱ्यांचं आणि कामकऱ्यांचं स्वतंत्र संपन्न झालेलं जग त्याच्या काव्याचा विषय होईल यात कसला संशय ? आशुक-माशुकांची इश्की गाणी जेव्हा पांढरपेशा कवी रचत होते तेव्हा सावकारशाही ठेवायची नाही असा आशावाद त्यांच्या कवितांतून प्रकट होत होता.

त्यांच्या वाङ्मयात रडवेपणा आहे अशी टीका करणाऱ्या टीकाखोरांनी त्यांच्या लेखनातून व्यक्त झालेल्या या कडवेपणाची दखल घेतली नाही. गुरुजींच्या

काव्यात धैर्य, आशावाद, उज्ज्वल स्वप्नांचे रंग आणि वीरत्वाला चेतना देणारे आश्वासन आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघानंही त्यांची गीतं आदरानं गायिली आहेत. सेवा दलाच्या आणि समाजवादी पक्षांच्या मेळाव्यात त्यांची गीतं मी ऐकली आहेत. गुरुजींच्या आशावादाला विचारांचा पीळ आणि बळ होतं.

'पत्री' हा त्यांचा काव्यसंग्रह खरोखरच अविस्मरणीय आहे. गेयता आणि ध्येयवादी विचार यांचा संगम साधलेले त्यांचे अर्थपूर्ण शब्द जेव्हा काव्याचं रूप धारण करतात. तेव्हा त्या शब्दांची शक्ती कानाला व मनाला जाणवते. 'पत्री' मधल्या कविता रडव्या किंवा दुबळ्या आहेत काय ? असा सवाल टीकाखोरांना विचारला पाहिजे. स्वातंत्र्याच्या चळवळीत उडी घेऊन अनेकवेळा तुरुंगवास पत्करणारा माणूस रडक्या मनोवृत्तीचा असू शकेल का ? पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराची दारं दलितांसाठी उघडलीच पाहिजेत या निर्धारानं प्राणांतिक उपोषण करणारा सत्याग्रही रडवा असतो काय ? गुरुजींच्या रूपानं मराठी साहित्यात एक नवी रचनात्मक शक्ती उदयाला आली आणि तिचा प्रवाह समाजाच्या सर्व वर्गात पडू लागला. हे चिडक्या साहित्यिकांना सहन होण्यासारखं नव्हतं. त्यामुळंच गुरुजींवर आक्षेप घेण्यात आले. अन्यथा त्यांच्या साहित्याचा प्रवाह शुद्ध, स्वच्छ व अस्खलित आहे हे सांगण्याचंही कारण नाही.

आमचे बहुतेक लेखक कवी पंख्याखाली टेबलखुर्चीवर लेखन करीत होते तेव्हा तुरुंगाच्या कोठडीत जमिनीवर बसून गुरुजी रात्रंदिवस लिहिण्यात गढलेले असायचे. त्यांच्या साहित्याला कष्टकऱ्यांच्या घामाचा आणि दुःखितांच्या अश्रूंचा वास येतो. त्या अश्रूंत गुरुजींचेही अश्रू मिसळलेले आहेत. शाईनं लिहिणारा लेखक आणि अश्रूंनी लिहिणारा लेखक यांच्यात केवढंतरी अंतर असतं. हे अंतर कित्येक साहित्यिकांनाही कळलं नाही. माझ्या दृष्टीनं साने गुरुजी हा मराठी साहित्यातला एक संत आहे. आणि या संतानं आपल्या हृदयस्थ शब्दांतून जे सारस्वत निर्माण केलं त्याची मीमांसा बुद्धीपेक्षा अंतःकरणानंच केली पाहिजे. साहित्यशास्त्राच्या ग्रांथिक फूटपट्ट्या लावून त्यांच्या वाङ्मयाची लांबी-रुंदी कळणार नाही. गुरुजींच्या वाङ्मयाची श्रीमंती पुस्तकी कंगालांना कशी कळेल ?

आपल्या आयुष्यात गुरुजींनी बहुविध स्वरूपाचं लेखन केलं. त्यांनी कथा-कादंबऱ्या लिहिल्या. काव्यनिर्मिती केली. वैचारिक ग्रंथ लिहिले. अनेक पुस्तकांचे

अनुवाद केले. आणि बालकांसाठी विपुल कथा लिहिल्या. मूल पाहिलं की गुरुजींचं हृदय फुलासारखं उमलून यायचं. मग ते कुणाला गाणं गाऊन दाखवतील, कुणाला गोष्ट सांगून त्याचं रंजन करतील. रडणाऱ्या बालकाचे अश्रू टिपताना ते जणू त्याची आई व्हायचे. आईचं वात्सल्य त्यांच्या मनी दाटलेलं असायचं. त्यांच्या मनाला दुष्टपणाचा अल्पांशही कधी स्पर्शू शकला नाही. त्यामुळंच त्यांच्या साहित्यात दुष्प्रवृत्तीचं चित्रण सापडत नाही. सारं जग प्रेमळपणानं ओथंबलेलं असावं हे त्यांचं चिरवांछित स्वप्न होतं. माणसावर आणि साऱ्या जगावर, झाडाझुडुपांवर, पशुपक्ष्यांवर त्यांचं प्रेम असायचं. इतकं की या प्रेमधर्मी लेखकाला प्रेममूर्ती असं संबोधण्यात काहीही अतिशयोक्ती नाही. कठोर आणि कुटिल शब्दांनी त्यांनी आयुष्यात कोणाला दुखावलं असेल अशी कल्पनाही करता येत नाही. पण म्हणून त्यांच्या हळवेपणाला दुबळेपणा ही संज्ञा देणं उचित ठरणार नाही. अन्याय आणि अत्याचार याबद्दल विलक्षण घृणा असलेला हा लेखक अन्यायी प्रवृत्तीविरुद्ध बंड करून उठायचा तेव्हा या फुलात वज्राचाही कणखरपणा आहे याची जाणीव व्हायची.

करुणा, सेवा आणि प्रेम यांच्या रसायनांतून घडलेलं हे व्यक्तित्व पुष्कळांना नीट समजून घेता आलं नाही. त्यामुळंच गुरुजी म्हणजे एक भावडे आणि दुबळे शिक्षक आहेत इतकंच मर्यादित मूल्यमापन कित्येकांनी केलं. पण गुरुजींच्या निश्चयी कठोरतेचा आणि अतूट तत्त्वनिष्ठेचा प्रत्यय त्यांनी केलेल्या प्राणांतिक उपोषणाच्या वेळी आला. गांधीजींनी देखील उपोषण सोडण्याची सूचना त्यांना केली होती. पण गुरुजींनी ती नम्रतेनं नाकारली. साऱ्या महाराष्ट्रात गुरुजींच्या या सत्याग्रहानं प्रचंड खळबळ उडाली. पांडुरंगाच्या मंदिराचं दार दलितांसाठी उघडलं जावं म्हणून दुसरा पांडुरंग त्याच्या दाराशी रात्रंदिवस धरणं धरून बसला. अखेर मंदिराचे विश्वस्त हरले. शेकडो वर्षे ज्या विठ्ठलाच्या दर्शनाला दलित जनता वंचित झाली होती तो विठ्ठल आता तिला डोळांभरून दर्शन देऊ लागला.

ही विसाव्या शतकातली क्रांतिकारक घटना आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात या क्रांतीची दिव्य अक्षरं साने गुरुजींनी आपल्या हातानं लिहिली. तळमळणारे भक्त आणि आसुसलेला देव यांची भेट गुरुजींनी करवून दिली हेही त्यांच्या प्रतिभादृष्टीनं केलेलं एक विलक्षण कार्य आहे. महाराष्ट्राचा धार्मिक आणि सामाजिक इतिहास विठ्ठलमंदिराभोवती फिरत होता. आता गुरुजींमुळे त्या इतिहासाला उदार व्यापकतेचं अधिष्ठान मिळालं. मराठीतल्या कोणत्याही लेखक-

कवीनं सामाजिकच क्रांतीचं निशाण साहसानं इतक्या उंचावर फडकावलं नव्हतं. साहित्यातून क्रांतिकारक विचार अभिनिवेशानं मांडणारे लेखक आणि विचारवंत आपल्या घराच्या सुरक्षित भिंतीत राहत होते. कोणत्याही सामाजिक किंवा राजकीय चळवळीत ते उतरले नाहीत. स्थैर्य आणि सुखवाद यांना धक्का न लागता केवळ शब्दांतूनच विचार व्यक्त करणं त्यांना सोयीचं होतं. पण याबद्दल या मध्यमवर्गीय स्थितीवादी लेखकांना दोष देण्यात अर्थ नाही. एखाद्या चळवळीत सक्रिय होण्यासाठी त्याग आणि सेवा ही मूल्यं रक्तात असावी लागतात. आमचे बहुतेक साहित्यिक शब्दशूर होते. पण साने गुरुजी कृतीच्या पातळीवर उतरून संघर्ष करीत होते. तुरुंगाच्या वाऱ्या करीत होते. समाज आणि देश यांच्यासंबंधी जी अतूट प्रेमभावना त्यांच्या मनात उचंबळत होती ती त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. आपल्या आयुष्यात त्यांनी कधीही निष्क्रिय सुखवादी भूमिका घेतलेली नाही. पांडित्याचे शब्द लिहून केवळ सुखासीन जीवन जगण्याचा मोह या लेखकाला कधीही झाला नाही. संतांच्या जीवितात जी सेवेची उत्कट ऊर्मी असते तिचीच प्रेरणा या संतवृत्तीच्या साहित्यिकात प्राधान्यानं होती. 'बुडता हे जन न देखवे डोळा' ही तुकारामांची वृत्ती या पांडुरंगात पुरेपूर होती. खेड्या-पाड्यांतल्या जनतेशी आणि बालकांशी समरस होणारी गुरुजींची भावशक्ती इतर बुद्धिजीवी आणि बुद्धिवादी लेखक-कवींत अभावानेच होती.

गुरुजींचं साहित्य हे प्रेमभावनेचं सुंदर आणि समर्थ दर्शन आहे. त्यात भाबडेपणा आहे हे टीकाकारांचं विधानच भाबडेपणाचं वाटतं. मी शाळेतला विद्यार्थी असतानाच 'श्यामची आई' हे त्यांचं पुस्तक वाचलं होतं. त्यानंतर ते पुन्हापुन्हा वाचण्याचा योग आला. साहित्यविषयक संमेलनांतून आणि चर्चासत्रांतून या पुस्तकाचा अनेक वेळा वाङ्मयीन दृष्टीनं विचार केला. मराठी साहित्यात या पुस्तकाचं एक आगळं उच्च प्रतीचं स्थान आहे. यात लेखकाच्या सत्त्वसुंदर वत्सल वृत्तीचे आणि उदात्त भावनेचे अनेक उन्मेष प्रकट झाले आहेत. 'श्यामची आई' आणि सानेगुरुजी हे एक दृढ समीकरण होऊन बसलं आहे. साने गुरुजी हे नाव उच्चारलं की या पुस्तकाची आठवण जागी होते. मराठीतल्या सर्वोत्कृष्ट दहा पुस्तकांत 'श्यामची आई' बसू शकेल. या पुस्तकावर विलक्षण समजल्या गेलेल्या काही टीकाकारांनी धारदार टीका करून यात बालिशता, भोळसर बालबोधपणा आणि केवळ सपक बोधवाद आहे अशी शेरेबाजी केली होती. शाळकरी मुलामुलींनाच

भावणारं हे भावूक साहित्य आहे अशा आशयाची टीका-टीप्पणी कित्येकांनी केली. पण सर्व टीकेला पुरून उरलेलं हे साहित्याच्या दृष्टीनं लक्षणीय असलेलं पुस्तक आहे.

बालवयातच हे रडवणारं पुस्तक आवडतं हा निर्बुद्ध गैरसमज हास्यास्पद आहे. आईसंबंधीचं प्रेम आणि ओढ हा केवळ बालवयातलाच विषय नाही. आईची माया ही जीवनाला समृद्ध करणारी चैतन्यशक्ती असते. कोणत्याही वयात 'श्यामची आई' हृदयाला हलवते. ज्या साहित्यात अंतःकरणाच्या तारा झंकारित करण्याची शक्ती असते तेच साहित्य दीर्घकाळ मनाला जीवनशक्ती देतं. 'श्यामची आई' ही लेखकाची आत्मकहाणी आहे. ही वाचली की गुरुजींच्या व्यक्तित्वाचे सारे विशेष लक्षात येतात. माणसाच्या बौद्धिक उत्कर्षापेक्षा त्याच्या भावनेचा विकास त्याला अधिक प्रगल्भ बनवतो. गुरुजींच्या प्रत्येक पुस्तकात त्यांनी आपलं आंतरिक भावचैतन्य ओतलेलं आहे. त्या वाङ्मयाची परीक्षा तांत्रिक मोजमापाची करण्याचा प्रयत्न सुज्ञपणाचा नाही. 'अनुभवा आले अंगा ते या जगा देतसे' हे संतवचन गुरुजींच्या साहित्याला यथार्थपणे लागू पडतं. साहित्याचा रंग कोणता आहे याला महत्त्व देण्याचं कारण नाही. त्याचा गंध हेच त्याचं मर्मस्थान असतं.

साने गुरुजींच्या साहित्यानं वाङ्मयीन क्षेत्रात एका नवीन युगाला आरंभ केला हे विधान कदाचित कित्येकांना अतिशयोक्तीचं वाटेल. पण विसाव्या शतकात साहित्यात प्रेमशक्तीचा आणि वत्सलतेचा गौरव त्यांच्या साहित्यानं झाला. समतेचा आणि ममतेचा विचार हा त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू होता. आंतरभारतीची विचारधारा याच प्रेमभावनेतून अवतीर्ण झाली. दलितांच्या मंदिरप्रवेशासाठी माणसाविषयीचं निर्विशेष प्रेम हेच प्रेरणाकेंद्र होतं. समाजजीवनाकडं प्रेमदृष्टीनं पाहणं हे कलावंताला नितांत आवश्यक असतं. त्याच्या कलेनं प्रेमभावनेचा विकास होत नसेल तर नुसती कलात्मकता त्या कलेला श्रेष्ठत्व देऊ शकत नाही. म्हणूनच गुरुजींच्या साहित्याची महती तिच्यातल्या प्रेमतत्त्वांमुळंच आहे.

कवी साधुदास यांनी काव्यासंबंधी म्हटलं आहे, 'काव्यकळा विकळा विफळा, एकहदी ना प्रेमकळा' हे केवळ काव्यासंबंधीच नव्हे तर सर्वच कलांविषयी खरं आहे. कलावंत सृष्टीसंबंधीच्या प्रेमानं भारलेला असेल तर त्याच्या कलेचा आविष्कार हृदयस्पर्शी होतो. साहित्य ही अशी कला आहे की ती शब्दपांडित्यानं श्रेष्ठ ठरत नाही. तिच्यातलं भावस्पर्शित्व किती उत्कट आहे यावरच तिचा रस आणि कस

अवलंबून असतो. एक साहित्यिक, एक समतावादी विचारवंत आणि एक स्वातंत्र्य-चळवळीतील निष्ठावंत सैनिक म्हणून गुरुजींची उंची स्तिमित करणारी आहे.

त्यांचं 'भारतीय संस्कृती' हे पुस्तक संस्कृतीकडं कसं उदारतेनं पाहता येतं याचा वस्तुपाठ आहे. अनेकवेळा त्यांच्या कवितेतल्या काही रसमय ओळी आठवत राहतात. आणि त्या गुणगुणत असताना मन रोमांचित होतं. सौंदर्याची निर्मिती करणं हे त्यांनी आपल्या लेखणीचं प्रमुख उद्दिष्ट मानलं नाही. समाजाला जागृतीची भावनिक साद घालणं आणि विषमतेतून समतेच्या विचारांकडं आकृष्ट करून घेणं हेच आपल्या साहित्याचं त्यांनी ध्येय मानलं. प्रेमाच्या शक्तीचा साक्षात्कार झालेला साहित्यिक एका प्रेमप्रधान वातावरणाची निर्मिती करून माणुसकीचे सूर आळवू शकतो हे त्यांनी सिद्ध केलं. त्यांच्या साहित्यात शेतकऱ्याचा नांगर आहे. कष्टकऱ्याच्या निढळाचा घाम आहे. माणसाचं माणसावर प्रेम आहे. प्रत्येकाच्या जीवनात राम आहे माणुसकीचं गीत गात जग पावलं टाकीत आहे हे दृश्य आहे. अशी भव्य स्वप्नं देणारं वाङ्मय निर्माण व्हावं ही आस गुरुजींच्या साहित्यातून प्रकट होते.

प्रेमधर्माचा मुक्त संदेश देणारं त्यांचं साहित्य स्वच्छ मनानं वाचण्यासारखं आहे. किंवा ते वाचताना मन स्वच्छ व्हावं असं आहे.

खरा तो एकचि धर्म। जगाला प्रेम अर्पावे॥

■■■

# विवाह हे सर्वस्व नव्हे

एका संत कवीचं स्त्रीविषयक मत किती कर्मठ आणि असहिष्णु आहे हे पुढील काव्यपंक्तीवरून स्पष्ट होतं. 'ढोल, गँवार, पशू, शूद्र, नारी ये सब ताडनके अधिकारी.' स्त्रीला ढोल, पशू आणि शूद्र यांच्या मालिकेत बसवण्यात आलं आहे. ही स्त्रीविषयक दृष्टी आता जुनाट झाली असा कोणी युक्तिवाद करील. पण आजही स्त्रीकडं सुसंस्कृत वृत्तीनं पाहिलं जातं असं निश्चितार्थानं विधान करता येत नाही. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीचं स्थान दुय्यम किंवा तिय्यम राहिलं आहे. एकविसाव्या शतकात आपण वावरत असलो तरी स्त्रीसंबंधीचा दृष्टिकोन अद्यापि मध्ययुगीन आहे याचे अनेक पुरावे देता येतील.

आपल्या संस्कृतीत स्त्री नेहमीच आदरणीय आणि वंदनीय होती. असा वादही कित्येकजण करतात. समर्थनासाठी म्हणून स्त्रीचा गौरव करणारी काही जुनी वचनं आणि सुभाषितं उल्लेखिली जातात. मनुस्मृतीतल्या एका वचनाचा पुन्हा पुन्हा उच्चार होतो. 'जिथं स्त्रीची पूजा होते तिथं देवतांचा निवास असतो.' अशा आशयाचं हे विधान आहे. पण या स्मृतिग्रंथात स्त्री-स्वातंत्र्याची कल्पना खोडून टाकली आहे. तिच्या स्वतंत्र व्यक्तित्वाचा उल्लेख नाही. ती स्वातंत्र्याला अपात्र आहे असा आपला अभिप्राय मनूनं व्यक्त केला आहे. भारतात स्त्रीला स्वतंत्र सन्माननीय दर्जा होता हा युक्तिवाद फोल ठरतो. उलट स्त्री हा दयेचा आणि अनुकंपेचा विषय आहे. म्हणून पुरुषाच्या अंकित राहून तिनं त्याची सेवा करीत आपल्या आयुष्याचं सार्थक करावं असंच मानलं जात होतं. सीता-सावित्री, द्रौपदी आणि मंदोदरी यांचे आदर्श स्त्रीनं जपावेत ही शिकवण तिला सदैव मिळत होती. पण या आदर्श स्त्रियांची त्यांच्या जीवनात किती फरफट झाली हे लक्षात घेतलं तर त्यातून निघणारा निष्कर्ष वेगळा असू शकेल.

आज जग झपाट्यानं जुनी कात टाकीत आहे. स्त्रीनं देखील आपली अस्मिता अनेक क्षेत्रांत सिद्ध केली. शिक्षणामुळं तिच्या व्यक्तित्वाला, विचाराला सामर्थ्याचे अंकुर फुटले. आता तिच्याकडं जुन्या-पुराण्या पारंपरिक दृष्टीनं पाहता येणार नाही. केवळ अन्याय सहन करीत राहणारी आणि पुरुषाच्या आधारावर

जगणारी एक दुबळी व्यक्ती असं तिचं मूल्यांकन आज होऊ शकत नाही. बुद्धीचे आणि कर्तृत्वाचे पंख फुलवून व्यापक आकाशात भरारी घेण्याची कुवत आजच्या स्त्रीत आहे हे सिद्ध करण्यासाठी उदाहरणं देण्याची जरूर नाही. आपण पुरुषांपेक्षा कमी आहोत असला न्यूनगंड स्त्रीला बाळगण्याचं कारण नाही. काही क्षेत्रांत तर ती सबला नव्हे, प्रबला ठरावी इतकी क्षमता तिनं मिळवली आहे. कोण्या कवीनं स्त्री-जीवनाची कहाणी म्हणजे 'आँचलमे दूध और आँखोंमे पानी' असं केलं होतं. आज हे वर्णन फारच मर्यादित अर्थानं मान्य करावं लागेल.

मी अनेक वर्षे महाविद्यालयात आणि विद्यापीठात अध्यापन केलं. अनेक अभ्यासू तरुणी स्वावलंबी होण्याची कशी अविश्रांत धडपड करतात आणि अखेर त्या संघर्षात कशा यशस्वी होतात ते मी पाहिलं आहे. कोणी परित्यक्ता तरुणी आपल्या प्रारब्धाला बोल लावीत बसण्यापेक्षा परिस्थितीशी दोन हात करीत बाणेदारपणे झगडत राहिली. आणि अखेर आपल्या बुद्धीच्या बळावर एका जिल्ह्याची मुख्य प्रशासनाधिकारी बनल्याचं उदाहरण मी पाहिलं आहे. तिच्याच मार्गानं चालणाऱ्या अनेक विद्यार्थिनी मला भेटल्या. हरिभाऊ आपट्यांच्या 'पण लक्षात कोण घेतो ?' या कादंबरीची नायिका यमू दुबळी आहे. रूढीची बंधनं तिला करकचून बांधून ठेवतात. 'बाबारे, आम्ही म्हणजे गोठ्यात बांधलेली जनावरं' असे करुण अगतिक उद्‌गार ती काढते. अशी असहाय यमुना आज दिसत नाही. शिक्षणातून तिचा आत्मप्रत्यय जागा होतो हे तिनं सिद्ध केलं आहे.

कित्येक तरुण मुलींनी आपल्या आयुष्याचं ध्येय स्वतःच्या प्रेरणेनं निश्चित केलं. लग्न, चूल आणि मूल ही साचेबंद चाकोरी त्यांच्या महत्त्वाकांक्षी मनाला मानवली नाही. काहीजणींनी निर्णय घेतला की आपण अविवाहित राहून आपल्याला आवडेल त्या मार्गानं समाजसेवा करायची. लेखन - वाचनात किंवा रुग्णांच्या सेवेत किंवा वृत्तपत्र चालवण्यात सारी शक्ती एकवटायची. हे निर्णय भोवतालच्या सामान्य जगाला आवडले नाहीत. विरोध आणि निंदानालस्ती यांच्या बावटळी झेलीत काही स्त्रिया लढाऊपणानं आपल्या निश्चयाला चिकटून राहिल्या. कुणी संगीत, नाट्य, चित्रपट, इत्यादी भिन्न-भिन्न क्षेत्रांत पावलं टाकली. 'जग काय म्हणेल ?' या प्रश्नानं त्या कधीही हतबल झाल्या नाहीत. खरं तर अशा स्वतंत्र बुद्धीच्या आणि कर्तृत्वाच्या स्त्रीचा आदर्श समोर ठेवला पाहिजे.

आमच्या समाजात मुळात स्त्रीपण हीच एक केविलवाणी अवस्था मानली

जाते. स्त्रियांनाही स्त्रीत्वाचा अनेक वेळा उबग येतो. पण स्त्रीत्व म्हणजे दैन्य, दुःख व दुबळेपणा या रूढ समजुती झटकून, स्वतःच्या पायावर निर्धारानं उभ्या राहणाऱ्या अनेकानेक कर्तबगार स्त्रिया आता दिसतात. स्त्रीच्या मनात झालेलं हे परिवर्तन अत्यंत महत्त्वाचं आहे. समाजाला सुदृढ आणि सुसंस्कृत बनवणारं आहे.

स्त्रियांनी मध्ययुगात कविता लिहिली. त्या कवितांतून त्यांचा न्यूनगंड आणि अशरण भावना प्रकट झालेली आहे. पण आज स्त्रियांच्या काव्यांत, आत्मचरित्रांत, त्यांच्या आत्मप्रत्ययी व्यक्तित्वाचा हुंकार जाणवतो. समाजसुधारकांनी केलेल्या कार्याची ही एक उल्लेखनीय परिणती आहे. याचा अर्थ समाजातल्या सर्वच स्तरांतली स्त्री स्वावलंबी झाली असं करण्याचं कारण नाही. अजूनही स्त्रीच्या कपाळी शापाची अक्षरं लिहिली जातात. अजूनही अन्यायी व्यवस्थेची बळी होण्याचं स्त्रीचं दुर्भाग्य टळलेलं नाही. पण मध्ययुगातल्या स्त्रीजीवनापेक्षा एकविसाव्या शतकातलं तिचं जीवन आणि व्यक्तित्व अनेक अंगांनी विकास पावलं, असं म्हणणं अतिशयोक्तीचं ठरणार नाही. अजून आपल्या समाजव्यवस्थेत स्त्रीला कित्येक लढे लढावे लागणार आहेत. पण तिच्या मस्तकावरची भीतीची काळी सावली आता राहिलेली नाही. ती मनमोकळेपणानं संवाद आणि वाद करू लागली आहे. ही निःसंशय प्रगती होत आहे.

विधायक कर्तृत्व करणाऱ्या काही ध्येयनिष्ठ स्त्रियांनी 'आम्ही आनंदिता' या शीर्षकाखाली एका वृत्तपत्राला मध्यंतरी मुलाखत दिली. वेगवेगळ्या क्षेत्रात आंतरिक ऊर्मीनं कार्य करणाऱ्या या अविवाहित भगिनींचं मनोगत त्यांतून व्यक्त झालं आहे. स्त्रीनं अविवाहित राहणं आजच्या बुद्धिवादी समजल्या जाणाऱ्या युगात देखील बहुसंख्य लोकांना रुचण्यासारखं दिसत नाही. अविवाहित स्त्रीबद्दल लोक निकोप मनानं विचार करू शकत नाहीत. सुशिक्षित माणसं देखील अविवाहितेविषयी अनुदार उद्गार काढतात. खरं तर विवाह करणं अथवा न करणं हा ज्याच्या त्याच्या इच्छेचा व्यक्तिगत प्रश्न आहे.

लग्न न करणारी स्त्री अधिक्षेपाचा आणि कुचेष्टेचा विषय व्हावा ही समाजाची मानसिक विकृती म्हटली पाहिजे. अविवाहित राहणं यात आक्षेपार्ह काय आहे ? एखाद्या स्त्रीला विवाहाचं बंधन नकोसं वाटत असेल तर ते तिनं केवळ रूढी म्हणून स्वीकारलंच पाहिजे काय ? पुरुष जर स्वेच्छेनं अविवाहित राहू शकतो तर स्त्रीला हे स्वातंत्र्य का नसावं ? एक जुनं वचन आठवतं. 'बिनाश्रयेन न शोभन्ते पंडिताः

वनिताः लताः' वेली, स्त्रिया आणि पंडित आश्रयाशिवाय शोभत नाहीत. स्त्रीनं पुरुषाचा आश्रय घेतलाच पाहिजे. हा प्राचीन समज आजच्या स्वतंत्रतेच्या वातावरणात कर्तृत्वसंपन्न स्त्रीनं उधळून लावला तर तिची निंदानालस्ती का व्हावी ? स्त्री-पुरुषांनी परस्पर सहवासात राहावं आणि कुटुंबसंस्था बळकट करावी हा विवाहाचा हेतू असतो. पण एखाद्या स्त्रीला वा पुरुषाला विवाह न करण्याचं स्वातंत्र्य उपभोगता येऊ शकतं. स्त्रीचं एकटीचं जीवन अपुरं आहे आणि पुरुषाचंही एकलकोंडं आयुष्य अपुरं आहे हा सर्वसाधारण विचार मान्य करूनही काही व्यक्तींना तो अमान्य असेल तर तेही समाजानं गृहीत धरलं पाहिजे. काही स्त्रिया बुद्धी आणि कर्तृत्व या अंगांनी अत्यंत प्रगत झालेल्या असतात. संसाराच्या रामरगाड्याशी स्वतःला जखडून घेणं त्यांना मान्य नसतं. एखादा ज्ञानेश्वर अथवा रामदास समाज-प्रबोधनासाठी संसाराची सामान्य वाट नाकारतो तसंच काही स्त्रियांना लग्न आणि प्रपंच यांचं वेळापत्रक स्वीकारावंसं वाटत नाही. त्याबद्दल लोकांनी खळखळ करण्याचं कारण दिसत नाही.

अजूनही आपली आदर्श स्त्रीची कल्पना सांकेतिक वर्तुळातच गुरफटलेली असावी हे खेदजनक आहे. स्त्रीच्या बुद्धिमत्तेपेक्षा तिनं कुटुंबासाठी केलेला त्याग, पतीला दिलेलं सहकार्य किंवा त्याची केलेली सेवा आणि निमूटपणानं सोसलेला छळ यांचीच महती गायिली जाते. स्वतः स्त्री सुद्धा या विचारवर्तुळातून अजून बाहेर पडलेली नाही. विवाह हे स्त्रीचं सर्वस्व नव्हे. विवाह झाला की ती कृतकृत्य झाली, आता तिच्या जीवनाला पूर्णता आली, दोन मुलांना जन्म दिला की तिचा संसार सर्वार्थानं संपन्न झाला, या समजुतीची स्त्री आणि पुरुष या दोघांनीही नीट चिकित्सा केली पाहिजे.

लग्न आणि संसार यापेक्षा अधिक उच्चतर ध्येयं माणसाला असू शकतात. व्यक्तिस्वातंत्र्याची संकल्पना मान्य असणाऱ्या स्त्रीनं केवळ संकेत म्हणून विवाह केलाच पाहिजे असं दुराग्रही मत मांडलं जाऊ नये. साहित्याच्या, शिक्षणाच्या रुग्णसेवेच्या आणि प्रशासनाच्या क्षेत्रांतल्या काही अविवाहित पण अत्यंत बुद्धिमान स्त्रिया मी पाहिल्या आहेत. काहींचा विवाह झाला आहे; पण काहींनी हे बंधन स्वीकारलेलं नाही. पण त्यांच्या जीवनात त्या आनंदी आणि उत्साही आहेत. आपल्या आयुष्यात काहीतरी अपूर्णता आहे अशी किंचितही जाणीव त्यांना होत नाही. त्या आपल्या कुटुंबातच राहतात. त्यांनी घर सोडलेलं नाही. याचा अर्थ

गृहप्रपंचाशी त्यांचा संबंध आहे पण वैवाहिक आयुष्य जगल्याशिवाय आपल्या जीवनाला अर्थ नाही असं मात्र त्यांना वाटत नाही. घरात राहून लेखन-वाचनात मन रमवणं, शिक्षिका म्हणून शाळेतल्या मुलामुलींवर संस्कार करणं, त्यांच्या सुखदुःखांत सहभागी होणं हे त्या करीतच आहेत. चारचौघींसारखं सांसारिक चाकोरीतून चालण्यात त्यांना रस वाटत नसेल आणि अन्य क्षेत्रांत त्या अधिक भावात्मक कार्य मनःपूर्वक करीत असतील तर लग्न आणि मुलंबाळं या ठरीव वाटेनं त्यांनी चालणं नाकारलं तर त्यांना कशासाठी दोष द्यायचा ? विवाहाशिवाय स्त्री राहूच शकत नाही हा एक भ्रांत समज आहे. कित्येक शास्त्रज्ञ, लेखक आणि कवी, समाजसेवक आपल्या दैनंदिन कार्यक्रमात इतके खोल बुडालेले असतात की विवाहासारखी पाउलवाट त्यांना कधी दिसतही नाही. आणि त्या वाटेला गेलं पाहिजे असं वाटतही नाही.

एक इतिहास संशोधक म्हणाले, 'मी माझ्या संशोधनकार्यासाठी देशभर भ्रमण केले. जुनी कागदपत्रं आणि साधनं मिळवण्यासाठी जिवाचा आटापिटा केला. इतिहासात मला माझं सुख सापडलं. वैवाहिक जीवन जगण्यासाठी मला वेळही नव्हता. त्यावाचून आपलं जीवन अडून राहिलं असंही कधी वाटलं नाही, वैयक्तिक प्रपंचापेक्षा इतिहास संशोधनाच्या आणि लेखनाच्या माध्यमातून मी व्यापक प्रपंचात गढून गेलो. आज मी पूर्ण समाधानी आहे.'

त्या संशोधकाचं हे मनोगत ऐकताना कुणालाही ते समर्थनीय वाटेल. एखाद्या कवयित्रीला, शास्त्रात संशोधन करणाऱ्या स्त्रीला किंवा सामाजिक कार्यात पूर्ण आयुष्य वेचणाऱ्या स्त्रीला विवाह आणि प्रपंच या क्षुल्लक गोष्टींची आठवणसुद्धा झाली नाही तर त्याबद्दल तिला दोष देणं सयुक्तिक होईल काय ? लग्न आणि संसार यापेक्षा कित्येक उच्चतर जीवनपद्धती असू शकतात. आपलं आयुष्य आपण कसं जगावं हे ठरवण्याचा अधिकार आपल्याला असतो. आपली अंतःप्रेरणा सांगेल तसं जगलं पाहिजे. समाज काय म्हणेल या शंकेनं निर्णय घेण्यात अर्थ नसतो. माधव ज्युलियनांची एक काव्यपंक्ती आहे, 'काहीही करा ही जनता मरिल नांगी.' जनता अनेक मुखांनी बोलत असते, स्त्रीबद्दल बोलताना तर जनतेच्या उत्साहाला भरती येते. लोक कोणाबद्दलही कोणतेही शेरे मारतात. त्यातून अविवाहित स्त्री हा तर लोकांच्या बोलण्याचा चवदार विषय असतो.

माझ्या परिचयातल्या एका बुद्धिमती अविवाहित समाजसेविकेनं म्हटलं

होतं, 'विवाहातून सुख कमी मिळतं. पण जन्मभर अपरिहार्यपणानं काही दुःखं मात्र भोगावी लागतात. पुरुष विवाहित असला तरी त्याच्या स्वातंत्र्याला फारशा मर्यादा पडत नाहीत. पण स्त्रीला मात्र आपलं स्वातंत्र्य गमवावं लागतं. पतीसाठी आणि अपत्यासाठी कुटुंबाच्या अभेद्य वर्तुळात कायमचं बंदिस्त व्हावं लागतं. आपल्या स्वतंत्र विचारकल्पनांशी तिला फारकत घ्यावी लागते. तिच्यातली काव्यात्मकता आणि सर्जनशीलता वैवाहिक आयुष्याच्या चाकोरीत हरवून जाते. ती केवळ एक गृहिणी राहते. गृहिणी हा शब्द बाह्यतः गोंडस आहे. पण घरातल्या कामाशी अष्टौप्रहर बांधली गेलेली एक कामवाली बाई यापेक्षा तिला अधिक किंमत नसते. ज्या स्त्रीच्या डोळ्यांसमोर सुंदर आणि भव्य स्वप्नं आहेत, जिला कर्तृत्वाचे पंख आहेत. तिचे पंख कापण्याचं कार्य लग्न आणि संसार करीत असतात. माझ्यासारख्या मनस्वी प्रकृतीच्या स्त्रीला आपलं स्वातंत्र्य गमवावं असं वाटत नाही. लग्नामुळं थोडी फार सुरक्षितता मिळते. स्थैर्यही मिळतं. पण प्रगतीच्या वाटा बंद होतात. मी एक कलावती आहे. रंगभूमीवर आणि पडद्यावर अभिनेत्री म्हणून मला स्थान आहे. कलेच्या आविष्कारात मला विलक्षण आनंद मिळतो. संसाराच्या बेडीत अडकून तो मी गमावून मात्र बसेन.'

तिच्या युक्तिवादातलं तथ्य नाकारता येणार नाही. स्वतःचा संसार असावा, मुलं असावीत, घर असावं आणि पतीबरोबर सुखदुःखं वाटून घ्यावीत यातही आनंद आहे. काव्यात्मकता आहे. पण स्वातंत्र्याची अनिवार ओढ, काहीतरी नवनिर्मिती करून दाखवण्याची उत्कट इच्छा आणि कर्तबगारी असलेल्या स्त्रीनं मळलेली सांसारिक वाट सोडून आपल्या अंतःस्थ ओढीला अनुसरून वेगळी वाट स्वीकारली तर त्यात काय चुकलं ? प्रत्येकाचं जीवन प्रत्येकाच्या आत्मिक इच्छेप्रमाणं त्यानं जगावं यात काहीच आक्षेपार्ह नाही. मात्र आपले निर्णय इतरांना विघातक ठरू नयेत ही अट त्यानं मानलीच पाहिजे.

अविवाहित राहण्यात काही धोके असतात. उतारवयात निवृत्तीनंतर एकटेपणाचा काळ कंठावा लागतो. अशा वेळी कोणाचा तरी प्रेमळ आधार सुखावह होतो. रसेल या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाला ऐंशीच्या उंबरठ्यावर उभा असताना विवाह करावासा वाटला. त्या पूर्वीचा विधुरावस्थेतला काळ त्यानं ग्रंथांच्या सहवासात, विचारांच्या साहचर्यात काढला होता. पण वृद्धपणी त्याला एकटेपणा जाणवू लागला. आपल्या सेक्रेटरी सहकारिणीशी त्यानं पुन्हा विवाह केला. एखाद्या

बुद्धिमती समंजस स्त्रीचं सान्निध्य त्याला आवश्यक वाटू लागलं. अशी काही उदाहरणं देता येतील.

एकाकीपणाची दुःखद जाणीव स्त्रीला पुरुषापेक्षा अधिक क्लेशदायक होऊ शकेल. पण वार्धक्याच्या काळात काय होईल याचा तरुणपणी विचार करून विवाहबंधन स्वीकारायचं का ? हे त्या स्त्रीनं ठरवायचं असतं. स्वातंत्र्याचीही किंमत मोजावी लागते आणि एखादं सुख मिळवायचं असेल तर त्यासाठी काही दुःखांचंही स्वागत करावं लागतं. अनेक वर्षे आपल्या रुग्णालयात रुग्णसेवा करण्यात पूर्ण रमलेल्या एका ध्येयवादी डॉक्टर संचालिकेला विचारलं असता ती म्हणाली,

'विवाहबंधनात गुरफटले असते तर हजारो रुग्णांच्या सेवेतला आनंद मला दीर्घकाळ घेता आला नसता. रोग्यांच्या दुःखपीडित चेहऱ्यावर आनंदाचं हास्य पाहिलं की माझं आयुष्य कृतार्थ झाल्याचं समाधान मिळतं. आता माझं शरीर थकलं आहे. पण मनाची टवटवी ओसरली नाही. दररोज रुग्णालयात प्रत्येक वॉर्डात काठी टेकीत मी जाते. आणि रुग्णांची विचारपूस करते. हाच माझा सुखी संसार आहे. या अर्थानं मी सौभाग्यवतीच आहे.' या सुसंस्कृत ध्येयनिष्ठ स्त्रीनं अनेकांचे ढासळत चाललेले संसार उभे केले. तिच्या समाधानी मनाचं विश्लेषण सामान्य शब्दांनी होऊ शकणार नाही.

अविवाहित स्त्रीला पुरुषापेक्षा अधिक समस्यांची आव्हानं पेलावी लागतात. समाजातल्या असंस्कृत प्रवृत्तीची कधीकधी शिकार बनण्याचा धोका तिला लक्षात घ्यावा लागतो. ती एखाद्या कार्यालयात काम करीत असेल तर तिचेच सहकारी आणि वरिष्ठ अधिकारी तिच्याकडं विकारी नजरेनं पाहतात. लोकांच्या विकृत दृष्टीपासून स्वतःचं संरक्षण करण्याची क्षमता सर्वच स्त्रियांत असेल असं नाही. सामाजिक अपप्रवृत्तीवर मात करण्याचा मानसिक खंबीरपणा स्त्रीला दाखवावा लागतो. कित्येक दुष्प्रवृत्ती आपल्यावर अकारण चिखलफेक करतील याचं भान अविवाहितेला ठेवावं लागतं. स्त्री आणि पुरुष यांना समाज एकाच मापानं मोजत नाही. स्त्रीचं चारित्र्य तोलताना धारवाडी काटा वापरला जातो. पण पुरुषाचं वर्तन तपासताना समाज दीडदांडीचा तराजू वापरतो हे एक विदारक सत्य आहे. आपल्या विचारांच्या आणि ध्येयाच्या कक्षेत सुखेनैव वावरता येईल हा भ्रम अविवाहित स्त्रीला घातक ठरतो. जग वाटतं तितकं वाईट नाही हे खरं असलं तरी ते वाटतं तितकं सरळ आणि चांगलं आहे हेही खरं नाही. त्यामुळं अविवाहित स्त्रीपेक्षा

विवाहित स्त्रीच्या भोवतीची संरक्षणाची भिंत अधिक मजबूत असते. या वास्तव परिस्थितीचं काटेकोर आकलन तिनं करून घेतलं पाहिजे.

अपप्रवृत्तींची आव्हानं धैर्यानं स्वीकारून आपलं कार्य कणखरपणानं करणाऱ्या पुष्कळ स्त्रिया आहेत. त्यांनी सामाजिक जीवनाची उंची वाढवलेली असते हे लक्षात घेतलं पाहिजे. विवाह, संसार आणि मातृत्व म्हणजे स्त्रीचं संपूर्ण जीवनसर्वस्व असं मानणं चुकीचं आहे. संसारानंच तिला व्यक्तित्व लाभतं हे खरं नाही. संसाराचा गाडा रात्रंदिवस कष्टानं ओढण्यात असंख्य स्त्रियांची व्यक्तित्वं कोमेजून गेली असं मत स्त्रिया व्यक्त करू लागल्या आहेत. आपलं व्यक्तित्व विकसित होण्याच्या आड लग्न येत असेल तर ते बंधन नाकारण्याचा अधिकार स्त्रीला आहे. पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीनं तिच्या व्यक्तित्वविकासाची दारं बंद करून टाकली. आणि संसाराचा भार सोसण्याची जबाबदारी पुरुषापेक्षाही तिच्यावर अधिकांशानं लादली.

अविवाहित राहणं म्हणजे एकाकीपणाची दुःखं सहन करणं असा अर्थ केला जातो. पण कितीतरी विवाहित स्त्रिया भरल्या संसारात देखील एकटेपणा सहन करतात. त्यांच्या मनाचा कुटुंबात आपलेपणानं विचार केला जातो का ? पती आपल्या ऑफिसात आणि मित्रमंडळीत दंग असतो. मुलांना त्यांचं स्वतःचं जग असतं. कुटुंबातली इतर माणसं आपापल्या सुखदुःखात मग्न असतात. ही स्त्री मात्र आपल्या समस्या, आशाआकांक्षा मोकळेपणानं कोणाला सांगू शकत नाही. सासूसासरे असले तर ते आपल्या सुनेच्या जीवनाशी समरस होऊ शकत नाहीत. विवाह करूनही एकट्यालाच आपल्या दुःखांच्या संगतीत राहावं लागत असेल तर विवाहामुळं जीवनाला पूर्णत्व येतं हे विधान निरर्थक ठरतं. खोल तात्त्विक अर्थानं विचार केला तर परिपूर्ण जीवन कोणालाच जगता येत नाही. पण इतका खोलवर विचार करण्याचं कारण नाही.

माझं आयुष्य मला माझ्याच इच्छेप्रमाणं जगायचं आहे ही भूमिका मनुष्यानं घेतली पाहिजे. वैवाहिक जीवन जगण्याकडं मनाची प्रवृत्ती नसेल तर केवळ सामाजिक संकेत म्हणून विवाह केला पाहिजे असं नाही. अनेक स्त्री-पुरुषांना संसाराच्या पाशात अडकण्यापेक्षा अधिक महत्त्वाचं श्रेष्ठ प्रतीचं कार्य करावं अशी ओढ असते. आपल्या अंतःकरणप्रवृत्तीचा कौल याबाबतीत प्रमाण मानला पाहिजे. विवाह न करणं म्हणजे सांसारिक सुखदुःखांचा त्याग करून संन्यास घेणंही नव्हे.

एखाद्या उच्च ध्येयाच्या मागं धावत जाताना विवाहासारख्या सामान्य गोष्टी बाजूला सारणं ध्येयपूर्तीच्या दृष्टीनं आवश्यक असतं. त्यामुळं विवाह आणि मातृत्व या अवस्था टाळून देखील आपलं जीवन अधिक उदात्त आणि निर्मितीशील करता येतं यावर अनेक स्त्रियांचा विश्वास आहे. म्हणूनच स्त्री-जीवनात विवाह हे सर्वस्व नव्हे. ती एक केवळ पद्धती आहे. यापेक्षा अधिक श्रेयस्कर वाट शोधण्याचा स्त्रीला आणि पुरुषाला अधिकार आहे. जीवनातला आनंद शरीरापेक्षा आपल्या मनाशी आणि व्यक्तित्व विकासाशी निगडित असतो.

■■■

# असे नेतृत्व पाहिजे

आपल्याला डॉक्टर व्हायचं असेल तर वैद्यक शास्त्राचा शिस्तबद्ध अभ्यास केला पाहिजे. निरनिराळ्या रोगांची लक्षणं समजून घेऊन रुग्णांवर शास्त्रीय दृष्टीनं योग्य उपचार केले पाहिजेत. वकिलीचा व्यवसाय करण्याची इच्छा असेल तर कायद्याचं शास्त्र सूक्ष्मपणे अभ्यासिलं पाहिजे. यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, व्यापारी, शिक्षक किंवा कोणताही व्यवसाय स्वीकारण्यासाठी त्या व्यवसायाची तत्त्वे समजून घेतली पाहिजेत.

पण राजकारण हा असा व्यवसाय आहे की तो अभ्यासाशिवाय करता येतो. अनेक राजकारणी कार्यकर्ते आणि नेते यांनी राज्यशास्त्राची प्राथमिक ओळख तरी करून घेतली आहे की नाही याची जबरदस्त शंका येते. पण ते राजकीय क्षेत्रात यशस्वी झालेले दिसतात. हे यश त्यांच्या पदरात कसं आणि का पडतं हा संशोधनाचा विषय आहे.

माझ्या माहितीचा एक अतिसामान्य कार्यकर्ता सात-आठ वर्षांत राजकीय नेता म्हणून मिरवत आहे. शाळा-कॉलेजात असताना एकेका वर्गात दोन-तीन वर्षे अनुभव घेऊन त्यानं 'येन केन प्रकारेण' पदवी मिळवली. परिश्रम न करता पदवीचं कुंकू त्याच्या कपाळाला लागलं. कोणताही विषय त्यानं कधी गंभीरपणानं अभ्यासिला नाही. कसलीही पूर्वतयारी न करता त्याला नेतृत्व लाभलं.

स्टीव्हलन्सन् नावाच्या एका विचारवंतानं राजकारणाविषयी म्हटलं आहे. 'Politics is perhaps the only profession for which no preparation is thought necessary' हा स्टीव्हन्सन् एक अभ्यासू राजकारणी होता. आपल्या निरीक्षणातूनच त्यानं हे मत व्यक्त केलं आहे. आजच्या राजकारणाकडं पाहिल्यावर त्याच्या मतातली सत्यता जाणवते. किती राजकारणी लोकांनी पोलिटिकल सायन्सचा अभ्यास केलेला असतो ? राजकारण हे असं क्षेत्र बनलं आहे की कोणत्याही उडाणटप्पूनं या क्षेत्रात घुसावं आणि कोणतंही पद काही आगंतुक गुणांवर मिळवावं. कधी-कधी वृत्तपत्रांतून आणि दूरदर्शनवरून अशा राजकारणी नेत्यांची मोठी छायाचित्रं दिसतात. 'तरुणांचे स्फूर्तिस्थान', 'दीनदलितांचा पालनहार', 'लोकजीवनाचा आधारस्तंभ' असे मोठमोठे

अलंकारिक मथळे देऊन फोटो येतात. त्यांनी न केलेल्या कामाबद्दल प्रशंसापर लेख प्रसिद्ध होतात. कोणीतरी नवशिका कवी आपल्या गद्य कवितेतून त्यांची स्तुतिस्तोत्रं गातो. सामान्य माणसाला वाटतं, टिळक - गांधी आणि नेहरू यांच्या मालिकेतल्या एका महान नेत्याचा जन्म झालेला आहे. प्रसारमाध्यमे या नेत्याला मुबलक प्रसिद्धी देतात. आणि मग नेता हा त्याच्या ललाटीचा शिक्का दृढ होतो. अशा कितीतरी पुढारी बनलेल्या किंवा बनवलेल्या व्यक्तींची उदाहरणं आपल्याला माहीत आहेत.

असेच एक पुढारी राजकारणावर भाष्य करताना पंडित नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांच्या ग्रंथांची नावं सांगत होते. शिक्षकांच्या सभेत ते बोलत होते. मध्येच एका शिक्षकानं डॉ. आंबेडकरांचा अमुक ग्रंथ आपण वाचला आहे का ? असा प्रश्न विचारला. त्या प्रश्नानं नेते महाशय गडबडले. पण मुत्सद्दीपणे म्हणाले, 'सभेचा वेळ घेऊ नका. नंतर भेटा.' पण त्या शिक्षकाच्या आगाऊपणानं ते रागावले होते. शिक्षकाची नंतर भेट झाल्यावर ते म्हणाले, 'आम्हाला जनतेचे प्रश्न सोडवायचे असतात. पुस्तकं वाचण्याइतके आम्ही रिकामटेकडे असत नाही..'

राजकारणात एकेकाळी व्यासंगाला महत्त्व होतं. अनेक कार्यकर्ते आणि नेते महत्त्वाच्या ग्रंथांवर चर्चा करीत. त्यांच्यात वादसंवाद होत असत. हे नेते उत्तम वाचक, चिंतक आणि लेखकही असत. ज्ञानाच्या आराधनेतून त्यांच्या नेतृत्वाला आणि कर्तृत्वाला आकार आलेला असायचा. लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात प्रतिकूल वातारणात 'गीतारहस्य' या ग्रंथाची निर्मिती केली. गीतेसंबंधीचं त्यांचं चिंतन किती सखोल आणि मूलगामी होतं याची साक्ष देणारा हा ग्रंथ लिहिताना टिळकांच्या दृष्टीसमोर आपल्या राष्ट्राच्या जीवनातील प्रश्न उभे होते. कर्मयोगाचा पुरस्कार करणारा हा ग्रंथ त्यांनी पारमार्थिक दृष्टीने नव्हे तर लौकिक आणि राष्ट्रीय विचारानं लिहिला.

पंडित नेहरू, डॉ. आंबेडकर हे नेते ज्ञाननिष्ठ होते. त्यांच्या लेखनातून आणि भाषणांतून त्यांच्या व्यासंगावर स्वच्छ प्रकाश पडतो. राजकारणी नेता अभ्यासू असावा. ज्ञानशक्तीवर त्याचा अढळ विश्वास असावा. ही अपेक्षा स्वातंत्र्योत्तर काळात ठेवता येईल अशी परिस्थिती उरलेली नाही. जनतेचं नेतृत्व वैचारिक पातळीवर करू शकतील असे हाताच्या बोटांवर मोजता येण्याइतकेही राजकीय पुढारी आज दिसत नाहीत. आणि दुर्दैव असं की जनता देखील अशा

पुढाऱ्यांची दखल घेत नाही. जातिपातीचं व गटबाजीचं राजकारण खेळणारा नेता गल्लीतच नव्हे तर दिल्लीतही लोकप्रिय होऊ शकतो. ज्ञानाची आराधना करण्याची परंपरा लुप्त होत चालली हे दुर्दैव आहे.

केवळ ज्ञानानेच राजकीय आणि सामाजिक प्रश्न सुटतात असं मी विधान करीत नाही. पण अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास यांचं तरी गरजेपुरतं अध्ययन झालेले किती पुढारी आढळतात ? कितीजणांना त्याची आवश्यकता वाटते ? एक प्रांतिक पुढारी डौलानं सांगत होते, 'तुमचं ते इकॉनॉमिक्स मला समजत नाही. ते शिकून मला पदवी मिळवायची नाही. मला एवढंच कळतं की सामान्य माणसाला दोन वेळ पोट भरेल इतकी चटणी-भाकर मिळाली पाहिजे. अंगभर कपडे आणि राहायला जागा भेटली पाहिजे.' त्याचं हे विधान योग्यच होतं. सर्वसामान्य माणसाच्या मूलभूत गरजा भागाव्यात अशी व्यवस्था करता आली पाहिजे यात शंका नाही. पण त्यासाठी देशाची अर्थव्यवस्था बळकट पायावर उभी करण्याची जबाबदारी, लोकांचं पुढारपण करणाऱ्या या नेत्यांवर असते. त्यांना अर्थशास्त्राचे, समाजशास्त्राचे प्राथमिक धडे तरी गिरवावे लागतील.

विधिमंडळात निवडून जाणं आणि आमदार, नामदार म्हणून पाच वर्षे मिरवीत राहणं, इमारतींच्या पायाचे दगड बसवणं, उद्घाटन करणं, आणि हार-तुरे स्वीकारणं म्हणजे पुढारी होणं नव्हे. बहुतेक पुढारी मिरवणारेच असतात. लाल दिव्याची गाडी आणि आलिशान बंगला मिळाला की यांचे घोडे गंगेत न्हाते. नेतेपदाची माळ वर्षानुवर्षे गळ्यात राहावी, आपल्या मुलालाही ती मिळावी यासाठी व्यवहारचातुर्य वापरणारे पुढारी देशाचं राजकारण पेलू शकतील काय ? ते धनवंत होतात पण ज्ञान मिळवण्याच्या वाटेनं चालावं आणि त्या ज्ञानाचा लोकहितासाठी विनियोग करावा ही कल्पनाच त्यांना मानवत नाही. बुकं वाचून आणि लेख लिहून आम्हाला कारकुनी किंवा मास्तरकी करायची नाही असे कुचेष्टेचे उद्गार काढणारे तथाकथित पुढारी मी पाहिले आहेत. कित्येक विद्वान किंवा विद्यापीठांचे कुलगुरू या पुढाऱ्यांच्या समोर कमरेत वाकून लाचारीनं उभे राहतात. तेव्हा ज्ञानात काही 'अर्थ' नाही असे हे नेतेमंडळी गृहीत धरतात.

लोककल्याणासाठी लोकनेतृत्व करणाऱ्या व्यक्तींनी आवश्यक त्या ज्ञानाची पद्धतशीर उपासना केलीच पाहिजे. एडमंड बर्कसारखा राजकारणी नेता दररोज तीन-चार तास अभ्यासात नियमानं घालवायचा. समाजातील वेगवेगळ्या

एकेक गाव जरी दिलंत तरी हे युद्ध टळेल, इतकी विनम्र भूमिकाही कृष्णानं घेतली होती. पण सुईच्या अग्रावरील मातीचा कणही मी देणार नाही असे माजोरीपणाचे उद्‌गार दुर्योधनानं काढले. युद्ध अटळ झालं आणि आता रणांगणावर दयेच्या आणि अहिंसेच्या गोष्टी अर्जुन करू लागलेला पाहून कृष्णानं त्याला 'क्लीब' म्हटलं. गीतेतला तो श्लोक असा आहे,

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप॥

पार्था, हा नेभळेपणा चालणार नाही. हे परंतपा, मनाचा दुबळेपणा झटकून युद्धाला तयार हो. युद्ध का आवश्यक आहे याचं स्पष्ट शब्दांत त्यानं प्रतिपादन केलं. अन्यायाचा आणि अभद्रतेचा कठोर प्रतिकार करणं हा वीराचा गुणधर्म असतो. रणभूमीत उभं राहिल्यावर निष्क्रिय विचारांच्या आहारी जाऊन माघार घेणं हे भ्याडपणाचं कृत्य आहे. यावर भर देऊन अर्जुनाच्या मनात उत्पन्न झालेल्या शंकेचं मूळ खोडून टाकलं. श्रीकृष्णाची गीता 'ततो युद्धाय युज्यस्व' असा रसरशीत संदेश देते.

याचा अर्थ गीतेनं हिंसेचं आणि रक्तपाताचं समर्थन केलं आहे असं म्हणणं निखालस चुकीचं ठरेल. अधर्म आणि अन्याय नष्ट करण्यासाठी शस्त्रबळाचा वापर करण्यात कोणताही दोष नाही. अहिंसा हे श्रेष्ठ मूल्य आहे. पण त्या मूल्यालाच कोणी उन्मत्त आव्हान देत असेल तर त्याच्या रक्षणासाठी हिंसेचा आश्रय करावाच लागतो. शांती टिकवण्याची किंमत मोजावी लागते. साधूंचं परिमाण आणि दुष्टांचा विनाश या गोष्टी घडवाव्या लागतात. नाही तर दुष्प्रवृत्ती सत्प्रवृत्तींचं भर चौकात वस्त्रहरण केल्याशिवाय राहणार नाहीत. शरीरात बळावलेला रोग दुर्लक्ष केल्यानं आणखी वाढत जातो. अशावेळी शस्त्रक्रिया करून त्याचं मूळ उपटून काढल्याशिवाय रोग्याचे प्राण वाचवता येत नाहीत. शेती करणाऱ्या शेतकऱ्याला प्रथम जमिनीतलं विषारी तण बलिष्ठ हातांनी उखडून टाकावं लागतं. राज्यकर्त्यांचं हेच राष्ट्रीय कर्तव्य असतं. शत्रूवरही दया करावी हा सिद्धान्त एका विशिष्ट मर्यादेपर्यंत ठीक आहे. पण राष्ट्रजीवनाला आव्हान देणाऱ्या शत्रूला त्याच्याच पद्धतीनं उत्तर द्यावं लागतं. हिंसक कृत्यं अमंगळ असतात. पण दुष्टांचं पारिपत्य करून सुष्टांना अभय देण्यासाठी केलेली हिंसा हे अहिंसेचंच एक रूप असतं. गीतेतलं तत्त्वज्ञान हिंसा मार्गाला पुष्टी देत नसून ते पर्यायानं शांत आणि सुरक्षित समाजजीवनाचीच भूमिका मांडणारं आहे.

दुर्योधन आणि दुःशासन यांच्यासारखे मदांध जोपर्यंत सत्ताधीश असतात तोपर्यंत न्याय आणि नीती, धर्म आणि समाज सुरक्षित राहू शकत नाही. द्रौपदीला भरदरबारात विवस्त्र करण्याचा नीच प्रयत्न करणारे कौरव जिवंत राहणं हीच एक सामाजिक आपत्ती होती. ज्या हातानं दुःशासनानं द्रौपदीचं वस्त्र ओढलं तो हात भीमानं मुळापासून उखडून टाकण्यात क्रूरता असली तरी ती अपरिहार्य आणि आवश्यक होती. 'जे हात संस्कृती आणि चारित्र्य यांची विटंबना करतात ते हात अखेर नष्ट होतात' हा नैतिक वस्तुपाठ देण्याचं कार्य हिंसेच्या माध्यमातून भीमानं केलं.

दुःशासनाला दया दाखवायला हवी होती असा भोंगळ युक्तिवाद करणारे काही 'धार्मिक' मी पाहिले आहेत. दुःशासनाला दयेचं दान द्यावं ही विचारसरणी जितकी दयनीय तितकीच हास्यास्पद आहे. रणांगणात पराभवाच्या वाटेवर असताना कर्णानं अर्जुनाला 'धर्मयुद्ध कर. मी निःशस्त्र असताना माझ्यावर बाण सोडू नकोस' असं म्हणून धर्माचा घोष केला होता. अर्जुनही या युक्तिवादामुळं थबकला होता. पण याच कर्णानं द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळी तिचा 'वेश्या' म्हणून उपहास केला आणि दुर्योधन-दुःशासनाला पाठिंबा दिला. लाक्षागृहात कपटानं पांडवांना जाळून मारण्याची मसलत कर्णानं मान्य केली. या प्रसंगांची रणांगणात कृष्णानं त्याला आठवण करून दिली. आणि 'त्यावेळी तुला धर्म आठवला होता का ?' असा बिनतोड सवाल केला. धर्म आणि संस्कृती ही मूल्य दुर्जनांच्या हातातली खेळणी बनू नयेत. आणि त्यांची विटंबना होऊ नये म्हणून दुष्टांची हिंसा करण्यात काही पातक नाही. हा सिद्धान्त बरोबर आहे. 'शठं प्रति शाठ्यम्' हे तत्त्व संतांनादेखील मान्य करावं लागतं. ज्या ज्ञानेश्वरांनी 'भूतां परस्परे पडो मैत्र जीवांचे' असं उत्कटतेनं म्हटलं. त्यांनीच गीतेवर भाष्य लिहिताना अर्जुनाला उद्देशून म्हटलं,

आता कोदंड घेऊनी हाती। आरुढ पां इथे रथी।
देई आलिंगन वीरवृत्ती। समाधाने।
सांडी हे मूर्खपण। उठी घे धनुष्यबाण।
संग्रामी हे कवण। कारुण्य तुझे।

समरांगणात कारुण्याचा काय उपयोग ? ही वीरत्व दाखवण्याची भूमी आहे. हृदयाचं ढिलेपण सोडून वीरवृत्तीला आलिंगन दे. ज्ञानेश्वरांप्रमाणेच संत तुकोबांनीही आपल्या फटकळ शैलीत हाच आशय सांगितला आहे. 'भले तरी देऊ कासेची लंगोटी। पण नाठाळ भेटला तर त्याच्या माथ्यावर प्रहार केला पाहिजे.'

दया या शब्दाचा अर्थ सांगताना ते म्हणतात,

दया तिचे नाव, भूतांचे पालन।
आणिक निर्दालन कंटकांचे॥

काट्यांचं निर्दालन केल्याशिवाय भूतमात्रांचं पालन होत नाही. म्हणून काटेकुटे ठेचून टाकणं हाही दयेचाच भाग आहे. आणखी एका अभंगात एक समर्पक दृष्टान्त देऊन त्यांनी म्हटलं आहे,

देव्हाऱ्यावरी विंचू आला। देवपूजा नावडे त्याला।
तेथे पैजारेचे काम। अधमासी तो अधम॥

विंचवाची नांगी ठेचल्याशिवाय देवपूजा होऊ शकत नाही. संत रामदासांनीही अशाच अभिप्रायाचा विचार परखडपणानं मांडला आहे. हिंसा आणि अहिंसा या संज्ञांचा योग्य अर्थ संतांनी स्वीकारलेला होता. सहानुभूती, दया आणि क्षमा हे सद्गुण आहेत. पण त्यांचा अतिरेक आत्मनाशाला कारणीभूत होतो. एका मर्यादेत दुष्ट अधमांना क्षमादान करावं. पण आवश्यक असेल तर वाघनखांनी त्यांचा कोथळा बाहेर काढावा. ही नीती ज्यांना समजते तेच समाजाचं आणि राष्ट्राचं रक्षण करू शकतात. विष्णुदासानं मेणाहून मऊ असावं पण कळिकाळाचं शिर भेदण्याचं बळ त्याच्यात असावं हाच गीतेचा संदेश आहे. गीता हा विशिष्ट धर्माचा सांप्रदायिक ग्रंथ नसून तो जीवनाला तात्त्विक बैठक देणारा वैचारिक ग्रंथ आहे. अर्जुनाच्या प्रश्नाचं उत्तर गीतेत जे मिळतं ते तत्त्वशुद्ध आहे.

अहिंसा धर्माचा उत्कट पुरस्कार करणाऱ्या महावीर आणि बुद्ध या धर्मवेत्त्यांनीही युद्धातल्या हिंसेला, जर ती अपरिहार्य आणि न्याय्य असेल तर क्षम्य मानलं आहे. त्यांनी राष्ट्राची क्षात्रवृत्ती मारून टाकली असा आक्षेप काही अभ्यासकांनी घेतलेला आहे. अहिंसा हा परमधर्म आहे, हे महावीरांचं प्रतिपादन योग्य त्या संदर्भात ध्यानात घेतलं पाहिजे. अहिंसा हे साधूंसाठी महाव्रत आहे. पण गृहस्थांसाठी ते अणुव्रत आहे. कोणत्याही परिस्थितीत साधूनं अहिंसा तत्त्वाला बाधा आणू नये. पण गृहस्थांनी जेव्हा आवश्यक असेल तेव्हा अन्यायाचा प्रखर प्रतिकार केला पाहिजे. त्यात होणारी हिंसा त्याला बाधक होत नाही. असाच उपदेश या दोन तत्त्ववेत्त्यांनी केला आहे. ज्या काळात जीवनाच्या सर्व व्यवहारात हिंसेला भरती आली होती त्या काळात अहिंसा, मैत्री, करुणा आणि क्षमा या तत्त्वांचा उपदेश करून जीवनाला संतुलित ठेवण्याचं व्यापक आणि महत्त्वपूर्ण कार्य

त्यांनी केलं. इतिहास अशी साक्ष देतो की जैन आणि बौद्ध यांची साम्राज्यं भारतात होती. या राज्यांचं संरक्षण आणि संवर्धन करताना त्यांना युद्धं करावी लागली.

युद्ध किंवा हिंसा राष्ट्रजीवनातून समग्रपणानं काढून टाकता येणार नाही. जेव्हा आव्हान मिळेल तेव्हा राष्ट्रानं आपल्या शस्त्राला आणि विचारांना धार लावली पाहिजे. युद्धं संपूर्णपणानं नष्ट होतील अशी वेळ केव्हा येईल हे सांगता येत नाही. हे केवळ स्वप्नरंजन वाटतं. अंधार आणि प्रकाश यांचा द्वंद्वात्मक खेळ जगात चालू असतो. अंधार झाल्यावर प्रकाश यावा म्हणून प्रयत्न केला पाहिजे. हिंसेची आणि क्रौर्याची, अन्याय अत्याचारांची लाट जगावर आली - आणि ती मधून मधून येतच असते - तर त्या लाटेशी समर्थपणानं लढण्याचं सामर्थ्य पणाला लावलं पाहिजे. असत् पासून सत् या तत्त्वाचं संरक्षण करण्यासाठी हाती शस्त्र धरण्यात कोणताही अपराध नाही. भ्याडपणा हीच अशावेळी अनीती असते. हे गीतेचं तत्त्वज्ञान नीटपणानं आणि धीटपणानं समजून घेतलं पाहिजे. शांतीसाठी दुष्टांचं रक्त सांडण्यात कोणताही अधर्म नाही. वास्तवाचं भान ठेवूनच वागलं पाहिजे हेच गीतेचं सार आहे.

■■■

# आजच्या शिक्षणक्षेत्राचे दर्शन

जग उत्तरोत्तर सुधारत चाललं आहे की त्याची अधोगती होत चालली आहे ? या प्रश्नाचं उत्तर देणं कठीण झालं आहे. आजच्या शास्त्रसंपन्न माणसानं चंद्रावर आपल्या पराक्रमी पाऊलखुणा उमटविल्या. चंद्रापर्यंत झेप घेऊ शकणारा माणूस पृथ्वीवर मात्र नीटपणानं राहू शकत नाही ही शोकांतिका आहे. श्रेष्ठ जीवनमूल्यांची पडझड वेगानं होत आहे. अधःपाताकडं झुकलेलं जग कुठं थांबणार याविषयी कुणीच सांगू शकत नाही. जगाचा सांधा निखळून पडला. ते जोडणारे समर्थ हात मात्र आज कुठं दिसत नाहीत. म्हणूनच प्रश्न पडतो की आपण नेमके कुठे आणि कोणत्या वाटेनं चाललो आहोत ? आजची परिस्थिती पाहिल्यावर विचारशील मनुष्याला वैफल्य यावं आणि त्यानं अगतिक व्हावं असं हे चित्र आहे. 'तुका म्हणे उगेचि राहावे। जे जे होईल ते ते पाहावे।' या तुकोबांच्या निष्कर्षापर्यंत आपण निरुपायानं येतो. कोणतं क्षेत्र आज स्वच्छ राहिलं आहे ? राजकारण, अर्थकारण, धर्म, शिक्षण, न्याय, व्यापार उद्योग, सारीच क्षेत्रं भ्रष्टतेच्या विळख्यात सापडली आहेत काय अशी भयशंका आपल्या मनात उभी राहते. 'सारेच दीप कसे मंदावले आता' असं कवीच्या शब्दांतून विचारावंसं वाटतं. एकेक दिवा मालवत आहे. अंधार वाढत आहे. नव्या प्रकाशकिरणांची चाहूल लागत नाही. अशावेळी सुबुद्ध माणसानं काय करावं ? हा यक्षप्रश्न आहे. निष्क्रियतेनं परिस्थितीला शरण जावं काय ? उघड्या डोळ्यांनी हे दुष्चित्र पाहात बसावं काय ?

एकेका क्षेत्रातल्या अराजकाबद्दल कितीतरी लिहिता येईल. पण माझ्यासारख्या शिक्षणक्षेत्रात वावरलेल्या एका अध्यापकाला आजची शैक्षणिक दुर्दशा पाहून एक प्रकारची निराशा वाटते. शिक्षणातून नवसमाजनिर्मितीचं भव्य स्वप्नं रंगवणारे महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जे चैतन्य दिलं, ते आज शिक्षण क्षेत्रात कुठेही आढळत नाहीत. शेतकऱ्यांना आणि कष्टकऱ्यांना, बहुजनसमाजातल्या स्त्री-पुरुषांना विद्येचा वारसा देण्यासाठी महात्मा फुल्यांनी आकाश-पाताळ एक केलं. त्यागाची पराकाष्ठा केली. स्त्रीच्या मनात आत्मविश्वास पेरण्यासाठी या महापुरुषानं लोकनिंदेला तोंड देत शाळा उभारल्या. कर्मवीर भाऊराव

पाटलांनी त्यांच्या पावलावर पाऊल टाकलं. आज या शिक्षणतपस्व्यांचे फक्त पुतळे तेवढे उभे आहेत. त्यांनी निर्माण केलेले आदर्श केव्हाच कोसळून पडले. शाळा-कॉलेजं वाढली. विद्यापीठांची संख्याही वाढत आहे. पण फुले, छत्रपती शाहू महाराज आणि भाऊराव पाटील यांनी दिलेले परिवर्तनाचे विचार मात्र कोणत्या वाऱ्यावादळात उडून गेले याचं संशोधन करण्याची जरूर आहे. शिक्षणसंस्थांच्या उंच इमारती उभ्या आहेत पण शिक्षण देणारे आणि घेणारे मात्र खुजे लोक आहेत. विचारांची उंची वाढवणारं शिक्षण आज आम्ही खरोखरच देऊ शकतो काय या प्रश्नाचा पाठपुरावा केला पाहिजे.

महात्मा फुल्यांना स्वतंत्र विचाराचा, श्रमाची पूजा करणारा आणि जातिधर्माच्या पलीकडे गेलेला अभेद वृत्तीचा माणूस शिक्षणातून घडावा हे अभिप्रेत होतं. आज गावोगावी उभारलेल्या शिक्षणसंस्थांवर जातिपातींची लेबलं चिकटवलेली दिसतात. या संस्थांचा उल्लेख करताना जात आणि पंथ यांचा माणसं निर्देश करतात. शिक्षणावर देखील जातींचे आणि धर्मांचे शिक्के दक्षतेने ठोकले जातात. हे राष्ट्रीय प्रगतीचं लक्षण मानता येईल काय ? अशा शिक्षणातून राष्ट्रीय वृत्तीचा माणूस आपण घडवू शकतो काय ?

एम्.ए.च्या परीक्षेत पहिला वर्ग मिळवलेल्या एका तरुणाला वेगवेगळ्या शिक्षणसंस्थांत जे अनुभव आले ते कोणालाही उद्वेगजनक वाटतील. शैक्षणिक प्रगतीच्या सर्टिफिकेट्सपेक्षा जात आणि पंथ महत्त्वाचे असतात हा दारुण अनुभव त्याला आला. एका ठिकाणी तर, ''अहो, तुमच्या जातीची ती अमुक-तमुक संस्था आहे तिकडं जाण्याचं सोडून इकडे का आलात ? इथं आम्ही उच्च वर्गातले शिक्षक नेमतो.'' असं सरळ सांगण्यात आलं. शिक्षणाच्या उघड्या बाजारात कोणत्याही दुकानात त्या तरुणाला प्रवेश मिळाला नाही. तो तरुण अस्वस्थ होऊन म्हणाला, ''विद्येच्या क्षेत्रात देखील कुळ, वर्ण आणि जात यांचं एवढं प्रस्थ माजलेलं आहे की मी 'व्यर्थच' विद्या घेतली असं वाटू लागलं.''

हे केवळ शिक्षणाच्या क्षेत्रात नाही साऱ्याच क्षेत्रात जातीच्या हरळीचं मूळ वाढत चाललं आहे. हे मूळ उपटून काढण्याचा भीमप्रयत्न अनेक समाजसुधारकांनी सातत्यानं केला. पण जातीय प्रवृत्ती हजार हत्तींचं बळ घेऊन समाजात उभी आहे. उदारमतवादी शिक्षण देऊनसुद्धा जातीयता सर्व क्षेत्रांत फोफावत आहे.

शिक्षणातून मनुष्य उदार होतो आणि भेदांच्या भिंती पाडू शकतो ही आशा

निष्फळ झाली. कित्येक शिक्षणसंस्था महापुरुषांची नावे धारण करून उभ्या आहेत. पण तेथेही भेदाभेदाची भूमिका दृढ झालेली दिसते. खरे तर हा जातीयतेचा प्रश्न आपल्या देशातला एक अत्यंत ज्वालाग्राही प्रश्न होऊन बसला आहे. सामाजिक जीवन प्रदूषित करणाऱ्या या परिस्थितीचा सामना कसा करायचा याला आज तरी नेमकं उत्तर मिळणं कठीण आहे.

शैक्षणिक संस्थांना विद्याविक्रीच्या दुकानांचं बाजारी स्वरूप आलेलं आहे. कोणे एके काळी शिक्षणाला धर्म मानलं जात होतं. आज शिक्षणाचा धंदा करणारे अनेक चतुर धंदेवाईक या व्यवसायात घुसलेले दिसतात. शाळा-कॉलेजांच्या कार्यालयात गांधी आणि आंबेडकर, फुले आणि कर्वे यांची भव्य छायाचित्रं लावलेली असतात. भिंतीवरच्या त्या चित्रांच्या खाली बसून संस्थेचा अध्यक्ष किंवा पदाधिकारी आपले 'आर्थिक' व्यवहार करीत असतात. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला देणगी घेतल्याशिवाय संमती मिळत नाही. प्रत्येक शिक्षणसंस्था विद्यार्थी पालकांकडून 'देणगी' म्हणण्यापेक्षा 'खंडणी' वसूल करण्यात अधिक रस घेतात. वैद्यकीय शिक्षण घ्यायचं असेल तर लक्षावधी रुपयांची तरतूद करावी लागते. लाखो रुपये खर्चून डॉक्टर झालेला तो विद्यार्थी आपला व्यवसाय मानवतेच्या दृष्टिकोनातून करणं शक्य आहे काय ? डॉक्टरांच्या व्यवसायात सहानुभूती, दया, सामाजिक जाणीव आणि माणुसकी ही मूल्ये ओहोटीला लागली आहेत. प्रत्येक रुग्ण हे आपलं 'गिऱ्हाईक' आहे याच भावनेनं डॉक्टर रुग्णांकडे पाहू लागले तर माणुसकी औषधालासुद्धा उरणार नाही. वैद्यकीय शिक्षणाचे दरवाजे आता गरिबांसाठी पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. माझ्या एका व्यापारी मित्रानं मुलाच्या शिक्षणासाठी मेडिकल कॉलेजच्या व्यवस्थापनाला चाळीस लक्ष रुपये देणगीदाखल दिले. ज्ञानाच्या क्षेत्रातली ही दरोडेखोरी आमच्या सर्वोच्च न्यायालयालाही थांबवता येत नाही. गरिबांनी शिक्षणक्षेत्राकडं ढुंकूनसुद्धा पाहू नये अशी चोख व्यवस्था झालेली आहे. उच्च शिक्षण ही केवळ धनदांडग्यांची मिरासदारी व्हावी हे लक्षण प्रगतीचं की अधोगतीचं याचा विचार गंभीरपणानं कोणी करीत नाही. आमच्या स्वतंत्र, सार्वभौम, लोकशाही देशातली शिक्षणक्षेत्रातली ही शोकांतिका पाहिली म्हणजे हा देश गरिबांचा कधीच नव्हता आणि गरिबांना भविष्यातही इथं जागा नाही हे भेसूर सत्य निमूटपणानं स्वीकारावं लागतं.

शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण हे देखील मूठभर लोकांच्याच कक्षेत

येऊ शकतं. आजच्या शाळा कॉलेजातलं वातावरण शिक्षणाला कितपत अनुकूल आहे असा सवाल अनेक शिक्षणतज्ज्ञांनी उपस्थित केला आहे. अध्यापक वर्ग पदवीधर असला तरी अध्यापन करण्यासाठी जी वैचारिक पात्रता आणि ज्ञाननिष्ठा आवश्यक असते ती त्याच्या ठायी फारशी उरलेली नाही. पाच आकड्यांचा पगार घेणारे हे अध्यापक स्वतः अभ्यासात, लेखनात रस घेताना दिसत नाहीत. सर्वच प्राध्यापकांच्या संदर्भात हे विधान मी करीत नाही. काही अध्यापक आपल्या संशोधनाचा आणि विचारांचा लाभ विद्यार्थ्यांना कर्तव्यबुद्धीनं करून देतात. पण या अभ्यासकांची संख्या झपाट्यानं कमी होत आहे. अध्यापक वर्गही आपली ख्याली खुषाली आणि काही व्यसनं यांच्यात गुंतून पडल्याचं चित्र दिसतं. या पगारदार वर्गानं गरीब वर्गातल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना निष्ठेनं शिकवावं, त्यांच्यात अभ्यासूपणा, स्वाभिमान हे गुण पेरावेत, अशी अपेक्षा आहे. पण या अपेक्षेची पूर्ती होताना दिसत नाही. पगारवाढ मिळावी आणि कामाचे तास कमी करावेत यासाठी संप करणारे व समाजाला वेठीला धरणारे हे शिक्षक समाजद्रोही प्रवृत्तीचे आहेत अशी टीका बऱ्याच वेळा झालेली आहे. विद्यालयातल्या बहुसंख्य शिक्षकांना अध्यापनात फारशी आस्था वाटत नसल्याची तक्रार कानावर येते. काही नवीन वाचन लेखन करावं, आपल्या विद्यार्थ्यांना योजनापूर्वक घडवावं. अशी ऊर्मी किती शिक्षकांच्या मनात असते ? जो पाठ शिकवायचा त्याची प्राथमिक तयारी देखील अनेक शिक्षक करीत नाहीत.

ही टीका केल्यावर एका शिक्षकानं मला प्रश्न विचारला, ''तुम्ही आम्हा शिक्षकांनाच धारेवर धरता हे अन्यायाचं आहे. सरकारी ऑफिसात वेळेवर कामं होत नाहीत. व्यापारी काळाबाजार करून जनतेचं शोषण करतात. राजकारणात अपप्रवृत्ती वाढल्या आहेत. आम्हां शिक्षकांचे दोष तुम्हाला दिसतात. तीन लाख रुपयांची देणगी घेऊन संस्थेनं मला नोकरी दिली. आता विकत घेतलेल्या, नोकरीचा वापर माझ्या इच्छेप्रमाणं मी का करू नये ?''

त्या शिक्षकाचा प्रश्न सकृद्दर्शनी तर्कशुद्ध वाटावा असा होता. पण इतर क्षेत्रांत कर्तव्यभ्रष्ट माणसं आहेत. त्यांच्याबद्दल न बोलता माझ्यावरच टीकाटिप्पणी का करता ? अशी पृच्छा करणं विसंगत आहे. अन्य क्षेत्रात भ्रष्टाचार आहे म्हणून आपणही आपल्या क्षेत्रात भ्रष्टतेचं आचरण करावं हे मत पूर्णपणे अविचाराचं आहे. आमची बहुतेक विद्यापीठं परीक्षा घेणाऱ्या आणि पदव्यांची खिरापत

वाटणाऱ्या एजन्सीज् बनल्या आहेत. विद्यापीठांच्या अधिकाऱ्यांतही भ्रष्टाचाराची साथ पसरलेली दिसते.

शिक्षणक्षेत्रातल्या काही ठळक उणिवांवर मी बोट ठेवलं आहे. इतर अनेक वैगुण्यांचा इथं उल्लेख केला नाही. शिक्षणाचा मुख्य उद्देश पोट भरण्याचं कसब हस्तगत करणं इतकाच होऊन बसला आहे. त्यामुळं पोटार्थी शिक्षण देणारी बाजारपेठ असं शिक्षणसंस्थांचं स्वरूप बनलेलं आहे. हृदयाला आणि मस्तकाला जीवनसत्त्वांचा पुरवठा करावा हा ज्ञानाचा हेतू आजच्या परिस्थितीत केव्हाच हरवून गेला. ज्ञानी माणसानं स्वाभिमानी, प्रतिकारक्षम आणि समाजहिताचा विचार करणारा समर्थ समाजघटक व्हावं ही कल्पना आज उरलेली दिसत नाही. ज्ञानरूपी पवित्र अग्नीत सारी पापकर्मं जळून जातात. म्हणून ज्ञानासारखं पवित्र दुसरं काहीही नाही. हा विचार कधीच अस्तंगत झाला. ज्ञान आणि माहितीच्या आधारावर युक्त्या प्रयुक्त्या करून सत्ता आणि श्रीमंती मिळवावी आणि समाजाकडं पाठ फिरवून आपल्या एअरकंडिशंड महालात राहावं इतकाच ध्येयवाद शिल्लक राहिला आहे. ज्ञानाला आणि शिक्षणसंस्थांना सामाजिक सेवेची बैठक नसेल तर अशा संस्था आणि त्या संस्थेतले अधिकारी म्हणजे समाजवृक्षावर वाढलेली बांडगुळं आहेत. मूळ वृक्षाचा जीवनरस शोषून ही पुष्ट होतात आणि वृक्ष मात्र शुष्क होत जातो.

शिक्षणाला धर्म मानून त्याला आपलं जीवन वाहिलेले साने गुरुजी आपलं नैराश्य एका लेखातून व्यक्त करताना म्हणाले, ''ह्या शिक्षण संस्थात ज्ञानाची धग नाही. ध्येयवादाची डूब नाही. स्वाभिमानाचा किरण नाही. सहानुभूतीचा बिंदू नाही. मानसशास्त्राचे खरे दर्शन नाही. आसमंताच्या जगाचे भान नाही. उत्साह नाही. तेज नाही. प्रयोग नाही. प्रेम नाही. ओलावा नाही. आस्था नाही. उत्कटता नाही. काही नाही ! काही नाही !!''

साने गुरुजींचे हे विचार साठ वर्षांपूर्वी व्यक्त झालेले आहेत. त्यावेळी शिक्षणाची काय व्यवस्था आणि अवस्था होती याचं हे चित्र आहे. आता परिस्थिती अधिकच निराशाजनक झालेली दिसते. शिक्षणातून माणसाचं माणूसपण विकसित व्हावं, त्याच्यातल्या पशुत्वाचा निरास व्हावा ही अपेक्षा उत्तरोत्तर धूसर होत चालली. आता शिक्षण आणि पदव्या यांचा काळाबाजार करणाऱ्या अनेक कारखान्यांची गर्दी वाढत चालली. एकविसाव्या शतकात ज्ञानविज्ञानाचा स्फोट झाला असं आपण म्हणतो. ते किती बरबरचं आहे हे स्पष्ट होतं. शिक्षणाचा

आग्रह धरणारे मागच्या शतकातले शिक्षणतपस्वी आज काही चमत्कार होऊन देशात आले तर त्यांना आश्चर्याचा आणि दुःखाचा जबरदस्त धक्का बसेल. ज्ञानातून संस्कृती उन्नत व्हावी ही आशा सध्या तरी विफल झाली आहे. शिक्षण ही केवळ बौद्धिक प्रक्रिया नसून ती माणूस सर्वार्थानं जागा करण्याची पद्धती आहे. ज्या देशात जागी झालेली माणसं असतात तो देशच खऱ्या अर्थानं विद्येचं माहेरघर बनतो. कित्येक शतकांपूर्वी भारतात तक्षशिला, नालंदा यांसारखी जागतिक कीर्तीची विद्यापीठं होती. आचार्य होते. ती ज्ञानपीठं भूतकाळाच्या उदरात गडप झाली. आजच्या विद्यापीठात प्रगत ज्ञानाचे किरण आले. पण अंधार मात्र गडद होत चालला. मेंदूची वाढ करणारं पण मनाला खुरटं करणारं शिक्षण नको आहे.

या लेखातले विचार निराशावादाकडं झुकलेले आहेत हे मी मान्य करतो. पण याच प्रकारचे विचार बहुतेक विचारवंत व्यक्त करतात. हे वस्तुस्थितीचं चित्रण आहे. आजचं शिक्षण गुणवाचक व्हावं यासाठी शिक्षणाच्या क्षेत्रात समाजनिष्ठा ठेवून नवनवीन प्रयोग करणारे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. या अंधारातूनच नवा प्रकाश उदयाला येईल अशी अपेक्षा करताना मला केशवसुतांच्या काही काव्यपंक्ती आठवतात -

सुंदर लेणी तयात खोदा
बसुनी का वाढविता मेदा
विक्रम काही करा चला तर !

वर्तमानकाळातलं हे आव्हान स्वीकारण्यासाठी ज्ञानावर आणि समाज-जीवनावर प्रेम करणारे लोक पुढं आले पाहिजेत. लेणी खोदण्यासाठी हात बळकट असावेत. आणि मन सुंदर असावं. उद्याचा भारत त्यातूनच घडणार आहे. क्रांतीचं चक्र आम्ही फिरवल्याशिवाय राहणार नाही या प्रत्ययातूनच क्रांती साकार होते.

■■■

# साहित्यातले तीन प्रवाह एकत्रित यावेत

जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडवण्याच्या इच्छेतून साहित्याची निर्मिती होते. कोणताही लेखक, कवी मानवी जीवनाच्या विविधतेवर आणि विचित्रतेवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न करीत असतो. याचा अर्थ जीवनाच्या प्रवृत्ती चितारून त्यावर भाष्य करण्याची मुख्य प्रेरणा साहित्याच्या मागे असते. सारेच साहित्य या उर्मीतूनच लिहिले जाते. या जीविताचे प्रामाणिक चित्र आपण रेखाटले हेच समाधान लेखकाला हवे असते. पण सर्वच लेखक जीवननिष्ठ, जीवनवादी असत नाहीत. जीवनाचा तटस्थपणे शोध घेण्याची आणि त्याचा अन्वयार्थ लावण्याची कुवत थोड्याच लेखकांत असते. वास्तवाला भिडण्याची ताकद अनेक कवी- लेखकात आढळत नाही. विदारक वास्तव त्यांना सहनही होत नाही मग कल्पनेच्या मायावी सृष्टीत असे लोक विहार करीत राहतात. त्यांची लेखणी सत्यसृष्टीतल्या नानाविध समस्यांचा, दुःखवेदनांचा वेध घेऊ शकत नाही. हे दुबळे कलावंत मग आपल्या क्षीण कल्पना सजवित बसतात. नंदनवनात वस्ती करतात. अटळ दुःखापासून दूर कुठेतरी जाऊन एकान्तवासात खोट्या कृत्रिम सुखाची गीते गात राहतात. साहित्यात हा एक प्रवाह अनेक शतकांपासून वाहात आहे. काव्य नाटकात, कथा-कादंबऱ्यात या पलायनवादी प्रवृत्तीच्या अनेक लाटा आलेल्या दिसतात. कल्पनारम्य अद्भुत वातावरणात वाचकांना घेऊन जाणे हेच प्रतिभेचे सामर्थ्य आहे अशा समजुतीमुळे रंजनवाद, इच्छापूर्तीवाद, स्वप्नवाद, सौंदर्यवाद अशा नावाखाली अवास्तवतेचा प्रवाह आजही आमच्या मराठी काव्य-नाटकात दिसतो. सुदैवाची गोष्ट अशी की या प्रवाहाला आता पूर्वीची प्रतिष्ठा राहिलेली दिसत नाही. याचे कारण समाज-जीवनाचे सम्यक दर्शन घडवणे हेच साहित्याचे प्रधान उद्दिष्ट मानले पाहिजे, ही विचारसरणी आता सर्वमान्य झाली आहे. तरीही रंजनवादी लेखनप्रवाह साहित्यात राहणारच आहे.

आजच्या मराठी साहित्यात दलित, ग्रामीण आणि जनवादी असे तीन ठळकपणे जाणवणारे प्रवाह आहेत. हे तिन्ही प्रवाह जीवनाशी संलग्न असल्यामुळे जीवनाच्या विशिष्ट अंगांची आमूलाग्र चित्रं प्रकट करण्याची त्यांची आकांक्षा आहे.

वर उल्लेखिलेल्या कल्पनारम्यवादी धारेशी मात्र यांचा संबंध नाही. असलाच तर विरोध आहे. एक काळ असा होता की ग्रामीण साहित्यातही अद्‌भुताची आणि काल्पनिकतेची एक धार मिसळली होती. याचे कारण सौंदर्यवादी चष्म्यातून काही नागर लेखकांनी ग्रामीण लोकजीवनाचे दर्शन घेतले होते. ते शहरात राहून गावातलं आयुष्य रेखाटीत होते. सुरुवातीला शहरी वाचकांनी रुचिपालट म्हणून या साहित्याचे तोंड भरून कौतुक केले... पण अनुभवाचा आधार नसलेल्या तथाकथित ग्रामीण साहित्याची इतिश्री झाली.

गावकीत वाढलेला आणि तिथल्या सुखदु:खाशी संपर्क असलेला एक लेखकवर्ग उदयाला आला आणि त्याचा गोतावळा अस्सल गावाकडचा वाटू लागला. आज ग्रामीण कथा आणि कादंबरी विकासाच्या वाटेने चालत आहे. तिच्या हातात वास्तवतेचे सूत्र आहे. आजच्या बदलत्या वातावरणात खेडी बदलत गेली. खेड्यांचे प्रश्न बदलले. नागर जीवनाशी खेड्यापाड्यांचा अधिक जवळून संबंध येऊ लागला. त्यामुळे पूर्वीच्या तुलनेत पूर्णत: बदलून गेलेल्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न लेखक करीत आहे.

ग्रामीण आणि दलित व जनवादी साहित्याची प्रेरणा स्थूल मानाने एकच आहे. खरे तर साहित्य कोणत्याही प्रकारचे असो, माणूस आणि त्याला येऊन चिकटलेली त्याची अटळ सुखदु:खे हाच साहित्याचा केंद्रबिंदू असतो. पण माणसानेच निर्माण केलेल्या सामाजिक, धार्मिक इत्यादी परिस्थितीमुळे माणसाच्या जीवनात चमत्कारिक चढउतार होतात. गावकुसाबाहेर सक्तीने, सामाजिक निर्बंधामुळे, रूढीमुळे आपल्या झोपडीत पिचत पडलेल्या एखाद्या तथाकथित अस्पृश्याच्या मनाचा क्षोभ किंवा अगतिकता प्रकट करणारी कादंबरी अधिक जिवंत ठरते. ग्रामीण किंवा जनवादी साहित्यात सुद्धा माणूस आणि त्याचे आयुष्य हेच रंगवलेले असते. पण या साहित्यामागील प्रेरणांची बारकाईने पाहणी केल्यास जाणवते की एका नवीन लढ्याची, एका अनिवार्य संघर्षाची ललकारी देण्याची कामगिरी दलित साहित्य करीत आहे. ग्रामीण साहित्यातही संघर्ष आहे. पण संघर्षाची किंवा क्रांतीची ठिणगी टाकण्याचे काम त्या साहित्याने केले नाही.

दलित साहित्याची श्रद्धा फुले-आंबेडकरांच्या लढाऊ परिवर्तनशील तत्त्वज्ञानावर असल्यामुळे एका नव्या समाजरचनेचा आदर्श समाजासमोर ठेवण्याची दलित लेखकांची पराकाष्ठा चालली आहे. हे साहित्य एका विशिष्ट विचारातून

अवतीर्ण होत आहे. या दृष्टीने पाहिल्यास दलित साहित्याची प्रकृती व प्रेरणा अन्य साहित्य प्रवाहापासून वेगळी वैशिष्ट्यपूर्ण वाटते. क्रांतीच्या लढ्यातले एक साधन म्हणून दलित लेखक-कवींनी साहित्याची निर्मिती चालवली आहे. त्यांच्यात कलात्मकता उपजतच आहे.

जनवादी साहित्य या संज्ञेचा अर्थ अजूनही म्हणावा तितका स्पष्ट झालेला नाही. एकदा साहित्य हे सर्वसाधारण जनतेच्या आयुष्याशी निगडित असते आणि असले पाहिजे हे मान्य केल्यावर जनवादी साहित्याचा एक वेगळा प्रवाह का मानावा हे कळत नाही. सामाजिक जाणीव ठेवून लिहिणारा कोणताही लेखक लोकवादीच किंवा जनवादीच असतो. आजच्या परिस्थितीत सामान्य माणूस सर्व बाजूंनी करकचून बांधला गेला आहे. आजची अर्थव्यवस्था, धार्मिक परिस्थिती, शिक्षणसंस्था, राज्यव्यवस्था या सर्व क्षेत्रांत सामान्य माणूस सर्वार्थांनी खचून आणि पिचून गेला आहे. कारण त्याला तसे पाहिल्यास कोठेच स्थान नाही. प्रत्येक व्यवस्था त्याचे शोषण करीत आहे. या साधारण माणसाची प्रतिमा वास्तव दृष्टीने उभी करण्याची धडपड साहित्यात चालू आहे. सामान्यातल्या सामान्याला जे साहित्य प्रदक्षिणा घालते त्याला जनवादी साहित्य असे संबोधावे असे मत जनवादी साहित्यिक व्यक्त करतात.

मला वाटते दलित, ग्रामीण आणि जनवादी या तिन्ही प्रवाहांना यापुढे परस्परात मिसळून जावे लागणार आहे. निदान दलित आणि जनवादी असे बारीक-सारीक भेद करण्यापेक्षा दलित साहित्यातच जनवादी प्रवाहाने विलीन व्हावे. समान प्रेरणांवर आधारलेले हे साहित्याचे प्रवाह काहीतरी कृत्रिम कारणांनी आपण भिन्न मानीत आहोत काय ? दलित साहित्य हे जनवादी नाही काय ? दलित साहित्यात ग्रामीण जीवनाला आणि त्यातील अन्याय, शोषण यांना स्थान नाही काय ? सर्वसाधारण मनुष्य मग तो खेड्यातला शेतमजूर असो, गिरणीतला कामगार असो, रस्त्यांची सफाई करणारा कष्टकरी असो, उन्हातान्हात दगड फोडणारा मजूर असो, स्त्री असो की पुरुष असो, भटक्या विमुक्त जमातीचा घटक असो, आदिवासी असो, सारेच आज भरडले जातात असे चित्र दिसते. गुलामगिरीचे साखळदंड पायात वागवीतच सामान्य माणसाला काट्याकुट्यातून अनवाणी चालावं लागत आहे. सर्व अंगांनी त्याचं शोषण होऊन त्याच्या आयुष्याचे चिपाड होत आहे. या माणसाच्या मुक्तीसाठी प्रचलित व्यवस्थेविरुद्ध प्राणपणाने झगडत

राहाण्याची आरोळी देणारे साहित्य आज मुख्यत: हवे आहे.

सुखासीन समाजात साहित्याला विदूषकाचा दर्जा असतो. घटकाभर फुटकळ मनोरंजन झाले की त्याचे काम संपले. अशा साहित्याला नवविचारांची आवश्यकता भासत नाही. उपभोग घेत पडलेल्या समाजाला कोणताही नवा विचार स्वीकारायचा नसतो. पण असला ऐतखाऊ, शोषणातच धन्यता मानणारा, भोगगंडाने पछाडलेला समाज मुळापासून उखडून टाकण्याची बलवत्तर प्रेरणा जे साहित्य देते तेच नव्या इतिहासाची जडणघडण करू शकते. आज ही शक्ती दलित साहित्यात आहे. ग्रामीण आणि जनवादी साहित्यही सामाजिक जाणिवेचाच आविष्कार करीत आहे. अशा वेळी केवळ आमची प्रेरणा वेगळी आहे, आमचा प्रवाह स्वतंत्र आणि स्वायत्त आहे असे निदान समाजनिष्ठ परिवर्तनवादी साहित्यिकांनी तरी हा भेदभाव मनात ठेवू नये असे मला वाटते. झाडाच्या एकाच बुंध्यातून जीवनरस घेत आणि मूळ बुंध्याला बळकटी देत तरारून वर आलेल्या तीन फांद्यांनी आम्ही सर्वस्वी वेगळे आहोत असे मानणे कितपत सयुक्तिक ठरेल ?

एकाच मातीतून अंकुरलेल्या आणि फोफावलेल्या झाडाच्या फांद्या प्रथम दृष्टिक्षेपात वेगळ्या भासत असल्या तरी त्या वेगळ्या असू शकत नाहीत. कारण त्या फांद्यांची पाने, फुले आणि फळे सारखीच आहेत. सूक्ष्म भेदांचे अवडंबर कशासाठी ? मला तर असे चित्र दिसत आहे की काही वर्षांतच नावाच्या वेगवेगळ्या चिठ्ठ्या गळून पडतील आणि 'क्रांतिवादी' व 'कलावादी' असे दोनच प्रवाह उरतील.

■■■

# आम्ही गांधीजींना विसरलो काय ?

महात्मा गांधी हे एक विलक्षण क्रांतिकारक आणि लोकोत्तर व्यक्तिमत्त्व होतं. इतिहासाचा प्रवाह बदलण्याची आणि अन्यायासमोर निर्भयतेनं उभं राहून त्याला आपल्या सौम्य पण तरीही आक्रमक भाषेतून आव्हान देण्याची शक्ती या हडकुळ्या माणसात होती. जेमतेम गुडघ्यापर्यंत धोतर नेसणारा आणि अंगावर पंचा घेणारा हा दुबळा माणूस 'ज्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नव्हता' त्या प्रचंड सत्तेला हतबल करतो. आणि ती साम्राज्यवादी शक्ती या माणसासमोर अखेर अवनम्र होते हा खरोखरच एक चमत्कार आहे. लढण्यासाठी याच्याजवळ कोणतं शस्त्र होतं ? कोणत्या शक्तीनं यानं भारतासारख्या खंडतुल्य देशात स्वातंत्र्याचा लढा पेटवला ? तो शस्त्रानं लढला नाही. त्यानं आत्मबळावर एक प्रचंड संग्राम उभा केला. हा शस्त्रांचा लढा असता तर ब्रिटिशांचं साम्राज्य अधिक दृढतेनं पाय रोवून उभं राहिलं असतं. पण एक शस्त्रहीन मनुष्य नि:शस्त्रांची सेना एकत्रित करतो आणि शस्त्रसज्ज सत्तेला पराभूत करतो. हा इतिहास त्यानं नव्यानं घडवला. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?' या प्रश्नाचं उत्तर गांधी नावाच्या क्रांतिकारकानं दिलं आहे. नि:शस्त्र प्रतिकार शस्त्रालाही हरवू शकतो हे सत्य जगाच्या निदर्शनाला गांधीजींनी आणलं. त्यांचे टीकाकार अजूनही गांधीजी हे स्वातंत्र्याचे शिल्पकार आहेत आणि त्यांनी अहिंसेचं शस्त्र वापरून विजय मिळवला हे मान्य करीत नाहीत. पण ते काहीही म्हणोत, काही हिंसात्मक लढे उभारले गेले. ब्रिटिश सत्तेनं ते केव्हाच नाहीसे केले. पण गांधींच्या मार्गानं पाउल टाकणारं सैन्य अखेर विजयी झालं, हे निर्विवाद आहे.

म. गांधींच्या व्यक्तित्वात जयिष्णू आक्रमकता आणि विनम्रता होती. ती शब्दातीत म्हणावी लागेल. आक्रमकतेतही त्यांच्या ठायी असलेल्या नम्रतेचं सुंदर दर्शन घडत होतं. ते म्हणत असत, ''मी ब्रिटिश साम्राज्याचा सर्वात मोठा शत्रू आहे. आणि त्याचवेळी मी ब्रिटिशांचा सर्वात मोठा मित्र आहे.'' शत्रुत्व आणि मित्रत्व यांची इतकी सुंदर सांगड त्यांनी घातली होती की तिचा आविष्कार इतिहासानं फार थोड्या वेळा पाहिला असेल. संत आणि क्रांतिकारक ही दोन्ही रूपं गांधीजींच्या

व्यक्तित्वात एकरूप झाली होती. त्यांचा दृष्टिकोन जितका व्यापक होता तितकाच ध्येयवाद उत्कट होता. जे राजकारण त्यांनी केलं त्याला नैतिक तत्त्वाचं आणि आध्यात्मिक विचाराचं अधिष्ठान सदैव असावं असा त्यांचा आग्रह होता. स्वार्थावर दृष्टी ठेवून संधिसाधू अनैतिक राजकारण करून मिळणाऱ्या यशापेक्षा तात्त्विक सत्याग्रहातून मिळालेलं अपयश देखील त्यांच्या दृष्टीनं अधिक श्रेयस्कर होतं. व्यवहाराच्या बाजूनं पाहिलं तर असा आदर्शवाद बहुतेकांना पटण्यासारखा नसतो. त्यांचं लक्ष केवळ उद्दिष्ट साध्य करणं एवढंच असतं. पण साध्य प्राप्त करून घेताना साधनांची शुद्धता कटाक्षानं पाळली पाहिजे हा महात्मा गांधीजींचा आग्रह अखेरपर्यंत अभंग राहिला. साध्यसाधनविवेक हा त्यांच्या केवळ राजकारणाचा नव्हे तर जीवनाचाही अविभाज्य घटक होता. त्यांच्या राजकीय आणि नैतिक विचारावर विरोधकांनी तर सतत टीका केलीच. पण त्यांच्या सहकाऱ्यांनाही गांधीजींचा पराकोटीचा आदर्शवाद मान्य नव्हता. गांधीजींची सहिष्णुता आणि शत्रूवरही प्रेम करण्याची प्रवृत्ती यामुळं त्यांच्यावर टीकेचा वर्षाव झाला. पण भारतातला सर्वसामान्य माणूस गांधींचा पुरस्कर्ता आणि भक्त होता. कोट्यवधी माणसांची त्यांच्याविषयीची भक्ती पाहून ब्रिटिश राज्यकर्ते स्तंभित झाले. जगातला सर्वाधिक लोकप्रिय नेता अशीच त्यांची प्रतिमा सिद्ध झाली. सामान्य माणसाला गांधीजींच्या रूपानं ईश्वरी शक्ती वावरत आहे असं वाटायचं.

गांधीजी म्हणत असत, ''माझं घर सर्वबाजूंनी बंद व्हावं आणि खिडक्या घट्ट बसाव्यात अशी माझी इच्छा नाही. सर्व राष्ट्रातल्या संस्कृतींनी माझ्या घरात शक्य तेवढ्या मोकळेपणानं घुसावं असं मला वाटतं. परंतु त्या कोणामुळेही माझे पाय घसरावेत असं मला मुळीच वाटत नाही.'' या सुंदर विचारावर भाष्य करण्याची काहीच आवश्यकता नाही. त्यांच्या चिंतनातलं सामर्थ्य या विचारातून लक्षात येतं. आपल्या मनाच्या सर्व खिडक्या उघडून मोकळ्या हवेत आणि प्रकाशात वावरणारे गांधी हे जागरूक तत्त्वचिंतक होते. सर्व संस्कृतींशी आणि विचारांशी परिचय करून घेणाऱ्या या विचारवंताला स्वत:च्या विचारांची सुदृढ बैठक होती. त्यांचा लोकसंवाद अखंड सुरू होता. ज्या गरीब, रंजल्या-गांजल्या लोकांचं प्रतिनिधित्व आपण करतो त्यांच्यात मिसळून गेलं पाहिजे, लोकांपासून अलिप्त राहून लोकप्रबोधन होऊ शकत नाही, याचं भान असलेलं नेतृत्व आज दिसत नाही. पण गांधीजी मात्र समाजातल्या शेवटच्या स्तरातल्या शेवटच्या माणसाचं

भान ठेवीत होते. आत्मभान आणि समाजभान यांचा तोल त्यांनी जन्मभर सांभाळला. यातच त्यांच्या महात्मतेचं बीज सामावलं आहे. करुणा आणि प्रेम, सहिष्णुता आणि क्षमाशीलता, जीवनातल्या कुरूपतेची आणि अभद्रतेची चीड व अन्यायावर तुटून पडण्याची वृत्ती हे त्यांचे गुण त्यांच्यातल्या नेतृत्वाला व कर्तृत्वाला उजाळा देणारे ठरले.

ते ईश्वरभक्त होते. ईश्वरावर प्रगाढ निष्ठा ठेवणारा हा माणूस माणसांत ईश्वर पाहात होता. एका लेखात त्यांनी म्हटलं आहे, 'I am endevouring to see God through service of Humanity. For God is neither in heaven, nor down below but in everyone.' ही श्रद्धा त्यांना आपल्या संस्कृतीतून आणि धर्मातून मिळाली होती. आपण जे वर्तन करतो, जे निर्णय घेतो ते आपल्या आतल्या आवाजामुळं म्हणजेच ईश्वरानं दिलेल्या प्रेरणेतून घेतो असं ते म्हणत असत. आतला आवाज या शब्दप्रयोगाची अनेकांनी चेष्टा केली. पण 'आतला आवाज' याचा अर्थ 'मनोदेवता' किंवा 'ईश्वराची इच्छा' असाच आहे. पण टीकाकारांनी गांधींच्या अनेक गोष्टींवर अज्ञानानं किंवा जाणून-बुजून विरोधी टीका केली. त्यांनी केलेले उपवास, त्यांनी चरख्याला दिलेलं महत्त्व, सूत कातण्याची कृती या सर्वांवर बरीवाईट टीका बुद्धिवादी समजल्या जाणाऱ्या लोकांनी केली आहे. गांधी आपल्या 'आतल्या आवाजानं' दाखवलेल्या वाटेनं चालत राहिले. इतरांना दुराग्रह वाटावा इतका त्यांचा निश्चयी स्वभाव होता. दुर्बळ वाटणाऱ्या या व्यक्तीत जी दुर्दम्य शक्ती होती तिची चिकित्सा त्यांच्या अनेक चरित्रकारांनी केली आहे.

गांधींचा जीवनग्रंथ कोणालाही समग्रपणानं वाचता यावा इतका तो उघडा आहे. कोणापासून काही लपवून ठेवावं असं त्यात काही आढळत नाही. 'माझे सत्याचे प्रयोग' या त्यांच्या आत्मचरित्रात हे जाणवतं. भलीभली माणसं आत्म-समर्थनासाठी आणि आत्मगौरवासाठी आत्मकथा लिहितात. संपूर्ण सत्य लिहीत नाहीत. पण सत्य आणि अहिंसा या दोन तत्त्वांच्या आधारावरच गांधी चालत राहिले. त्यामुळं आपण आयुष्यात मोहाच्या आहारी जाऊन काही चुका कशा केल्या हे त्यांनी प्रांजलपणे सांगितलं आहे. इतकं प्रामाणिक आत्मकथन सहसा आढळत नाही. साहित्यिक म्हणून त्यांच्या योग्यतेचंही दर्शन या आत्मकथेत आणि त्याबरोबरच 'यंग इंडिया' व 'हरिजन' पत्रांतून लिहिलेल्या अनेक लेखांतून

होतं. ते राजकारणी होते. पण त्यांच्या आचारविचारात कोणतंही छद्म नव्हतं. संताची उदारमतवादी वृत्ती त्यांच्यात अधिकाशानं होती. संत बुद्धीनं विचार करतात. पण त्यापेक्षाही ते हृदयानं अधिक विचार करतात. राजकारण असो, समाजकारण किंवा धर्मकारण असो प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपलं अंत:करण ओतून काम केलं.

ते दररोज सकाळी प्रार्थना करीत. त्यांच्या एका प्रार्थनासभेत मला सहभागी होण्याची संधी मिळाली होती. शाळेत जाणारा माझ्यासारखा एक विद्यार्थी त्यावेळी विभूति-पूजनाच्या भावनेनं भारावलेला असला तर त्यात आश्चर्य नाही. प्रार्थना सुरू झाली. उपनिषदातला एक श्लोक म्हटला जात असताना गांधींच्या डोळ्यांतून अश्रू येत होते. त्या संस्कृत श्लोकाचा अर्थ त्यावेळी मला संपूर्ण कळला नाही. तो श्लोक असा -

न त्वहं कामये राज्यं न सुखं न पुनर्भवम् ।
कामये दु:ख तप्तानां प्राणिनाम् आर्तिनाशनम् ॥

मला राज्य नको, सुख नको, पुनर्जन्मही नको. दु:खितांच्या वेदनांचं शमन करण्याची शक्ती मिळावी हीच माझी इच्छा आहे. गांधींच्या व्यक्तित्वाचं चित्र या श्लोकातून उमटलं आहे असं मला वाटतं. महात्म्यांचे अश्रू लोककल्याणाच्या भूमिकेतूनच उत्पन्न होतात. स्वार्थासाठी कोणीही रडेल पण परार्थासाठी अश्रू गाळणं हेच महात्मतेचं लक्षण असतं. गांधींचे अनेक लेख मी 'हरिजन' पत्रातून वाचले होते. पण खऱ्या गांधीचं दर्शन मला त्या प्रार्थनासभेत घडलं. महात्म्याचे पाहिलेले ते अश्रू मी विसरू शकत नाही. हास्य आणि अश्रू मनाचं चित्र दाखवतात.

बर्नार्ड शॉला पत्रकारांनी प्रश्न विचारला होता, 'भारतभेटीत तुम्ही काय पाहिलं ?' शॉ म्हणाला, ''मी भारतात तीन सुंदर गोष्टी पाहिल्या. हिमालयाची हिमाच्छादित शिखरं, यमुनेच्या तीरावरील ताजमहाल आणि गांधीजींच्या मुद्रेवरील हास्य.'' पहिल्या दोन सौंदर्याबद्दल शंका नव्हती. पण गांधींच्या सुरकुतलेल्या, वृद्ध दंतहीन मुखावरील हास्य शॉला आकृष्ट करून घेणारं ठरलं यात विशेष अर्थ आहे. जे हास्य मनाच्या निर्मल भावनेतून मुद्रेवर येतं त्या निरागस हास्याला एक आगळं सौंदर्य असतं. गांधींच्या हसण्यात बालकाची निरागसता व्यक्त व्हायची. असं निर्हेतुक, निष्पाप हास्य ज्याला हसता येतं तो माणूस सामान्य असतं नाही. 'The great man is he who does not lose his child's heart.' हेच खरं.

गांधींच्या व्यक्तित्वात फुलांची कोमलता आणि वज्राची कठोरता यांचं मिश्रण झालेलं होतं. आपलं सर्व जीवन त्यांनी शिस्तीच्या चौकटीत बसवलं होतं. आध्यात्मिक प्रवृत्तीमुळं कोणत्याही प्रलोभनाच्या आहारी जाऊन ते आपल्या अंगीकृत कार्यापासून विचलित झाले असं दिसत नाही. त्यांचा प्रभाव केवळ भारतीय जनतेवरच पडला असं नव्हे तर साऱ्या जगावरच त्यांच्या व्यक्तित्वाची आणि विचाराची मुद्रा उमटू शकली. मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला, हो चि मिन्ह अशा अनेक देशभक्तांनी गांधींपासून प्रेरणा मिळवली. केवळ भारत स्वतंत्र होऊन गांधींचं समाधान होण्यासारखं नव्हतं. जगातल्या परतंत्र राष्ट्रांनी आपले साखळदंड तोडावेत यासाठी शक्ती निर्माण करणारं एक तत्त्वज्ञान त्यांनी तयार केलं. त्यांचं मोठेपण यातच आहे. 'महात्मा' ही संज्ञा जनतेनं त्यांना स्वयंस्फूर्तीनं दिली होती. काही नेते तर त्यांचा उल्लेख केवळ 'मिस्टर गांधी' असा करीत होते. 'महात्मा' या विशेषणाला ते मान्यता देत नव्हते. अर्थात तो त्यांचा प्रश्न होता. दुसऱ्याला महात्मा असं संबोधल्यामुळं त्यांचा अहंकार कदाचित दुखावला जात असेल. पण त्यांची महानता एखाद्या लहानशा प्रसंगातूनही व्यक्त होत होती. याची अनेक उदाहरणं देता येतील.

स्वातंत्र्योत्सव सोडून नौखालीतलं जातीय दंग्यांनी रक्तरंजित झालेलं वातावरण स्वच्छ करण्यासाठी गांधी नौखालीत घरोघरी आणि झोपडी-झोपडीत जात होते. हिंदू, मुसलमान दोघेही प्रक्षुब्ध झाले होते. परस्परांचं रक्त सांडत होते. अशा स्थितीत शांतीचा संदेश देत गांधी फिरत होते. दु:खितांचे डोळे पुसत होते. पण जातीय क्षोभाची तापलेली हवा निवळत नव्हती. संध्याकाळी आपल्या झोपडीकडं परतल्यावर त्यांच्या नातीनं- मनू गांधीनं पाय धुण्यासाठी गरम पाणी दिलं. गांधी म्हणाले, ''या देशातल्या लक्षावधी लोकांना अन्न शिजवण्यासाठी पुरेसं इंधन मिळत नाही. मी माझे पाय धुण्यासाठी गरम पाणी घेणं हा गुन्हा आहे. ही चैन मला परवडणारी नाही.'' त्यांनी थंड पाण्यानंच हातपाय धुतले.

गांधींची महात्मता अशा अनेक लहान-सहान घटनांतूनही दिसून येते. आपल्या आश्रमात ते सर्वांना आपल्या हातानं भोजन वाढत असत. कुष्ठरोगानं आजारी झालेल्या परचुरे शास्त्र्यांना त्यांनी आश्रमात ठेवून घेतलं. आणि ते स्वत: त्यांची सेवाशुश्रूषा करीत होते. आम्हां सामान्य माणसांची शोकांतिका अशी की आम्हाला संत महात्मे नीट ओळखता येत नाहीत. महात्म्याला सोडून एखाद्या

दुरात्म्याची पूजा करणारी लोकबुद्धी किती आकुंचित असते याची अनेक उदाहरणं देता येतील. आज गांधीजींचे पुतळे देशात ठिकठिकाणी उभे आहेत. जयंती आणि पुण्यतिथीला एखादा हार उपचार म्हणून त्या पुतळ्यांच्या गळ्यात पडतो. आजच्या पिढीला तर गांधींचं संपूर्ण नावही माहीत नसतं. खरं तर हा गांधींचा पराभव नसून तो आजच्या पिढीचा पराभव म्हटला पाहिजे. महात्मे येतात आणि जातात. फार तर ते लोकांच्या पूजेचे विषय होतात. मूर्तिपूजा वाढत जाते. महात्म्याचं कार्य मात्र विस्मरणाच्या अंधारात नाहीसं होतं. साऱ्या जगातच हे घडतं. महान व्यक्ती एकदा काळाच्या ओघात हरवून गेली म्हणजे तिचा शोध घेणं कठीण असतं. त्याचे अनुयायीच त्याला विसरून जातात. गांधींच्याही दैवात हेच लिहिलेलं असावं. या नावाचा एक महापुरुष या देशात होऊन गेला हे आमच्या लक्षात आहे काय ? सामान्य मळखाऊ माणसं आपल्या साचेबंद जीवनपद्धतीतून बाहेर पडत नाहीत. कोणी संत महात्मा आला म्हणून त्यांची ठरलेली चाकोरी बुजत नाही.

राजकारणात नीतितत्त्वांचं कटाक्षानं पालन व्हावं आणि सामान्य माणसाचं जीवनमान उंचावत नेण्याचं कार्य या माध्यमातून होत राहावं हे गांधींचं आवडतं स्वप्न होतं. आदर्श राज्याला ते 'रामराज्य' म्हणत असत. स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे झाली तरीही राम अद्यापि वनवासातच वणवणत आहे. गांधींनी शुद्ध, स्वच्छ नैतिकतेवर आधारलेल्या राजकारणाचा सतत पुरस्कार केला. या संदर्भात लो. टिळक आणि म. गांधी यांच्यात पत्रव्यवहारही झाला. टिळकांनी गीतेचा अर्थ 'शठे शठम्' असा लावला. गांधींनी मात्र 'शठं प्रति सत्यम्' असा गीतेचा अर्थ घेतला. 'राजकारण' हा साधूंचा खेळ नव्हे.' असं टिळकांनी गांधींना लिहिलं होतं. पण गांधींना हे विधान मान्य नव्हतं. 'जीवनव्यवहारात आणि विशेषत: राजकारणात साधुत्वानं वागून यश मिळत नाही', असं त्यांनी गांधींना पत्रातून लिहिलं. टिळकांच्या विधानात सत्य आहे. पण गांधींचं विधानही 'शठम् प्रत्यपि सत्यम्' सयुक्तिक आहे.

हा दोन महापुरुषांचा वाद-संवाद होता. दोघांच्याही मताला अनुभवाची बैठक आहे. आणि या दोन्ही मतांना मर्यादाही आहेत. हे दोन्ही नेते गीतेचे भोक्ते होते. चारित्र्यानं संपन्न होते. दोघांनीही देशाच्या कल्याणासाठी व स्वातंत्र्यासाठी आपलं आयुष्य वाहिलं होतं. राजकारणात नैतिक निष्ठांना अतिरेकी महत्त्व दिलं तर अपयश येण्याची भीती असते. दुष्टत्वाचा प्रतिकार साधुत्वानं होणं नेहमीच

शक्य नसतं. पण साधूपणानं प्रतिकार होणं शक्य असेल तर प्रथम तो साधूपणानेच करावा असं लो. टिळकांनी 'गीतारहस्यात' म्हटलं आहे. पण साधुत्वानं दुष्टांचं निवारण करणं शक्य नसेल तर 'शठम् प्रति शाठ्यम्' असंच वागलं पाहिजे कारण ते अपरिहार्य आहे, ही टिळकांची भूमिका. पण गांधींचा आग्रह दुष्टत्वाचा प्रतिकार साधुत्वानंच करावा असा होता. दोन तत्वचिंतकांच्या या उच्च वादविवादात सामान्य माणसानं पडू नये. थोडा विचार केला तर ही दोन्ही मतं तर्कशुद्ध वाटतात. टिळकांच्या मतात व्यवहारबुद्धीचेही दर्शन होते. गांधी मात्र साधनशुचितेचा आग्रह सोडत नाहीत. या दोन विचारांचा समन्वय करता येणं शक्य आहे. आजच्या राजकारणात उच्च पातळीवरून कोणी तत्त्वशुद्ध विचार करीत नाही हे राजकारणाचं अध:पतन आहे. गांधींच्या सत्याग्रह विचारात हृदयपरिवर्तनाचं तत्त्व सामावलेलं आहे. दुष्टांची हिंसा ही देखील हिंसाच मानावी लागते. आणि ती शुद्ध नैतिकदृष्ट्या निर्दोष ठरत नाही. पण जेव्हा राष्ट्राचा गाडा ओढावा लागतो आणि सज्जनांचं संरक्षण व संवर्धन करावं लागतं तेव्हा दुर्जनांचं निर्दालन करणं आवश्यक असतं. त्यात होणारी हिंसा गृहित धरून सुद्धा दुष्टांचा संहार राष्ट्ररक्षणासाठी जरुरीचा असतो. स्वत: गांधींनी देखील परकीयांचं आक्रमण झालं तेव्हा सैन्य पाठवून देशाच्या सीमांचं रक्षण केलं पाहिजे असंच म्हटलं होतं. गांधींच्या दृष्टीसमोर उत्तुंग आदर्शाचं शिखर होतं. देशात हिंसा घडूच नये, अहिंसा आणि प्रेम या तत्त्वांच्या प्रभावानं देश सुखी व्हावा ही त्यांची भूमिका होती. पण आदर्शाला देखील व्यवहाराची कुंपणं घालावी लागतात. रामालाही रावणाचं हृदयपरिवर्तन करता आलं नाही. अहिंसेसाठीच कित्येक वेळा हिंसेचा मार्ग पत्करावा लागतो.

'If you want peace be prepared for war' या वचनातही आपद्धर्म म्हणून हिंसेचं आचरण अनिवार्य असतं असा आशय आहे. युद्धापासून परावृत्त होऊ पाहणाऱ्या अर्जुनाला कृष्णानं कर्तव्य म्हणून युद्ध केलं पाहिजे हेच सांगितलं. गांधीजींच्या विचारात्त अहिंसेचा अतिरेक होतो असा आक्षेप त्यांच्या काळात त्यांचे सहकारीही घेत होते. पण भ्याडपणापेक्षा हिंसा चालेल असाही निर्णय गांधींनी दिला होता. गांधी आणि टिळक यांच्यातले मतभेद उच्च तात्त्विक पातळीवरचे होते. या दोन्ही महापुरुषांची विचारसरणी त्या उंचीवर जाऊनच पाहिली पाहिजे. आज आपल्या देशात हिंसेला महापूर आला आहे. शेकडो निरपराध माणसं हिंसेचे बळी होत आहेत. गांधींचा दृष्टिकोन काही अंशी तरी शासनानं

आणि जनतेनं आचारात आणला तर वातावरणातली हिंस्रता, क्रूरता, आणि अन्याय नियंत्रणात येईल. हिंसा, अहिंसेचा प्रश्न आणि टिळक-गांधींची भूमिका एका विस्तृत लेखाचा विषय असल्यामुळं त्यांची इथं अधिक चर्चा करणं शक्य नाही.

अहिंसात्मक स्वातंत्र्यलढ्यात गांधींनी भारताला जे अपूर्व स्वरूपाचं नेतृत्व दिलं ते विलक्षण होतं. पण केवळ स्वातंत्र्यलढ्याचे सर्वोच्च नेते इतकंच गांधींचं कार्य मर्यादित नाही. या माणसानं मानवजातीची मान आपल्या कर्तृत्वानं उन्नत केली. इतिहासाचा ओघ बदलला. जन्मभर सत्य आणि अहिंसा या मूल्यांची ध्वजा त्यांनी जगभर नाचवली.

आज गांधींचा विचार करताना त्यांच्यातलं संतत्व आणि उत्कट मानवप्रेम हेच प्राधान्यानं लक्षात येतं. उच्च जीवनमूल्यांच्या रक्षणासाठी ते सतत लढत राहिले. अहिंसा हे त्यांचं साधन नव्हतं तर साध्य होतं. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास भेदू ऐसे' हा त्यांच्या वृत्तीचा स्थायी विशेष होता. एक राजकारणी नेता म्हणून त्यांच्याकडं पाहणं अत्यंत अपुरं आहे. जीवनाच्या प्रवाहाचं शुद्धीकरण करणं हेच या संताचं प्रमुख कार्य होतं. गांधींच्या विचार आणि व्यक्तित्वांवर धर्मतत्त्वांचा अधिक प्रभाव होता.

१९२० पासून पुढे अठ्ठावीस वर्षे गांधींनी भारतीय जनतेला जे वैचारिक, राजकीय आणि सामाजिक नेतृत्व दिलं त्यामुळं जनतेत अन्यायाविरुद्ध लढण्याची ऊर्मी निर्माण झाली. गांधींचं सारं जीवनकार्य किती प्रमाणात सफल झालं याचं गणित मांडणं शक्य नाही. यश आणि अपयश यांचे चढउतार त्यांच्या जीवनात येऊन गेले. जी स्वप्नं त्यांनी रंगवली ती आजतरी उद्‌ध्वस्त झालेली दिसतात. गांधींच्या पाउलखुणा पुसत होत चालल्या. आजच्या परिस्थितीत गांधी हा कदाचित कालबाह्य झालेला महान विषय आहे असंच म्हणावं लागेल. महापुरुष विशिष्ट काळानंतर केवळ नावानं उरतात आणि पूजेचे विषय होतात.

बुद्ध, महावीर आणि ख्रिस्त यांच्याही कपाळावर पराभवाच्या रेषा काळानं रेखाटल्या आहेत. या आपत्तीतून गांधीही सुटू शकत नाहीत. काळ पुढे गेला, जग पुढं गेलं. पण गांधींनी प्रस्थापित केलेल्या आदर्शांना मात्र ते अजून गाठू शकलं नाही. उलट त्याची परागती मात्र होत आहे. हे अपयश गांधींचं की त्यांना समजू न शकणाऱ्या जगाचं ? याचा विचार गंभीरपणानं केला पाहिजे. एक गोष्ट मात्र

खरी, आईन्स्टाइन म्हणाला होता, ''हाडामांसाचा असा एक माणूस या भूतलावर होऊन गेला यावर पुढच्या पिढीचा विश्वास बसणार नाही.'' गांधीजींचं लोकोत्तर व्यक्तिमत्त्व ही लोकांना एक दंतकथा वाटेल इतकी ती बेगळी आणि विलक्षण आहे. 'ती विलक्षण आहे' इतकं जरी समजलं तरीही चालेलं. १९०९ साली म्हणजे जेव्हा गांधी 'महात्मा' झाले नव्हते तेव्हा त्यांचे गुरू ना. गोपाळकृष्ण गोखले म्हणाले होते,

'He is a man, who may well be discribed as a man among men, a hero among heroes patriot among patriots and we may will say that in him Indian humanity has really reached it's high watermark.'

गोखल्यांचे हे शब्द कोणत्याही अर्थानं अतिशयोक्तीचे नाहीत. एका विद्वान राजकारणी विचारवंतानं गांधींचं केलेलं हे मूल्यमापन सयुक्तिक आहे. आज गांधींना 'राष्ट्रपिता' म्हणायलाही तयार नसणारे काही अतिविद्वान लोक आहेत. बापाला बाप न म्हणणं हा मुलाच्या पराक्रमाचा उच्चांक असतो ! पण नि:पक्षपाती इतिहासकार गोखल्यांच्या अभिप्रायाखाली आपली सही करील यात शंका नाही. जगाच्या अशक्त पोटाला महापुरुष पचवता येत नाहीत हे पूर्वीही घडलेलं आहे. गांधींच्या बाबतीत त्याची पुनरावृत्ती झाली इतकंच म्हणता येईल.

■■■

जीवनाच्या वाटेवर काटे पुष्कळ, फुलं थोडी असतात. जीवनाकडं पाठ फिरवणं शक्यच नसतं. सुखाला रंग आणि गंध येतो तो दु:खाच्या स्पर्शानं. निर्मलकुमार फडकुले यांचा हा वैचारिक लेखसंग्रह. जीवनाचं दर्शन आणि त्याचं संवेद्य मनानं केलेलं चिंतन व चिंतनातून काढलेले आशावादी, परिपूर्ण निष्कर्ष हे या लेखनाचं मध्यवर्ती वैशिष्ट्य. स्त्रियांचे प्रश्न, धर्म, नेतृत्व, आजचं शिक्षणक्षेत्र, साहित्य, नियती आणि पुरुषार्थ, सीता, द्रौपदी, आंबेडकर, जीवन, प्रेम, परमेश्वर अशा विविध विषयांवर आपल्या चिंतनशील, शैलीदार, मोहक, अवखळ शब्दकळेनं फडकुले यांनी लेखन केलं आहे. 'अर्जुनाचा प्रश्न' सांगताना 'गीतेचं सार' सांगितलं आहे. 'जगाला प्रेम अर्पावे' यात साने गुरुजींची चिंतनशीलता वेगळ्या दृष्टिकोनातून दाखवली आहे.